कार्यालयीन कामकाजासाठी

महाराष्ट्र शासन

# वेतन त्रुटी निवारण समिती (७ वा वेतन आयोग)

## अहवाल

श्री.मुकेश खुल्लर,
अध्यक्ष, भा.प्र.से.(से.नि.)
माजी अप्पर मुख्य सचिव (सेवा),
सामान्य प्रशासन विभाग

श्रीमती व्ही. राधा, भा.प्र.से.
अप्पर मुख्य सचिव (सेवा),
सामान्य प्रशासन विभाग

श्री.सौरभ विजय, भा.प्र.से.
प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग

सन-२०२४

मुंबई.

# वेतन त्रुटी निवारण समिती

**(७ वा वेतन आयोग)**

**अहवाल**

श्री.मुकेश खुल्लर,
अध्यक्ष, भा.प्र.से.(से.नि.)
माजी अप्पर मुख्य सचिव (सेवा),
सामान्य प्रशासन विभाग

श्रीमती व्ही.राधा,
सदस्य, अप्पर मुख्य सचिव (सेवा),
सामान्य प्रशासन विभाग.

श्री.सौरभ विजय,
सदस्य,प्रधान सचिव (व्यय),
वित्त विभाग.

**मुंबई,**

**दि. ३१ डिसेंबर, २०२४**

अनुक्रमणिका



| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | प्रकरण-१ – प्रस्तावना | ९ |
| २ | प्रकरण-२ - समितीचा दृष्टीकोन | ११-१८ |
| | प्रकरण-२ (अ) समितीला आढळलेल्या प्रशासकीय सुधारणांसंबंधाने सूचना | १९ |
| | प्रकरण-२ (ब) प्रशासकीय सुधारणांबाबत विभागाचे आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम | |
| ३ | प्रकरण-३ - प्रशासकीय विभागांचे प्रस्ताव आणि त्यावरील समितीच्या शिफारशी. | २१-४९ |
| | ३.१ (अ) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग<br>अ) कृषि आयुक्तालय<br>ब) दुग्धव्यवसाय विकास विभाग<br>क) पशुसंवर्धन आयुक्तालय<br>ड) कृषि विद्यापीठे<br>इ) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ | |
| | ३.२ सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग<br>अ) रेशीम संचालनालय | ५०-५२ |
| | ३.३ वित्त विभाग<br>अ) वस्तू व सेवाकर कार्यालय<br>ब) विमा संचालनालय | ५३-५७ |
| | ३.४ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग<br>अ) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा<br>ब) नियंत्रक वैधमापनशास्त्र | ५८-६२ |
| | ३.५ सामान्य प्रशासन विभाग<br>अ) मंत्रालयीन संवर्ग<br>ब) माहिती व जनसंपर्क कार्यालय<br>क) लोकआयुक्त कार्यालय<br>ड) महाराष्ट्र लोकसेवा आयोग<br>इ) सैनिक कल्याण विभाग<br>ई) शासकीय परिवहन सेवा/ सह्याद्री अतिथीगृह/ | ६३-९४ |

| | |
|---|---|
| नंदगिरी अतिथीगृह | |
| ३.६ उच्च व तंत्र शिक्षण विभाग<br>अ) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)<br>ब) तंत्रशिक्षण संचालनालय<br>क) अकृषि विद्यापीठे | ९५-१११ |
| ३.७ गृह विभाग<br>अ) पोलीस महासंचालक<br>ब) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग<br>क) पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई<br>ड) संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि शासकीय रासायनिक विश्लेषक<br>इ) कारागृह महानिरीक्षक<br>फ) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क | ११२-१३० |
| ३.८ उद्योग, उर्जा व कामगार विभाग<br>अ) उद्योग संचालनालय<br>ब) मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय<br>क) कामगार आयुक्त<br>ड) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य<br>इ) मुख्य विद्युत निरीक्षक (निरीक्षण व शुल्क शाखा)<br>फ) औद्योगिक न्यायालय | १३१-१४२ |
| ३.९ विधि व न्याय विभाग<br>अ) उच्च न्यायालय, मुंबई<br>ब) जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय(ग्रामीण)<br>क) कौटुंबिक न्यायालय<br>ड) धर्मादाय आयुक्त<br>इ) निबंधक, भागिदारी संस्था<br>फ) विधि व न्याय विभाग (मंत्रालय स्तर) (विधि संवर्ग)<br>ग) महाराष्ट्र राज्य सेवा विधि प्राधिकरण | १४३-१५६ |
| ३.१० मराठी भाषा विभाग<br>अ) भाषा संचालनालय<br>ब) महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ | १५७-१६० |

| | |
|---|---|
| ३.११ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग<br>अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय<br>ब) आयुष संचालनालय | १६१-१८१ |
| ३.१२ इतर मागास व बहुजन कल्याण विभाग<br>अ) इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय | १८२-१८३ |
| ३.१३ नियोजन विभाग<br>अ) अर्थ व सांख्यिकी संचालनालय | १८४-१८९ |
| ३.१४ सार्वजनिक आरोग्य विभाग<br>अ) आरोग्य सेवा संचालनालय | १९०-२१६ |
| ३.१५ सार्वजनिक बांधकाम विभाग<br>अ) सार्वजनिक बांधकाम विभाग सर्व मंडळे<br>ब) मुख्य अभियंता विद्युत<br>क) संचालक, उपवने व उद्याने<br>ड) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन | २१७-२२६ |
| ३.१६ महसूल व वन विभाग<br>अ) महसूल विभाग<br>ब) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख<br>क) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक अधीक्षक<br>ड) मुख्य वनसंरक्षक | २२७-२४४ |
| ३.१७ ग्रामविकास व जलसंधारण विभाग | २४५-२६३ |
| ३.१८ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग<br>अ) शिक्षण संचालनालय<br>ब) शिक्षण आयुक्तालय, पुणे | २६४-२७३ |
| ३.१९ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग<br>अ) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय | २७४-२७७ |
| ३.२० सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | २७८ |
| ३.२१ आदिवासी विकास विभाग<br>अ) आदिवासी आश्रमशाळा | २७९-२८८ |
| ३.२२ नगर विकास विभाग<br>अ) नगररचना व मुल्य निर्धारण संचालनालय | २८९-२९१ |
| ३.२३ जलसंपदा विभाग<br>अ) पाटबंधारे विभाग, मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना व सर्व प्रादेशिक मंडळे | २९२-२९९ |

| | | |
|---|---|---|
| | ३.२४ पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग<br>अ) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा | ३००-३१५ |
| | ३.२५ महिला व बालविकास विभाग<br>अ) महिला व बाल विकास आयुक्तालय | ३१६-३१७ |
| | ३.२६ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | ३१८-३२५ |
| | ३.२७ वाहन चालक संवर्ग | ३२६-३२७ |
| ४ | प्रकरण-४-समितीची प्रशासकीय सुधारणा संबंधी टिप्पणी व सादरीकरण | ३२९-३३५ |
| ५ | ऋणनिर्देश | ३३७ |
| ६ | समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले प्रशासकीय विभाग प्रमुख / विभाग प्रमुख आणि अधिकारी / कर्मचारी संघटनांची यादी | ३३९-३४२ |
| ७ | वेतन त्रुटी निवारण समितीची नियुक्ती व अनुषंगिक शासन निर्णय | ३६१ |

प्रकरण-१

प्रस्तावना

सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या (बक्षी समिती) शिफारशींच्या आधारे दि.१जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सुधारित वेतनश्रेणीतील संभाव्य त्रुटींचे निवारण करण्यासाठी वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९ दि.१६ मार्च, २०२४ अन्वये श्री. मुकेश खुल्लर, भा.प्र.से.(सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली वेतन त्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली. अ.मु.स.(सेवा), सामान्य प्रशासन विभाग आणि प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांना समितीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले. अहवाल सादर करण्यासाठी समितीस नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आली. समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे होती :-

(अ) ज्या संवर्गाच्या संदर्भात न्यायालयाने सातव्या वेतन आयोगातील त्रुटींबाबत आदेश दिले असतील अशा संवर्गाच्या वेतनश्रेणीतील त्रुटींचा सखोल अभ्यास करून अहवाल सादर करणे.

(ब) प्रशासकीय विभागांकडून एखाद्या विशिष्ट संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीमधील त्रुटी संबधित सादर होणाऱ्या प्रकरणांची तपासणी करणे.

समितीला आपल्या कामासाठी स्वतःची कार्यपद्धती ठरविण्याची मुभा देण्यात आली होती.

२. ज्या संवर्गाच्या सुधारित वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आहेत अशी प्रशासकीय विभागाच्या सचिवांची / विभागप्रमुखांची खातरजमा झाली असेल, त्या संवर्गाच्या वेतनत्रुटी निवारण्याचे प्रस्ताव त्यांनी तपासून आवश्यक त्या समर्थनासह ४ प्रतींमध्ये प्रथमतः दि.१६ मे, २०२४ पर्यंत समितीकडे सादर करावयाचे होते. या कालावधीतील लोकसभा सार्वत्रिक निवडणुका आणि विधानमंडळ अधिवेशन कामकाज विचारात घेऊन, वित्त विभागाच्या दि. ३१ मे, २०२४ रोजीच्या पत्रानुसार समितीकडे प्रस्ताव सादर करण्याची मुदत दि.१० जून, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली.

३. दरम्यानच्या कालावधीत अ.मु.स.(सेवा), सामान्य प्रशासन विभाग या पदावर श्रीमती व्ही. राधा यांची नियुक्ती झाली. त्यानंतर वेतनत्रुटी निवारण समितीच्या कामकाजात त्यांनी भाग घेण्यास सक्रियपणे सुरुवात केली.

४. वेतनत्रुटी निवारण समितीच्या बैठकांना संबंधित प्रशासकीय विभागांचे सचिव आणि विभागप्रमुख तसेच संबंधित कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींना (प्रशासकीय विभागांमार्फत) बोलविण्यात आले. विविध प्रशासकीय विभागांकडून समितीच्या विचारार्थ सुमारे ४४२ संवर्गाचे प्रस्ताव प्राप्त झाले, त्यापैकी ४४१ संवर्गासंबंधीच्या शिफारशी या अहवालात समाविष्ट आहेत.

काही प्रस्ताव वेतनत्रुटीशी संबंधित नसल्यामुळे त्याबाबत वित्त विभागाच्या सल्ल्याने/ सहमतीने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. माहे जुलै ते सप्टेंबर, २०२४ या कालावधीत विविध प्रशासकीय विभागांचे सचिव आणि विभागप्रमुख तसेच संबंधित कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत बैठका घेऊन समितीने त्यांची मते / विचार जाणून घेतले. वेतनत्रुटी निवारण समितीच्या विचारार्थ प्राप्त झालेल्या प्रस्तावांसंदर्भात चर्चा करण्यासाठी जुलै ते सप्टेंबर, २०२४ या कालावधीत समितीच्या एकूण ३० बैठका घेण्यात आल्या.

---

२. प्रकरण- २

## समितीचा दृष्टीकोन

### २.१ पार्श्वभूमी:-

२.१.१ केंद्र शासनाने चौथ्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील निर्णयानुसार केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या. केंद्र शासनाच्या सुधारित वेतनश्रेणींच्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.बी.एन.नाईक यांच्या अध्यक्षतेखाली "वेतन समानीकरण समिती" नियुक्त करण्यात आली होती. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार या समितीने राज्य शासनाकडील संवर्गांची / पदांची केंद्र शासनाकडील संवर्गांशी / पदांशी समकक्षता (Equivalence) निश्चित केली. तसेच राज्य शासनाकडील ज्या संवर्गांशी / पदांशी केंद्र शासनाकडे समकक्ष (Equivalent) संवर्ग / पदे आढळून आली नाहीत, अशा संवर्गांना / पदांना समुचित सुधारित वेतनश्रेणींची शिफारस केली होती.

२.१.२ राज्य शासनाकडील ज्या संवर्गांची/पदांची केंद्र शासनाकडील संवर्ग/पदांशी समकक्षता प्रस्थापित होऊ शकली नाही, अशा संवर्गांना/पदांना समुचित सुधारित वेतनश्रेणींची शिफारस करताना संवर्गांची/पदांची सुधारणापूर्व वेतनश्रेणी, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे कुशल/अकुशल व तांत्रिक/अतांत्रिक स्वरुप, पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठी किमान शैक्षणिक अर्हता, पदवी/पदविकेचे स्वरुप, पदोन्नती साखळी इत्यादी विविध बाबी/निकष विचारात घेतले होते. परिणामी विविध प्रशासकीय विभागांमधील बहुतांश संवर्गांचे/पदांचे आणि वेतनश्रेणींचे सुसुत्रीकरण केले गेले. मात्र अशा प्रकारे मूल्यमापनाच्या आधारे वेगवेगळ्या प्रशासकीय विभागांमधील संवर्गांना/पदांना अथवा एकाच विभागामधील विविध संवर्गांना/पदांना एकच वेतनश्रेणी विहित करण्यात आली असली तरी त्यांच्यामध्ये थेट समकक्षता (Equivalence) प्रस्थापित करण्यात आली नव्हती.

२.१.३ तथापि, एखाद्या विभागातील ज्या संवर्गातील पदे अन्य विभागाच्या आस्थापनेवर आहेत त्या संवर्गांना/पदांना मूळ विभागातील संवर्गाप्रमाणे/पदांप्रमाणेच सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करण्यात आली होती. म्हणजेच राज्यातील विविध प्रशासकीय विभागांतर्गत संवर्गामध्ये समकक्षता प्रस्थापित करण्यात आली आहे.

२.१.४ चौथ्या वेतन आयोगामध्ये (वेतन समानीकरण समिती - नाईक समिती) स्वीकारलेली प्रमुख तत्वे सर्वसाधारणपणे पुढे पाचव्या (सुकथनकर समिती) व सहाव्या (हकीम समिती) वेतन आयोगातही विचारात घेण्यात आली आहेत. तथापि, हकीम समितीने सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेली सुधारित वेतनसंरचना राज्य शासनाकडील समकक्ष (Equivalent) संवर्गांना/ पदांना जशीच्या तशी लागू न करता त्यामध्ये बदल सुचवून सुधारित वेतनसंरचनेची शिफारस (परिच्छेद ३.४.२) केली.

२.२ समितीने विचारात घेतलेल्या मूल्यमापनविषयक आधारभूत बाबी:-

२.२.१ विविध प्रशासकीय विभागांकडून समितीच्या विचारार्थ प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे मूल्यमापन करताना वेतन समानीकरण समिती व सुकथनकर समिती त्याचप्रमाणे हकीम समिती या समित्यांनी स्वीकारलेला दृष्टीकोन विचारात घेतला आहे.

तथापि, वेतन समानीकरण समितीने केंद्र शासनाकडील पदांशी समकक्ष ठरवलेल्या राज्य शासनाकडील पदांना केंद्र शासनाप्रमाणे जशीच्या - तशी सुधारित वेतन संरचना लागू करण्याच्या मुद्यासंदर्भात वेतनत्रुटी निवारण समितीने (बक्षी समिती, २०१२), त्यांच्या अहवालातील परीच्छेद २.३ मध्ये स्वतंत्रपणे नमूद/विशद केलेले निष्कर्षही विचारात घेतले आहेत.

२.२.२ आता ७व्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासनानेदेखील वेतनश्रेणींवर आधारित सुधारित वेतनरचना स्वीकारली आहे. याकरिता, सहाव्या वेतन आयोगातील प्रत्येक ग्रेड वेतनाशी संबंधित स्वतंत्र वेतनश्रेणी विहित करण्यात आली आहे.

२.२.३ कोणत्याही संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना सर्वसाधारणतः त्या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे कुशल - अकुशल व तांत्रिक - अतांत्रिक स्वरुप, पदाचा दर्जा, पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठी किमान शैक्षणिक अर्हता, पदवी/पदविकेचे स्वरुप, पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सार्वजनक/प्रशासकीय सेवेतील स्थान व सेवेचे महत्व आणि त्याअनुषंगाने येणाऱ्या विशिष्ठ जबाबदाऱ्या इत्यादी घटक/ निकष विचारात घेऊन, मूल्यमापनांती त्या संवर्गास वेतनश्रेणी विहित केली जाते.

वरील निकषांच्या आधारे स्वतंत्र मूल्यमापनानुसार विविध संवर्गाच्या वेतनश्रेणी विहित/सुधारित करताना वेगवेगळ्या विभागांमधील वेगवेगळ्या संवर्गांना तसेच एकाच विभागांतर वेगवेगळ्या संवर्गांना एखाद्या विशिष्ठ वेतन आयोगामध्ये समान वेतनश्रेणी मंजूर केली जाते. अशा प्रकारे समान वेतनश्रेणी अनुज्ञेय केली गेली असली तरी, त्या सर्व संवर्गांमध्ये आपापसात समकक्षता प्रस्थापित केली आहे असे मानता येत नाही, कारण विहित केलेली वेतनश्रेणी स्वतंत्र मूल्यमापनाच्या आधारे मंजूर केलेली असते. वेगवेगळ्या पदांना समान वेतनश्रेणी मंजूर करताना त्यांची आपापसात सांगड घातली गेली असल्यासच त्या पदांमध्ये समकक्षता आहे असे म्हणणे उचित ठरते.

एखाद्या विशिष्ठ वेतन आयोगामध्ये समान वेतनश्रेणीत असलेल्या संवर्गापैकी काही संवर्गांना तदनंतर प्रशासकीय संरचनेची पुनर्रचना/आकृतीबंधातील बदल, नव्याने सोपवलेली जिकिरीची/विशिष्ट स्वरूपाची जबाबदारी अथवा अन्य प्रशासकीय कारणास्तव तुलनेने उच्च वेतनश्रेणी मंजूर केली असल्यास इतर संवर्गांनादेखील तीच उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याची

मागणी समर्थनीय ठरत नाही. कारण श्रेणीवर्धनासाठी विचारात घेतलेले मुद्दे/निकष इतर संवर्गाच्याबाबतीत तंतोतंत लागू ठरतातच असे नाही, त्यामुळे असे श्रेणीवाढीचे प्रस्ताव वेतन त्रुटी समजता येणार नाहीत.

थोडक्यात, कोणत्याही संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना विविध निकष विचारात घेतले जातात. अशा प्रकारे वेतनश्रेणी विहित करताना विविध संवर्गांना स्वतंत्र मूल्यमापनाअंती समान/समकक्ष वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते. अशा समान/समकक्ष वेतनश्रेणीतील संवर्गांमध्ये थेट समकक्षता प्रस्थापित झालेली नसली तरी वेतनश्रेणीच्याबाबतीत सापेक्षता निर्माण होते. तथापि, एखाद्या संवर्गास वरील परिच्छेदात नमुद कारणास्तव तुलनेने उच्च वेतनश्रेणी लागू केल्यास त्या संवर्गाची अन्य संवर्गाशी असलेली वेतनश्रेणीची सापेक्षता भंग पावते किंबहुना अशा परिस्थितीत ते अपरिहार्य ठरते.

२.२.४ सर्वसाधारणतः दर दहा वर्षांनी होणाऱ्या वेतन सुधारणेच्या प्रत्येक वेळी पूर्वी अस्तित्वात असलेल्या वेतनश्रेणींची संख्या कमी करण्यात आलेली आहे. थोडक्यात, वेतनश्रेणीची संख्या कमी करण्याच्या प्रक्रियेमुळे पूर्वीच्या काही वेतनश्रेणींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. एकत्रित केलेल्या दोन पैक्षा अधिक वेतनश्रेणींना एकच सुधारित वेतनश्रेणी दिल्यामुळे वेतनश्रेणीतील पूर्वीची सापेक्षता भंग पावणे अनिवार्य आहे. प्रत्यक्षात, सर्वसाधारणतः सुमारे दहा वर्षांच्या कालावधीनंतर, दरम्यान झालेल्या स्थित्यंतराच्या अनुषंगाने सर्व पदांचे पुनर्मूल्यांकन, एकत्रितपणे व एकाच वेळी आणि सापेक्षतेवरही योग्य भार देवून, अपेक्षित असते व त्याकरिताच वेतन आयोगासारखी स्वतंत्र, जबाबदार व उच्चस्तरीय समिती नेमण्याचा प्रघात रुढ झाला आहे. मात्र, यामुळे संवर्गातील पूर्वीची सापेक्षता काही प्रमाणात विस्कळित/भंग होणे नैसर्गिक आहे.

वरील वस्तुस्थितीवर आधारित विवेचनाचा सांगोपांग विचार केल्यानंतर समिती या निष्कर्षाप्रत आली आहे की, दि. १ जानेवारी, २०१६ पासून विहित करावयाच्या सुधारित वेतनश्रेणींच्या प्रयोजनार्थ संवर्गातील पूर्वीची सापेक्षता सर्वच प्रकरणी आधारभूत मानणे संयुक्तिक होणार नाही.

२.२.५ बऱ्याच संवर्गांनी (उदा.शिक्षक, प्रशिक्षित शिक्षक) ६व्या वेतन आयोग लागू झाल्यानंतर मिळालेल्या प्रत्यक्ष वेतनवाढीची तुलना ७व्या वेतन आयोगानुसार मिळालेल्या वेतनवाढीशी करून सुधारित वेतन निश्चितीनुसार वाढ प्रत्यक्षात कमी मिळत असल्याचे प्रतिपादित केले आहे. ७व्या वेतन आयोग लागू करण्याच्या शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने पूर्वीच्या वेतन आयोगातील वेतन निश्चितीनुसार मिळालेली वाढीची तुलना ७व्या वेतन आयोगाशी करून, प्रत्यक्षात वाढ कमी मिळत असल्याचा मुद्दा गैरलागू/अव्यवहार्य दिसून येतो.

२.२.६ (१) आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत :-

७व्या वेतनआयोगांतर्गत आश्वासित प्रगतीयोजना लागू करण्यासंबंधी तरतुदी वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१९ अन्वये विहित करण्यात आल्या आहेत. हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे शासनातील सर्वच संवर्गांना या तरतुदी बंधनकारक आहेत. तथापि, काही संवर्गांनी या आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या संवर्गाची वेतनश्रेणी मिळणेबाबत मागणी केली आहे. सदर बाब उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदींशी विसंगत असल्यामुळे समितीला विचार करता येत नाही.

२.२.६ (२) निवडश्रेणी वेतनस्तर लागू करणेबाबत:-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ अन्वये गट-अ मधील संवर्गासाठी निवडश्रेणी वेतनस्तर मंजूर करण्याबाबतची कार्यपद्धती आणि पात्रतेच्या अटी विहित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये पुढीलप्रमाणे तरतुदी आहेत. १) एस-२० ते एस-२६ मध्ये वेतन आहरित करणाऱ्या संवर्गांना निवडश्रेणी लागू करण्यात आली आहे. २) सदर तरतूद मंजूर पदसंख्येच्या २५ % पदांना लागू आहे. ३) ज्या संवर्गाची संवर्ग संख्या किमान ४ इतकी आहे, अशा संवर्गानाच या अटींमुळे एस-२७ पेक्षा जास्त वेतन आहरित करणाऱ्या संवर्गांना तसेच एकाकी पदांना निवडश्रेणीचा लाभ अनुज्ञेय होत नाही. यास्तव उपरोक्त अटी शिथिल करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी, असे समिती शिफारस करीत आहे.

२.२.७ दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींबाबत:-

वित्त विभाग सेवा-९, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये एकूण १०५ संवर्गांच्या वेतनश्रेणी सुधारित करण्यात आल्या आहेत. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २२.०२.२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी राहिलेली नाही. तथापि, अधिक स्पष्टतेसाठी नमूद करण्यात येते की, ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांचे वेतन जुन्या वेतनश्रेणीत (खंड-१ प्रमाणे) निश्चित करण्याचा विकल्प दिला असेल, त्यांची पदोन्नतीनंतरची वेतननिश्चिती ही खंड-२ नुसार मंजूर करण्यात आलेल्या वेतनश्रेणीत करण्यात येईल आणि पुढील वेतनसुधारणा करताना खंड-२ मधील सुधारित वेतनश्रेणी विचारात घेण्यात येईल. तसेच जुन्या वेतनश्रेणीत वेतननिश्चितीचा विकल्प दिलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय भत्ते हे खंड-२ प्रमाणे सुधारित केलेल्या वेतनश्रेणीप्रमाणे देय राहतील. वेतनश्रेणीप्रमाणे वेतननिश्चिती झाल्यानंतर जुन्या वेतनश्रेणीला अनुज्ञेय असलेले भत्ते लागू होणार नाहीत.

२.२.८ लिपिक वर्गीय संवर्गाची वेतन संरचना:-

लिपिकवर्गीय संवर्ग राज्य शासनाकडे सर्वसाधारण संवर्ग (Common Cadre) असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. या संवर्गामध्ये कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, मुख्य/प्रमुख/प्रथम लिपिक व सहाय्यक अधीक्षक/अधीक्षक अशी पदोन्नती साखळी प्रामुख्याने आढळून येते. काही विभागांमध्ये प्रशासन अधिकारी अथवा सहाय्यक प्रशासन अधिकारी असे संवर्ग देखील आहेत.

सर्वच प्रशासकीय विभागांमध्ये कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक आणि अधीक्षक या संवर्गांना वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) केंद्र शासनाकडील अनुक्रमे कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक आणि अधीक्षक या संवर्गाशी समकक्षता प्रदान केली आहे. त्यानुसार या संवर्गांना चौथ्या वेतन आयोगात वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत. तर उर्वरित संवर्गांना मूल्यमापनाअंती शिफारस केलेल्या वेतनश्रेणी मंजूर केल्या होत्या. त्यानंतर पुढे पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी/वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

सर्वच प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असलेले हे सर्वसाधारण संवर्ग असल्यामुळे कोणत्याही विभागातील या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये बदल करणे वरील पार्श्वभूमीवर योग्य/न्यायसंगत ठरत नाही असे समितीचे मत आहे.

२.२.९ शासनाच्या काही विभागांमधील काही संवर्गातील पदांवर दुसऱ्या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची बदलीने नियुक्ती करण्यात येते. हे संवर्ग आपापसात बदली पात्र असतात. म्हणजेच एका संवर्गातून दुसऱ्या संवर्गात किंवा त्या उलट बदलीने नियुक्ती करण्यात येते. अशा आपापसात बदली पात्र संवर्गात, संवर्गांची वेतनश्रेणी समान असावी असे समितीचे मत आहे.

तथापि, प्रशासकीय आवश्यकता म्हणून शासनाच्या काही विभागांमधील काही संवर्गातील पदांवर त्याच विभागातील दुसऱ्या संवर्गातील अथवा अन्य विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची बदलीने किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते. मात्र असे संवर्ग आपापसात बदलीपात्र असतातच असे नाही. या दोनही संवर्गांची वेतनश्रेणी स्वतंत्र मूल्यमापनाअंती विहित केलेली असल्याने कनिष्ठ संवर्गाने वरिष्ठ संवर्गाच्या वेतनश्रेणीची मागणी उचित ठरत नाही.

काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये उच्च वेतनश्रेणीतील संवर्गातून तुलनेने निम्न वेतनश्रेणीतील संवर्गात नियुक्ती दिली जात असल्यास अशा नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यास त्याच्या संवर्गाच्या वेतनसंरचनेत वेतन मिळणे नैसर्गिक आहे. अशा बाबतीत निम्न संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांनी संवर्गबाह्य पदावरील अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनसंरचनेचा आग्रह धरणे संयुक्तिक नाही.

### २.३ केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत

२.३.१ दि.१ एप्रिल, १९७६ पासून राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत शिफारस करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती श्री. आर. आर. भोळे यांच्या अध्यक्षतेखाली वेतन आयोगाची नियुक्ती करण्यात आली होती. न्यायमूर्ती भोळे वेतन आयोगाच्या शिफारशींवर निर्णय घेताना (सन१९७७) राज्य शासनाने असाही निर्णय घेतला की, "राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी सुधारण्याकरिता स्वतंत्र आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांकरिता वेतन आयोग नियुक्त करेल त्या वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे वेतनश्रेणीविषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. यासाठी वेतननिश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल."

२.३.२ उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने वेतन समानीकरण समितीने केंद्र शासनाकडील पदांशी समकक्ष ठरविलेल्या राज्य शासनाकडील पदांना केंद्र शासनाप्रमाणे जशीच्या - तशी सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचे प्रस्ताव समितीस प्राप्त झाले आहेत.

या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, वेतन त्रुटी निवारण समिती, २०१२ च्या (बक्षी समिती) शिफारशी मान्य करताना समितीने परिच्छेद २.३ मध्ये केंद्र शासनाकडील वेतनश्रेणी जशाच्या तशा लागू करण्याबाबत विविध मुद्यांचा ऊहापोह केला आहे. या निष्कर्षांचाही विचार करणे समितीस आवश्यक वाटते.

तसेच यासंदर्भात केंद्र/राज्य शासनाकडील खालील मुद्दे विचारात घेणे अपरिहार्य ठरते.

अ) केंद्र शासनाचे आणि राज्य शासनाचे उत्पन्नाचे स्त्रोत भिन्न आहेत. तसेच राज्य शासनाच्या साधनसंपत्तीच्या तुलनेत केंद्र शासनाची साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे वेतन व भत्त्यांच्या खर्चाच्या संदर्भात राज्य शासनावर मर्यादा येतात. या कारणास्तव केंद्र आणि राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात काही अंशी तफावत येणे स्वाभाविक आहे.

ब) केंद्र शासनाकडे पदांशी समकक्ष ठरविलेल्या राज्य शासनाकडील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार चौथ्या व पाचव्या वेतन आयोगात केंद्र शासनाकडील पदाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत, त्यामुळे अशा संवर्गाच्या वेतनमानाचा स्तर चांगल्या प्रकारे उंचावला गेला आहे. त्याचप्रमाणे इतर संवर्गांनाही त्यांच्या विहित वेतनश्रेणींशी अनुरुप वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत.

क) केंद्र शासनाकडे काही संवर्गांना उच्च वेतनश्रेणी विहित करताना तेथील पद संरचना/पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सेवेतील स्थान/महत्त्व इ. बाबी विचारात घेऊन त्याचप्रमाणे काही प्रसंगी संवर्गाचे सुसूत्रीकरण करताना संवर्गाची श्रेणीवाढ आवश्यक ठरते. या सर्व बाबी राज्य शासनाकडील संवर्गाच्या बाबतीत लागू ठरतीलच असे नाही.

वरील कारणास्तव प्राप्त परिस्थितीत केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या बहुतांशी कर्मचाऱ्यांच्या वेतनाची पुन्हा तुलना करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. सातव्या वेतन आयोगामध्ये केंद्र शासनाने/मा. न्यायालयांनी काही संवर्गांना मंजूर केलेल्या समकक्षतेपेक्षा उच्च वेतनश्रेणीची पुन्हा मागणी करण्याबाबत आग्रही भूमिका घेणे योग्य ठरत नाही असे समितीस वाटते.

२.४ इतर अनुषंगिक बाबी

२.४.१ वेतन त्रुटी निवारण समितीच्या बैठकांना प्रशासकीय विभागाच्या सचिवांनाही आमंत्रित करण्यात आले होते. काही प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी बैठकीस उपस्थित राहून त्यांची मते समितीसमोर विशद केली आहेत.

तसेच काही अपवाद वगळता इतर प्रस्तावांच्या संदर्भात प्रशासकीय विभागांनी अभिप्राय दिलेले आहेत. तर, काही प्रकरणी संघटनांच्या मागणीशी प्रशासकीय विभाग सहमत नव्हते. संघटनांनीदेखील काही प्रकरणी त्यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ कोणतेही अभिप्राय दिले नसल्याचे आढळून आले आहे.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती असली तरी संवर्गाचे व त्यांना विहित केलेल्या वेतनश्रेणींचे मूल्यमापन करताना समितीने वेतनश्रेणींशी निगडित विविध घटकांचा सर्वंकष विचार केला आहे.

२.४.२ समितीच्या विचारार्थ प्राप्त प्रस्तावांचा विचार करता असे निदर्शनास आले की, काही प्रस्ताव हे चौथ्या व पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणींशी निगडित आहेत, तर काही प्रस्ताव संवर्गाशी श्रेणीवाढ/दर्जावाढीशी संबंधित आहेत.

काही संवर्गाचा अंतर्भाव महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ सोबतच्या अनुसूचित नसल्यामुळे त्या संवर्गाचा समावेश अनुसूचीमध्ये करण्याविषयी किंवा पदनाम अथवा वेतनश्रेणीची योग्य नोंद अनुसूचित नसल्यामुळे अशा नोंदी सुधारण्याबाबतचे प्रस्ताव देखील समितीस प्राप्त झाले आहेत. समितीच्या कार्य कक्षेमध्ये नसलेले व नमूद अन्य प्रस्ताव समितीने विचारात घेतले नाहीत.

२.४.३ संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत विहित कार्यपद्धतीनुसार प्रशासकीय विभाग व संघटनांच्या अभिप्रायांसह समितीच्या विचारार्थ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. समितीने प्रस्तावांबाबत विभाग प्रमुख आणि अधिकारी/कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत चर्चा केली आहे. या व्यतिरिक्त काही संघटनांनी तसेच अधिकारी/कर्मचारी यांनी वैयक्तिकरित्या समितीच्या विचाराधीन प्रस्तावांच्या अनुषंगाने समितीस आणि वित्त विभागासदेखील निवेदने सादर केली आहेत. समितीस याद्वारे पूरक माहिती उपलब्ध झाली. प्रस्तावांची तपासणी करताना समितीने ही निवेदनेही विचारात घेतली आहे.

२.४.४ समितीच्या विचारार्थ प्राप्त प्रस्तावांमधील काही संवर्गाच्या वेतनश्रेणीबाबतची प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही संवर्गांच्याबाबतीत अशी न्यायालयीन प्रकरणे असल्याचे समितीच्या निदर्शनास आले नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा न्यायप्रविष्ट प्रकरणातील संवर्गाच्या वेतनश्रेणीसंदर्भात समितीच्या शिफारशी या माननीय न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहतील.

२.५ समितीने शिफारशी केलेले वेतनस्तर दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावेत आणि प्रत्यक्ष आर्थिक लाभ या संबंधीचे शासन आदेश ज्या महिन्यात निर्गमित होतील, त्या महिन्याच्या १ तारखेपासून देण्याची शिफारस समिती करीत आहे. मात्र दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून आदेश निर्गमित होण्यापूर्वीच्या महिन्यापर्यंत कोणतीही थकबाकी अनुज्ञेय ठरणार नाही. यासंबंधीची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील विहित तरतुदीनुसार करण्यात यावी.

२.६ समितीच्या शिफारशींमुळे अपेक्षित आर्थिक भार :-

समितीने केलेल्या शिफारशींमुळे अंदाजित रुपये ८० कोटी इतका वाढीव वार्षिक आर्थिक भार अपेक्षित आहे. आर्थिक भार परिगणना करताना संवर्गातील एकूण पदसंख्या विचारात घेतली आहे. प्रत्यक्ष संवर्गात भरलेली पदे कमी असल्याने आर्थिक भारामध्ये घट अपेक्षित आहे.

प्रकरण- २(अ)

**समितीला आढळलेल्या प्रशासकीय सुधारणांसंबंधाने सूचना**

चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी शासनाने सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. एन.बी. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली वेतन समानीकरण समिती नेमून राज्य शासनाकडील सर्वच संवर्गांबाबत सर्वंकष विचार (वेतनश्रेणी, सेवाप्रवेश नियम, केंद्र/ राज्य शासनाकडील समकक्ष पदे इ.) करुन वेतनश्रेणी विहित केल्या होत्या. तदनंतर त्याआधारे पुढील वेतनआयोगात (१९८६ ते २०१६) राज्य शासनाकडील संवर्गांना वेतनश्रेणी विहित करण्यात आल्या आहेत. या ४० वर्षांच्या कालावधीत कालानुरुप बऱ्याच संवर्गांची आवश्यकता राहिली नसेल अथवा काही संवर्ग नव्याने निर्माण झाले असतील. तसेच, काही नवीन प्रशासकीय विभागांचीही निर्मिती झाली आहे. वास्तव, पुढील वेतनआयोग लागू करण्यापूर्वी राज्य शासनाकडील सर्व संवर्गांचे यथायोग्य मूल्यमापन होणे आवश्यक आहे. अशा प्रकारची समिती नेमून निर्णय घेणे योग्य राहील.

**प्रकरण २(ब)**

**प्रशासकीय विभागाचे आकृतीबंध आणि सेवा प्रवेश नियम**

अ) विविध संवर्गाच्या वेतनश्रेणीविषयी शिफारशी करताना समितीने मुख्यत: सेवाप्रवेश नियमांचा आधार घेतला आहे. कित्येक संवर्गाचे सेवाप्रवेश नियम बऱ्याच कालावधीपूर्वी (वर्षापूर्वी) विहित केलेले आहेत. काही संवर्गांचे सेवाप्रवेश नियम सन-१९५३ (उदा. वीजतंत्री,वायरमन), १९६४ (भांडारपाल (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)) या वर्षांचे असून त्यात अद्यापही बदल/सुधारणा झालेल्या नाहीत. तसेच काही पदांची निर्मिती करण्यात आली असली तरी संबंधित संवर्गांचे सेवाप्रवेश नियम अद्यापही तयार नाहीत. परिणामी, निम्न संवर्गातील पदधारकांना पदोन्नतीची संधी उपलब्ध असली तरी प्रत्यक्ष पदोन्नती मिळू शकली नाही. दरम्यानच्या काळात सेवाप्रवेश नियमांमध्ये काही सुधारणा झाल्या असल्यास व त्या समितीच्या निदर्शनास आल्या नसतील तर समितीने केलेल्या शिफारशी गैरलागू ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही, याकरिता, शिफारशींची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यापूर्वी संबंधित प्रशासकीय विभागांनी सेवा प्रवेश नियमाबाबत खातर जमा करणे योग्य होईल.

ब) कालानुरुप विविध विद्याशाखांचे महत्त्व व आवश्यकता, त्यांच्या समावेशामुळे जनतेस/समाजाला देण्यात येणाऱ्या सेवेत होणारे मूल्यवर्धन विचारात घेऊन सेवाप्रवेश नियमांत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

क) सर्वच प्रशासकीय विभागांनी त्यांचे आकृतीबंध कालानुरुप सुधारित करण्याची आवश्यकता आहे. काही कालबाह्य संवर्ग/पदे निरसित करुन विभागांचे आधुनिकीकरण करण्याची आवश्यकता आहे. काही संवर्ग/पदे विविध उपयोगी (Multi-tasking) असणे याबाबत विचार करण्याची गरज दिसून येते.

ड)  प्रशासकीय विभागांचे आकृतीबंध सुधारित करणे तसेच सेवाप्रवेश नियमांत सुधारणा करण्यासाठी प्रशासकीय सुधारणांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या शासनाच्या यशदासारख्या संस्थांचे सहाय्य घेता येईल. राज्य शासनाकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा (Workforce) ईष्टतम (Optimum) उपयोग / वापर होणे ही काळाची गरज आहे.

********************

प्रकरण-३

प्रशासकीय विभागांचे प्रस्ताव व त्यावरील समितीच्या शिफारशी

३.१ कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ. क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातवा वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड वेतन | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील मंजूर वेतनस्तर (रुपये) | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील मंजूर वेतनस्तर (रुपये) |
| | अ) कृषि आयुक्तालय | | | | |
| १ | महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा प्रशासकीय अधिकारी (गट–अ) | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४७९००-१५१८०० | एस २० रु.५६१००-१७७५०० |
| २ | महाराष्ट्र कृषि सेवा गट–ब तंत्र अधिकारी | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० ५६१००-१७७५०० |
| ३ | सहायक प्रशासकीय अधिकारी गट–ब | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१९ रु.५५१००-१७५१०० |
| ४ | महाराष्ट्र कृषि सेवा गट–ब कनिष्ठ अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ५ | कृषि पर्यवेक्षक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| | ब) दुग्ध व्यवसाय विकास विभाग | | | | |
| ६ | पाळी व्यवस्थापक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ७ | गुणनियंत्रण गट – क | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ८ | दुग्धशाळा | ९३००- | ४३०० | एस-१३ | एस-१६ रु. ४४९००- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | व्यवस्थापक | ३४८०० | | रु.३५४००-११२४०० | १४२४०० |
| | क)पशुसंवर्धन आयुक्तालय | | | | |
| ९ | अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) | ३७४००-६७००० | ८७०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० | एस-२९ १३११००-२१६६०० |
| १० | सह आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० |
| ११ | उप आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| १२ | सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) | १५६००-३९१०० | ५७०० | एस-२२ रु.६००००-१९०८०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| १३ | पशुधन विकास अधिकारी गट-ब | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| | ड) कृषि विद्यापीठे | | | | |
| | ड(१) कृषि विद्यापीठ, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | | | | |
| १४ | सहायक कुल सचिव | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| १५ | शाखा अभियंता | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १६ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| १७ | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | एस ८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| १८ | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ड (२) कृषि विद्यापीठ, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | | | | |
| १९ | कार्यदेशक पर्यवेक्षक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| | ड (३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | | | | |
| २० | नळ कारागीर | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| | ड(४) महात्मा फुले विद्यापीठ, राहूरी | | | | |
| २१ | वरिष्ठ तांत्रिक सहायक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| २२ | यांत्रिक पर्यवेक्षक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| २३ | तांत्रिक सहायक (यांत्रिकी) | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| २४ | तांत्रिक सहायक (ग्रंथालय) | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| २५ | शिक्षक (पशुवैद्यकीय) | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| २६ | नळ कारागीर | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| २७ | मेस्त्री | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५०० ८११०० |
| | ड (५) महात्मा फुले विद्यापीठ, राहूरी अंतर्गत कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव | | | | |
| २८ | प्राचार्य | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१९ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| २९ | मुकादम | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ रु.१५०००-४७६०० | एस-३ रु.१६६००-५२४०० |
| | ड(६) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला अंतर्गत ग्रामीण शिक्षण संस्था, पिंपरी वर्धा | | | | |
| ३० | फिल्डमन फॉर हॉर्टिकल्चर | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| ३१ | फिल्डमन | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ड (७) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला अंतर्गत शिवाजी कृषि महाविद्यालय, अमरावती | | | | |
| ३२ | प्रक्षेत्र अधिक्षक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु. ३५४००-११२४०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| | ड(८) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | | | | |
| ३३ | क्रीडा अधिकारी | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | UGC ACADAMIC LEVEL १० रु.५७७००-१८२४०० |
| ३४ | आरेखक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० (चार वर्षाच्या सेवेनंतर) | एस-१४ रु.३८६००-१२२८०० (चार वर्षाच्या सेवेनंतर) |
| | ढ) महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ | | | | |
| ३५ | सहायक कुल सचिव | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ३६ | स्वीय सहायक | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ३७ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० (खंड-२ नुसार) | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ३८ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० (खंड २ प्रमाणे) | एस-१६ रु.४४९०० १४२४०० |
| ३९ | प्रक्षेत्र सहायक व कृषि सहायक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | विद्यापीठातील सात वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर एस-१० रु.२९२००-९२३०० ही वेतनश्रेणी देणेबाबत |
| ४० | संदेशक तथा तारतंत्री | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |

अ) कृषि आयुक्तालय

**१.महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा प्रशासकीय अधिकारी (गट-अ) :-**

**संघटनेची मागणी** :- शासनाच्या विविध विभागातील प्रादेशिक आणि विभाग स्तरावरील समकक्ष पदांची वेतनश्रेणी ही १५६००-३९१०० ग्रेड पे ५४००/- अशी आहे. परंतु याच खात्यात कृषि उपसंचालक पदाला ५४००/- ग्रेड पे देण्यात आलेला आहे. आणि प्रशासकीय अधिकाऱ्याला ५०००/- ग्रेड पे आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांना न्यायालयीन प्रकरणामध्ये सादरकर्ता अधिकारी म्हणून काम करावे लागते. शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच इतर विविध विभागात कार्यरत असलेल्या प्रशासन अधिकारी पदाला ५४००/- ग्रेड पे लागू केलेला आहे. सातव्या वेतन आयोगात महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा अधिकारी गट - अ पदाला रु.५४०० ग्रेड पे गृहीत धरुन त्यानुसार वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- मा. न्या. श्री. एन.डी. नाईक समितीची शिफारस विचारात न घेता कृषि विभागाचे प्रशासकीय अधिकारी या पदास सहाव्या वेतन आयोगात इतर समकक्ष अधिकाऱ्यांची रु.५४००/- ग्रेड पे ऐवजी रु.५०००/- ग्रेड पे (७ व्या वेतन आयोगात एस-२० ऐवजी एस-१८) ही वेतनश्रेणी देण्यात आल्याची बाब स्पष्ट होते. मा. न्या. नाईक समितीची शिफारस आणि वेतनश्रेणी मागण्याचे विवेचन विचारात घेता कृषि विभागातील प्रशासकीय अधिकारी या पदास राज्य शासनाकडील अन्य प्रशासकीय विभागातील पदाला लागु असलेली एस-२० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला शासन अधिसूचना दिनांक ०३.१२.२०१९ अन्वये रु. ९३०० -३४८०० ग्रे. वे. रु. ५००० (७ वा वेतन आयोग एस -१८) मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार सहाव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२.महाराष्ट्र कृषि सेवा गट ब संवर्ग अधिकारी :-

**संघटनेची मागणी** :- कृषि विभागातील मकृसे वर्ग-२ संवर्गातील पदे २ रा व ४ था वेतन आयोग वेतनश्रेणीत वर्ग-२ चा दर्जा असलेल्या उपअभियंता, जिल्हा पशुधन अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा वर्ग-२ या पदांशी समकक्ष होती. परंतु या पदांना ३ ऱ्या व ४ थ्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीत मध्यावधी सुधारणा करुन वर्ग १ दर्जासह सुधारित वेतनश्रेणी लागु करण्यात आल्यामुळे त्यांच्यातील समकक्षता बाधीत झालेली आहे. तर वर्ग-३ दर्जा असलेले पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा वर्ग-३, पर्यवेक्षक (अन्न) या पदांना वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी व दर्जावाढ केल्यामुळे या पदांची असलेली मकृसे वर्ग-२

संवर्गातील पदांची वरिष्ठता बाधित झालेली आहे. महसुल विभागात तहसीलदार, गट विकास अधिकारी या वर्ग २ च्या पदांना त्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पाहता वर्ग १ चा दर्जा देण्यात आला आहे. या पदांप्रमाणेच कृषि तालुका कृषि अधिकारी पदाला तालुका व जिल्हास्तरावर विविध योजना राबविताना समन्वय साधावा लागतो. त्यामुळे मकृसे वर्ग-२ संवर्गातील पदांची समकक्षता व वरिष्ठता पुनःस्थापित करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी म.कृ.से. वर्ग-२ संवर्गातील पदांना एस-१६ ऐवजी सुधारित वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० (वर्ग-१ दर्जा) मंजूर करण्याची शिफारस करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- महसूल विभागातील तहसीलदार व ग्राम विकास विभागातील गट विकास अधिकारी या वर्ग-२ च्या पदांना त्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पाहता वर्ग-१ चा दर्जा देण्यात आला आहे. या पदांप्रमाणेच कृषि तालुका कृषि अधिकारी पदाला तालुका व जिल्हास्तरावर विविध योजना राबविताना समन्वय साधावा लागतो. त्यामुळे महाराष्ट्र कृषि सेवा वर्ग-२ संवर्गातील पदांची समकक्षता व वरिष्ठता पुनःस्थापित करणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र कृषि सेवा वर्ग-२ संवर्गातील पदांना सुधारित वेतनश्रेणी एस-१९ देणे संयुक्तिक ठरेल.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समिती (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. कृषि विभागातील तंत्र अधिकारी व महसूल व वन विभागातील तहसीलदार या पदाचे सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

३.सहायक प्रशासकीय अधिकारी गट-ब :-

<u>संघटनेची मागणी</u> :- पदोन्नतीच्या साखळीतील पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ झालेली आहे. पदोन्नती साखळीतील वरिष्ठ पदांची संख्या कमी असून वेतनश्रेणी पे बँण्ड एकच असल्याने पदोन्नती नाकारण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे पदोन्नती साखळी शृंखलेवर विपरीत परिणाम होत आहे. सातव्या वेतन आयोगात महाराष्ट्र कृषि सहायक प्रशासकीय सेवा अधिकारी गट- ब पदाला रु.५००० ग्रेड पे गृहीत धरुन त्यानुसार एस १५ ऐवजी एस-१९ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:- अधिक्षक या पदाची वेतनश्रेणी एस-१४ असून सहायक प्रशासकीय अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-१६ आहे. सदर पद राजपत्रित दर्जाचे तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे पदोन्नती नाकारण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे पदोन्नतीसाखळी शृंखलेवर विपरीत परिणाम होत आहे. सबब, सदर पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करणे संयुक्तिक होईल.

**समितीची शिफारस**:- वेतन समानीकरण समिती (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. विभागाने प्रस्तुत संवर्गात वेतन त्रुटी असून आणि त्यामुळे वेतनश्रेणी वाढविण्याबाबत कोणतेही समर्थनीय कारण दिलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

४.महाराष्ट्र कृषि सेवा गट ब कनिष्ठ अधिकारी :-

**संघटनेची मागणी** :- पदोन्नतीच्या साखळीतील पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ झालेली आहे. पदोन्नती साखळीतील वरिष्ठ पदांची संख्या कमी असून वेतनश्रेणी व पे बॅण्ड एकच असल्याने पदोन्नती नाकारण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे पदोन्नती साखळी शृंखलेवर विपरीत परीणाम होत आहे. ६ व्या वेतन आयोगात रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.४६०० वर्ग-२ दर्जासह मंजूर करुन ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१५ ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- कृषि अधिकारी पदास सन १९८१ पासून राजपत्रित दर्जा दिलेला आहे. सदर पद सरळसेवेने भरले जाते. पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या, वेतनश्रेणी एकच असल्याने पदोन्नती नाकारण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे पदोन्नतीसाखळी शृंखलेवर विपरीत परिणाम होत आहे. सबब, सदर पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समिती (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच पदोन्नती साखळीतील वेतन श्रेणी एकसारखी झाली आहे ही बाब वस्तुस्थितीला धरून नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

५. कृषि पर्यवेक्षक :-

**संघटनेची मागणी** :- कृषि पर्यवेक्षक व ग्रामविकास विभागातील विस्तार अधिकारी हे पर्यवेक्षीय पद असल्याने दोन्ही पदांना एस -१३ ही वेतनश्रेणी देण्यात आली होती. परंतु, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये, विस्तार अधिकारी या पदाला सुधारित वेतनस्तर एस -१४ मंजूर करण्यात आला आहे. कृषि पर्यवेक्षक संवर्गाला सदर वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही. सबब, सदर संवर्गाला एस-१३ ऐवजी एस -१४ ही वेतनश्रेणी लागू करावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- कृषि पर्यवेक्षक व विस्तार अधिकारी या पदाकरिता, दोन्ही संवर्ग पर्यवेक्षीय असल्याने दोघांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या एकच असल्याने ग्रामविकास

विभागातील विस्तार अधिकारी या संवर्गाप्रमाणेच कृषि पर्यवेक्षक या संवर्गाकरिता, एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच कृषि पर्यवेक्षक या पदाची शैक्षणिक अर्हता कृषि पदविका अशी आहे. तथापि, विभागाने ग्राम विकास विभागातील ज्या संवर्गाशी तुलना केली आहे त्या संवर्गाचे सेवा प्रवेश नियम उपलब्ध करुन दिलेले नाहीत किंवा शैक्षणिक व इतर पदासाठी अहर्ता सारखी आहे याचा कुठलाही पुरावा उपलब्ध करून दिला नाही. यास्तव दोन्ही संवर्गाची तुलना करणे शक्य होत नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी नाही.

**ब) दुग्ध व्यवसाय विकास विभाग**

६.पाळी व्यवस्थापक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- इक्वल रेम्युनरेशन ॲक्ट, १९७६ नुसार दिनांक १०.०२.१९७७ पासून केंद्र शासनाच्या दिल्ली दूध योजनेच्या कारखान्यातील विभाग व्यवस्थापक व पाळी व्यवस्थापक यांना देण्यात येणाऱ्या वेतनाप्रमाणे राज्य शासनाच्या दूध योजनांच्या कारखान्यातील दुग्ध शाळा पर्यवेक्षक हे दिल्ली दुध योजनेतील विभाग व्यवस्थापकाप्रमाणे कामे, कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडत असल्याने केंद्र शासनाप्रमाणे पाळी व्यवस्थापक यांना वेतन मिळावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- महाराष्ट्र शासन दुग्धतंत्रज्ञ संघटनेने त्यांच्या दि.१६.०४.२०२४ च्या निवेदनाद्वारे दि.१०.०२.१९७७ पासून केंद्र शासनाच्या दिल्ली दूध योजनेनुसार वेतन मिळणेबाबत कळविले आहे. तथापि उपरोक्त वित्त विभागाच्या दि.१६.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सन २०१६ पासून पुढील वेतनश्रेणीतील त्रुटी निवारण करण्याकरिता, प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. यास्तव संघटनेने दि.१०.०२.१९७७ पासून केलेली मागणी योग्य दिसून येत नाही. सद्यस्थितीत दूध संकलन/वितरण बंद झाले असून पाळी व्यवस्थापक/दुग्धशाळा पर्यवेक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या संवर्गाचे कामकाज राहिलेले नाही. तसेच सद्यस्थितीत पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाची पुनर्रचना करण्यास मा. मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता पाळी व्यवस्थापक व दुग्धशाळा पर्यवेक्षक यांच्यावर अतिरिक्त कामाचा भार नसल्याने सदर संघटनेची मागणी मान्य करता येऊ शकत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- कृषि व पदुम विभाग शासन निर्णय दिनांक ११.११.२००२ अन्वये शासकीय दुग्धशाळा/ शीतकरण केंद्रे सहकारी दुध संघाकडे हस्तांतरीत किंवा विक्री करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय १०.१०.२०२४ अन्वये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतीबंध सुधारित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार पाळी व्यवस्थापक हा संवर्ग निरसित करण्यात आला आहे. तसेच

विभागाने पाळी व्यवस्थापक यांच्यावर अतिरिक्त कामाचा भार नसल्याचे नमूद केले आहे. प्रस्तुत संवर्गाच्या मागण्या ह्या जुन्या असल्यामुळे पूर्वीच्या संबंधित ४ थ्या, ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये विचार होऊन निर्णय झालेला आहे. यास्तव सदर संवर्गाच्या मागणीमध्ये नवीन तथ्य आढळून येत नाही. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी नाही.

७. गुणनियंत्रण गट – क :-

<u>संघटनेची मागणी</u> :- लॅब असिस्टंट संवर्गासाठी सध्याचे सेवाप्रवेश नियम कालबाह्य ठरल्याने कलम ३०९ अन्वये सुधारित करण्याचे शासनाचे आदेश लक्षात घेऊन या पदासाठी एस.एस.सी या ऐवजी बी.एससी उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता प्रस्तावित केल्याने वेतन आयोगाच्या धोरणानुसार या पदाला रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- गुण नियंत्रण कर्मचारी संघटनेने त्यांच्या दि.१३.५.२०२४ च्या निवेदनाद्वारे पूर्वलक्षी प्रभावाने थकबाकी न देता वेतन निश्चिती करुन सुधारित लाभ द्यावा अशी मागणी आहे. वित्त विभागाच्या दि.१६.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सन २०१६ पासून पुढील वेतनश्रेणीतील त्रुटी निवारण करण्याकरिता, प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सद्यःस्थितीत दूध संकलन/वितरण बंद झाले असून गुण नियंत्रण गटातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या संवर्गाचे कामकाज राहिलेले नाही. तसेच सद्यःस्थितीत पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाची पुनर्रचना करण्यास मा. मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता गुण नियंत्रण गटातील कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार नसल्याने सदर संघटनेची मागणी मान्य करता येऊ शकत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- कृषि व पदुम विभाग शासन निर्णय दिनांक ११.११.२००२ अन्वये शासकीय दुग्धशाळा/ शीतकरण केंद्रे सहकारी दुध संघाकडे हस्तांतरीत किंवा विक्री करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १०.१०.२०२४ अन्वये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतीबंध सुधारित करण्यात आला आहे. त्यानुसार गुण नियंत्रण गट-क हा संवर्ग निरसित करण्यात आला आहे. तसेच विभागाने गुण नियंत्रण गट-क यांच्यावर अतिरिक्त कामाचा भार नसल्याचे नमूद केले आहे. प्रस्तुत संवर्गाच्या मागण्या ह्या जुन्या असल्यामुळे पूर्वीच्या संबंधित ४ थ्या, ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये विचार होऊन निर्णय झालेला आहे. यास्तव सदर संवर्गाच्या मागणीमध्ये नवीन तथ्य आढळून येत नाही. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणी मध्ये त्रुटी आढळून येत नाही.

८. दुग्धशाळा व्यवस्थापक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- इक्वल रेम्युनरेशन ॲक्ट, १९७६ नुसार दिनांक १०.०२.१९७७ पासून केंद्र शासनाच्या दिल्ली दूध योजनेच्या कारखान्यातील विभाग व्यवस्थापक व पाळी व्यवस्थापक यांना देण्यात येणाऱ्या वेतनाप्रमाणे राज्य शासनाच्या दूध योजनांच्या कारखान्यातील दुग्ध शाळा पर्यवेक्षक हे दिल्ली दुध योजनेतील विभाग व्यवस्थापकाप्रमाणे कामे, कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडत असल्याने केंद्र शासनाप्रमाणे दुग्धशाळा व्यवस्थापक यांना वेतन मिळावे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- महाराष्ट्र शासन दुग्धतंत्रज्ञ संघटनेने त्यांच्या दि.१६.०४.२०२४ च्या निवेदनाद्वारे दि.१०.०२.१९७७ पासून केंद्र शासनाच्या दिल्ली दूध योजनेनुसार वेतन मिळणेबाबत कळविले आहे. तथापि उपरोक्त वित्त विभागाच्या दि.१६.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सन २०१६ पासून पुढील वेतनश्रेणीतील त्रुटी निवारण करण्याकरिता, प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. यास्तव संघटनेने दि.१०.०२.१९७७ पासून केलेली मागणी योग्य दिसून येत नाही.

सद्यःस्थितीत दूध संकलन/वितरण बंद झाले असून पाळी व्यवस्थापक/दुग्धशाळा पर्यवेक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या संवर्गाचे कामकाज राहिलेले नाही. तसेच सद्यःस्थितीत पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाची पुनर्रचना करण्यास मा. मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता पाळी व्यवस्थापक व दुग्धशाळा पर्यवेक्षक यांच्यावर अतिरिक्त कामाचा भार नसल्याने सदर संघटनेची मागणी मान्य करता येऊ शकत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- कृषि व पदुम विभाग शासन निर्णय दिनांक ११.११.२००२ अन्वये शासकीय दुग्धशाळा/शीतकरण केंद्रे सहकारी दूध संघाकडे हस्तांतरीत किंवा विक्री करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १०.१०.२०२४ अन्वये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतीबंध सुधारित करण्यात आला आहे. त्यानुसार दुग्धशाळा व्यवस्थापक हा संवर्ग निरसित करण्यात आला आहे. तसेच विभागाने दुग्धशाळा व्यवस्थापक (दुग्धशाळा पर्यवेक्षक) यांच्यावर अतिरिक्त कामाचा भार नसल्याचे नमूद केले आहे. प्रस्तुत संवर्गाच्या मागण्या ह्या जुन्या असल्यामुळे पूर्वीच्या संबंधित ४ थ्या, ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये विचार होऊन निर्णय झालेला आहे. यास्तव सदर संवर्गाच्या मागणीमध्ये नवीन तथ्य आढळून येत नाही. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

क) पशुसंवर्धन आयुक्तालय

९. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासना अंतर्गत कार्यरत सहआयुक्त पशुसंवर्धन पदाचे केंद्र शासनाच्या पशुपालन व डेअरी विभागांतर्गत समतुल्य पदांच्या वेतनश्रेणीमध्ये मोठ्या प्रमाणात फरक आहे. फक्त पशुसंवर्धन विभागातील वेतनश्रेणी नतर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन हे पद-एस-२२ या वेतनश्रेणी मध्ये समाविष्ट केल्याने त्यापुढील उपायुक्त पशुसंवर्धन, सहआयुक्त पशुसंवर्धन आणि अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन या पदांची वेतनश्रेणी अनुक्रमे एस-२३, एस-२५ व एस-२७ आहे. जे केंद्र शासनाच्या समतुल्य पदांच्या वेतनश्रेणीशी विसंगत आहे. त्यामुळे केंद्र शासनाप्रमाणेच; पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासनांतर्गत अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन हे पद एस-२९ या वेतनश्रेणीमध्ये समाविष्ट करून या सर्व पदांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करण्यात याव्यात.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- केंद्र शासनाच्या समतुल्य पदाचे सेवाप्रवेश नियम व राज्य शासनाच्या समतुल्य पदाचे सेवा प्रवेश नियम तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्या मध्ये कामाची व्याप्ती, कामाचे क्षेत्र तसेच सदर पदावर नियुक्त होण्याकरिता, आवश्यक असलेला कामाचा अनुभव यामध्ये भिन्नता दिसून येते. त्यामुळे सदर पदास केंद्र शासनाच्या वेतनानुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील वेतन देणे संयुक्तिक ठरणार नाही.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-२७ रु. १२३१००-२१५९००ही मंजूर करण्यात आली आहे. विभागानेही ह्या मागणीचे समर्थन केलेले नाही. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१०.सह आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) :-

**संघटनेची मागणी** :- पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासना अंतर्गत कार्यरत सहआयुक्त पशुसंवर्धन पदांचे केंद्र शासनाच्या पशुपालन व डेअरी विभागांतर्गत समतुल्य पदांच्या वेतनश्रेणीमध्ये मोठ्या प्रमाणात फरक आहे. फक्त पशुसंवर्धन विभागातील वेतनश्रेणी नंतर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन हे पद-एस-२२ या वेतनश्रेणी मध्ये समाविष्ट केल्याने त्यापुढील उपायुक्त पशुसंवर्धन, सहआयुक्त पशुसंवर्धन आणि अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन या पदांची वेतनश्रेणी अनुक्रमे एस-२३, एस-२५ व एस-२७ आहे. जे केंद्र शासनाच्या समतुल्य पदांच्या वेतनश्रेणीशी विसंगत आहे. त्यामुळे केंद्र शासनप्रमाणेच; पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासनांतर्गत सहआयुक्त पशुसंवर्धन हे पद एस-२७ या वेतनश्रेणीमध्ये समाविष्ट करून या सर्व पदांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करण्यात याव्यात.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- केंद्र शासनाच्या समतुल्य पदाचे सेवाप्रवेश नियम व राज्य शासनाच्या समतुल्य पदाचे सेवा प्रवेश नियम तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्या मध्ये कामाची व्याप्ती, कामाचे क्षेत्र तसेच सदर पदावर नियुक्त होण्याकरिता, आवश्यक असलेला कामाचा अनुभव यामध्ये भिन्नता दिसून येते. त्यामुळे सदर पदास केंद्र शासनाच्या वेतनानुसार ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील वेतन देणे संयुक्तिक ठरणार नाही.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-२५ रु.१२३१००-२१५९००ही मंजूर करण्यात आली आहे. विभागानेही ह्या मागणीचे समर्थन केलेले नाही. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

११. उप आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) :-

<u>संघटनेची मागणी</u>:- पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासना अंतर्गत कार्यरत उपायुक्त पशुसंवर्धन पदांचे केंद्र शासनाच्या पशुपालन व डेअरी विभागांतर्गत समतुल्य पदांच्या वेतनश्रेणीमध्ये मोठ्या प्रमाणात फरक आहे. फक्त पशुसंवर्धन विभागातील वेतनश्रेणी नंतर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन हे पद-एस-२२ या वेतनश्रेणी मध्ये समाविष्ट केल्याने त्यापुढील उपायुक्त पशुसंवर्धन, सहआयुक्त पशुसंवर्धन आणि अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन या पदांची वेतनश्रेणी अनुक्रमे एस-२३, एस-२५ व एस-२७ आहे. ज्या केंद्र शासनाच्या समतुल्य पदांच्या वेतनश्रेणीशी विसंगत आहे. त्यामुळे केंद्र शासनाप्रमाणेच पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासनांतर्गत उपायुक्त पशुसंवर्धन हे पद एस-२५ या वेतनश्रेणीमध्ये समाविष्ट करून या सर्व पदांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करण्यात याव्यात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्र शासनाच्या समतुल्य पदाचे सेवाप्रवेश नियम व राज्य शासनाच्या समतुल्य पदाचे सेवा प्रवेश नियम तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्या मध्ये कामाची व्याप्ती, कामाचे क्षेत्र तसेच सदर पदावर नियुक्त होण्याकरिता, आवश्यक असलेला कामाचा अनुभव यामध्ये भिन्नता दिसून येते. त्यामुळे सदर पदास केंद्र शासनाच्या वेतनानुसार ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील वेतन देणे संयुक्तिक ठरणार नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत ६ व्या वेतन आयोगातील अनुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-२३ रु.६७७००-२०८७०० ही मंजूर करण्यात आली आहे. विभागानेही ह्या मागणीचे समर्थन केलेले नाही. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१२.सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासना अंतर्गत कार्यरत सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन पदांचे केंद्र शासनाच्या पशुपालन व डेअरी विभागांतर्गत समतुल्य पदांच्या वेतनश्रेणीमध्ये मोठ्या प्रमाणात फरक आहे. विशेषतः महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत असलेल्या एस-२० वेतनश्रेणी आहरण करणाऱ्या पदामध्ये त्यापुढील वेतनश्रेणीची पदे एस-२३ या वेतनश्रेणी मध्ये मोडतात. परंतु फक्त पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी या एस- २० वेतनश्रेणी नंतर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन हे पद- एस-२२ या वेतनश्रेणी मध्ये समाविष्ट केल्याने त्यापुढील उपायुक्त पशुसंवर्धन, सहआयुक्त पशुसंवर्धन आणि अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन या पदांची वेतनश्रेणी अनुक्रमे एस-२३, एस-२५ व एस-२७ आहे. ज्या केंद्र शासनाच्या समतुल्य पदांच्या वेतनश्रेणीशी विसंगत आहेत. त्यामुळे केंद्र शासनाप्रमाणेच, पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासनांतर्गत हे पद एस-२३ या वेतनश्रेणीमध्ये समाविष्ट करून वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- केंद्र शासनाच्या समतुल्या पदाचे सेवाप्रवेश नियम व राज्य शासनाच्या समतुल्य पदाचे सेवा प्रवेश नियम तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्या मध्ये कामाची व्याप्ती, कामाचे क्षेत्र तसेच सदर पदावर नियुक्त होण्याकरिता, आवश्यक असलेला कामाचा अनुभव यामध्ये भिन्नता दिसून येते. त्यामुळे सदर पदास केंद्र शासनाच्या वेतनानुसार ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील वेतन देणे संयुक्तिक ठरणार नाही.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-२२ रु. ६००००-१९०८०० ही मंजूर करण्यात आली आहे. विभागानेही ह्या मागणीचे समर्थन केलेले नाही. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**१३.पशुधन विकास अधिकारी गट – ब :-**

**संघटनेची मागणी** :- राज्यातील सर्व जिल्हा परिषद स्तराकडील पशुधन पर्यवेक्षक संवर्गास विकास संवर्गातुन, सहाय्यक गट विकास अधिकारी व गटविकास अधिकारी, गट-अ अशी पदोन्नती साखळी उपलब्ध असल्याने संबधित संवर्गास आश्वासित प्रगती योजनेचा तिसऱ्या कालबध्द पदोन्नतीचा लाभ एस-२० या वेतन स्तराचा सरसकट लाभ मिळतो. मात्र पशुधन विकास अधिकारी गट-अ व गट-ब यांची सेवा जेष्ठता जाणीवपूर्वक वेगवेगळी केल्याने सदरहू पद एकाकी असल्याचे, पशुसंवर्धन विभागाचे म्हणणे आहे. ७२ व्या घटना दुरूस्ती नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाचे बळकटीकरण करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणानुसार शासनाकडील ज्या योजना/संस्था जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या, त्या संस्थांवर हे कर्मचारी कार्यरत होते. त्यांची सेवा त्याच संवर्गात, त्याच पदावर जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केल्या आहेत. त्यांना वेतन स्तर एस-२० चा लाभ मिळतो. ही तफावत अन्याय कारक आहे. त्या अनुषंगाने एक संवर्ग समान / पदोन्नती साखळी / समान कर्तव्य जबाबदाऱ्या त्या आधारे, समान वेतन या न्याय तत्वानुसार पशुधन विकास अधिकारी गट ब या संवर्गास वेतन स्तर एस-२० मंजूर होणे आवश्यक आहे.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- पशुधन विकास अधिकारी (गट-अ) व पदविकाधारक पशुधन विकास अधिकारी (गट-ब) यांच्या कर्तव्य व जबाबदारीमध्ये भिन्नता विचारात घेऊन ५ व्या वेतन आयोगापासून त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये ठेवण्यात आलेली वेतन तफावत ही योग्य असल्याने संबंधित संघटनामार्फत पशुधन विकास अधिकारी पदाच्या वेतनश्रेणीमध्ये एस-१६ वरुन एस-२० अशी सुधारणा करण्याची केलेली मागणी उचित ठरत नाही.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने ( ४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ वरुन एस-१६ नुकत्याच शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. त्यामुळे त्याच मुद्यावर फेर विचार होणे संयुक्तिक

ठरत नाही. विभागानेही मागणीचे समर्थन केले नाही. सबब, सदर संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

ड) कृषि विद्यापीठे

ड(१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

१४.सहायक कुल सचिव :-

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ मध्ये रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु. ५४०० आणि रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.५४०० या दोन्ही वेतनश्रेणी एकत्रित करण्यात आल्या असून, सातव्या वेतन आयोगामध्ये एस-२० ही वेतनश्रेणी समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार अकृषि विद्यापीठातील सहायक कुलसचिव पदाला एस-२० ही वेतनश्रेणी लागु करण्यात आली आहे. कृषि व अकृषि विद्यापीठातील सहायक कुलसचिव पदाचे कामकाज सारखेच असून या विद्यापीठातील सहायक कुलसचिव या पदाला एस-१६ वेतनश्रेणी लागु करण्यात आली आहे. त्यामुळे अकृषि विद्यापीठातील सहायक कुलसचिव या पदाला मिळणारी एस-२० ही वेतनश्रेणी कृषि विद्यापीठातील सहायक कुलसचिव पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना लागू करावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- अकृषि विद्यापीठांपैकी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा विचार केला असता दोन्ही विद्यापीठे केवळ ३ जिल्ह्याकरिता, कार्यरत आहेत. तथापि महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांकरिता, चार कृषि विद्यापीठे आहेत. म्हणजेच सरासरी ९ जिल्हे एका विद्यापीठात येतात. तसेच महाराष्ट्रात ते एकुण ४७ शासकीय व १६१ खाजगी महाविद्यालये असून एकुण १८,३६६ पदवीचे विद्यार्थी आहेत. त्याचबरोबर पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवीचे देखील विद्यार्थी आहेत. त्यामुळे कामाचे स्वरुप व व्यापकता हे अकृषि विद्यापीठांपेक्षा जास्त आहे. तसेच खाजगी महाविद्यालयांची शैक्षणिक कामे या पदास पहावी लागतात. त्यामुळे मागणी केलेली एस-२० ही वेतनश्रेणी लागु करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- कामाची व्याप्ती आणि विविधता पाहता अकृषि विद्यापीठातील प्रस्तुत संवर्गाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये या कृषि विद्यापीठातील संवर्गाशी तुलनीय आहेत असे म्हणता येणार नाही. तसेच कृषि व पदुम विभागाच्या अधिनस्त असलेल्या चारही कृषि विद्यापीठांमधील सहायक कुलसचिव या पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी लागू आहे. विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी वाढविण्याबाबत इतर कोणतीही नवीन समर्थनीय कारणे दिलेली नाहीत. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१५. शाखा अभियंता :-

<u>संघटनेची मागणी:-</u> शासन निर्णय दिनांक १३/०२/२०२३ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभाग/जलसंपदा विभाग/मृद व जलसंधारण विभागाच्या धर्तीवर, राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील शाखा अभियंता या पदांला एस-१५ ऐवजी एस-१६ ही सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या कामाचे स्वरूप खूप व्यापक व मोठ्या प्रमाणात आहे. रस्ते, पुल, मोठ्या इमारती इ. बांधकामे, सर्किट हाऊस देखभाल, दुरूस्ती, इतर शासकीय इमारतींची देखभाल, दुरूस्ती अशी मोठ्या प्रमाणातील व जोखमीची कामे त्यांना पार पाडावी लागतात. त्यांच्या तुलनेत कृषि विद्यापीठातील शाखा अभियंता यांच्या कामाचे स्वरूप कमी प्रमाणात आहे. त्यामुळे मागणी केलेली वेतनश्रेणी लागू करणे उचित होणार नाही असे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- कृषि व पदुम विभागाच्या दिनांक २८.०१.१९९४ मधील तरतुदीनुसार शेतकी अभियंता क्षेत्रातील शाखा अभियंता व जलसंपदा विभागातील शाखा अभियंता हे संवर्ग समकक्ष आहेत. सदर संवर्गाला ६व्या व ७व्या वेतनआयोगामध्ये समान वेतनश्रेणी मंजूर आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील प्रस्तुत संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. यास्तव कृषि व पदुम विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व कृषि विद्यापीठातील सदर पदाला एस-१५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागु करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१६.कनिष्ठ अभियंता :-

<u>संघटनेची मागणी</u> :-शासन निर्णय दिनांक १३/०२/२०२३ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभाग/जलसंपदा विभाग/मृद व जलसंधारण विभागाच्या धर्तीवर, राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील कनिष्ठ अभियंता या पदांला एस-१३ ऐवजी एस-१५ ही सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या कामाचे स्वरूप खूप व्यापक व मोठ्या प्रमाणात आहे. रस्ते, पुल, मोठ्या इमारती इ. बांधकामे, सर्किट हाऊस देखभाल, दुरूस्ती, इतर शासकीय इमारतींची देखभाल, दुरूस्ती अशी मोठ्या प्रमाणातील व जोखमीची कामे त्यांना पार पाडावी लागतात. त्यांच्या तुलनेत कृषि विद्यापीठातील कनिष्ठ अभियंता यांच्या कामाचे स्वरूप कमी प्रमाणात आहे. त्यामुळे मागणी केलेली वेतनश्रेणी लागू करणे उचित होणार नाही असे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- कृषि व पदुम विभागाच्या दिनांक २८.०१.१९९४ मधील तरतुदीनुसार शेतकी अभियांत्रिकी क्षेत्रातील कनिष्ठ अभियंता व जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता हे

संवर्ग समकक्ष ठरविले आहे. सदर संवर्गाला ६व्या व ७व्या वेतनआयोगामध्ये समान वेतनश्रेणी मंजूर आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील प्रस्तुत संवर्गाला दिनांक १३.०१.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. यास्तव कृषि व पदुम विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व कृषि विद्यापीठातील सदर पदाला एस-१३ रु.३५४००-११२४०० ऐवजी एस-१५ रु. ४१८००-१३२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१७. वरिष्ठ लिपिक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग तसेच महसूल व वन विभाग येथे कार्यरत असलेल्या वरिष्ठ लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांना एस-१० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात येते. त्याअनुषंगाने कृषि विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या वरिष्ठ लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांना कामाचे व्यापक स्वरूप व जबाबदाऱ्या पाहता वेतन कमी असल्यामुळे वरिष्ठ लिपिक या संवर्गाला एस-८ ऐवजी एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- इतर शासकीय विभागामध्ये सदर पदास एस-८ हीच वेतनश्रेणी लागू असल्याने मागणी केलेली वेतनश्रेणी लागू करणे उचित होणार नाही. तसेच सुधारित विकल्प देण्याचा विषय हा वेतन त्रुटी निवारण या विषयांतर्गत येत नसल्याकारणाने उपरोक्त सुधारित वेतनश्रेणीची मागणी मान्य करता येत नाही.

<u>समितीची शिफारस</u>:- वर नमूद संवर्ग सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश विभागांमध्ये कार्यरत असलेल्या संवर्गाच्या वेतनश्रेणी प्रमाणे आहे. प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्यासाठी विभागाने इतर कोणतेही समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गांना इतर विभागातील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१८. लिपिक टंकलेखक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- कामाचे व्यापक स्वरूप व जबाबदाऱ्या पाहता वेतन कमी असल्यामुळे लिपिक-टंकलेखक या संवर्गाला एस-६ ऐवजी एस-८ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- इतर शासकीय विभागामध्ये सदर पदास एस-६ हीच वेतनश्रेणी लागू असल्याने मागणी केलेली वेतनश्रेणी लागू करणे उचित होणार नाही.

<u>समितीची शिफारस</u>:- वर नमूद संवर्ग सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश विभागांमध्ये कार्यरत असलेल्या संवर्गाच्या वेतनश्रेणीप्रमाणे आहेत. प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्यासाठी विभागानेया मागणीचे समर्थन केलेले नाही. या संवर्गांना इतर विभागातील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी

समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

ड (२) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठ, परभणी

१९. कार्यदेशक पर्यवेक्षक :-

**<u>संघटनेची मागणी</u>** :- राज्यातील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील कार्यदेशक पर्यवेक्षक या पदाला एस-१३ ही वेतनश्रेणी लागु आहे. तथापि, इतर कृषि विद्यापीठांना एस-१० ही वेतनश्रेणी लागू आहे. सेवाप्रवेश नियम व कर्तव्य जबाबदाऱ्या चारही विद्यापीठांची समान असल्याने उर्वरित तीनही विद्यापीठांना एस-१० ऐवजी एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- बक्षी समितीमध्ये सदर पद हे कृषि विभागातील कार्यदेशक पर्यवेक्षक पदाशी समकक्ष असल्याचे नमूद करून त्या पदास कृषि विभागातील पदाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर केली आहे. एका विद्यापीठात समान पदाला वरिष्ठ श्रेणी व इतर ३ विद्यापीठांना कनिष्ठ श्रेणी अशा तफावतीमुळे अडचणी होत आहेत. त्यामुळे कार्यदेशक पर्यवेक्षक या पदाकरिता, चारही कृषि विद्यापीठांमध्ये एक समान वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४०० लागू करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u>** :- डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील कार्यदेशक पर्यवेक्षक या संवर्गाला वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ११.०२.२०१३ अन्वये ६ व्या वेतन आयोगामध्ये वेतनबँड पीबी-२: रु. ९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४२०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असून, त्यानुसार ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१३ रु.३५४००-११२४०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ व उपरोक्त नमूद कृषि विद्यापीठ मधील सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. सबब, उपरोक्त नमूद कृषि विद्यापीठांमधील कार्यदेशक पर्यवेक्षक या संवर्गाला एस-१३ रु.३५४००-११२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची समिती शिफारस करीत आहे.

ड (३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

२०. नळ कारागीर :-

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्यातील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील नळ कारागिर या पदाला एस-८ ही वेतनश्रेणी लागु आहे. तथापि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ येथे सदर पदाला एस-६ ही वेतनश्रेणी लागू आहे. सेवाप्रवेश नियम व कर्तव्य जबाबदाऱ्या समान असल्याने प्रस्तुत विद्यापीठातील नळ कारागीर या पदाला एस-६ ऐवजी एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- कृषि विद्यापीठ, दापोली येथील नळ कारागीर या पदास एस-८ ही वेतनश्रेणी लागू आहे. तथापी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील नळ कारागीर या पदास एस-६ ही वेतनश्रेणी लागू आहे. सदरहू पदास कृषि विद्यापीठ दापोली येथील नळ कारागीर या पदानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास हरकत नसावी.

समितीची शिफारस :- डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील नळ कारागीर या पदाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली व वसंतराव नाईक मराठवाडा, कृषि विद्यापीठ, परभणी येथील नळकारागीर या पदाचे सेवाप्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. सबब, वसंतराव नाईक मराठवाडा, कृषि विद्यापीठ, परभणी येथील "नळकारागीर" या पदाला एस-६ रु. १९९००-६३२०० ऐवजी एस-८ रु.२५५००-८१९०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

ड (४) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी

२१. वरिष्ठ तांत्रिक सहायक :-

संघटनेची मागणी :- सदर पद हे वरिष्ठ संशोधन सहाय्यक पदाशी समकक्ष आहे. ४ थ्या वेतन आयोगात दोन्ही पदांना समान वेतनश्रेणी होती. त्यांच्या शैक्षणिक पात्रता देखील समान आहेत. केवळ अभियांत्रिकी महाविद्यालयात हे पद कार्यरत असल्याने त्यास वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक असे संबोधण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाला एस-१४ ऐवजी वरिष्ठ संशोधन सहाय्यक पदाची एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक व वरिष्ठ संशोधन सहाय्याक या पदांची शैक्षणिक अर्हता भिन्न असल्यामुळे मागणी केलेली वेतनश्रेणी एस- १५ लागू करणे उचित होणार नाही असे मत आहे.

समितीची शिफारस :- वरिष्ठ तांत्रिक सहायक व वरिष्ठ संशोधन अधिकारी या संवर्गाची शैक्षणिक अर्हता भिन्न आहेत. विभागानेही या मागणीचे समर्थन केले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२२. यांत्रिक पर्यवेक्षक :-

संघटनेची मागणी :- यांत्रिक पर्यवेक्षक या संवर्गास एस - १० या वेतनश्रेणी ऐवजी एस -१३ ही वेतनश्रेणी लागू करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदरहू पदांबाबतचे सेवाप्रवेश नियम व कार्य व जबाबदाऱ्या शासनास सादर न करण्यात आल्या कारणाने निश्चित भाष्य करता येत नाही.

**समितीची शिफारस** :- विभागाच्या अभिप्रायामध्ये सदरहू पदांबाबतचे सेवाप्रवेश नियम व कार्य व जबाबदाऱ्या शासनास सादर न करण्यात आल्या कारणाने निश्चित भाष्य करता येत नाही, असे नमूद केले आहे. तसेच, सदर संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याच्या अनुषंगाने विभागाने या मागणीचे समर्थन केलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२३. तांत्रिक सहायक (यांत्रिकी) :-

**संघटनेची मागणी** :- चारही कृषि विद्यापीठांमध्ये समान पद असुन त्यांचे सेवा प्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदाऱ्या, शैक्षणिक अर्हता या सर्व बाबी एकसमान आहेत. तथापि,प्रत्येक विद्यापीठात वेगवेगळ्या वेतनश्रेणी आहेत. त्यामुळे परभणी विद्यापीठातील तांत्रिक सहायक संवर्गाप्रमाणे इतर विद्यापीठातील सदर पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- चारही कृषि विद्यापीठांमध्ये समान पद असुन त्यांचे सेवा प्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदाऱ्या, शैक्षणिक अर्हता या सर्व बाबी एकसमान आहेत. तथापि, प्रत्येक विद्यापीठात वेगवेगळ्या वेतनश्रेणी आहेत त्यामुळे मागणी केली आहे. सबब, एकसमान वेतनश्रेणी करिता, परभणी वगळता इतर ३ विद्यापीठांत सदर पदास एस-१६ रु. ४४९००-१४२४०० व एस-१५ रु. ४१८००- १३२३०० (इतरांसाठी) अशी वेतनश्रेणी लागु करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस** :- तांत्रिक सहायक (यांत्रिकी) या संवर्गास चारही विद्यापीठांमध्ये वेगवेगळी वेतनश्रेणी मंजूर आहे. राहुरी व अकोला विद्यापीठात एस-१०, परभणी येथे एस-१६ व एस-१५ आणि दापोली येथे एस-१५ वेतनश्रेणी मंजूर आहे. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने दिनांक १९.०९.२०२४ रोजी पाठविलेल्या प्रस्तावानुसार परभणी कृषि विद्यापीठ येथील प्रस्तुत संवर्गाची शैक्षणिक अर्हता "संबंधित विषयातील दुसऱ्या वर्गाची पदव्युत्तर पदवी व विद्यापीठातील ५ वर्षाचा अनुभव" अशी आहे. तर इतर विद्यापीठातील प्रस्तुत संवर्गाची शैक्षणिक अर्हता उपलब्ध करून दिली नसल्यामुळे शैक्षणिक अर्हता समान आहे ही बाब स्पष्ट होत नाही. प्रस्तुत संवर्गाला सहाव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२४. तांत्रिक सहायक (ग्रंथालय):-

**संघटनेची मागणी** :- तांत्रिक सहायक (ग्रंथालय) या पदाला राहुरी येथे एस-१०, अकोला व परभणी येथे एस-१४ तर दापोली येथे एस-१३ ही वेतनश्रेणी लागू आहे. प्रत्येक विद्यापीठात एकाच पदास वेगवेगळी वेतनश्रेणी आहे. त्यामुळे एक समान वेतनश्रेणी राहण्याच्या हेतुने

चारही विद्यापीठातील तांत्रिक सहायक (ग्रंथालय) या संवर्गाला एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- तांत्रिक सहायक (ग्रंथालय) या पदाला राहूरी येथे एस-१०, अकोला व परभणी येथे एस-१४ तर दापोली येथे एस. १३ ही वेतनश्रेणी लागू आहे. प्रत्येक विद्यापीठात एकाच पदास वेगवेगळी वेतनश्रेणी आहे. त्यामुळे एक समान वेतनश्रेणी राहण्याच्या हेतुने चारही विद्यापीठातील तांत्रिक सहायक (ग्रंथालय) या संवर्गाला एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- अकोला व परभणी कृषि विद्यापीठातील तांत्रिक सहायक (ग्रंथालय) या संवर्गाला एस-१४ ही वेतनश्रेणी मंजूर आहे. त्याप्रमाणे वेतनश्रेणी राहूरी व दापोली कृषि विद्यापीठांना मंजूर नाही. याबाबत नमूद करण्यात येते की, सर्वच विद्यापीठातील सेवाप्रवेश नियमांआधारी यांची तुलना करणे शक्य होत नाही. सबब, या संवर्गाचे वेतनश्रेणी सुधारणेबाबत कृषि व पदुम विभागाने वित्त विभागाशी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करुन निर्णयाप्रत येणे उचित होईल.

२५. मिश्रक (पशुवैद्यकीय) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- मिश्रक (वैद्यकीय) व मिश्रक (पशुवैद्यकीय) या पदांची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये जबाबदाऱ्या व तिसऱ्या वेतन आयोगामध्ये रु.२९०-५४० higher start रु.३३०/- for diploma holder समान वेतन संरचना लागू असताना ४ था, ५ वा, ६ वा व ७ व्या वेतन आयोगामध्ये सुधारित वेतनसंरचना लागू करताना दोन्ही पदांना वेगवेगळ्या वेतनसंरचना लागू करण्यात आलेल्या आहेत. समान काम, समान वेतन या न्यायनिर्णयाच्या अधिन राहून सातव्या वेतन आयोगामध्ये वेतनत्रुटीतील तफावत दूर करुन दोन्ही पदांना समान वेतनश्रेणी लागू करावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- राहूरी येथील मिश्रक (वैद्यकिय) या पदास एस- १० ही वेतनश्रेणी असली तरी सदर पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या व कामाचे स्वरूप हे मिश्रक (पशुवैद्यकीय) या पदापेक्षा जादा प्रमाणात आहेत. त्यामुळे मागणी केलेली वेतनश्रेणी एस-१० लागू करणे उचित होणार नाही असे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समिती (४ था वेतन आयोग) यांनी मिश्रक (वैद्यकीय) व मिश्रक (पशुवैद्यकीय) या संवर्गांना समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे ४ था, ५ वा, ६ व्या वेतन आयोगामध्ये सुधारित वेतनसंरचना लागू करताना दोन्ही संवर्गांना वेगवेगळ्या वेतनसंरचना लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत संवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात लागू करण्यात आली आहे. विभागाचे संवर्गाच्या मागणीला समर्थन नाही. या संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२६.नळ कारागीर :-

<u>संघटनेची मागणी</u> :- डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील नळ कारागीर या संवर्गाला शासन निर्णय दिनांक १८/१०/२०११ व वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ११/०२/२०१३ अन्वये एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. तथापि, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पदाला एस-६ ही वेतनश्रेणी लागू आहे. प्रस्तुत विद्यापीठातील नळकारागीर या पदाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेली याचिका दिनांक १८/१२/२०२२ रोजी निकाली काढली असून, पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "We dispose of the petition by directing respondents no. 1 and 2 to take appropriate decision on the proposal received from the respondent no. 3 - University (Exhibit - F) as expeditiously as possible and in any case within 12 weeks." सबब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील नळकारागीर या पदाला एस-६ ऐवजी एस-८ ही वेतनश्रेणी लागू करावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- राज्यातील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील नळकारागीर या पदास आयटीआय प्रमाणपत्र धारकांकरिता, एस-८ ही वेतनश्रेणी लागू आहे. तथापि, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील नळकारागीर या पदास एस-६ ही वेतनश्रेणी लागू आहे. सदरहू पदास डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :- डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील नळ कारागीर या पदाला एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील नळकारागीर या पदाचे सेवाप्रवेश नियम कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. सबब, वसंतराव नाईक मराठवाडा, कृषि विद्यापीठ, परभणी येथील "नळ कारागीर" या पदाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२७. मिस्त्री :-

<u>संघटनेची मागणी</u> :- डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील मिस्त्री या संवर्गाला शासन निर्णय दिनांक १८/१०/२०११ व वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ११/०२/२०१३ अन्वये एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. तथापि, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पदाला एस-६ ही वेतनश्रेणी लागू आहे. प्रस्तुत विद्यापीठातील मिस्त्री या पदाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेली याचिका दिनांक १८/१२/२०२२ रोजी निकाली काढली आहे. We dispose of the petition by directing respondents no. 1 and 2 to take appropriate decision on the proposal received from the respondent no. 3 - University (Exhibit - F) as expeditiously as possible and in any case within 12 weeks. सबब,

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील मिस्त्री या पदाला एस-६ ऐवजी एस-८ ही वेतनश्रेणी लागू करावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- राज्यातील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील मिस्त्री या पदास आयटीआय प्रमाणपत्र धारकांकरिता, एस-८ ही वेतनश्रेणी लागू आहे. तथापि, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील मिस्त्री या पदास एस-६ ही वेतनश्रेणी लागू आहे. सदरहू पदास डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :- डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील मिस्त्री या पदाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. या पदाचे सेवाप्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. सबब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील "मिस्त्री" या पदाला एस-६ रु.१९९००-६३२०० ऐवजी एस-८ रु.२५५००-८११०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**ड (५) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषितंत्र विद्यालय, मालेगाव**

२८. प्राचार्य :-

<u>संघटनेची मागणी</u> :- महाराष्ट्र राज्यातील खाजगी शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनामार्फत संचलित, कृषि विद्यापीठांची संलग्न व शासन अनुदानित कृषि तंत्र विद्यालय मालेगाव कॅम्प, जिल्हा नाशिक येथील प्राचार्य पदास सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी (रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६०००) लागू करणे बाबत संस्थेमार्फत व संबंधित कृषि तंत्र विद्यालयामार्फत वारंवार मागणी करण्यात येत आहे. शासनाने सहाव्या वेतन आयोगानुसार स्थापन केलेल्या वेतन त्रुटीच्या शिफारशीनुसार शासन निर्णय दिनांक ११ फेब्रुवारी २०१३ अन्वये मालेगाव येथील कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य पदास सुधारित वेतनश्रेणी लागू न करता फक्त ग्रेड पे मध्ये २०० एवढी वाढ करून दिली हे न्याय उचित नाही कृषि विद्यापीठाच्या प्रत्यक्ष नियंत्रणा खालील कृषि तंत्र विद्यालयांप्रमाणेच संलग्न कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्यांना प्रशासकीय आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सारखेच कामे व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. शैक्षणिक अर्हता देखील समान आहे फक्त वेतनश्रेणी तफावत ठेवून फार मोठा अन्याय केला आहे. कृषि विद्यापीठाशी संलग्न शासन अनुदानित कृषि तंत्र विद्यालय मालेगाव कॅम्प येथील प्राचार्य पदास सहाय्यक पदाची वेतनश्रेणी किंवा ग्रेड पे रु.५४०० सातव्या वेतन आयोगापासून लागू करावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- राज्यातील इतर कृषि विद्यापीठांतर्गत संलग्नित विद्यालये, महाविद्यालये यांमधील प्राचार्य पदाची वेतनश्रेणी ही सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन त्रुटी समितीच्या निर्णयानुसार ग्रेड पे ४४०० वरून ग्रेड पे ४६०० अशी सुधारित करण्यात आली होती. त्यानुसार, सदरहू वेतनश्रेणी समर्पक असून सुधारणेची आवश्यकता दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतनत्रुटी निवारण समिती २०१२ यांच्या शिफारशीनुसार, सदरहू संवर्गाच्या वेतनश्रेणीत सहाव्या वेतन आयोगात शासन निर्णय दिनांक ११.०२.२०१३ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये पुन्हा सुधारणा करण्याबाबत कोणताही नवीन मुद्दा उपस्थित केलेला नाही.विभागानेही संवर्गाच्या मागणीचे समर्थन केलेले नाही. ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी सुधारित समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. या संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

२९.मुकादम :-

<u>संघटनेची मागणी</u> :- कृषि तंत्र विद्यालय मालेगाव कॅम्प हे विद्यालय शासन अनुदानित व महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी, विद्यापीठाशी संलग्न आहे. ह्या विद्यालयातील मुकादम या पदाची वेतनश्रेणी S-१ रुपये १५०००-४७६०० अशी मंजूर करण्यात आलेली आहे. तथापि, निदर्शनास आणण्यात येते की, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी, येथील मुकादम पदासाठी एस-३ १६६००- ५२४०० ही वेतनश्रेणी लागू केलेली आहे. त्यामुळे या कृषि तंत्र विद्यालयातील मुकादम या पदास देखील S-३ रु.१६६००- ५२४०० ही वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक ठरते. तसेच मुकादम या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. तरी महात्मा फुले कृषि विद्यापीठाशी संलग्न असलेले कृषि तंत्र विद्यालय मालेगाव कॅम्प जिल्हा नाशिक येथील मुकादम पदास S-३ रु.१६६००-५२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्यास विनंती आहे.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- कृषि विद्यापीठ राहूरी अंतर्गत कृषि तंत्र विद्यालय, (अनुदानित) मालेगाव येथील मुकादम पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या समान असल्याकारणाने कृषि विद्यापीठ राहूरी येथील मुकादम पदाप्रमाणे कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव येथील मुकादम पदाची वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- मुकादम या संवर्गास कृषि व पदुम विभागाच्या अधिनस्त असलेल्या महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी येथे एस-३ ही वेतनश्रेणी मंजूर केलेली दिसून येते. तसेच विभागाने सदर प्रस्तावाचे समर्थन केले आहे. कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव कॅम्प हे महाविद्यालय कृषि विद्यापीठ, राहूरी अंतर्गत कार्यरत असल्याने सदर पदाला एस-१ रु.१५०००-४७१०० या वेतनश्रेणी ऐवजी कृषि विद्यापीठ राहूरी येथील मुकादम या संवर्गाप्रमाणे एस-३ रु.१६६००-५२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**ड (६) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत ग्रामीण शिक्षण संस्था, पिंपरी, वर्धा.**

३०. फिल्डमन फॉर हॉर्टीकल्चर :-

<u>संघटनेची मागणी</u> :- फिल्डमन फॉर हॉर्टिकल्चर पदांची कर्तव्य व जबाबदाऱ्या व सेवा प्रवेश नियम फिल्डमन फॉर हॉर्टीकल्चर रुरल इंस्टीट्यूट अमरावती सारखी आहेत, तसेच शैक्षणिक अर्हता सुध्दा सारखी आहे. रुरल इंस्टिट्युट पिंपरी वर्धा, येथील फिल्डमन फॉर हॉर्टीकल्चर

या पदाचे ग्रेड वेतन रूरल इंस्टिट्युट अमरावती येथील पदाप्रमाणे रु. २००० ऐवजी रु २४०० ग्रेड वेतन मजूर करण्यात यावे .

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- ग्रामीण शिक्षण संस्था, अमरावती तसेच पिंपरी व वर्धा येथील फिल्डमन व फिल्डमन फॉर हॉर्टिकल्चर या पदांच्या कर्तव्य जबाबदाऱ्या, सेवा प्रवेश नियम तसेच शैक्षणिक अर्हता समान असल्याकारणाने ग्रामीण शिक्षण संस्था, पिंपरी वर्धा येथील पदांची वेतनश्रेणी सुधारित करण्यास हरकत नसावी.

**समितीची शिफारस** :-डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला व सदर विद्यापीठाच्या अंतर्गत ग्रामीण शिक्षण संस्था, अमरावती तसेच पिंपरी व वर्धा येथील फिल्डमन फॉर हॉर्टिकल्चर या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याकारणाने सदर संवर्गाला एस-७ रु. २१७००-६९१०० ऐवजी एस-८ रु.२५५००-८११०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३१.फिल्डमन :-

**संघटनेची मागणी** :- फिल्डमन पदांची कर्तव्य व जबाबदाऱ्या व सेवा प्रवेश नियम फिल्डमन रुरल इंस्टीट्यूट अमरावती सारखी आहेत, तसेच शैक्षणिक अर्हता सुध्दा सारखी आहे. रूरल इंस्टीट्यूट पिंपरी वर्धा, येथील फिल्डमन या पदाचे ग्रेड वेतन रूरल इंस्टीट्यूट अमरावती येथील पदाप्रमाणे रु २४०० मंजूर करण्यात यावे .

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- ग्रामीण शिक्षण संस्था, अमरावती तसेच पिंपरी व वर्धा येथील फिल्डमन व फिल्डमन फॉर हॉर्टिकल्चर या पदांच्या कर्तव्य जबाबदाऱ्या, सेवा प्रवेश नियम तसेच शैक्षणिक अर्हता समान असल्याकारणाने ग्रामीण शिक्षण संस्था, पिंपरी वर्धा येथील पदांची वेतनश्रेणी सुधारित करण्यास हरकत नसावी.

**समितीची शिफारस**:- डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला व सदर विद्यापीठाच्या अंतर्गत ग्रामीण शिक्षण संस्था, अमरावती तसेच पिंपरी व वर्धा येथील फिल्डमन या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याकारणाने सदर संवर्गाला एस-६ रु. १९९००-६३२०० ऐवजी एस-८ रु.२५५००-८११०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

ड (७) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत शिवाजी कृषि महाविद्यालय, अमरावती.

३२. प्रक्षेत्र अधिक्षक :-

**संघटनेची मागणी** :- सर्व कृषि विद्यापीठांमध्ये व शासन अनुदानित संलग्न शिक्षण संस्था आनंद निकेतन कृषि महाविद्यालय, वरोरा येथील प्रक्षेत्र अधिक्षक या संवर्गाला ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१३ ऐवजी एस-१६ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

__प्रशासकीय विभागाचे अभिप्राय__ :- डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत श्री शिवाजी कृषि महाविद्यालय, अमरावती, आनंद निकेतन कृषि महाविद्यालय, वरोरा ही कृषि महाविद्यालये व जनता कृषि तंत्र विद्यालय, अमरावती, ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा, ग्रामीण शिक्षण संस्था, अमरावती या संस्था आहेत. त्यापैकी, आनंद निकेतन कृषि महाविद्यालय, वरोरा येथील प्रक्षेत्र अधीक्षक पदास वेतनश्रेणी ९३००-३४८०० व ग्रेड पे ४४०० लागू आहे. इतर शैक्षणिक संस्थांमधील समपदास ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० लागू आहे. सदरहू पदांबाबतचे सेवाप्रवेश नियम व कार्य व जबाबदा या शासनास सादर न करण्यात आल्याकारणाने निश्चित भाष्य करता येत नाही.

__समितीची शिफारस__ :- सदरहू पदांबाबतचे सेवाप्रवेश नियम व कार्य व जबाबदाऱ्या शासनास सादर न करण्यात आल्याकारणाने निश्चित भाष्य करता येत नाही असे विभागाने कळविले आहे. विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत आवश्यक ते कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले नाहीत.सदर पदाला सहाव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही. ।

(८) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

३३. क्रीडा अधिकारी :-

__संघटनेची मागणी__ :- इतर कृषि विद्यापीठातील क्रीडा अधिकारी या पदाची वेतनश्रेणी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतन संरचनेनुसार शारीरीक शिक्षण निदेशक पदाची वेतनश्रेणी Academic level १० रु.५७७००-१८२४०० अशी असून डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील सदर पदास एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागू आहे. सबब, सदर विद्यापीठामध्ये क्रीडा अधिकारी या पदाच्या वेतनश्रेणी UGC Academic level १० रु.५७७००-१८२४०० लागू करण्यात यावी.

__प्रशासकीय विभागाचे अभिप्राय__ :- क्रीडा अधिकारी या पदास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शारीरिक शिक्षण निदेशक पदासाठी असलेल्या वेतनश्रेण्या वित्त विभागाच्या मान्यतेने पुर्वलक्षी प्रभावाने दिनांक ०१.०४.१९८० पासुन लागू करण्यात आलेल्या आहेत. यास्तव कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली येथील क्रीडा अधिकारी या पदाला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनसंरचनेनुसार शारीरिक शिक्षण निर्देशक पदाची वेतन श्रेणी Academic Level १० रु.५७७००-१८२४०० लागू करण्याबाबत प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समितीसमोर सादर करण्याबाबत वित्त विभागाने अभिप्राय दिले होते. त्यानुसार प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

__समितीची शिफारस__ :- कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली स्थापन करण्यासाठी शासन निर्णय दि.०७.०१.२००० अन्वये शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील १०१ पदे

निर्माण करण्यात आली आहेत. यामध्ये क्रीडा अधिकारी (वेतनश्रेणी ७४५०-२२५-११५००) हे पद सहाय्यक कर्मचारी या गटात अंतर्भूत करण्यात आलेले आहे. वास्तविक वरिष्ठ महाविद्यालयाकरिता शारीरिक शिक्षण निदेशक (वेतनश्रेणी ८०००-२७५-१३५००) या संवर्गातील पदे अनुज्ञेय असताना प्रस्तुत महाविद्यालयाकडील क्रीडा अधिकारी हे पद कनिष्ठ वेतनश्रेणीत निर्माण करण्यात आल्याचे निदर्शनास येते. महाराष्ट्र राज्य कृषि विद्यापीठ, परिनियम १९९० मधील कलम ७९ नुसार क्रीडा अधिकारी तसेच शारीरिक शिक्षण निदेशक ही पदे शिक्षक वर्गीय प्रवर्गातील असली तरी, मुळात पद निर्मितीच्या वेळेसच सदर पद कनिष्ठ वेतनश्रेणीत निर्माण करण्यात आलेले आढळते. क्रीडा अधिकारी या पदास UGC वेतनश्रेणी द्यावयाची झाल्यास प्रथमतः ते पद उच्च वेतनश्रेणीत दर्शविणे आवश्यक ठरेल. त्यानंतरच सदर पदाची वेतनश्रेणी सुधारण्याबाबत निर्णय घेणे योग्य राहील. त्यामुळे या पदाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

३४. आरेखक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१३ असून चार वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.२८.०७.२००९ नुसार, आरेखक पदाची वेतनश्रेणी चार वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० अशी निश्चित करण्यात आली आहे. तथापि, ६ व्या वेतन आयोगाच्या कृषि विभागाच्या शासन निर्णयानुसार, या पदास रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० अशी वेतनश्रेणी चार वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर लागू करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार सदरहू पदाची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० अशी सुधारित करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. सदरहू मागणीस अनुसरून वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० (एस-१४: ३८६००-१२२८००) अशी सुधारणा करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक २८.०७.२००९ अन्वये रेखाचित्र संवर्गात एकाच वेतनश्रेणीत विविध विभागात वेगवेगळ्या पदनामाने पदे अस्तित्वात आहेत. यामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने रेखाचित्र संवर्गातील पदनामे केंद्र शासनाकडील पदनामांच्या आधारे सर्व विभागात सारखेच करण्यात आली असून वेतनश्रेणी दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार आरेखक संवर्गास चार वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४३०० (७ व्या वेतन आयोगानुसार एस-१४ रु.३८६००-१२२८००) मंजूर करण्यात आली आहे. अन्य विभागातील उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग इ. आरेखक या पदास चार वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१४ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सबब, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील आरेखक या पदास चार वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१४ रु.३८६००-१२२८०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

(इ) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

३५. सहायक कुलसचिव :-

<u>संघटनेची मागणी</u> :- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथील सहायक कुलसचिव या पदाची वेतनश्रेणी एस-२० आहे. सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या या महाराष्ट्र पशु मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेशी समान असून पदनाम सुद्धा सारखेच आहे. तसेच दोन्ही विद्यापीठामधील सहायक कुलसचिव या पदाचे सेवाप्रवेश नियमसुद्धा सारखेच आहेत. सबब, सदर पदाची वेतनश्रेणी एस-१६ ऐवजी एस-२० करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- विद्यापीठ व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयामधील सहायक कुलसचिव यांचे कर्तव्य व जबाबदारी पाहता व मंजूर पदसंख्या कमी असल्यामुळे जास्त आर्थिक भार पडणार नाही या बाबी समोर ठेवून एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यास हरकत नसावी.

समितीची शिफारस :- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्न महाविद्यालयांची संख्या व विद्यार्थी संख्या विचारात घेता त्यांच्याकडील सवंर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची व्याप्ती व अभ्यासक्रमाची विविधता निश्चितच अधिक आहे. तसेच कृषि व पदुम विभागाच्या अधिनस्त असलेल्या चारही कृषि विद्यापीठांमधील सहायक कुलसचिव या पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी लागू आहे. विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी वाढविण्याबाबत इतर कोणतीही नवीन समर्थनीय कारणे दिलेली नाहीत. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

३६. स्वीय सहायक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- वित्त विभागाच्या दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशी स्वीकृत करण्यात आलेल्या आहेत. तथापि, विद्यापीठातील स्वीय सहायक हे शासनातील लघुलेखक या दर्जाचे असून सदर पदास अद्याप सुधारित वेतनस्तर लागू करण्यात आलेला नाही. सबब, सदर पदाला एस-१६ ऐवजी एस-२५ ही वेतनश्रेणी केंद्र शासनाप्रमाणे लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- केंद्र शासनाप्रमाणे एस-२५ ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबत मागणी केली आहे. तथापि, विद्यापीठातील स्वीय सहायक या पदास, शासनातील लघुलेखक (निवडश्रेणी) या पदाला खंड -२ अन्वये लागू केलेली एस-१७ ही वेतनश्रेणी अद्याप लागू करण्यात आलेली नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- केंद्र शासनाप्रमाणे एस -२५ ही वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी योग्य ठरत नाही. तथापि, निवडश्रेणी लघुलेखक या संवर्गाला वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक

१३.०२.२०२३ अन्वये एस-१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. यास्तव महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ येथील स्वीय सहायक या संवर्गाला एस-१६ रु.४४९००-१४२४०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

३७. लघुलेखक (उच्चश्रेणी) :-

संघटनेची मागणी :- विद्यापीठामध्ये उच्चश्रेणी लघुलेखक या संवर्गाकरिता, सातव्या वेतन आयोगानुसार खंड-२ मध्ये एस-१६ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर आहे. सदर प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाप्रमाणे एस-१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाप्रमाणे एस-१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

समितीची शिफारस :- विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार केंद्र शासनाप्रमाणे एस -१७ ही वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी योग्य ठरत नाही. तथापि, उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गाला वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये नुकतीच एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्याच मुद्यावर पुनश्च फेर विचार करणे संयुक्तिक नाही. यास्तव या संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

३८. लघुलेखक (निम्नश्रेणी) :-

संघटनेची मागणी:- विद्यापीठामध्ये निम्नश्रेणी लघुलेखक या संवर्गाकरिता, ७व्या वेतन आयोगानुसार खंड-२ मध्ये एस-१५ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर आहे. सदर प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाप्रमाणे एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाप्रमाणे एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

समितीची शिफारस :- विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार केंद्र शासनाप्रमाणे एस -१६ ही वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी योग्य ठरत नाही. तथापि, निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गाला वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये नुकतीच एस-१४ ऐवजी एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्याच मुद्यावर पुनश्च फेर विचार करणे संयुक्तिक नाही. यास्तव या संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

३९. प्रक्षेत्र सहायक व कृषि सहायक :-

संघटनेची मागणी :- विद्यापीठात प्रक्षेत्र सहायक व कृषि सहायक पदाची वेतनश्रेणी एस-८ आहे. सदर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना १२ वर्षाच्या सतत सेवेनंतर सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात येतो. परंतु इतर विद्यापीठ जसे परभणी येथे सदर पदाला ७ वर्षाच्या सेवेनंतर एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात येते. महाराष्ट्र पशु मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व परभणी कृषि विद्यापीठ येथील सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असून

पदनाम सुद्धा सारखेच आहेत. सबब, सदर पदाला सुद्धा ७ वर्षानंतर एस-८ ऐवजी एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- विद्यापीठाच्या प्रक्षेत्राबरील काम, कर्तव्य व जबाबदाऱ्या पाहता व सर्व कृषि विद्यापीठामधील कृषि सहाय्यकांना देण्यात येणाऱ्या वेतनश्रेणीस अनुसरुन सात वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यास हरकत नसावी.

**समितीची शिफारस** :- कृषि विभागांतर्गत कृषि विद्यापीठे संलग्न कृषि महाविद्यालये येथील प्रक्षेत्र सहायक व कृषि सहायक यांना ७ वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर एस -१० रु. २९२०० - ९२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात येते. सबब,, या विभागांतर्गत प्रक्षेत्र सहायक व कृषि सहायक यांच्या सेवाप्रवेश नियमात तरतूद असण्याच्या अटीच्या अधीन राहून सदर संवर्गाला ७ वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर एस -१० रु. २९२००-९२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**४०.यंत्रज्ञ तथा तारतंत्री :-**

**संघटनेची मागणी** :- विद्यापीठात यंत्रज्ञ तथा तारतंत्री या संवर्गाकरिता, सातवा वेतन आयोगानुसार एस-६ ही वेतनश्रेणी मंजूर आहे. दुग्धव्यवसाय विभाग येथील नमूद तारतंत्री या पदाची वेतनश्रेणी एस-८ आहे. दोन्ही कार्यालयामधील पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या जवळपास समान असून पदनाम व सेवाप्रवेश नियमसुद्धा सारखेच आहेत. सबब, सदर पदाला एस-६ ऐवजी एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- दुग्ध व्यवसाय विकास विभाग महाराष्ट्र शासन येथील पद व विद्यापीठातील पद हे समकक्ष असून त्याप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी एस-८ लागू करण्यास हरकत नसावी.

**समितीची शिफारस** :- दुग्धव्यवसाय विकास विभागातील व पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ अंतर्गत तारतंत्री या संवर्गाची वेतनश्रेणी पूर्वीपासूनच भिन्न आहे. या संवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-६ लागू करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

******

## ३.२ सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रूपये) | मागणी केलेले वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रूपये) |
| | अ)रेशीम संचालनालय | | | | |
| १ | संचालक (रेशीम) | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२६ रु.८२२००-२१९५०० (खंड २ प्रमाणे) | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० |
| २ | उपसंचालक (रेशीम) | ९३००-३४८०० | ५४०० | एस-२१ रु.५७१००-१८०८००(खंड २ प्रमाणे) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ३ | सहायक संचालक (रेशीम) | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१७ रु.४७६००-१५११००(खंड २ प्रमाणे) | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ४ | रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-२) | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१५ रु.४१८००-१३२३००(खंड २ प्रमाणे) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ५ | वरिष्ठ तांत्रिक सहायक | ५२००-२०२०० | २८०० | एस-११ रु.३०१००-९५१०० (खंड २ प्रमाणे) | एस-१३ रु.३५४००-११२४०० |

अ) रेशीम संचालनालय

१. संचालक (रेशीम):-

<u>संघटनेची मागणी :-</u> संचालक (रेशीम) ( वेतनश्रेणी एस-२६ रु.८२२००-२१९५०० (खंड २ प्रमाणे) या पदाच्या वेतनश्रेणीत संचालक (फलोत्पादन) कृषि विभाग या पदाप्रमाणे एस-२७ रु.१२३१००-२१५९००अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> संचालक (रेशीम) या पदाची वेतनश्रेणी संचालक (फलोत्पादन) कृषिविभाग या पदाप्रमाणे करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये संचालक या

संवर्गाची वेतनश्रेणी एस-२५ वरुन एस-२६ नुकतीच करण्यात आली आहे. सबब,, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळून येत नाही.

२. उपसंचालक (रेशीम):-

**संघटनेची मागणी:-** उपसंचालक (रेशीम) ( वेतनश्रेणी एस-२१ रु.५७१००-१८०८०० (खंड २ प्रमाणे) या पदाच्या वेतनश्रेणीत अधिक्षक, कृषि अधिकारी, कृषि विभाग या पदाप्रमाणे एस-२३ रु.६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> उपसंचालक (रेशीम) या पदाची वेतनश्रेणी अधिक्षक, कृषि अधिकारी, कृषि विभाग या पदाप्रमाणे करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये उपसंचालक या संवर्गाची वेतनश्रेणी एस-२० वरुन एस-२१ नुकतीच करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळून येत नाही.

३. सहायक संचालक (रेशीम):-

**<u>संघटनेची मागणी:-</u>** सहायक संचालक (रेशीम) ( वेतनश्रेणी एस १७ रु.४७६००-१५११००(खंड २ प्रमाणे) या पदाच्या वेतनश्रेणीत कृषि उपसंचालक/ कृषिविकास अधिकारी, कृषि विभाग या पदाप्रमाणे एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>** सहायक संचालक (रेशीम) या पदाची वेतनश्रेणी कृषि उपसंचालक/ कृषिविकास अधिकारी, कृषि विभाग या पदाप्रमाणे करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये सहायक संचालक या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१६ वरुन एस-१७ नुकतीच करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळून येत नाही.

**४. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-२) :-**

<u>संघटनेची मागणी:-</u> रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-२) ( वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० (खंड २ प्रमाणे) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>** रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-२) या पदाची वेतनश्रेणी रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-१) या पदाप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२ या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१४ वरुन एस-१५ नुकतीच करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळून येत नाही.

५. वरिष्ठ तांत्रिक सहायक :-

<u>संघटनेची मागणी</u>:- वरिष्ठ तांत्रिक सहायक ( वेतनश्रेणी एस-११ रु.३०१००-९५१०० (खंड २ प्रमाणे) या पदाच्या वेतनश्रेणीत कृषि पर्यवेक्षक, कृषि विभाग पदाप्रमाणे एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वरिष्ठ तांत्रिक सहायक या पदाची वेतनश्रेणी कृषि पर्यवेक्षक कृषि विभाग या पदाप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये वरिष्ठ तांत्रिक सहायक या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१० वरुन एस-११ नुकतीच करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळून येत नाही.

****

३.३. वित्त विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | विद्यमान वेतनसंरचना | | सातवा वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) | मागणी केलेली वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) |
| | अ)वस्तू व सेवाकर कार्यालय | | | | |
| १ | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| २ | राज्यकर निरीक्षक व केंद्रीय वस्तू व सेवाकर निरीक्षक (गट-ब अराजपत्रित) | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ३ | महाव्यवस्थापक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१३२३०० |
| ४ | व्यवस्थापक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| | ब) विमा संचालनालय, मुंबई | | | | |
| ५ | सहायक विमा संचालक | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ६ | कनिष्ठ तांत्रिक अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ७ | तांत्रिक सहायक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |

अ) वस्तू व सेवाकर कार्यालय :-

१.ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी :-

**<u>संघटनेची मागणी :-</u>** नियोजन विभागातील ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी वस्तू व सेवा कर विभागातील ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी यांचे सेवा प्रवेश नियम समान आहेत. परंतु फक्त

नियोजन विभागातील ग्रंथपाल यांना राज्य वेतन सुधारणा समिती खंड-२ नुसार सुधारित वेतनस्तर एस-२० एकदा वेचावून देण्यात आला असून, वस्तू व सेवा कर विभागातील ग्रंथपाल यांना लागू असलेली वेतनश्रेणी मध्ये तफावत आहे. यास्तव नियोजन विभागातील ग्रंथपाल यांना लागू असलेली वेतनश्रेणी वस्तू व सेवा कर विभागातील ग्रंथपाल यांना एस-१५ ऐवजी एस-२० लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वस्तू व सेवा कर विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी हा संवर्ग मृत संवर्ग म्हणुन घोषित करण्यात आला आहे. सदर संवर्गात १ पद मंजूर असून कार्यरत असलेले अधिकारी दि.३०.९.२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहेत. विधि व न्याय विभाग आणि नियोजन विभागातील ग्रंथपाल यांचे सेवा प्रवेश नियम तसेच वस्तू व सेवा कर विभागातील ग्रंथपाल यांचे सेवाप्रवेश नियम काही बाबींमध्ये समान आहेत. यास्तव वस्तूव सेवाकर विभागातील मृत संवर्ग घोषित केलेल्या ग्रंथपाल या संवर्गातील वेतन संरचनेतील तफावत दूर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभागाने वस्तू व सेवाकर विभागाच्या सुधारित आकृतीबंधामध्ये सदर संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित केला आहे. तसेच कार्यरत असलेले अधिकारी दि.३०.९.२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सदर संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित केला असल्यामुळे तसेच विभागाने प्रस्तुत संवर्गाचे सेवा नियम समान आहेत या बाबतीत स्पष्ट मत दिलेले नाही. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी नाही व वेतनश्रेणी सुधारित करण्याची आवश्यकता नाही.

२.राज्यकर निरीक्षक (गट-ब अराजपत्रित) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय वस्तू व सेवाकर मधील निरीक्षक व राज्यकर निरीक्षक यांच्या कामकाजाचे स्वरुप सारखेच असल्याने वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षक यांना केंद्रीय वस्तू व सेवाकर विभागातील निरीक्षक या संवर्गाला लागु असलेली एस-१६ ही वेतनश्रेणी एस-१४ ऐवजी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- राज्य शासनातील वस्तू व सेवाकर कर्मचारी व केंद्रीय वस्तू व सेवाकर मधील निरीक्षक व राज्यकर निरीक्षक यांच्या कामाचे स्वरूप सारखेच असल्याचे दिसून येते. केंद्र शासनाच्या कामकाजाप्रमाणे समान काम समान वेतन या तत्वानुसार महाराष्ट्र राज्याच्या वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षक या पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४थ्या वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाप्रमाणे समकक्षता दिलेली नाही. सदर संवर्गाला ४थ्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ५व्या, ६व्या व ७व्या वेतनआयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

३.महाव्यवस्थापक :-

<u>संघटनेची मागणी :-</u> उपहारगृहातील महाव्यवस्थापक पद व वस्तू व सेवा कर विभागातील विक्री अधिकारी ही दोन्ही पदे समकक्ष आहेत व दोन्ही पदांच्या वेतनश्रेण्या ह्या पूर्वीपासून समान आहेत. खंड-२ नुसार विक्रीकर अधिकारी यांची वेतनश्रेणी एस-१५ वरून एस-१७ करण्यात आली आहे. सबब, महाव्यवस्थापक पदाला देखील खंड-२ नुसार मंजूर केलेली सुधारित वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी एस-१७ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> वस्तू व सेवा कर विभागातील विक्रीकर अधिकारी पदास समकक्ष असलेल्या महाव्यवस्थापक, शासकीय उपहारगृहे या संवर्गातील वेतन संरचनेतील तफावत दूर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वस्तू व सेवा कर विभागातील विक्रीकर अधिकारी संवर्गाची आणि महाव्यवस्थापक, शासकीय उपहारगृहे या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. या संवर्गात आता विक्रीकर अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती होत नसल्याचे दिसून येते. तसेच सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. करिता, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

४.व्यवस्थापक :-

<u>संघटनेची मागणी :-</u> व्यवस्थापक पद व विक्रीकर निरीक्षक ही दोन्ही पदे समकक्ष आहेत. दोन्ही पदांच्या वेतनश्रेण्या ह्या पुर्वीपासून ५ व्या वेतन आयोगापर्यंत समान आहेत. तथापि, ६व्या वेतन आयोगापासून सदर पदांच्या वेतनश्रेणीमध्ये तफावत निर्माण झाली असून सदरची तफावत ७व्या वेतन आयोगामध्येही कायम राहिलेली आहे. ७व्या वेतन आयोगामध्ये विक्रीकर निरीक्षक या पदाला एस-१४ ही वेतनश्रेणी लागु करण्यात आली आहे. सबब, व्यवस्थापक पदाला एस-१० ऐवजी सुधारित वेतनश्रेणी एस-१४ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> वस्तू व सेवा कर विभागातील विक्रीकर निरीक्षक पदास समकक्ष असलेल्या व्यवस्थापक या संवर्गातील वेतन संरचनेतील तफावत दूर करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीस पाठविण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वस्तू व सेवा कर विभागातील विक्रीकर निरीक्षक संवर्गाची आणि व्यवस्थापक, शासकीय उपहारगृहे या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. तसेच सदर पद आता सरळसेवेने भरण्यात आल्याचे आढळते. विक्रीकर निरीक्षक या संवर्गातून हे पद आता भरले जात नसल्यामुळे, या संवर्गाला सहाव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. करिता, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

ब) विमा संचालनालय, मुंबई

५सहायक विमा संचालक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- सहायक विमा संचालक पदास समान असणाऱ्या राज्य शासनाच्या विविध आस्थापनेवरील संवर्गांना दि.१३.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१८ वरुन एस-२० हा सुधारित वेतनस्तर लागू करण्यात आला आहे. विमा संचालनालयातील सहायक विमा संचालक यांच्या वेतनश्रेणीत ५व्या वेतन आयोगापासून तफावत निर्माण झाली आहे. सहायक विमा संचालक या पदाच्या वेतनश्रेणी मध्ये असलेली असमानता दूर करून एस-१८ ऐवजी एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहायक विमा संचालक या पदाला असलेले प्रशासकीय व आर्थिक शक्ती विचारात घेऊन वेतनश्रेणीमध्ये असलेली असमानता दूर करून सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० अशी वेतनस्तरात सुधारणा करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u>:- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) सहायक विमा संचालक या संवर्गास सहायक विक्रीकर आयुक्त (विक्रीकर विभाग) व सहायक संचालक (लेखा व कोषागारे) या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गास ६व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-१८ रु.४९१००-१५५८०० ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

६.कनिष्ठ तांत्रिक अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- कनिष्ठ तांत्रिक अधिकारी या पदास समान असणाऱ्या राज्य शासनाच्या विविध आस्थापनेवरील संवर्गांना दि.१३.२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये एस-१५ वरुन एस-१७ हा सुधारित वेतनस्तर लागू करण्यात आला आहे. विमा संचालनालयातील कनिष्ठ तांत्रिक अधिकारी यांच्या वेतनश्रेणीत ६व्या वेतन आयोगात तफावत निर्माण झाली आहे. कनिष्ठ तांत्रिक अधिकारी या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये असलेली असमानता दूर करून एस-१५ ऐवजी एस-१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- कनिष्ठ तांत्रिक अधिकारी या पदाला असलेले प्रशासकीय व आर्थिक शक्ती तसेच विमा विषयक प्रत्यक्ष कामकाज विचारात घेऊन वेतनश्रेणीमध्ये असलेली असमानता दूर करून सातव्या वेतन आयोगानुसार लेखा अधिकारी (लेखा व कोषागारे) याप्रमाणे एस-१७ अशी वेतनस्तरात सुधारणा करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतनसमानीकरण समितीने (४था वेतन आयोग) कनिष्ठ तांत्रिक अधिकारी या संवर्गास लेखा अधिकारी (लेखा व कोषागारे) या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गास ६व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित

वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब,, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

७.तांत्रिक सहायक :-

<u>संघटनेची मागणी :-</u> या पदास समान असणाऱ्या राज्य शासनाच्या विविध आस्थापनेवरील संवर्गांना दि.१३.२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये एस-१० वरून एस-१४ हा सुधारित वेतनस्तर लागू करण्यात आला आहे. विमा संचालनालयातील तांत्रिक सहायक यांच्या वेतनश्रेणीत ६व्या वेतन आयोगात तफावत निर्माण झाली आहे. तांत्रिक सहायक या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये असलेली असमानता दूर करून एस-१० ऐवजी एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> तांत्रिक सहायक या पदावरील कर्मचारी हाताळत असलेले विमा विषयक प्रत्यक्ष कागकाज विचारात घेऊन वेतनश्रेणीमध्ये असलेली असमानता दूर करण्यासाठी सातव्या वेतन आयोगानुसार एस-१४ अशी वेतनस्तरात सुधारणा करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> अल्पबचत संचालनालयातील सहायक व विमा संचालनालयातील तांत्रिक सहायक या पदांचे सेवा प्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या भिन्न आहेत. तांत्रिक सहायक या पदाला ६व्या वेतन आयोगामधील रु.५२००-२०२०० ग्रे.वे.रु.२८०० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना एस-१० रु.२९२००-९२३०० ७व्या वेतन आयोगामध्ये लागू करण्यात आली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी नाही.

*****

३.४ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातवा वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील मंजूर वेतनस्तर (रूपये) | मागणी केलेला मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रूपये) |
| | अ) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा | | | | |
| १ | तांत्रिक अधिकारी (गट-ब राजपत्रित) | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| २ | शिधावाटप अधिकारी/ मुख्य निरीक्षण अधिकारी | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ३ | सहायक शिधावाटप अधिकारी | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| ४ | शिधावाटप निरीक्षक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| | ब) नियंत्रक, वैधमापनशास्त्र | | | | |
| ५ | सह नियंत्रक | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ६ | उप नियंत्रक | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ७ | निरीक्षक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ८ | क्षेत्र सहायक | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-८ रु.२५५००-८११०० |

अ) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा

१. तांत्रिक अधिकारी (गट-ब राजपत्रित) :-

**संघटनेची मागणी :-** अन्न, नागरी पुरवठा विभागाच्या दिनांक १८.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतीबंधामध्ये सहायक विभागीय पुरवठा अधिकारी/ सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी/तांत्रिक अधिकारी व इतर (गट-ब राजपत्रित) ही सर्व पदे एकत्रित दर्शविण्यात आली असून, त्यांना एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. तथापि, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-१६ ऐवजी एस-१७ करण्यात आली आहे. यास्तव सदर संवर्गाला (एस-१६ रु. ४४९००-१४२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ रु. ४७६००-१५११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी व तांत्रिक अधिकारी ही दोन्ही पदे गट-ब राजपत्रित असली तरी, त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या व सदर पदावर नियुक्तीची पात्रता वेगवेगळी आहे. दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी या संवर्गाचा वेतनस्तर एस-१६ वरुन एस-१७ करण्यात आला आहे. तथापि तांत्रिक अधिकारी या संवर्गांना सदर वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही. सबब, तांत्रिक अधिकारी या संवर्गासाठी एस-१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**समितीची शिफारस :-** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक १८.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतीबंधामध्ये तसेच दिनांक २७.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये प्रसिद्ध केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार सहायक विभागीय पुरवठा अधिकारी/ सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी/तांत्रिक अधिकारी व इतर (गट-ब राजपत्रित) ही सर्व पदे एकत्रित दर्शविण्यात आली असली तरी, ७ व्या वेतनआयोगानुसार वेतनश्रेणी दिनांक ०१.०१.२०१६ रोजी मंजूर असलेल्या वेतनसंरचनेशी तुलना करुन मंजूर करण्यात आल्या आहेत. विभागाच्या मते सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी व तांत्रिक अधिकारी ही दोन्ही पदांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या व सदर पदावर नियुक्तीची पात्रता वेगवेगळी आहे, असे असता दोन्ही संवर्ग समकक्ष आहेत हे स्पष्ट होत नाही. प्रस्तुत संवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२. शिधावाटप अधिकारी/ मुख्य निरीक्षण अधिकारी:-

**संघटनेची मागणी:-** शिधावाटप अधिकारी / मुख्य निरीक्षक अधिकारी हे पद सहायक शिधावाटप अधिकारी या संवर्गाचे पदोन्नतीचे पद आहे. सदर पदाला एस-१४ ही वेतनश्रेणी लागू केल्यास शिधावाटप अधिकारी या पदाला एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** शिधावाटप अधिकारी / मुख्य निरीक्षक अधिकारी हे पद सहायक शिधावाटप अधिकारी या संवर्गाचे पदोन्नतीचे पद आहे. सदर पदाला एस-१४ ही वेतनश्रेणी लागू केल्यास शिधावाटप अधिकारी या पदाला एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** शिधावाटप अधिकारी हे सहायक शिधावाटप अधिकारी या संवर्गाचे पदोन्नतीचे पद आहे. सहायक शिधावाटप अधिकारी या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१४ अशी सुधारित करण्याची केलेली शिफारस मान्य झाल्यास, प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करणे आवश्यक ठरेल. सबब, सदर संवर्गाला एस-१४ रु.३८६००-१२२८०० ऐवजी एस-१५ रु.४१८००-१३२३०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. सहायक शिधावाटप अधिकारी:-

**संघटनेची मागणी:-** पुरवठा आयुक्त कार्यालयातील निरीक्षक अधिकारी व नियंत्रक शिधावाटप कार्यालयातील सहायक शिधावाटप अधिकारी या संवर्गाला ३ र्‍या ते ५ व्या वेतन आयोगामध्ये समान वेतनश्रेणी मंजूर होती. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये निरीक्षक शिधावाटप या पदाची वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१४ करण्यात आली. सबब, समान पदावरील समान काम या तत्वानुसार सहायक शिधावाटप अधिकारी या पदाला एस-१३ ऐवजी एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** पुरवठा आयुक्त कार्यालयातील निरीक्षक अधिकारी व नियंत्रक शिधावाटप कार्यालयातील सहायक शिधावाटप अधिकारी या संवर्गाला ३ र्‍या ते ५ व्या वेतन आयोगामध्ये समान वेतनश्रेणी मंजूर होती. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये निरीक्षक शिधावाटप या पदाची वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१४ करण्यात आली. सबब, समान पदावरील समान काम या तत्वानुसार सहायक शिधावाटप अधिकारी या संवर्गाला एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** पुरवठा आयुक्त कार्यालयातील निरीक्षक अधिकारी व नियंत्रक शिधावाटप कार्यालयातील सहायक शिधावाटप अधिकारी या संवर्गाला ३ र्‍या ते ७ व्या वेतन आयोगामध्ये समान वेतनश्रेणी मंजूर होती. तथापि, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये पुरवठा आयुक्त कार्यालयातील निरीक्षक अधिकारी या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१४ अशी सुधारित करण्यात आली आहे. उपरोक्त संवर्गाशी समकक्ष नियंत्रक शिधावाटप कार्यालयातील सहायक शिधावाटप अधिकारी हे पद असल्यामुळे सदर संवर्गासही एस-१३ रु.३५४००-११२४०० ऐवजी एस-१४ रु.३८६००-१२२८०० अशी वेतनश्रेणी सुधारित करण्याची शिफारस करीत आहे.

४. शिधावाटप निरीक्षक :-

**संघटनेची मागणी:-** विभागीय पुरवठा आयुक्त या कार्यालयातील पुरवठा निरीक्षक / अव्वल कारकून या संवर्गाला एस-१० ही वेतनश्रेणी लागू आहे. सदर पद शिधावाटप निरीक्षक या पदाशी समकक्ष असल्याने, शिधावाटप निरीक्षक ( वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० रु.२९२००-९२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** विभागीय पुरवठा आयुक्त या कार्यालयातील पुरवठा निरीक्षक / अव्वल कारकून या संवर्गाला एस-१० ही वेतनश्रेणी लागू आहे. सदर पद शिधावाटप निरीक्षक या पदाशी समकक्ष असल्याने, शिधावाटप निरीक्षक ( वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या

पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० रु.२९२००-९२३०० अशी सुधारणा करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. किंबहुना विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील पुरवठा निरीक्षक या पदापेक्षा नियंत्रक शिधावाटप कार्यालयातील शिधावाटप निरीक्षक या संवर्गाला ३ ऱ्या, ४ थ्या, ५व्या व ६ व्या वेतन आयोगामध्ये कनिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये प्रस्तुत संवर्गाला मंजूर असल्याने, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

ब) नियंत्रक वैधमापनशास्त्र

५. सह नियंत्रक :-

संघटनेची मागणी:- सह नियंत्रक हे प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून पद आहे. या पदास पुढील पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही. प्रादेशिक विभाग प्रमुख असलेल्या इतर पदांना एस-२५ ही वेतनश्रेणी लागू आहे. यास्तव सह नियंत्रक या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२५ अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सह नियंत्रक पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सदर पदास उपलब्ध नसलेली पदोन्नतीची संधी व या पदास समकक्ष असलेल्या इतर विभागातील पदास लागू असलेली वेतनश्रेणी विचारात घेता सहनियंत्रक पदावरील अधिकाऱ्यांमध्ये येत असलेले नैराश्य या बाबी विचारात घेता या यंत्रणेतील सहनियंत्रक या पदास एस-२५ ही वेतनश्रेणी लागू करणे उचित ठरते.

समितीची शिफारस :- प्रस्तुत संवर्गाचा प्रस्ताव वेतनत्रुटीचा नसून अधिक वेतनवाढीच्या मागणीचा आहे. या संवर्गास ३ ऱ्या, ४ थ्या, ५ व्या व ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही. प्रसंगत: नमूद करण्यात येते की, जरी या संवर्गास पदोन्नतीची संधी उपलब्ध नसली तरी, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ अन्वये गट-अ मधील संवर्गासाठी निवडश्रेणी वेतनस्तर मंजूर करण्यात आलेला आहे. या शासन निर्णयातील "पदोन्नतीचे पद उपलब्धतेबाबतची" अट शिथिल करण्याची शिफारस करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदींनुसार प्रस्तुत संवर्गाला विहित निवडश्रेणी वेतनस्तर लागू होईल.

६. उप नियंत्रक :-

संघटनेची मागणी:- सदर संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ अन्वये एस-१५ ऐवजी एस-१७ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. उप नियंत्रक हे पद जिल्हा प्रमुख म्हणून जिल्हास्तरीय पद असल्याने या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ ऐवजी एस- २० रु. ५६१०० - १७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- उप नियंत्रक पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या व या पदास समकक्ष असलेल्या इतर विभागातील पदास लागू असलेली वेतनश्रेणी विचारात घेता या यंत्रणेतील उपनियंत्रक पदावरील अधिकाऱ्यांच्यामध्ये येत असलेले नैराश्य या बाबी विचारात घेता उपनियंत्रक या पदास एस-२० ही वेतनश्रेणी लागू करणे उचित ठरते.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी एस-१७ अशी नुकतीच सुधारित करण्यात आली आहे. सबब, आता पुन्हा मंजूर वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मागणी योग्य ठरत नाही.

७. निरीक्षक :-

संघटनेची मागणी:- खंड २ मध्ये निरीक्षक निम्नश्रेणी या पदास- एस-१४ : ३८६००- १२२८०० मागणी दर्शवून ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. प्रत्यक्षात मात्र मागणी एस-१५: रु.४१८००-१३२३०० अशी करण्यात आली होती. निरीक्षक निवडश्रेणी या पदाच्या वेतनश्रेणीत कोणतीही वाढ न केल्याने निरीक्षक निवडश्रेणी व निरीक्षक निम्नश्रेणी या दोन्ही पदास एकच वेतनश्रेणी लागू होत असल्याने निरीक्षक निवड श्रेणी या पदावरील अधिकाऱ्यांवर अन्याय होत आहे. सदर दोन्ही पदे समकक्ष असल्याने सदर पदाला एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरीक्षक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, पदोन्नतीच्या उपलब्ध असलेल्या नगण्य संधी, शासनाच्या इतर विभागातील समकक्ष किंवा त्याहूनही कमी असलेल्या पदास लागू करण्यात आलेली जास्तीची वेतनश्रेणी व विलीनीकरणाचा शासनास सादर केलेला दिनांक २२.०२.२०२४ रोजीचा प्रस्ताव विचारात घेता या यंत्रणेतील निरीक्षक या संवर्गास एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करणे उचित ठरते.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१४ अशी नुकतीच सुधारित करण्यात आली आहे. सबब, आता पुन्हा मंजूर वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मागणी योग्य ठरत नाही.

८. क्षेत्र सहायक :-

संघटनेची मागणी:- खंड २ मध्ये क्षेत्र सहायक या पदास एस-७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. शिक्षण संचालनालय येथील क्षेत्र सहायक व दुग्धव्यवसाय विभागातील कृषी क्षेत्र सहायक या संवर्गाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू आहे. सबब, सदर पदाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वैधमापनशास्त्र यंत्रणेतील क्षेत्र सहायक या पदाची शैक्षणिक अर्हता, कर्तव्य व जबाबदाऱ्या व शासनाच्या इतर विभागातील समकक्ष पदास लागू करण्यात आलेली वेतनश्रेणी विचारात घेता या यंत्रणेतील क्षेत्र सहायक या पदासही एस-८ ही वेतनश्रेणी लागू करणे उचित ठरते.

**<u>समितीची शिफारस :-</u>** वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२५ अन्वये प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-६ ऐवजी एस-७ अशी नुकतीच सुधारित करण्यात आली आहे. सबब, आता पुन्हा मंजूर वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मागणी योग्य ठरत नाही.

****************

## ३.५ सामान्य प्रशासन विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातवा वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) | मागणी केलेला मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) |
| | अ) मंत्रालयीन संवर्ग | | | | |
| १ | सह सचिव | ३७४००-६७००० | ८७०० | एस-२७ रु. १२३१००-२१५९०० | एस-२९ रु.१३११००-२१६६०० |
| २ | वरिष्ठ स्वीय सहायक | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२४ रु.७९१००-२११९०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ३ | निवडश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ४ | कक्ष अधिकारी | ९३००-३४८०० | ४८०० (चार वर्षांच्या सेवेनंतर १५६००-३९१०० ५४००) | एस-१७ रु.४७६००-१५११०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ५ | उच्चश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु. ४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ६ | निम्नश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु. ४४९००-१४२४०० |
| ७ | सहायक कक्ष अधिकारी | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | लघुटंकलेखक | ५२००-२०२२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ९ | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु. १९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| | ४) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | | | | |
| १० | जिल्हा माहिती अधिकारी | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० (खंड २ प्रमाणे लागू केलेली वेतनश्रेणी) |
| ११ | वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० (खंड २ प्रमाणे लागू केलेली वेतनश्रेणी) |
| १२ | वरिष्ठ उपसंपादक | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० (खंड २ प्रमाणे लागू केलेली वेतनश्रेणी) |
| १३ | चलत छायाचित्रकार | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० (खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| १४ | दूरदर्शन छायाचित्रकार | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० (खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| १५ | सहायक संचालक (माहिती)/ माहिती अधिकारी/ अधीक्षक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० (खंड २ प्रमाणे लागू केलेली वेतनश्रेणी) |
| १६ | उप संपादक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० (खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | वेतनश्रेणी) |
| १७ | माहिती सहायक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० (खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| १८ | प्रतिवेदक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१२ रु.३२०००-१०१६००(खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| १९ | उर्दू अनुवादक/ अनुवादक/ स्वागतकार | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१२ रु.३२०००-१०१६००(खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| २० | छायाचित्रकार | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१२ रु.३२०००-१०१६००(खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| २१ | सहायक दूरचित्रवाणी छायाचित्रकार (पूर्वीचे पदनाम साऊंड रेकॉर्डिस्ट) | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| २२ | सहायक चित्रपट संकलक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३००(खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| २३ | सिने यंत्रचालक | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-८ रु.२५५००-८११००(खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| २४ | कॅमेरा सहायक | ४४००-७४४० | १६०० | एस-३ रु.१६६००-५२४०० | एस-१२ रु.३२२००-१०१६०० |
| २५ | अंधार कोठडी | ४४४०- | १३०० | एस-१ रु.१५०००- | एस-३ रु.१६६००- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | परिचर | ७४४० | | ४७६०० | ५२४००(खंड २ प्रमाणे लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी) |
| | क) लोकायुक्त कार्यालय | | | | |
| २६ | सचिव | १५६००-३९१०० | ६६०० | एस--२४ रु.७११००-२११९०० | एस-२६ रु.८२२००-२११५०० |
| २७ | सहायक प्रबंधक | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | जे-३ रु.१११०००-१६३०३० |
| २८ | कक्ष अधिकारी | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० एस-२० रु.५६१००-१७७५०० (चार वर्षानंतर) |
| २९ | सहायक कक्ष अधिकारी | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ३० | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | मंत्रालय लिपिक प्रमाणे दरमहा रु.५०००/- ठोक भत्ता देणेबाबत |
| | ड)महाराष्ट्र लोकसेवा आयोग, | | | | |
| ३१ | सहायक कक्ष अधिकारी | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| | इ) सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे | | | | |
| ३२ | संचालक | १५६००-३९१०० व ३७४००-६७००० | ७६००/ ८७०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० एस-२७ रु. ११८५००-२१४१०० | एस-२९ रु.१३११००-२१६६०० |
| ३३ | उपसंचालक / जिल्हा सैनिक | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४९१००- | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कल्याण अधिकारी / प्रभारी अधिकारी | | | ११५८०० | |
| | ई)शासकीय परिवहन सेवा/ सह्याद्री अतिथीगृह/ नंदगिरी अतिथीगृह | | | | |
| ३४ | नोंदणी पर्यवेक्षक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| ३५ | मुख्य यांत्रिक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ३६ | नोंदणी लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ३७ | बटलर | ४४४०-७४४० | १४०० | एस-२ रु.१५३००-४८७०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| ३८ | अकुशल कामगार (हमाल, धुणारा, शिपाई, स्वच्छक) | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ रु.१५०००-४७६०० | एस-५ रु.१८०००-५६९०० |
| ३९ | सुरक्षा रक्षक | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ रु.१५०००-४७६०० | एस-५ रु.१८०००-५६९०० |

आ) मंत्रालयीन संवर्ग –:

१.सह सचिव :-

संघटनेची मागणी :- मंत्रालय हे राज्य शासनाचे सर्वोच्च प्रशासकीय कार्यालय असून येथे मुख्यतः धोरणात्मक बाबींवर निर्णय घेतले जातात व क्षेत्रिय कार्यालयाकडून त्यानुसार अंमलबजावणी करुन घेतली जाते. त्यामुळे मंत्रालयीन सह सचिव यांना क्षेत्रिय स्तरावरील संचालकांपेक्षा जास्त वेतनश्रेणी किंवा किमान समान वेतनश्रेणी असणे आवश्यक आहे. तथापि सह सचिवांना एस-२७ (रु.१२३१००) या वेतनश्रेणीत वेतन दिले जाते. सद्यःस्थितीत अनेक क्षेत्रिय संचालकांना एस-२९ (रु.१३११००) ही वेतनश्रेणी दिलेली आहे. वास्तविक जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा मुख्य परीक्षेमार्फत भरली जातात व ज्या पदांसाठी पात्रतेसाठी कोणतीही पदवी आवश्यक असते अशा पदांच्या पदोन्नती साखळीतील सर्व पदांना समान वेतनश्रेणी असणे आवश्यक आहे. चौथ्या वेतन आयोगामध्ये संचालक लेखा व कोषागारे व वित्त विभागातील सर्व संचालक, संचालक नगर रचना, सह सचिव, मंत्रालय यांची वेतनश्रेणी (रु.४५००-५७००) ही एकच होती. तथापि त्यानंतरच्या वेतन आयोगामध्ये इतर पदांची

वेतनश्रेणी ही वाढविण्यात आली असून सातव्या वेतन आयोगामध्ये सह सचिव, मंत्रालय याना एस-२७ ही वेतनश्रेणी देण्यात आली असून इतर पदांना एस-२९ ही वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. सदर प्रकार हा समान पदांमध्ये भेदभाव निर्माण करीत आहे. त्यामुळे मंत्रालयीन सह सचिव पदांना एस-२९ ही वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे. तसेच सदर पदावरील १० ते १५ वर्षाची सेवा विचारात घेता सदर पदावरील कुंठीतता दूर करण्यासाठी २५% पदांना एस-३० ही निवडश्रेणी वेतनस्तर म्हणून मंजूर करावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- मंत्रालयातील सह सचिवांना एस-२९ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी व सदर संवर्गातील कुंठितता घालविण्याच्या अनुषंगाने सह सचिव संवर्गातील २५% पदांसाठी एस-३० हा निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यात यावा.

<u>समितीची शिफारस</u> :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ नुसार एस-२० ते एस-२६ वेतनस्तर लागू असणाऱ्या संवर्गानाच निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्याचे निदेश आहेत. सह सचिव (सध्याची वेतनश्रेणी एस-२७) या संवर्गाला यापुढे पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. वास्तव सदर पदावर कार्यरत अधिकाऱ्यास कुंठीततेस सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत उपरोक्त शासन निर्णयातील एस-२६ वेतनश्रेणीपर्यंत निवडस्तर लागू करण्याची अट शिथिल करणे योग्य राहील. तसेच सदर पदावर किमान ५ वर्षाची सेवा झाल्यानंतर त्या पुढील वेतनश्रेणी मंजूर करणे योग्य ठरेल. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाला निवडश्रेणीत वेतनश्रेणी एस-२८ रु.१२४८०० २१२४०० मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. प्रसंगतः नमूद करण्यात येते की, ज्या सह सचिवांना निवडश्रेणी वेतनस्तर लागू होईल, त्यांना वाढीव वेतनाच्या अनुषंगाने कामासंबंधी अधिकची जबाबदारी देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच, विभागाच्या धोरणात्मकबाबीसंबंधी सातत्य राहण्याच्या अनुषंगाने (जसे सेवाप्रवेश नियम, आकृतिबंध इ.), न्यायालयीन प्रकरणे म्हणजेच ज्या विषयासंबंधी कामकाज कायम अद्ययावत ठेवण्याची आवश्यकता आहे, असे विषय निवडश्रेणी सह सचिवांकडे सोपविण्याबाबत विचार व्हावा.

**२. वरिष्ठ स्वीय सहायक :-**

<u>संघटनेची मागणी</u> : शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ नुसार प्रसिद्ध केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील सुधारित वेतनश्रेणीविषयक शिफारशींमुळे राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक संवर्गाच्या वेतनश्रेणीमधील असमानता दूर होण्याऐवजी सेवाज्येष्ठ लघुलेखकांच्या पदस्थापना, पदोन्नती, वेतननिश्चिती इत्यादीमुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, सदर समितीच्या खंड २ अहवाल शासनाने विचारात न घेता मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाच्या निर्देशानुसार असमानता दूर करण्याबाबतचा निर्णय घ्यावा, अशी विनंती आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १३.०२.२०२३ नुसार प्रसिद्ध केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील सुधारित

वेतनश्रेणीविषयक शिफारशींमुळे राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक संवर्गाच्या वेतनश्रेणीतील असमानता दूर होण्याऐवजी सेवाज्येष्ठ लघुलेखकांचे पदस्थापना, पदोन्नती, वेतननिश्चिती इ. मुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, सदर समितीच्या खंड-२ अहवाल शासनाने विचारात न घेता मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाच्या निर्देशानुसार असमानता दूर करण्याबाबतचा निर्णय घ्यावा एस-२४ ऐवजी एस-२५ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०२/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-२३ रु.६७७००-२०८७०० वरुन एस-२४ रु.७११००-२११९०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटींबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे.

तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चिती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तदनंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. निवडश्रेणी लघुलेखक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ नुसार प्रसिध्द केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील सुधारित वेतनश्रेणीविषयक शिफारशींमुळे राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक संवर्गाच्या वेतनश्रेणीमधील असमानता दूर होण्याऐवजी सेवाज्येष्ठ लघुलेखकांच्या पदस्थापना, पदोन्नती, वेतननिश्चिती इत्यादीमुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, सदर समितीच्या खंड-२ अहवाल शासनाने विचारात न घेता मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाच्या निर्देशानुसार असमानता दूर करण्याबाबतचा निर्णय घ्यावा, अशी विनंती आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १३.०२.२०२३ नुसार प्रसिद्ध केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड २ मधील सुधारित वेतनश्रेणीविषयक शिफारशींमुळे राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक संवर्गाच्या वेतनश्रेणीतील असमानता दूर होण्याऐवजी सेवाज्येष्ठ लघुलेखकांचे पदस्थापना, पदोन्नती,

वेतननिश्चिती इ. मुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, सदर समितीच्या खंड-२ अहवाल शासनाने विचारात न घेता मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाच्या निर्देशानुसार असमानता दूर करण्याबाबतचा निर्णय घ्यावा व प्रस्तुत संवर्गास एस-१७ ऐवजी एस-२३ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

समितीची शिफारस:- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१६ रु.४४९००-१४२४०० वरुन एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करुनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करुन वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करुन वेतन निश्चिती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. कक्ष अधिकारी :-

संघटनेची मागणी :- मा. उच्च न्यायालय, मुंबई व खंडपीठ नागपूर व खंडपीठ औरंगाबाद येथील कक्ष अधिकाऱ्यांना विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक १९.०४.२०२२ अन्वये अनुज्ञेय करण्यात आलेल्या "दिनांक १ एप्रिल २०११ पासून रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ४८०० तसेच चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००" या वेतनश्रेणी ऐवजी "रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४०० तसेच, चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६००" या सुधारित ग्रेड पे अनुसार मंत्रालयीन संवर्गातील कक्ष अधिकाऱ्यांना ग्रेड पे मंजूर करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- कक्ष अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना एस-१७ याऐवजी एस-२० तसेच चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर एस-२० याऐवजी एस-२३ हा वेतनस्तर सुधारित करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) राज्य शासनातील मंत्रालयीन कक्ष अधिकारी या पदाला केंद्र शासनाच्या सचिवालयातील कक्ष अधिकारी या

पदाला समकक्ष ठरविले आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि.११/०२/२०१३ अन्वये सदर संवर्गाला केंद्र शासनाच्या सचिवालयातील कक्ष अधिकारी संवर्गाप्रमाणे रु.९३००-३४८०० ग्रे.वे. रु.४८०० व ४ वर्षाच्या सेवेनंतर १५६००-३९१०० ग्रे.वे. रु.५४०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. संवर्गाने उच्च न्यायालयातील या संवर्गाची तुलना करणे योग्य नाही. माननीय उच्च न्यायालयाने वेतनश्रेणी स्वतःच्या अधिकाराखाली निश्चित केलेली आहे. ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

५. उच्चश्रेणी लघुलेखक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ नुसार प्रसिध्द केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील सुधारित वेतनश्रेणीविषयक शिफारशींमुळे राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक संवर्गाच्या वेतनश्रेणीमधील असमानता दूर होण्याऐवजी सेवाज्येष्ठ लघुलेखकांच्या पदस्थापना, पदोन्नती, वेतननिश्चिती इत्यादीमुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, सदर समितीच्या खंड-२ अहवाल शासनाने विचारात न घेता म. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाच्या निर्देशानुसार असमानता दूर करण्याबाबतचा निर्णय घ्यावा, अशी विनंती आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १३.०२.२०२३ नुसार प्रसिद्ध केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड २ मधील सुधारित वेतनश्रेणीविषयक शिफारशींमुळे राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक संवर्गाच्या वेतनश्रेणीतील असमानता दूर होण्याऐवजी सेवाज्येष्ठ लघुलेखकांचे पदस्थापना, पदोन्नती, वेतननिश्चिती इ. मुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, सदर समितीच्या खंड-२ अहवाल शासनाने विचारात न घेता मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाच्या निर्देशानुसार असमानता दूर करण्याबाबतचा निर्णय घ्यावा व प्रस्तुत संवर्गास एस-१६ ऐवजी एस-२० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० वरून एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संदर्भिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चिती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या

कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**६. निम्नश्रेणी लघुलेखक :-**

**संघटनेची मागणी :-** शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ नुसार प्रसिध्द केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड २ मधील सुधारित वेतनश्रेणींविषयक शिफारशींमुळे राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक संवर्गाच्या वेतनश्रेणीमधील असमानता दूर होण्याऐवजी सेवाज्येष्ठ लघुलेखकांच्या पदस्थापना, पदोन्नती, वेतननिश्चिती इत्यादीमुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, सदर समितीच्या खंड-२ अहवाल शासनाने विचारात न घेता मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाच्या निर्देशानुसार असमानता दूर करण्याबाबतचा निर्णय घ्यावा, अशी विनंती आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १३.०२.२०२३ नुसार प्रसिद्ध केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील सुधारित वेतनश्रेणीविषयक शिफारशींमुळे राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक संवर्गाच्या वेतनश्रेणीतील असमानता दूर होण्याऐवजी सेवाज्येष्ठ लघुलेखकांचे पदस्थापना, पदोन्नती, वेतननिश्चिती इ. मुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, सदर समितीच्या खंड-२ अहवाल शासनाने विचारात न घेता मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाच्या निर्देशानुसार असमानता दूर करण्याबाबतचा निर्णय घ्यावा व प्रस्तुत संवर्गाला एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० वरुन एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरांविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटींबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करुनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

७. सहायक कक्ष अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- मंत्रालयीन कामकाजाचे विशिष्ट स्वरुप तसेच यापूर्वीच्या वेतन आयोगाच्या आणि वेतन त्रुटी समितीच्या शिफारशी, केंद्र शासनाप्रमाणे वेतन संरचनेबाबत समित्यांचा दृष्टीकोन तसेच संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या, पदोन्नती साखळी, त्या पदाचे प्रशासकीय स्थान/महत्व, शैक्षणिक अर्हतेचा दर्जा, पदाशी निगडीत विशिष्ट जबाबदाऱ्या, त्या पदांच्या सध्याच्या वेतनसंरचना तसेच सेवाप्रवेश नियम इत्यादी बाबींचा साकल्याने विचार करुन "सहायक कक्ष अधिकारी" या पदाची विद्यमान वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० ऐवजी केंद्रीय सचिवालयातील सहायक कक्ष अधिकारी या पदाची स्तर-७, रु. ४४९००-१४२४०० (ग्रेड पे ४६००) (एस-१६) प्रमाणे वेतन सुधारित करुन या पदाच्या वारंवार होणाऱ्या मागणीस न्याय द्यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी संवर्ग व केंद्र शासनाकडील केंद्रीय सचिवालयातील सहायक कक्ष अधिकारी संवर्गाची समकक्षता असल्यामुळे संघटनेने मागणी केल्यानुसार ७ व्या वेतन आयोगानुसार केंद्रीय सचिवालयातील सहायक कक्ष अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-१६ मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) राज्यातील सहायक कक्ष अधिकारी (पूर्वीचे पदनाम सहायक) या पदाला केंद्र शासनातील सहायक या पदाला समकक्ष ठरविले आहे. सहायक कक्ष अधिकारी पदाची राज्य शासनाची व केंद्र शासनाकडील वेतनश्रेणी चौथ्या व पाचव्या वेतन आयोगामध्ये समान होती. केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २०/२१/२००६-सीएस-२, दि.२५/०९/२००६ अन्वये केंद्रातील सहायक कक्ष अधिकारी यांची वेतनश्रेणी ६५००-२००-१०५०० अशी सुधारित केली. तसेच, केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक एफ नंबर १/१/२००८-आयसी, दि.१६/११/२००९ अन्वये केंद्रीय सचिवालयातील सहायक कक्ष अधिकारी या पदाचे वेतन सहाव्या वेतन आयोगानुसार पी.बी.२ मधील श्रेणी वेतन (ग्रेड वेतन ४२००) ऐवजी (रु.४६००/-) असे करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या दि.२१/१२/२०१५ रोजीच्या आदेशान्वये "सहायक" पदाचे पदनाम "सहायक कक्ष अधिकारी" असे करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०३/०३/२०१६ रोजीच अन्वये मंत्रालयीन विभागातील "सहायक" पदाचे पदनाम "सहायक कक्ष अधिकारी" असे करण्यात आले आहे. उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता सदर संवर्गाची वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० ऐवजी एस-१६ रु. ४४९००-१४२४०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

८. लघुटंकलेखक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र सरकार, उच्च न्यायालय व विधानमंडळ सचिवालय यांच्याप्रमाणे सुधारित एस-१० ही वेतनश्रेणी लघुटंकलेखक संवर्गास मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- मंत्रालयीन लघुलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यानुसार सातव्या वेतन आयोगानुसार केंद्रीय सचिवालयातील लघुटंकलेखक संवर्गाला लागू असलेली एस-१० ही वेतनश्रेणी राज्य शासनातील लघुटंकलेखक यांना लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) लघुटंकलेखक या पदाला कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ५ व्या व ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

९. लिपिक -टंकलेखक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- मंत्रालय लिपिक टंकलेखकांचा महाराष्ट्राच्या मुख्यालयाच्या ठिकाणी काम करण्याचा दर्जा, कामाचे विशिष्ठ स्वरूप, विधानमंडळाशी निगडीत कामकाज, मंत्रालयाबाहेर नियमित बदली धोरण नसणे, विभागांतर्गत परिक्षेमध्ये उमेदवारांच्या तुलनेत कमी जागा, नियमित पदोन्नती मिळण्यास होणारा विलंब, महागड्या शहरात राहणे, शासकीय निवासस्थानासाठीची प्रतिक्षा, दूरवरचा व जिकरीचा प्रवास, या कारणांचा विचार करुन मंत्रालय लिपिक-टंकलेखकांचा केंद्र शासनातील सचिवालयात कार्यरत संवर्गाच्या धर्तीवर मंत्रालयीन प्रशासकीय विभागात कार्यरत लिपिक-टंकलेखक यांचे पदनाम "मंत्रालय सहायक" असे करुन सातव्या वेतन आयोगानुसार एस-८ वेतनस्तरातील वेतन पूर्वलक्षी प्रभावासह लागू करण्यात यावे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:- मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक महाराष्ट्राच्या मुख्यालयाच्या ठिकाणी काम करण्याचा दर्जा, कामाचे विशिष्ठ स्वरुप, विधानमंडळाशी निगडीत कामकाज, नियमित पदोन्नती मिळण्यास होणारा विलंब, बृहन्मुंबईतील खर्चिक राहणीमान, शासकीय निवासस्थानासाठीची प्रतिक्षा, दूरवरचा व जिकरीचा प्रवास या कारणांचा विचार करुन मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील लिपिक-टंकलेखक यांना एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. तसेच मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गाचे पदनाम मंत्रालयीन सहायक करण्याबाबत स्वतंत्र कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात येईल.

<u>समितीची शिफारस</u> :- प्रस्तुत संवर्ग सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून, बहुतांश विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गाना इतर विभागातील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

तसेच मंत्रालयीन लिपिक संवर्गास शासन निर्णय दिनांक ०५.०२.२०२४ अन्वये मासिक रु.५०००/- इतका ठोक भत्ता मंत्रालयीन विभागातील कामकाजाचे स्वरुप विचारात घेऊन स्वतंत्रपणे मंजूर करण्यात आला आहे.

ब) माहिती व जनसंपर्क:-

१०. जिल्हा माहिती अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवालाच्या खंड २ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनश्च सादर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१८ रु.४९१००-१५५८०० वरुन एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंदर्भी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चिती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

११. वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) :-

<u>संघटनेची मागणी</u> :-राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड २ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व

सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सादर पदाची वेतनश्रेणी एस-१८ रु.४९५००-१५५८०० वरुन एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबोधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करुनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करुन वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करुन वेतन निश्चिती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करुन नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

**१२. वरिष्ठ उपसंपादक :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१८ रु.४९१००-१५५८०० वरून एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

१३. चलत छायाचित्रकार :-

संघटनेची मागणी :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० वरून एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी

लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

१४. दूरदर्शन छायाचित्रकार :-

संघटनेची मागणी :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड २ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती,२०१७ च्या अहवालाच्या खंड २ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० वरुन एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संदर्भाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

१५. सहायक संचालक (माहिती)/ माहिती अधिकारी/ अधीक्षक :-

संघटनेची मागणी :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व

सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० वरुन एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

१६. उप संपादक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u>** :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० वरून एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चिती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

**१७. माहिती सहायक :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुन:श्च सादर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u>** :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० वरुन एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी

लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

१८. प्रतिवेदक :-

संघटनेची मागणी :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१० रु.२९२००-९२३०० वरून एस-१२ रु.३२०००-१०१६०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

१९. उर्दू अनुवादक/ अनुवादक/ स्वागतकार :-

संघटनेची मागणी :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>** :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u>** :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१० रु.२९२००-९२३०० वरून एस-१२ रु.३२०००-१०१६०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड २ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटींबाबत संबोधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

**२०. छायाचित्रकार :-**

**<u>संघटनेची मागणी</u>** :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>** :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u>** :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१० रु.२९२००-९२३०० वरून एस-१२ रु.३२०००-१०१६०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन

सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

२१. सहायक दूरचित्रवाणी छायाचित्रकार :-

संघटनेची मागणी : केंद्र शासनाच्या सूचना व प्रसारण मंत्रालयातील दूरदर्शन केंद्रातील साऊंड रेकॉर्डिस्ट या पदाचे नाव व त्यांच्या कामाचे स्वरुप सारखे आहे. सहाव्या वेतन आयोगात या पदाची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रे.पे. ४६०० अशी आहे. सातव्या वेतन आयोगात या पदास वेतनश्रेणी पे मॅट्रीक्स लेवल -८ रु. ४४९००-१४२४०० अशी आहे. या पदाचे सेवा प्रवेश नियम, कामाचे स्वरुप पदोन्नती प्रणाली इ. बाबी व सर्वोच्च न्यायालयाचे समान काम समान वेतन या धोरणानुसार साऊंड रेकॉर्डिस्ट या पदाला एस-२० ही वेतनश्रेणी मिळावी.

<u>प्रशासकीय विभागाचे</u> अभिप्राय :- सहायक दूरचित्रवाणी या पदाला केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची राज्य वेतनत्रुटी निवारण समितीसमोर विनंती करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- राज्य वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनातील संबंधित पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-१० ही ६ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२२. सहायक चित्रपट संकलक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनश्च सादर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागा</u>चे अभिप्राय :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा

समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

**समितीची <u>शिफारस</u>** :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११०० वरुन एस-१० रु.२९२००-९२३०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करुनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करुन वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करुन वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीस पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करुन नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

**२३. सिने यंत्रचालक :-**

**<u>संघटनेची मागणी</u>** :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनश्च सादर करण्यात यावा.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>** :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u>** :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-७ रु.२१७००-६९१०० वरुन एस-८ रु.२५५००-८११०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती

करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करुनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करुन वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

२४. कॅमेरा सहायक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र शासनाच्या सूचना व प्रसारण मंत्रालयातील दूरदर्शन केंद्रातील लायटींग असिस्टंट या पदाचे नाव वेगळे असले तरी त्यांच्या कामाचे स्वरुप सारखे आहे. सहाव्या वेतन आयोगात या पदाची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रे.वे. ४२०० अशी आहे. या पदाचे सेवा प्रवेश नियम, कामाचे स्वरुप पदोन्नती प्रणाली इ. बाबी व सर्वोच्च न्यायालयाचे समान काम समान वेतन या धोरणानुसार कॅमेरा सहायक या पदाला एस-१२ ही वेतनश्रेणी मिळावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> : कॅमेरा सहायक या पदाला केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची राज्य वेतनत्रुटी निवारण समितीसमोर विनंती करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- राज्य वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनातील संबंधित पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-३ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी नाही.

२५. अंधार कोठडी परिचर :-

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांचे सध्याचे मुळ वेतन कमी झाले आहे. त्यामुळे वेतनवाढ किंवा वेतन संरक्षणाचा नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी व सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना मिळण्यासाठी प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन लागू केले असता त्यात बहुतांश अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सध्याचे मूळ वेतन कमी झाल्याचे आढळून येत असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ नुसार करावयाच्या सुधारित कार्यवाहीबाबत तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबतची विनंती वेतन त्रुटी निवारण समितीला करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१ रु.१५०००-४७६००वरून एस-३ रु.१६६००-५२४०० अशी सुधारित करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे. तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

लोक आयुक्त कार्यालय :-

२६. सचिव :-

संघटनेची मागणी :- बक्षी समितीच्या शिफारशीनुसार निर्गमित करण्यात आलेल्या दि.१३/०२/२०२३ नुसार वरिष्ठ स्वीय सहाय्यक या पदाला एस-२४ वेतनस्तर लागू करण्यात आला आहे. या कार्यालयातील वरिष्ठ स्वीय सहाय्यक या पदाला लागू केल्यामुळे वरिष्ठ स्वीय सहाय्यक व सचिव या पदाचा वेतनस्तर समान झालेला आहे. लोक आयुक्तांचा दर्जा लघुलेखक (निम्नश्रेणी), लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक (निवडश्रेणी), वरिष्ठ स्वीय सहाय्यक व सचिव. या कार्यालयातील सचिव पदावर १ व्यक्ती कार्यरत आहे. लोकायुक्त कार्यालयातील सचिव पदास उच्च न्यायालयातील खाजगी सचिव पदाची वेतनश्रेणी एस-२६ लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- लोक आयुक्त कार्यालयात लघुलेखक पदाच्या पदोन्नतीच्या साखळीत सचिव हे सर्वोच्च पद असून ते वरिष्ठ स्वीय सहाय्यक या संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात येते. या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या वरिष्ठ स्वीय सहाय्यक पदापेक्षा उच्च आहेत. तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगानुसार लोक आयुक्त कार्यालयातील सहायक प्रबंधक व सचिव या पदांचे वेतन समान होते. ६ व्या वेतन आयोगानुसार सहाय्यक प्रबंधक, सचिव व वरिष्ठ स्वीय सहाय्यक या तीनही पदांची वेतनश्रेणी समान झाली व ७ व्या वेतन आयोगानुसार सचिव व वरिष्ठ स्वीय सहाय्यक या दोन्ही पदांना एस-२४ ही वेतनश्रेणी लागू आहे. सचिव या पदाची अधिक कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता लोक आयुक्त कार्यालयाने सदर पदाला उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या खाजगी सचिवांना लागू असलेली एस-२६ या वेतनश्रेणीची मागणी केली आहे. त्यानुसार सचिव या पदाकरिता, एस-२६ ही वेतनश्रेणी लागू करणे सोईचे होईल.

**<u>समितीची शिफारस</u>:-** वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०२/२०२३ अन्वये वरिष्ठ स्वीय सहायक या संवर्गास एस-२३ ऐवजी एस-२४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. लोक आयुक्त कार्यालयाच्या प्रारुप सेवाप्रवेश नियमानुसार सचिव हे पद वरिष्ठ स्वीय सहायक या पदाचे पदोन्नतीचे पद आहे. वरिष्ठ स्वीय सहायक या पदाला एस-२४ लागू करण्यात आल्याने वरिष्ठ स्वीय सहायक व सचिव या पदाची वेतनश्रेणी समान झाली आहे. यास्तव सचिव या पदाची वेतनश्रेणी सुधारित करणे आवश्यक असल्याने, सचिव या पदास सुधारित वेतनश्रेणी एस-२५ ~~[illegible]~~ मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२७. सहायक प्रबंधक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- सामान्य प्रशासन विभागाने दि. २४/०५/१९७३ च्या शासन निर्णय क्र LPL-१०७३/८९२५ (A)-DI अन्वये सहाय्यक प्रबंधक यांना उच्च न्यायालयाच्या अपिल शाखेतील उप प्रबंधकाची वेतनश्रेणी लागू केली. त्यानंतरच्या वेतन आयोगाने या कार्यालयातील सहायक प्रबंधक यांना अतिरिक्त जिल्हा न्यायाधिशाची वेतनश्रेणी लागू करण्याचे तत्वतः मान्य केले होते. सहायक प्रबंधक हे पद या कार्यालयातील सचिव व वरिष्ठ स्वीय सहायक यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे आहे. त्यामुळे त्यांना लागू होणारी वेतनश्रेणी ही सहायक प्रबंधक यांच्या वेतनश्रेणी पेक्षा कमी असणे स्वाभाविक आहे. त्यानुसार ३१/०१/१९८५ पर्यंत या पदामध्ये सहायक प्रबंधक पदाची वेतनश्रेणी वरिष्ठ होती. परंतू त्यानंतरच्या वेतन आयोगांनी मात्र सहायक प्रबंधक यांच्या पदाचा दर्जा कमी दाखवून सचिव व वरिष्ठ स्वीय सहायक यांना सहायक प्रबंधक पदाच्या वेतनश्रेणी पेक्षा जास्त वेतनश्रेणी देण्यात आली आहे. सदर बाब पदाच्या दर्जाच्या दृष्टीने चुकीची आहे. यास्तव या कार्यालयातील सहायक प्रबंधक पदास दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) या पदाची (जे-३-रु. १११०००-१६३०३०) ही वेतनश्रेणी दि. ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:- लोक आयुक्त कार्यालयात सहायक प्रबंधकाची एकूण ४ पदे मंजूर असून सदरची पदे पदोन्नतीने तथा प्रतिनियुक्तीने भरली जातात. सदरचे पद अत्यंत महत्वाचे असून या पदावर काम करणाऱ्या व्यक्तींना लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांना न्यायिक काम व निर्णय प्रक्रियेत सहाय्य करावे लागते. प्रकरणांच्या अनुषंगाने विविध प्रकारचे कायदे समजून घेणे व सुनावण्यांच्यावेळी लोक आयुक्त व उप लोक आयुक्तांसमोर वस्तुस्थिती मांडणे हे या पदाचे महत्वाचे काम आहे. सदर प्रशासकीय व न्यायिक जबाबदाऱ्या विचारात घेऊन लोक आयुक्त कार्यालयाने सहायक प्रबंधक या पदाला दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) या पदाची न्यायिक वेतनश्रेणी जे-३ : रु.१११०००-१६३०३० लागू करण्याची मागणी केली आहे. तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगानुसार लोक आयुक्त कार्यालयातील सचिव व सहायक प्रबंधक या पदांची वेतनश्रेणी समान होती. सहाव्या वेतन आयोगानंतर सदर कार्यालयातील सहायक प्रबंधक, सचिव व वरिष्ठ स्वीय सहाय्यक या तीनही पदांची वेतनश्रेणी समान झाली व सातव्या वेतन आयोगानंतर सचिव व वरिष्ठ स्वीय सहाय्यक या पदांना एस-२४ तर सहायक प्रबंधक या पदाला त्यापेक्षा कमी म्हणजे एस-२३ ही वेतनश्रेणी लागू झाली आहे. सहाय्यक प्रबंधक

या पदाचे महत्व तसेच त्यांच्या न्यायिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या विचारात घेता त्यांना वरची वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे. तथापि, या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) या पदाची वेतनश्रेणी देण्याच्या अनुषंगाने सहायक प्रबंधक पदावर काम करण्याकरिता, विशिष्ठ शैक्षणिक अर्हता, न्यायिक अनुभव आवश्यक असणे अनिवार्य नाही. त्यामुळे त्यांना दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) या पदाची वेतनश्रेणी मंजूर करणे उचित होणार नाही. तथापि, या पदाची कर्तव्ये व जबाबदारी विचारात घेऊन त्यांना एस २३ ऐवजी एस-२४ ही वेतनश्रेणी मंजूर करणे उचित होईल.

<u>समितीची शिफारस</u>:- प्रस्तुत संवर्गाने मागणी केलेली वेतनश्रेणी ही न्यायालयीन संवर्गाची आहे. लोकआयुक्त कार्यालयाच्या प्रारुप सेवाप्रवेश नियमानुसार सहायक प्रबंधक हे पद कक्ष अधिकारी या संवर्गाच्या पदोन्नतीचे पद आहे. सदर संवर्गाची शैक्षणिक अर्हता व कामाचा अनुभव न्यायालयीन संवर्गाशी समकक्ष ठरत नाही. त्यामुळे सदर संवर्गाला न्यायालयीन संवर्गाची वेतनश्रेणी लागू होत नाही. तथापि सदर संवर्गास वरिष्ठ स्वीय सहायक या पदाप्रमाणे वेतनश्रेणी पूर्वीपासूनच लागू आहे. लोकआयुक्त कार्यालयातील कामकाजाचे स्वरुप विचारात घेता प्रस्तुत संवर्गाला एस-२४ रु.६११००-२११९०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२८. कक्ष अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- लोक आयुक्त कार्यालयाच्या निर्मिती पासूनच लोक आयुक्त कार्यालयातील अधिक्षक / कक्ष अधिकारी हे पद मंत्रालयीन अधिक्षक / कक्ष अधिकारी या पदाशी समकक्ष समजले जाते. लोक आयुक्त कार्यालयातील कक्ष अधिकारी व मंत्रालयातील कक्ष अधिकारी यांना दिनांक १.१.१९९६ पासून ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली. त्यानंतर दिनांक २७.८.२००६ च्या शासन निर्णयाद्वारे मंत्रालयीन कक्ष अधिकारी पदास ४ वर्षाच्या सलग सेवेनंतर दिनांक ३.१०.२००३ पासून ८००० १३५०० ही अकार्यात्मक वेतनश्रेणी लागू करण्यात आली. सदरची वेतनश्रेणी ही उच्च न्यायालयातील कक्ष अधिकारी, विधानमंडळातील कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग तसेच निवडणूक आयोगातील कक्ष अधिकारी यांनाही लागू करण्यात आली आहे. यास्तव लोक आयुक्त कार्यालयातील कक्ष अधिकारी यांना एस-१७ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी तसेच ४ वर्षाच्या सेवेनंतर अकार्यात्मिक वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- मंत्रालयीन कक्ष अधिकाऱ्यांप्रमाणे लोक आयुक्त कार्यालयातील कक्ष अधिकाऱ्यांना एस-१७ ही वेतनश्रेणी व ४ वर्षाच्या सलग सेवेनंतर अकार्यात्मक वेतनश्रेणी लागू करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :- लोकायुक्त कार्यालयाचे प्रारुप सेवा प्रवेश नियमानुसार कक्ष अधिकारी हा संवर्ग मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाशी तुलनीय आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला

मंत्रालयीन कक्ष अधिकारी या संवर्गाप्रमाणे एस-१७ रु.४७६००-१५११०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तथापि, मंत्रालयीन कक्ष अधिकारी व लोकआयुक्त कार्यालयातील कक्ष अधिकारी यांच्या पदोन्नती साखळी आणि कामकाजाचे स्वरुप भिन्न आहे. या कारणास्तव प्रस्तुत संवर्गाला ४ वर्षानंतरची अकार्यात्मक वेतनश्रेणी लागू करणे योग्य ठरणार नाही.

२९. सहायक कक्ष अधिकारी-:

संघटनेची मागणी :- लोक आयुक्त कार्यालयाची स्थापना झाल्यापासून लोक आयुक्त कार्यालयातील सहायक हे पद (सध्याचे पद सहायक कक्ष अधिकारी) मंत्रालयातील सहायक कक्ष अधिकारी या पदाशी समकक्ष आहे. तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या व सातव्या वेतन आयोगाने मंत्रालयीन व लोक आयुक्त कार्यालयातील सहायक कक्ष अधिकारी यांना समान वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. सन २००८ मध्ये केंद्रीय सचिवालयातील सहायक पदाचे पदनाम सहायक कक्ष अधिकारी असे करण्यात आले असून ग्रेड वेतन ४२०० ऐवजी ४६०० करण्यात आले आहे. त्यानुषंगाने, मंत्रालय व लोक आयुक्त कार्यालयातील सहायक या पदाचे पदनाम सहायक कक्ष अधिकारी असे बदलण्यात आले आहे. तथापि, सदर पदाच्या वेतनामध्ये (ग्रेड पे) केंद्राच्या धर्तीवर सुधारणा करण्यात आलेली नाही. लोक आयुक्त कार्यालयातील सहायक कक्ष अधिकारी या पदाच्या कामकाजाचे विशिष्ट स्वरुप विचारात घेऊन या पदाचे वेतन केंद्रीय सचिवालयानुसार ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे एस-१६ (ग्रेड पे ४६००) मध्ये निश्चित करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या व सातव्या वेतन आयोगाने मंत्रालयीन व लोक आयुक्त कार्यालयातील सहायक कक्ष अधिकारी यांना समान वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. याच धर्तीवर जेव्हा केंद्रीय सचिवालयातील सहायक कक्ष अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-१६ मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी यांना भविष्यात मंजूर होईल त्यावेळी सदर वेतनश्रेणी लोक आयुक्त कार्यालयातील सहायक कक्ष अधिकारी यांना लागू करणे उचित होईल.

समितीची शिफारस:- लोकायुक्त कार्यालयाचे प्रारुप सेवा प्रवेश नियमानुसार सहायक कक्ष अधिकारी हा संवर्ग मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी संवर्गाशी तुलनीय आहे. मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी संवर्गास एस-१४ रु.३८६००-१२२८०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे. सदर शिफारस मान्य झाल्यास प्रस्तुत संवर्गाला एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

३०. लिपिक टंकलेखक :-

संघटनेची मागणी :- लोक आयुक्त कार्यालयातील लिपिक टंकलेखकांना मंत्रालयीन लिपिक टंकलेखक प्रमाणे दरमहा ठोकभत्ता लागू करणेबाबत.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** वित्त विभागाच्या दिनांक ५.२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दरमहा रु.५०००/- ठोक भत्ता केवळ मंत्रालयातील लिपिक-टंकलेखकांना लागू करण्यात आला आहे. त्यामुळे लोक आयुक्त कार्यालयाची सदरची मागणी मान्य करणे उचित होणार नाही.

**समितीची शिफारस:-** एखाद्या संवर्गाला विशिष्ट स्वरुपाचे भत्ते लागू करणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून, वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

ड) महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालय :-

३१. सहायक कक्ष अधिकारी :-

**संघटनेची मागणी :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयातील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील सहायक कक्ष अधिकारी पदाची विद्यमान वेतनश्रेणी एस-१४ (रु. ३८६००-१२२८००) (सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे ग्रेड वेतन ४३००) ऐवजी केंद्रीय सचिवालयातील/ केंद्रीय लोकसेवा आयोगातील सहायक कक्ष अधिकारी या पदाच्या एस-१६ (रु. ४४९००-१४२४००) (सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे ग्रेड वेतन-४६००) या वेतनश्रेणीप्रमाणेच पूर्वलक्षी प्रभावाने सुधारित करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील सहायक कक्ष अधिकारी संवर्गास केंद्र शासनाकडील केंद्रीय सचिवालयातील सहायक कक्ष अधिकारी संवर्गाची समकक्षता दर्शविलेली असल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील सहायक कक्ष अधिकारी पदाची वेतनश्रेणी एस-१६ करण्यात यावी.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने ( ४ था वेतन आयोग) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील सहायक (आताचे पदनाम सहायक कक्ष अधिकारी) या संवर्गास मंत्रालयीन सहायक (सहायक कक्ष अधिकारी ) या संवर्गास समकक्ष ठरविले आहे. प्रस्तुत संवर्गाला पूर्वीपासूनच मंत्रालयीन सहायक (आताचे पदनाम सहायक कक्ष अधिकारी) या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम लागू आहेत. मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी संवर्गास एस-१४ रु.३८६००-१२२८०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे. सदर शिफारस मान्य झाल्यास प्रस्तुत संवर्गाला एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**इ) सैनिक कल्याण विभाग:-**

३२. संचालक:-

**संघटनेची मागणी :-** संचालक पदावर नियुक्त होणारा व्यक्ती हा ब्रिगेडीयर किंवा कर्नल दर्जाचा अधिकारी असून रु.८९००/- वेतनस्तर मध्ये भारतीय सैन्यदलात निवृत्त झालेले अधिकारी असतात. त्यामुळे सैनिक कल्याण विभागातील संचालक पदावरील प्रथम नियुक्ती सातव्या वेतन आयोगानुसार एस-२५/एस-२७ (ग्रेड वेतन ७६००/८७००) या वेतनश्रेणीत देण्यात

येते. तरी ही तफावत दूर करून सदर पदाची सातव्या वेतन आयोगानुसार सध्याची वेतनश्रेणी सुधारित करून एस-२९ करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सैनिक कल्याण विभाग, पुणे कार्यालयातील संचालक हे पद अत्यंत महत्वाचे जबाबदारीचे व उच्च दर्जाचे आहे. सदर पदावर नियुक्त होणारा व्यक्ती हा ब्रिगेडियर किंवा कर्नल दर्जाचा अधिकारी असल्याने, सध्याची असलेली एस-२५/एस-२७ वेतनश्रेणी सुधारित करून एस-२९ करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :-भारत सरकारच्या दि.१५/०३/२०११ च्या पत्रानुसार, राज्य व जिल्हा सैनिक मंडळावरील खर्चाचा ६०% भार केंद्र शासनामार्फत उचलला जातो. तसेच सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१५/०९/२००० नुसार सदर पदावर नियुक्त होणारा व्यक्ती "ब्रिगेडियर किंवा कर्नल दर्जाचा अधिकारी असावा" अशी तरतूद आहे. सैन्य दलातील सदर अधिकारी हे एस-२९ या वेतनस्तरमधील असतात, करिता, सदर पदाला एस-२७ रु.१२३१००-२१५९००ऐवजी एस-२९ रु.१३११००-२१६६०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच प्रस्तुत संवर्गाला एस-२९ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर केल्यानंतर अनुज्ञेय होणाऱ्या वेतनातून येत असलेले निवृत्तीवेतन वजा करावे ही शिफारस करण्यात येत आहे.

३३. उपसंचालक/जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी/ प्रभारी अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी या पदावर नियुक्त झालेल्या या अधिकाऱ्यांना सैन्य सेवेचा मान ठेऊन शासनाने या सर्व अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे ग्रेड पे रु.६६००/- (सातव्या वेतन आयोगाप्रमाणे एस-२३) या वेतनस्तरावर राज्य शासनाच्या सेवेत प्रथम नियुक्ती देण्यात यावी आणि वेतन श्रेणीतील होणारी अवनती दूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:- जिल्हा सैनिक अधिकारी भरती प्रक्रीयेमध्ये बहुतांश अधिकारी कनिष्ठ वेतन स्तरावर नियुक्ती होत असल्यामुळे नियुक्ती नंतर देखील रुजू होत नाहीत, तसेच बऱ्याच रुजू झालेले अधिकारी राजीनामे देतात. या कारणास्तव आज स्थितीस सैनिक कल्याण विभागात जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांची एकुण १६ पदे रिक्त आहेत. उपसंचालक / जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी/प्रभारी अधिकारी पदावर नियुक्त होणारा व्यक्ती हा मेजर किंवा त्यापेक्षा कमी नसलेले पद धारण केलेले अधिकारी असून रु. ६६००/- या वेतन स्तरावरून सैन्य दलातून निवृत्त होतो. त्यामुळे "उपसंचालक/ जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी/ प्रभारी अधिकारी या पदावरील प्रथम नियुक्ती सातव्या वेतन आयोगानुसार एस-१८ (ग्रेड पे-५०००/-) या वेतनस्तरावर देण्यात येते. तरी ही तफावत दूर करून सदर पदांसाठीची सध्याची असलेली एस-१८ ( ग्रेड पे-५०००/-) वेतनश्रेणी सुधारित करून एस-२३ ( ग्रेड पे-६६००/-) करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u>** :- भारत सरकारच्या दि.१५/०३/२०११ च्या पत्रानुसार, राज्य व जिल्हा सैनिक मंडळावरील खर्चाचा ६०% भार केंद्र शासनामार्फत उचलला जातो. तसेच सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१५/०९/२००० नुसार सदर पदावर नियुक्त होणारा व्यक्ती "मेजर किंवा त्यापेक्षा कमी नसलेले पद धारण केलेले असावे" अशी तरतूद आहे. सैन्य दलातील मेजर दर्जाचा अधिकारी रु. ६६००/- ग्रेड वेतन (सातव्या वेतन आयोगानुसार एस-२३ रु.६७७००-२०८७००) या वेतनस्तरमधील असतात, करिता, सदर पदाला एस-१८ रु.४९१००-१५५८०० ऐवजी एस-२३ रु.६७७००-२०८७०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच प्रस्तुत संवर्गाला एस-२३ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर केल्यानंतर अनुज्ञेय होणाऱ्या वेतनातून येत असलेले निवृत्तीवेतन वजा करावे ही शिफारशी करण्यात येत आहे.

**ई) शासकीय परिवहन सेवा/ सह्याद्री अतिथीगृह/नंदगिरी अतिथीगृह :-**

**३४. नोंदणी पर्यवेक्षक :-**

**<u>संघटनेची मागणी</u>** :- नोंदणी पर्यवेक्षक हे पद अत्यंत जबाबदारीचे पद असल्याने सहाव्या वेतन आयोगानुसार ४३००/- ग्रे.पे.गृहित धरून, सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:-** नोंदणी पर्यवेक्षक हे पद सामान्य पदश्रृंखलेनुसार राज्य शासनातील वरिष्ठ लिपिक पद हे श्रेणी वेतन रू.२४०० याच्या समतुल्य दिसून येते. नोंदणी पर्यवेक्षकाचे सेवा प्रवेश नियम, त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेऊन नियंत्रकांनी दिलेले अभिप्राय विचारात घेता, सहाव्या वेतन आयोगानुसार श्रेणी वेतन रू.२४००/- वरून रू.४३००/- गृहीत धरुन सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्याचा निर्णय वेतन त्रुटी समितीने घेणे उचित होईल.

**<u>समितीची शिफारस</u>:-** प्रस्तुत संवर्ग सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश विभागांमध्ये कार्यरत आहेत व वेतनश्रेणी पण त्याप्रमाणे मंजूर आहे . या संवर्गांना इतर विभागातील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच ४थ्या., ५व्या, ६व्या व ७व्या वेतन आयोगात असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी नाही.

**३५. मुख्य यांत्रिक :-**

**<u>संघटनेची मागणी</u>** :- मुख्य यांत्रिक हे पद केंद्र शासनाच्या अखत्यारितील Ordnance Factory मधील समतुल्य पदाच्या समकक्ष आहे. सदर संवर्गाच्या वाढीव मागणीबाबत आणि मुख्य यांत्रिकाचे सेवाप्रवेश नियम, त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेऊन नियंत्रकांनी दिलेले अभिप्राय विचारात घेता, सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन रू.२४००/- वरून २८००/- ग्रे.पे.गृहित धरून, सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:-** मुख्य यांत्रिक हे पद केंद्र शासनाच्या अखत्यारितील Ordnance Factory मधील समतुल्य पदाच्या समकक्ष आहे. सदर संवर्गाच्या वाढीव मागणीबाबत आणि मुख्य यांत्रिकाचे सेवाप्रवेश नियम, त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेऊन नियंत्रकांनी दिलेले अभिप्राय विचारात घेता, सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन रु.२४००/- वरून रु.२८००/- गृहीत धरून सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्याचा निर्णय वेतन त्रुटी निवारण समितीने घेणे उचित होईल.

**<u>समितीची शिफारस</u>:-** वेतन समानीकरण समितीने (४थ्या वेतन आयोग) या संवर्गास केंद्र शासनाकडील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. ४थ्या वेतन आयोगात मंजूर केलेल्या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ५व्या, ६व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. यास्तव प्रस्तुत संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

३६. नोंदणी लिपिक :-

**<u>संघटनेची मागणी</u> :-** नोंदणी लिपिक हे पद जबाबदारीचे असल्याने सहाव्या वेतन आयोगानुसार रु.२८००/- ग्रेड वेतन गृहित धरून सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:-** केंद्र आणि राज्य शासनात लिपिक वर्गीय संवर्गातील पदांना श्रेणी वेतन रु.१९००/- हेच समान वेतन आहे. नोंदणी लिपिकाचे सेवाप्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेऊन नियंत्रकांनी दिलेले अभिप्राय विचारात घेता, सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन रु.१९००/- वरून रु.२८००/- गृहीत धरून सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्याचा निर्णय वेतन त्रुटी निवारण समितीने घेणे उचित होईल.

**<u>समितीची शिफारस</u>:-** प्रस्तुत संवर्ग सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर विभागातील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

३७. बटलर:-

**<u>संघटनेची मागणी</u> :-** बटलर पद महत्त्वाचे असून आंध्रप्रदेश, हैद्राबाद व अन्य राज्याप्रमाणे अशी पदे तांत्रिक पदे म्हणून घोषित करून रु.९३००-३४८०० ग्रे.वे.४२०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची तसेच रु.१००० विशेष वेतन व रु.१५०० पोषाख भत्ता देण्याची विनंती करण्यात येत आहे.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :-** आंध्र प्रदेश व इतर राज्यातील बटलर संवर्गातील पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ह्या सह्याद्री/नंदगिरी राज्य अतिथि गृहातील बटलर प्रमाणेच असल्याचे दिसून येते. परंतु आंध्रप्रदेश व इतर राज्यातील बटलर संवर्गातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी जास्त असून त्याप्रमाणे सह्याद्री व नंदगिरी राज्य अतिथि गृहातील वेतननिश्चिती करण्याचा निर्णय वेतनत्रुटी निवारण समितीने घेणे उचित होईल.

समितीची शिफारस :- बटलर या संवर्गाचे पदोन्नतीचे पद मुख्य बटलर असे असून सदर पदाची वेतनश्रेणी एस-६ ही आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

३८. अकुशल कामगार (हमाल, धुणारा, शिपाई, स्वच्छक) :-

संघटनेची मागणी :- अकुशल कामगार (हमाल, धुणारा, शिपाई, स्वच्छक) हे पद जबाबदारीचे असल्याने सहाव्या वेतन आयोगातील रु.१८००/- ग्रेड वेतन गृहित धरुन सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर श्रेणी वेतनाचे पद राज्यात नसून, गट -ड मधील कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाने सहाव्या वेतन आयोगात, हा संवर्ग कालबाह्य करुन गट -क मधील किमान वेतन श्रेणी वेतन त्यांना लागू केली. तथापि, राज्य शासनाने गट -ड मधील पदे कालानुरुप मृत संवर्ग घोषित करण्याचे धोरण अवलंबल्याने या संवर्गांना सहाव्या वेतन आयोगापासूनच वेगळी वेतनश्रेणी एस-१ अशी लागू केली असून त्याच्याच समकक्ष वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगात लागू केलेली दिसून येते. अकुशल कामगाराचे सेवाप्रवेश नियम, त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेऊन नियंत्रकांनी दिलेले अभिप्राय विचारात घेता, एस-१ वरुन एस-५ सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्याचा निर्णय वेतन त्रुटीनिवारण समितीने घेणे उचित होईल.

समितीची शिफारस:- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०९.०३.२०२१ अन्वये सुधारित आकृतीबंधानुसार प्रस्तुत संवर्ग मृत घोषित करण्यात आला आहे. करिता, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

३९. सुरक्षा रक्षक :-

संघटनेची मागणी :- सुरक्षा रक्षक हे पद जबाबदारीचे असल्याने सहाव्या वेतन आयोगातील रु१८००/- ग्रेड वेतन गृहित धरुन सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर श्रेणी वेतनाचे पद राज्यात नसून गट-ड मधील कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाने सहाव्या वेतन आयोगात हा संवर्ग कालबाह्य करून गट-क मधील किमान श्रेणी वेतन त्यांना लागू केली. तथापि, राज्य शासनाने गट-ड मधील पदे कालानुरुप मृत संवर्ग घोषित करण्याचे धोरण अवलंबल्याने या संवर्गांना सहाव्या वेतन आयोगापासूनच वेगळी वेतनश्रेणी एस-१ अशी लागू केली असून त्याच्याच समकक्ष वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगात लागू केलेली दिसून येते. सुरक्षा रक्षक संवर्गाचे सेवाप्रवेश नियम, त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेता, सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन रू.१३००/- वरुन रू.१८००/- गृहित धरून सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी निश्चित करण्याचा निर्णय वेतन त्रुटी निवारण समितीने घेणे उचित होईल.

<u>समितीची शिफारस :-</u> सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०९.०३.२०२१ अन्वये सुधारित आकृतीबंधानुसार प्रस्तुत संवर्ग मृत घोषित करण्यात आला आहे. करिता, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

**********

## ३.६ उच्च व तंत्र शिक्षण विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | पदनाम | विद्यमान वेतनसंरचना | | सातवा वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रूपये) | मागणी केलेले वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रूपये) |
| | अ) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) | | | | |
| १ | कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ अधिक्षक/ प्रबंधक, गट-ब | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रू.४१८००-१३२३०० | एस-१७ रू.४७६००-१५११०० |
| २ | सहायक ग्रंथपाल | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रू.२९२००-९२३०० | एस-१४ रू.३८६००-१२२८०० |
| | ब) तंत्र शिक्षण संचालनालय | | | | |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | ९३००-३४८०० | ५००० | एस १८ रू.४९१००-१५५८०० | एस-२० रू. ५६१००-१७७५०० |
| ४ | प्रोग्रामर | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रू.४१८००-१३२३०० | एस-२० रू.५६१००-१७७५०० |
| ५ | भांडारपाल | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रू.२९२००-९२३०० | एस-१३ रू.३५४००-११२४०० |
| ६ | सहायक रासायनिक (चर्मकला) | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रू.२९२००-९२३०० | केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगातील लेव्हल ८ रू. ४७६००-१५११००/-, व एस-१४, ३८६००-१२२८००/-, एस- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १५ ४१८००-१३२३००/-, एस-१६, ४४९००-१४२४०० |
| ७ | कर्मशाळा निदेशक/ प्रयोगशाळा सहायक (तांत्रिक)/ निदेशक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ८ | प्रयोगशाळा सहायक (अतांत्रिक) | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| ९ | सहायक ग्रंथपाल | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रू.२१७००-६९१०० | एस.१० रु.२९२००-९२३०० |
| १० | यंत्र परिचर | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रू.१९९००-६३२०० | एस-८ रू.२५५००-८११०० |
| | क)अकृषि विद्यापीठे | | | | |
| | क)१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | | | | |
| ११ | कायदा अधिकारी | ९३००-३४८०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० (पी.बी.३ १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) |
| | क (२) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | | | | |
| १२ | उप कुल सचिव | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| १३ | सहायक कुल सचिव | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| | क) (३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | | | | |
| १४ | सांख्यिकी सहायक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| | क) (४) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | | | | |
| १५ | सहायक कुल सचिव | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००- | शिक्षकीय पदाप्रमाणे वाढीव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | १७७५०० | वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी |
| १६ | उपअभियंता (स्थापत्य)/ (विद्युत) | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु. ४१८००-१३२००० | एस-२० रु. ५६१००-१७७५०० |
| १७ | उच्चश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु. ४१८००-१३२००० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १८ | निम्नश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६०००-१२२८०० | एस-१५ रु. ४१८००-१३२००० |
| | क) (५) मुंबई विद्यापीठ, मुंबई | | | | |
| १९ | निवडश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| | क) (६) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे | | | | |
| २० | डाटा एन्ट्री ऑपरेटर श्रेणी-२ | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |

ग) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

१.कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ अधिक्षक/ प्रबंधक, गट-ब:-

संघटनेची मागणी :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व उच्च शिक्षण या दोन्ही विभागांमध्ये गट-ब मधील अधिक्षक (राजपत्रित) या पदावरील अधिकाऱ्यांच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या सारख्याच असल्याने एकाच संवर्गातील सर्व पदांना समान वेतनश्रेणी लागू करण्याचे शासन धोरण विचारात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ अधिक्षक/ प्रबंधक (म.शि.से), गट-ब या पदांना एस-१५ ऐवजी वेतन मॅट्रीक्स एस-१७: ४७६००-१५११०० अशी वेतनश्रेणी करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व उच्च शिक्षण या दोन्ही विभागांमध्ये गट- ब मधील अधिक्षक (राजपत्रित) या पदावरील अधिकाऱ्यांच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या सारख्याच असल्याने एकाच संवर्गातील सर्व पदांना समान वेतनश्रेणी लागू करण्याचे शासन धोरण विचारात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ अधिक्षक/ प्रबंधक (म.शि.से), गट-ब या पदांना वेतन मॅट्रीक्स एस-१७: रु.४७६००-१५११०० अशी वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- विभागाने तुलना केलेल्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील अधिक्षक व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी या दोन्ही संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तसेच कर्तव्ये व जबाबदाऱ्या उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. तसेच प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ३ऱ्या, ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२. सहायक ग्रंथपाल :-

<u>संघटनेची मागणी</u> :- महाविद्यालयीन सहाय्यक ग्रंथपाल पदाची शैक्षणिक अर्हता बी.लिब व वेतनश्रेणी भोळे आयोगामध्ये रु.३६५-७६० ही होती. चौथ्या वेतन आयोगामध्ये ती १४००-२३०० होती. पाचव्या वेतन आयोगामध्ये ४५००- ७००० अशी होती. दि.०१.०१.१९९६ पासून शालेय शिक्षण विभागातील ग्रंथपालांना ५५००-९००० ही वेतनश्रेणी मान्य करण्यात आलेली आहे. शालेय शिक्षण विभाग व उच्च शिक्षण विभागांतर्गत असलेल्या सहाय्यक ग्रंथपालाच्या शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असताना देखील महाविद्यालयीन सहाय्यक ग्रंथपालांना रु.५२००-२०२०० या वेतनश्रेणीत २८०० ग्रेड वेतन तर शालेय शिक्षण विभागातील ग्रंथपालांना रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० मंजूर करण्यात आलेले आहे. त्यामुळे शालेय शिक्षण विभागातील सहाय्यक ग्रंथपालाप्रमाणेच रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० म्हणजेच सातव्या वेतन आयोगात वेतनस्तर एस-१४ मंजूर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहायक ग्रंथपाल या पदाला शालेय शिक्षण विभागाकडील ग्रंथपाल या पदाची वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी अर्जदारांनी केली आहे. तथापि, महाविद्यालयांमधील सहायक ग्रंथपाल आणि शालेय शिक्षण विभागाकडील ग्रंथपाल या दोन्ही पदांना ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१० हीच वेतनश्रेणी लागू करण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे ह्या पदासंदर्भात सादर करण्यात आलेला प्रस्ताव योग्य नाही.

<u>समितीची शिफारस</u> -: सहायक ग्रंथपाल या संवर्गाला ३ऱ्या, ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. संघटनेने शालेय शिक्षण विभागातील सहायक ग्रंथपाल या पदाची एस-१५ ही वेतनश्रेणी मिळण्याबाबत विनंती केली आहे. विभागाने शालेय शिक्षण व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील महाविद्यालयामधील सहायक ग्रंथपाल या संवर्गाची वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१० अशी समान आहे हे कळविले आहे व प्रस्तावाचे समर्थन केलेले नाही. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

ब) तंत्र शिक्षण संचालनालय

३. प्रशासकीय अधिकारी:-

<u>**संघटनेची मागणी**</u> :- उच्च शिक्षण व शालेय शिक्षण इ. विभागातील प्रशासकीय अधिकारी या पदाची वेतनसंरचना ६ व्या वेतन आयोगात रु. १५६००-३९१००/- ग्रेड वेतन ५४००/- इतकी मंजूर आहे. एकाच मंत्रालयीन विभागातील वर्ग-१ च्या पदासाठी भिन्न वेतनसंरचना मंजूर करण्यात आलेली आहे. तरी संचालनालयातील प्रशासकीय अधिकारी हे पद रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५००० (सातवा वेतन आयोग एस-१८) या संरचनेमध्ये मंजूर असुन सदर पदाची सुधारित वेतनसंरचना रु.१५६००- ३९१००/- ग्रेड पे ५४००/- (सहावा वेतन आयोग) व वेतनस्तर एस-२० रु.५६१००- १७७५००/-(सातवा वेतन आयोग) अशी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय**</u> :- संचालनालय तसेच अधिपत्याखालील विभागीय कार्यालय तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच शासकीय/ अशासकीय अनुदानीत व खाजगी संस्थांतील आस्थापना विषयक, लेखा विषयक तसेच न्यायालयीन कामकाज हाताळत असतात. सद्य:स्थितीत तंत्रशिक्षण संचालनालय येथे प्रशासकीय अधिकाऱ्यांची २ पदे असुन तंत्रशिक्षण संचालनालयातील संबधित कार्यासनाचे कार्यासन अधिकारी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांचे प्रशासकीय, लेखाविषयक व शैक्षणिक कामकाज पाहत असतात. तसेच प्रत्येक विभागीय कार्यालयास प्रत्येकी १ अशी प्रशासकीय अधिकाऱ्यांची पदे आहेत. उच्च शिक्षण व शालेय शिक्षण इ. विभागातील प्रशासकीय अधिकारी या पदाची वेतनसंरचना ६ व्या वेतन आयोगात रु. १५६००-३९१००/- ग्रेड वेतन ५४००/- इतकी मंजूर आहे. एकाच मंत्रालयीन विभागातील वर्ग-१ च्या पदासाठी भिन्न वेतनसंरचना मंजूर करण्यात आलेली आहे. तरी संचालनालयातील प्रशासकीय अधिकारी हे पद रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५००० या संरचनेमध्ये मंजूर असून, सदर पदाची सुधारित वेतन संरचना रु.१५६००-३९१००/- ग्रेड पे ५४००/- (सहावा वेतन आयोग) व वेतनस्तर एस-२० रु.५६१००- १७७५००/-(सातवा वेतन आयोग) अशी सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

<u>**समितीची शिफारस**</u> :- प्रस्तावातील कथित त्रुटी जुनीच असून ७ व्या वेतन आयोग लागू झाल्यापासून उद्भवलेली नाही. विभागाने ज्या उच्च शिक्षण व शालेय शिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी या संवर्गाशी तुलना केली आहे, त्या संवर्गाचा सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदारी याबाबतचा तुलनात्मक तक्ता उपलब्ध करुन दिला नाही. प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी नाहीत. तसेच विभागाने आकृतीबंध सुधारित करताना प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी, अर्हता इ. सर्व बाबींचा समग्र विचार करुन आवश्यकतेनुसार कार्यवाही करणे योग्य राहील.

४.प्रोग्रामर :-

<u>संघटनेची मागणी</u> :- तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत प्रोग्रामर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना समान पद, समान काम व समान वेतन या न्यायाप्रमाणे इतर विभागात तसेच विद्यापीठात कार्यरत असलेल्या प्रोग्रामर या पदाला लागू असलेली रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ५४००/- ही वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.५०००/- ऐवजी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:- अन्य विद्यापीठ/कार्यालयांमधील प्रोग्रामर पदासाठी निश्चित कर्तव्ये, शैक्षणिक अर्हता, सेवाप्रवेश नियम, वेतनश्रेण्या, पदोन्नतीची साखळी व अनुभव उच्च स्तराचे आहेत. अन्य कार्यालयातील प्रोग्रामर पदांच्या तुलनेत संचालनालयातील पदाची कर्तव्ये, शैक्षणिक अर्हता, सेवाप्रवेश नियम, वेतनश्रेण्या, पदोन्नतीची साखळी व अनुभव या बाबी अन्य कार्यालयांतील प्रोग्रामर पदाच्या तुलनेत निम्नस्तरीय आहेत. सदर वस्तुस्थितीचा विचार करता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण प्रोग्रामर्स कृती समितीने समान पद, समान काम व समान वेतन या नैसर्गिक न्यायानुसार प्रोग्रामर पदावरील कर्मचाऱ्यांना व इतर विभागातील तसेच इतर विद्यापीठातील प्रोग्रामर या समकक्ष पदाप्रमाणे वेतन व इतर भत्ते मिळण्याबाबतची शिफारस करण्यात येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- अन्य विद्यापीठ/कार्यालयांमधील प्रोग्रामर पदासाठी निश्चित कर्तव्ये, शैक्षणिक अर्हता, सेवाप्रवेश नियम, वेतनश्रेण्या, पदोन्नतीची साखळी व अनुभव उच्च स्तराचे आहेत. अन्य कार्यालयातील प्रोग्रामर पदांच्या तुलनेत संचालनालयातील पदाची कर्तव्ये, शैक्षणिक अर्हता, सेवाप्रवेश नियम, वेतनश्रेण्या, पदोन्नतीची साखळी व अनुभव या बाबी निम्नस्तरीय असल्याने, इतर विद्यापीतातील प्रोग्रामर या समकक्ष पदाप्रमाणे वेतन व इतर भत्ते मिळण्याबाबतची शिफारस विभागामार्फत करण्यात आलेली नाही. सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

५.भांडारपाल :-

<u>संघटनेची मागणी</u> :- महाराष्ट्र शासनाच्या सार्वजानिक बांधकाम व पाटबंधारे या विभागातील भांडारपाल पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना रु.४५००-७०००/- या वेतनश्रेणी ऐवजी रु.५०००-८०००/- ही वेतनश्रेणी लागू केलेली असून, त्याच धर्तीवर तंत्रशिक्षण संचानालयातील भांडारपालांना रु.५०००-८०००/- ही (एस-१३ ) वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- महाराष्ट्र शासनाच्या सार्वजानिक बांधकाम व पाटबंधारे या विभागातील भांडारपाल पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना रु.४५००-७०००/- या वेतनश्रेणी ऐवजी रु.५०००-८०००/- ही वेतनश्रेणी लागू केलेली असून, त्याच धर्तीवर तंत्रशिक्षण संचालनालयातील भांडारपालांना रु.५०००-८०००/- ही वेतनश्रेणी लागू करणेबाबत मागणी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व तंत्रशिक्षण संचालनालयातील भांडारपाल पदाची शैक्षणिक अर्हता व कर्तव्य व जबाबदाऱ्या समान असल्याने समान काम समान वेतनश्रेणी या तत्वास अनुसरुन भांडारपाल या

पदास सहाव्या वेतन आयोगात रु.९३००-३४८००/- ग्रेड वेतन रु.४२००/- व सातव्या वेतन आयोगात वेतनस्तर एस-१३ (रु.३५४००-११२४००/-) अशी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

<u>**समितीची शिफारस**</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाचे दिनांक २४.०९.१९६४ रोजीचे सेवाप्रवेश नियम तपासले असता त्यात शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशी आहे. प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या, ५ व्या, ६ व्या वेतनआयोगाध्ये मंजूर असलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**६. सहायक रासायनिक (चर्मकला) :-**

**संघटनेची मागणी :-** तंत्रशिक्षण सचालनालय, मुंबई अंतर्गत असलेल्या शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थेतील सहायक रासायनिक (चर्मकला) या संवर्गाला एस-१० ऐवजी केंद्र शासनाच्या धर्तीवर एस-१४ व आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत एस-१५ व एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय**</u> :- तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई अंतर्गत असलेल्या शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थेतील सहाय्यक रासायनिक (चर्मकला) या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत विनंती केली आहे. सदर विनंतीस अनुसरुन नमुद करण्यात येते की, संचालनालयाअंतर्गत प्रशासकीय व शिक्षकेत्तर संवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या पदांचा सुधारित आकृतीबंध/ आढावा वित्त विभागास सादर केला आहे. सदर आकृतीबंध/आढाव्यामध्ये सहाय्यक रासायनिक (चर्मकला) या पदांचा मृत संवर्गामध्ये समावेश करण्यात आला असल्याने सदर पद नष्ट होणार आहे. तरी प्रस्तावित वेतनश्रेणी उंचावून देण्याची शिफारस करण्यात येत नाही.

समितीची शिफारस :- प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. तसेच संचालनालयाअंतर्गत प्रशासकीय व शिक्षकेत्तर संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदांचा सुधारित आकृतीबंध/ आढावा वित्त विभागास सादर केला आहे. सदर आकृतीबंध /आढाव्यामध्ये सहाय्यक रासायनिक (चर्मकला) या पदांचा मृत संवर्गामध्ये समावेश करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे. विभागानेही संवर्गाच्या प्रस्तावाचे समर्थन केलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

७. कर्मशाळा निदेशक/ प्रयोगशाळा सहायक (तांत्रिक)/ निदेशक :-

संघटनेची मागणी :- कर्मशाळा निदेशक/ प्रयोगशाळा सहायक (तांत्रिक) या पदाचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेता एस-८ ऐवजी एस-१५ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय-: तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत कर्मशाळेतील तांत्रिक सहायकारी पदे व प्रयोगशाळेतील प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक) या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांनी त्यांना निदेशक पदनाम व सुधारित वेतनश्रेणी मिळणेबाबत शासनाकडे मागणी केली होती. यास अनुसरुन शासनाने दि.२७.०९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित पदनामास खालील अटीच्या अधिन राहून मान्यता दिली आहे. "सुधारित पदनामाच्या अनुषंगाने वरीष्ठ वेतन श्रेणी अनुज्ञेय राहणार नाही, तसेच या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही व शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार येणार नाही/ पडणार नाही. तसेच सदर पदनामात बदल केल्याने इतर विभागातील समान पदनाम असणाऱ्या पदांची वेतनश्रेणी देय असणार नाही. सदर पदनाम बदलानंतरही सदर पदनामांच्या मूळ वेतनश्रेणीत/ वेतनसंरचनेत कोणताही बदल होणार नाही. इतर विभागात कार्यरत असणाऱ्या याच पदनामांचा वेतनश्रेणीत फरक असल्यास त्याप्रमाणे वेतन सुधारणेची मागणी अनुज्ञेय असणार नाही, सदरचे पदनाम बदलानंतरही सदर पदनामांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये बदल होणार नाही. सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याने पदनाम बदलाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या वेतनश्रेणींशी समानता दर्शवून त्यानुसार वेतनसंरचना मागता येणार नाही." तसेच, मुद्रण निदेशक या पदाची शैक्षणिक अर्हता व कर्तव्ये जबाबदाऱ्या अधिक असल्याने संघटनेने केलेल्या मागणीनुसार वेतनसंरचना देय होत नाही.

समितीची शिफारस :- शासनाने दि.२७.०९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित पदनामास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे. "सुधारित पदनामाच्या अनुषंगाने वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय राहणार नाही, तसेच या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही व शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार येणार नाही/ पडणार नाही. तसेच सदर पदनामात बदल केल्याने इतर विभागातील समान पदनाम असणाऱ्या पदांची वेतनश्रेणी देय असणार नाही, सदर पदनाम बदलानंतरही सदर पदनामांच्या मूळ वेतनश्रेणीत/ वेतनसंरचनेत कोणताही बदल होणार नाही. इतर विभागात कार्यरत असणाऱ्या याच पदनामांच्या वेतनश्रेणीत फरक असल्यास त्याप्रमाणे वेतन सुधारणेची मागणी अनुज्ञेय असणार नाही, सदरचे पदनाम बदलानंतरही सदर पदनामांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये बदल होणार नाही. सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याने पदनाम बदलाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या वेतनश्रेणींशी समानता दर्शवून त्यानुसार वेतन संरचना मागता येणार नाही." तसेच विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत समर्थन केलेले नाही. सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणींशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

८.प्रयोगशाळा सहायक (अतांत्रिक) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई अंतर्गत असलेल्या शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थेतील प्रयोगशाळा सहायक (अतांत्रिक) या संवर्गाला एस-७ ऐवजी एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- संचालनालयाअंतर्गत प्रशासकीय व शिक्षकेत्तर संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदांचा सुधारित आकृतीबंध/आढावा शासनास सादर करण्यात आला आहे. सदर आकृतीबंध /आढाव्यामध्ये सदर प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) या पदांचा मृत संवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सदरची पदे नष्ट होणार असल्याने वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबतची शिफारस करण्यात येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने संचालनालयाअंतर्गत प्रशासकीय व शिक्षकेत्तर संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदांचा सुधारित आकृतीबंध मंजुरीसाठी शासनास सादर केला असून, त्यामध्ये प्रयोगशाळा सहायक हा संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित केला असल्याचे अभिप्राय दिले आहेत व प्रस्तावाचे समर्थन केलेले नाही. सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

९.सहायक ग्रंथपाल :-

<u>संघटनेची मागणी</u> :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनामध्ये सहाय्यक ग्रंथपाल या पदास एस- ७ : रु. २१७००-६९१०० ही वेतनश्रेणी लागू आहे. तथापि अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थेत सहाय्यक ग्रंथपाल या पदास सातव्या वेतन आयोगानुसार एस-१० : २९२००-९२३०० ही वेतनश्रेणी लागू आहे. सबब, सदर पदास एस-७ ऐवजी एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनामध्ये सहाय्यक ग्रंथपाल या पदास एस-७ : रु.२१७००-६९१०० ही वेतनश्रेणी लागू आहे. तथापि, अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थेत सहाय्यक ग्रंथपाल या पदास सातव्या वेतन आयोगानुसार एस-१० : रु.२९२००-९२३०० ही वेतनश्रेणी लागू आहे. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय व शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतन मध्ये सहाय्यक ग्रंथपाल या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी समान पद, समान शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने प्रस्तुत संवर्गाला एस-१० : रु. २९२००-९२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत ज्या अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थाचा उल्लेख केला आहे, त्या संस्थेतील प्रस्तुत

पदांच्या सेवाशर्ती आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तुलनात्मक तक्ता उपलब्ध करुन दिला नाही. तसेच पदोन्नती साखळीचा तक्ता सुद्धा उपलब्ध करुन दिला नाही. ही कथित त्रुटी जुनी असून ७ व्या वेतनआयोगाची वेतनश्रेणी लागू झाल्यामुळे आलेली नाही. प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या, ५ व्या, ६ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर असलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१०.यंत्र परिचर -:

<u>संघटनेची मागणी</u> :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनामध्ये यंत्र परिचर या पदास एस- ६ ही वेतनश्रेणी लागू आहे. सदर पदाला एस-६ ऐवजी एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई अंतर्गत असलेल्या शासकीय मुद्रण तंत्र संस्था, मुंबई संस्थेतील यंत्र परिचर या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत विनंती केली आहे. सदर विनंतीस अनुसरुन नमूद करण्यात येते की, संचालनालयाअंतर्गत प्रशासकीय व शिक्षकेत्तर संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदांचा सुधारित आकृतीबंध/आढावा वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. सदर आकृतीबंध /आढाव्यामध्ये यंत्र परिचर या पदांचा मृत संवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सदरची पदे ही नष्ट होणार असल्याने प्रस्तावित वेतनश्रेणी वाढवून देण्याची शिफारस करण्यात येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत समर्थन केलेले नाही. तसेच सदर संवर्गाचा समावेश मृत संवर्गात करण्याबाबत विभागाने प्रस्तावित आहे. प्रस्तुत संवर्गाला ३ ऱ्या, ४ थ्या, ५ व्या, ६ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर असलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

क) अकृषि विद्यापीठे

(क) (१) पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

११.कायदा अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- कायदा अधिकारी या संवर्गाला रु. ९३००-३४८०० ग्रे.वे ५४०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली होती. सदर वेतनश्रेणी सहायक कुलसचिव या पदाला सुद्धा मंजूर करण्यात आली होती. तथापि, शासन निर्णय दिनांक १३/०२/२०२३ अन्वये राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील सहायक कुलसचिव यांना रु. १५६००-३९१०० ग्रे.वे.५४०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. शासन अधिसूचना दिनांक २२/१२/२०२३ अन्वये एस-२० ही वेतनश्रेणी

मंजूर करण्यात आली आहे. तथापि, सहाव्या वेतन आयोगानुसार पी.बी. १५६००-३९१०० ग्रे.वे. ५४०० अशी वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- कायदा अधिकारी या पदाला ६ व्या वेतन आयोगानुसार रु.१५६००-३९१०० ग्रे.वे.५४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तथापि, वेतनत्रुटी समितीची स्थापना ७व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणींमधील त्रुटी संबंधित सादर होणाऱ्या प्रकरणांची तपासणी करणे ह्या उद्देशाने झाली आहे. अर्जदारांची मागणी ६ व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी सुधारित करण्याची आहे. त्यामुळे कायदा अधिकारी ह्या पदासंदर्भात सादर करण्यात आलेला प्रस्ताव योग्य नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत सहमती दर्शविलेली नाही. या संवर्गाची मागणी ६ व्या वेतन आयोगातील वेतनसंरचना सुधारण्याबाबत आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९ अन्वये ७ व्या वेतन आयोगामध्ये रु.९३००-३४८०० ग्रे.वे.रु.५४०० व रु.१५६००-३९१०० ग्रे.वे. रु.५४०० या दोन्ही वेतनश्रेणी एकत्र करुन एस-२० रु.५६१००-१७७५०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये लागू करण्यात आलेली असून, वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**(क)(२) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

**१२.उपकुलसचिव :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- शिक्षक संवर्गातून उपकुलसचिव म्हणून नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना रु. १५६००- ३९१०० ग्रेड वेतन ७६०० मंजूर करण्यात आलेले आहे. तसेच शिक्षकेत्तर संवर्गातून येणाऱ्या उमेदवारांसाठी रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० मंजूर करण्यात आलेले आहे. सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या या समान असून कुलसचिव पदाच्या अर्हतेमध्ये सरळसेवेने व पदोन्नतीने ८ वर्ष उपकुलसचिव पदाचा अनुभव असणारी व्यक्ति पात्र ठरते. . मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि.०२.११.२०१७ रोजी निर्गमित केलेल्या पत्रामध्ये केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने उपकुलसचिव पदाकरिता, Master Degree ५५ % with 4 year of administrative experience as Assistant Registrar or in equivalent अशी शैक्षणिक अर्हता निश्चित केलेली आहे. याकरिता, Pay Band of Rs १५६००-३९१०० with Grade pay of Rs ७६०० Fixed at level १२ वेतनश्रेणी आहे. व उपकुलसचिव म्हणून पाच वर्ष सेवा झाल्यानंतर pay Band ३७४००-६७००० with Grade pay ८७०० Fixed at level १३ with five years experience as Assistant Registrar or in equivalent post अशी शैक्षणिक अर्हता आहे. या दोन्ही बॅन्ड मध्ये अधिकारी काम करताना कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्या आहेत. कामाच्या स्वरूपात कोणताही बदल नाही. त्यामुळे उपकुलसचिव या पदास एकच वेतनश्रेणी लागू राहील असे नमूद केले आहे. याबाबत शासन पत्र दि.२० मे, २०१० व दि.२५ मे, २०१० हे शासनाने रद्द केलेले आहेत. विद्यापीठातील उपकुलसचिव पदास एकच वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- केंद्रीय विद्यापीठातील उपकुलसचिव आणि सहायक कुलसचिव या पदांची वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी अर्जदारांनी केली आहे. तथापि, केंद्रीय विद्यापीठातील कुलसचिव या पदाची वेतनश्रेणी राज्याच्या विद्यापीठातील कुलसचिवांना लागू करण्यात आली नसून, ती स्वतंत्र आहे. त्याप्रमाणे उपकुलसचिव व सहायक कुलसचिव यांच्या वेतनश्रेणीदेखील स्वतंत्र आहेत. त्या केंद्रीय विद्यापीठांमधील वेतनश्रेणींशी निगडीत नाहीत. तसेच, सर्व सार्वजनिक विद्यापीठांमधील उपकुलसचिव आणि सहायक कुलसचिव या पदांना अनुक्रमे एस-२३ आणि एस-२० अशी एकसमान वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर बाब विचारात घेता उप कुलसचिव आणि सहायक कुलसचिव या पदासंदर्भात सादर करण्यात आलेला प्रस्ताव योग्य नाही.

**समितीची शिफारस**-: विभागाने वेतनश्रेणी सुधारण्याबाबत सहमती दर्शविलेली नाही. यासाठी विभागाने दिलेले असहमतीचे कारण योग्य असून, या संवर्गाला इतर विद्यापिठांमधील मिळत असलेली वेतनश्रेणी लागू आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

१३.सहायक कुलसचिव :-

**संघटनेची मागणी** :- सहाय्यक कुलसचिव या पदास पाचव्या वेतन आयोगाशी वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित केल्यानंतर एस-२० हा वेतनस्तर मंजूर करण्यात आलेला आहे. वर नमूद केलेली उपकुलसचिव पदाची वेतनश्रेणीची मागणी मान्य झाल्यानंतर उपकुलसचिव पदास रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० व सहाय्यक कुलसचिव या पदाकरिता, मान्य करण्यात आलेली विद्यमान वेतनश्रेणीमध्ये मोठी तफावत निर्माण होत असल्यामुळे, सहाय्यक कुलसचिव पदाकरिता, रू.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** -: केंद्रीय विद्यापीठातील उपकुलसचिव आणि सहायक कुलसचिव या पदांची वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी अर्जदारांनी केली आहे. तथापि, केंद्रीय विद्यापीठातील कुलसचिव या पदाची वेतनश्रेणी राज्याच्या विद्यापीठातील कुलसचिवांना लागू करण्यात आली नसून, ती स्वतंत्र आहे. त्याप्रमाणे उपकुलसचिव व सहायक कुलसचिव यांच्या वेतनश्रेणीदेखील स्वतंत्र आहेत. त्या केंद्रीय विद्यापीठांमधील वेतनश्रेणींशी निगडीत नाहीत. तसेच, सर्व सार्वजनिक विद्यापीठांमधील उपकुलसचिव आणि सहायक कुलसचिव या पदांना अनुक्रमे एस-२३ आणि एस-२० अशी एकसमान वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर बाब विचारात घेता उप कुलसचिव आणि सहायक कुलसचिव या पदासंदर्भात सादर करण्यात आलेला प्रस्ताव योग्य नाही.

**समितीची शिफारस** -: विभागाने वेतनश्रेणी सुधारण्याबाबत सहमती दर्शविलेली नाही. यासाठी विभागाने दिलेले असहमतीचे कारण योग्य असून, या संवर्गाला इतर विद्यापिठांमधील मिळत असलेली वेतनश्रेणी लागू आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी

समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

(क) (३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

१४.सांख्यिकी सहायक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- या विद्यापीठातील सांख्यिकी सहाय्यक या पदास पाचव्या वेतन आयोगामध्ये ४०००- ६००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली होती. त्या वेतनश्रेणीशी सातव्या वेतन आयोगातील समकक्ष वेतनस्तर एस-८ मंजूर करण्यात आलेला आहे. सांख्यिकी सहाय्यक या पदास चौथ्या वेतन आयोगामध्ये शासन निर्णय दि.१४ ऑगस्ट, १९९२ अन्वये रु. १६४०-२९०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. त्या वेतनश्रेणीच्या समकक्ष सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० अशी समकक्ष वेतनस्तर एस-१४ असा आहे. त्यामुळे या पदास त्याअनुषंगाने एस १४ असा वेतनस्तर मंजूर करण्यात यावा. याबाबत मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे ४७०९/२०२१ रिट याचिका दाखल केलेली आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- विद्यापीठामधील सांख्यिकी सहायक या पदाचा आर्थिक भार स्विकारण्यास दिनांक १४.८.१९९२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या वेतनश्रेणी विचारात घेऊन सातव्या वेतन आयोगानुसार एस - १४ ही वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी अर्जदारांनी केली आहे. त्यासंदर्भात नमूद करण्यात येते की, वेतनत्रुटी समितीची स्थापना सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीमधील त्रुटी संबंधित सादर होणाऱ्या प्रकरणाची तपासणी करणे ह्या उद्देशाने झाली आहे. अर्जदारांची मागणी चौथ्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी सुधारित करण्याची आहे. त्यामुळे सांख्यिकी सहायक ह्या पदासंदर्भात सादर करण्यात आलेला प्रस्ताव योग्य नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने वेतनश्रेणी सुधारण्याबाबत सहमती दर्शविलेली नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाचे सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये जबाबदाऱ्या यांची तुलनात्मक माहिती विभागाने सादर केलेली नाही. सदर संवर्गाला ५ व्या व ६ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर करण्यात आलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतनआयोगात मंजूर करण्यात आल्या आहेत. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

(क)(४) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

१५.सहायक कुलसचिव :-

<u>संघटनेची मागणी</u> -: या विद्यापीठातील सहाय्यक कुलसचिव या पदास पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली असून सातव्या वेतन आयोगामध्ये रु . १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनस्तर एस- २० मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच या पदावर कार्यरत असलेले डॉ. वागलवाड हे अशासकीय महाविद्यालयात

सहाय्यक प्राध्यापक पदावर रु.१५६००-३९१०० ग्रे.पे. ६००० या वेतनश्रेणीत कार्यरत होते. तद्नंतर विहित मार्गाने या विद्यापीठात सहायक कुलसचिव या पदावर रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीत रूजू झाले. शासन पत्र दि.२० मे, २०१० व २५ मे, २०१० ही पत्रे शासन पत्र दि.१६.०८.२०१८ व २४.०८.२०१८ अन्वये रद्द केलेली आहेत. डॉ. तगलवाड यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्रमांक ५५१३७/२०२३ दाखल केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या शिक्षक पदाच्या समकक्ष सातव्या वेतन आयोगातील वेतनस्तर मंजूर करावा, अशी विनंती केली आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>-: या पदाला शिक्षकीय पदांनुसार सातव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करण्याची विनंती अर्जदार श्री. तगलवाड यांनी केली आहे. त्यासंदर्भात नमूद करण्यात येते की, सहायक कुलसचिव या पदाला राज्य शासनाकडील एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर पदाला शिक्षकीय पदाची वेतनश्रेणी लागू नाही. यास्तव या पदासंदर्भात सादर करण्यात आलेला प्रस्ताव योग्य नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने वेतनश्रेणी सुधारण्याबाबत सहमती दर्शविलेली नाही. या संवर्गाला इतर विद्यापीठांप्रमाणे वेतनश्रेणी लागू आहे. तसेच संवर्गातील पदावरील अर्ज करण्यापूर्वी तुलना करीत असलेले संवर्गाला कोणती वेतनश्रेणी आहे, ही बाब तपासण्याची जबाबदारी अर्जदाराची असते. सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

१६.उप अभियंता (स्थापत्य)/ (विद्युत):-

<u>संघटनेची मागणी</u> :- या पदाची पाचव्या वेतन आयोगामध्ये वेतनश्रेणी रु. ६५००-१०५०० अशी असून त्यास सातव्या वेतन आयोगामध्ये समकक्ष वेतनस्तर एस-१५ मंजूर करण्यात आलेला आहे. शासन निर्णय दि.०४.१०.१९९९ मध्ये सदर पदास वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० ग्रेड पे ५४०० अशी करण्यात आलेली आहे. त्यानुसार या वेतनश्रेणीच्या समकक्ष वेतनस्तर एस-२० मंजूर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- उप अभियंता या पदासंदर्भात दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ च्या शासन निर्णयामधे नमूद वेतनश्रेणी विचारात घेऊन एस-२० ही वेतनश्रेणी उपअभियंता संवर्गाला लागू करण्याची विनंती अर्जदारांनी केली आहे. त्यासंदर्भात नमूद करण्यात येते की, वेतनत्रुटी समितीची स्थापना सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीमधील त्रुटी संबंधित सादर होणाऱ्या प्रकरणाची तपासणी करणे ह्या उद्देशाने झाली आहे. अर्जदारांची मागणी पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी सुधारित करण्याची आहे. त्यामुळे उपअभियंता या पदासंदर्भात सादर करण्यात आलेला प्रस्ताव योग्य नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रस्तावाचे समर्थन केलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

१७.उच्चश्रेणी लघुलेखक-:

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य शासनाकडील उच्चश्रेणी लघुलेखक या पदांना वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १३.२.२०२३ अन्वये ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१६ हा वेतनस्तर लागू करण्यात आला आहे. सदर वेतनस्तर विद्यापीठाकडील लघुलेखकांना देखील लागू करावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वित्त विभागाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक उच्चश्रेणी ह्या पदाला एस-१६ अशी वेतनश्रेणी लागू केली आहे. सदर वेतनश्रेणी राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषि विद्यापीठांमधील प्रस्तुत संवर्गाला लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- राज्य शासनाच्या सेवेतील उच्चश्रेणी लघुलेखक व विद्यापीठातील उच्चश्रेणी लघुलेखक या संवर्गाची वेतनश्रेणी ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये समान होती. तथापि, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये प्रशासकीय विभागातील उच्चश्रेणी लघुलेखक या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ वरुन एस-१६ अशी मंजूर करण्यात आली आहे. सबब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त्याखालील सर्व विद्यापीठांमधील प्रस्तुत संवर्गाला एस-१५ रु.४१८००-१३२३००ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१८.निम्नश्रेणी लघुलेखक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- राज्य शासनाकडील निम्नश्रेणी लघुलेखक या पदांना वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.२.२०२३ अन्वये ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१५ हा वेतनस्तर लागू करण्यात आला आहे. सदर वेतनस्तर विद्यापीठाकडील लघुलेखकांना देखील लागू करावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वित्त विभागाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक निम्नश्रेणी ह्या पदाला एस-१५ अशी वेतनश्रेणी लागू केली आहे. सदर वेतनश्रेणी राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषि विद्यापीठांमधील प्रस्तुत संवर्गाला लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभागाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक निम्नश्रेणी ह्या पदाला एस-१५ अशी वेतनश्रेणी लागू केली आहे. सदर वेतनश्रेणी राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषि विद्यापीठांमधील प्रस्तुत संवर्गाला लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

(क) (५) मुंबई विद्यापीठ

१९. निवडश्रेणी लघुलेखक

**संघटनेची मागणी :-** निरंक

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** वित्त विभागाने दिनांक १३.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेतील लघुलेखक निवडश्रेणी या पदाला एस-१७ ही वेतनश्रेणी लागू केली आहे. सदर वेतनश्रेणी राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषि विद्यापीठांमधील पदांना लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** राज्य शासनाच्या सेवेतील निवडश्रेणी लघुलेखक व विद्यापीठातील निवडश्रेणी लघुलेखक या संवर्गाची वेतनश्रेणी ५व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये समान होती. तथापि, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये प्रशासकीय विभागातील निवडश्रेणी लघुलेखक या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१६ वरून एस-१७ अशी मंजूर करण्यात आली आहे. सबब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठांमधील प्रस्तुत संवर्गाला एस-१६ रु.४४९००-१४२४०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० ही वेतनश्रेणी मंजुर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

(क)(६) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे

२०.डाटा एंट्री ऑपरेटर श्रेणी-२ :-

**<u>संघटनेची मागणी</u> :-** विद्यापीठाने त्यांचे पत्र एएन- १६७१ दि. ०५/०५/२०१० नुसार ६वा वेतन आयोग शासन अधिसूचना दि.०७/१०/२००९ मध्ये सदर पदास नमूद करण्यात आलेली पीबी-१ रु.५२००-२०२०० ( ग्रेड वेतन २८००) बाबत वेतनत्रुटीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर पदावर कार्यरत सेवांस पद निर्मिती वेळीस असलेली वेतनश्रेणीच्या समकक्ष सहावा वेतन आयोग (पीबी-२ रु. ९३०० ३४८०० (ग्रेड वेतन ४२००) लागू करण्यात आला आहे. शासन अधिसूचना दि.२२.१२.२०२३ अन्वये या पदास एस १० वेतनस्तर लागू करण्यात आलेला आहे. या पदास सहाव्या वेतन आयोगाच्या समकक्ष वेतनस्तर एस- १३ लागू करण्यात यावा.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :-** डाटा एंट्री ऑपरेटर श्रेणी-२ (बायोइन्फॉर्मेटिक) या पदाला दिनांक ५.१२.१९९६ च्या शासन निर्णयामधील वेतनश्रेणी विचारात घेऊन सातव्या वेतन आयोगाची एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी अर्जदारांनी केली आहे. त्यासंदर्भात नमूद करण्यात येते की, वेतनत्रुटी समितीची स्थापना सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीमधील त्रुटी संबंधित सादर होणाऱ्या प्रकरणाची तपासणी करणे ह्या उद्देशाने झाली आहे. अर्जदारांची मागणी चौथ्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी सुधारित करण्याची आहे. त्यामुळे ह्या पदासंदर्भात सादर करण्यात आलेला प्रस्ताव योग्य नाही.

**<u>समितीची शिफारस</u> :-** उच्च व तंत्रशिक्षण विभाग, अधिसूचना दिनांक २२.१२.२०२३ अन्वये ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी विद्यापीठातील संवर्गांना मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार

प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणींमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

****

## ३.७ गृह विभाग

प्रस्तावाचा तपशील

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | विद्यमान वेतनसंरचना | | सातवा वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील मंजूर वेतनस्तर (रुपये) | मागणी केलेला मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) |
| | अ) पोलीस महासंचालक | | | | |
| १ | पोलीस निरीक्षक | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु. ४९१००-१५५८०० | एस-१९ रु.५५१००-१७५१०० |
| २ | पोलीस शिपाई | ५२००-२०२०० | २००० विशेष वेतन रु.५००/- | एस-७, रु.२१७००-६९१०० + विशेष वेतन ७५० | एस-८ रु. २५५००-८११०० |
| ३ | स्वीय सहायक (राजपत्रित) (गट-ब) | ९३००-३४८०० | ४६०० | एस -१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| | ब) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे | | | | |
| ४ | कार्यदेशक छायाचित्रकार | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ५ | छायाचित्रकार | ९३००-३४८०० | ३५०० | एस-१२ रु.३२०००-१०१६०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| ६ | सहायक छायाचित्रकार | ५२००-२०२०० | २९०० | एस-११ रु.३०१००-९५१०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| | क)पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई | | | | |
| ७ | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देताना अनुज्ञेय दिनांकास काल्पनिक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | वेतननिश्चिती करुन दिनांक ०१.०१.२०१६ पासुन प्रत्यक्ष लाभ देणेबाबत |
| | ड) संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि शासकीय रासायनिक विश्लेषक | | | | |
| ८ | संचालक | ३७४००-६७००० | ८८०० | एस-२८ रु.१२४८००-२१२४०० | एस-२९ रु. १३११००-२१६६०० |
| ९ | उपसंचालक (गट-अ) | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२४ रु.७११००-२११९०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| १० | वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी गट-अ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ११ | लेखा अधिकारी गट-अ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| १२ | सहायक रासायनिक विश्लेषक व इतर ६ संवर्ग | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १३ | प्रशासकीय अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी (भांडार) गट-ब | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १४ | अधिक्षक/ अधिक्षक (भंडार) गट-ब (अराजपत्रित) | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| १५ | लिपिक- | ५२००- | १९०० | एस-६ रु.१९९००- | मंत्रालय लिपिक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | टंकलेखक | २०२०० | | ६३२०० | प्रमाणे दरमहा रु.५०००/- ठोक भत्ता देणेबाबत |
| | इ) कारागृह महानिरीक्षक, पुणे | | | | |
| १६ | वरिष्ठ प्रशासन अधिकारी | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| १७ | स्वीय सहायक / प्रशासन अधिकारी/ रचना व कार्यपद्धती अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| १८ | पर्यवेक्षक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| १९ | निदेशक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| | फ) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क | | | | |
| २० | उप अधीक्षक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु. ४४९०० -१४२४०० |
| २१ | दुय्यम निरीक्षक | ५२००-२०२०० | ३५०० | एस-१२ रु.३२०००-१०१६०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| २२ | सहायक दुय्यम निरीक्षक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| | ग) परिवहन आयुक्त | | | | |
| २३ | अपर परिवहन आयुक्त | ३७४००-६७००० | ८७०० | एस-२७ रु.१२३१०० २१५९०० | एस-२९ रु.१३११००-२१६६०० |
| २४ | परिवहन सह आयुक्त | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० | एस-२८ रु.१२३१००-२१५९०० |
| २५ | प्रादेशिक | १५६००- | ६६०० | एस-२३ रु.६७७००- | एस-२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | परिवहन अधिकारी | ३९१०० | | २०८७०० | रु.७८८००-२०९२०० |
| २६ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| २७ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| २८ | मोटर वाहन निरीक्षक | ९३००-३४८०० | ४५०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० |
| २९ | सहायक मोटर वाहन निरीक्षक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |

अ)पोलीस महासंचालक:-

१) पोलीस निरीक्षक:-

संघटनेची मागणी:- पोलीस निरीक्षक व तहसीलदार पदाशी महसूल विभागातील समकक्ष असलेले तहसीलदार ५व या दोन्ही पदांची वेतनश्रेणी ५ व्या वेतन आयोगामध्ये समान होती. तथापि, ६ व्या वेतन आयोगामध्ये तफावत झाली आहे. सबब, पोलीस निरीक्षक या पदाची वेतनश्रेणी एस-१८ ऐवजी तहसीलदार संवर्गाप्रमाणे एस-१९ मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- राज्य पोलीस सेवेतील पोलीस निरीक्षक हा संवर्ग तहसीलदार या संवर्गाशी समकक्ष असल्याने त्यांचे वेतन तहसीलदार संवर्गाप्रमाणे एस-१९ अशी सुधारित करण्यात यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. पोलीस निरीक्षक संवर्गाची व तहसिलदार या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. ६ व्या वेतन आयोगामध्ये प्रस्तुत संवर्गाची मंजूर वेतनसंरचना रु.९३००-३४८०० ग्रे.वे. रु.५०००/- अशी होती. तर, तहसीलदार संवर्गाची वेतनसंरचना रु.१५६००-३९१०० ग्रे.वे. रु.५००० /- अशी होती. पोलीस निरीक्षक संवर्गाला ६ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतनआयोगामध्ये एस-१८ ही मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२. पोलीस शिपाई :-

<u>संघटनेची मागणी:-</u> राज्य पोलीस सेवेतील शिपाई हा संवर्ग तलाठी या संवर्गाशी समकक्ष आहे. यास्तव पोलीस शिपाई ( वेतनश्रेणी एस-७, रु.२१७००-६९१०० + विशेष वेतन ७५०) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-७ ऐवजी एस-८ रु. २५५००-८११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> राज्य पोलीस सेवेतील शिपाई हा संवर्ग तलाठी या संवर्गाशी समकक्ष असल्याने त्यांचे वेतन तलाठी संवर्गाप्रमाणे एस-८ अशी सुधारित करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. पोलीस शिपाई संवर्गाची व तलाठी या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या वेतन आयोगापासून तलाठी संवर्गापेक्षा वेगळी वेतनश्रेणी विहित करण्यात आली आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतनआयोगामध्ये एस-७ ही मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

३. स्वीय सहायक (राजपत्रित) (गट-ब) :-

<u>संघटनेची मागणी:-</u> राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ अहवाल खंड-२ मधील शिफारशींनुसार शासन निर्णय, वित्त विभाग, दि.१३.०२.२०२३ अन्वये लघुलेखक (निवडश्रेणी) संवर्गाची सुधारित करण्यात आलेली आहे. स्वीय सहायक व निवडश्रेणी लघुलेखक ही पदे समकक्ष आहेत. यास्तव स्वीय सहायक (राजपत्रित) (गट-ब) ( वेतनश्रेणी एस-१६ रु.४४९००-१४२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ अहवाल खंड-२ मधील शिफारशीनुसार शासन निर्णय, वित्त विभाग, दि.१३.०२.२०२३ अन्वये लघुलेखक (निवडश्रेणी) संवर्गाची सुधारित करण्यात आलेली एस-१७ ही वेतनश्रेणी पोलीस महासंचालक कार्यालय तसेच अधिपत्याखालील कार्यालयातील लघुलेखक संवर्गातील स्वीय सहायक (राजपत्रित गट-ब) या पदास मंजूर करण्याची विनंती राज्य वेतनत्रुटी निवारण समितीस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतनसमानीकरण समिती (४था वेतन आयोग) अहवालातील परिच्छेद ३.२१ नुसार राज्यातील लघुलेखक संवर्गाचे विश्लेषण केले आहे. त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयांमध्ये स्वीय सहायक संवर्गाचे पद निर्माण केल्यास सदर पदास मंत्रालयातील निवडश्रेणी लघुलेखक संवर्गाची वेतनश्रेणी देण्यात यावी. प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या वेतन आयोगापासून ७ व्या वेतन आयोगापर्यंत मंत्रालयीन निवडश्रेणी लघुलेखकाची समकक्ष वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये निवडश्रेणी लघुलेखक संवर्गाची वेतनश्रेणी एस-१६ ऐवजी एस-१७ लागू करण्यात आली आहे. यास्तव पोलीस महासंचालक या कार्यालयातील स्वीय सहायक (राजपत्रित) गट - ब या संवर्गाला एस-१७ रु.४७६००-१५११०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

ब) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे

४. कार्यदेशक छायाचित्रकार :-

<u>संघटनेची मागणी</u>:- निम्न पद असलेले छायाचित्रकार या संवर्गाची मागणी केलेली वेतनश्रेणी वाढविल्यास कार्यदेशक (वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- निम्न पद असलेले छायाचित्रकार या पदाची मागणी केलेली वेतनश्रेणी वाढविल्यास कार्यदेशक या पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणीदेखील वाढविणे आवश्यक आहे. सबब, कार्यदेशक ( वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- सदर संवर्गाला वित्त विभाग, दि.१३/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१२ रु.३२०००-१०१६०० ऐवजी एस-१३ रु.३५४००-११२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. छायाचित्रकार या संवर्गाचे पदोन्नतीचे पद कार्यदेशक छायाचित्रकार हे आहे. छायाचित्रकार या संवर्गाला समितीने शिफारस केलेली एस-१३ ही वेतनश्रेणी मंजूर झाल्यास कार्यदेशक छायाचित्रकार या पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतही सुधारणा करणे आवश्यक ठरते. यास्तव कार्यदेशक छायाचित्रकार या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१३ रु. ३५४००-११२४०० ऐवजी एस-१४ रु. ३८६०० १२२८०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. छायाचित्रकार :-

<u>संघटनेची मागणी</u>:- निम्न पद असलेले सहायक छायाचित्रक या पदाची मागणी केलेली वेतनश्रेणी वाढविल्यास छायाचित्रकार ( वेतनश्रेणी एस-१२ रु.३२०००-१०१६००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु.३८६००-१२२८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- निम्न पद असलेले सहायक छायाचित्रकार या पदाची मागणी केलेली वेतनश्रेणी वाढविल्यास छायाचित्रकार या पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणीदेखील वाढविणे आवश्यक आहे. यास्तव, छायाचित्रकार ( वेतनश्रेणी एस-१२ रु.३२०००-१०१६००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु.३८६००-१२२८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- सदर संवर्गाला वित्त विभाग, दि.१३/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१० रु.२९२०० - ९२३०० ऐवजी एस-१२ रु.३२००० १०१६०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सहायक छायाचित्रकार या संवर्गाचे पदोन्नतीचे पद छायाचित्रकार हे आहे. सहायक छायाचित्रकार या संवर्गाला समितीने शिफारस केलेली एस-१२ ही वेतनश्रेणी मंजूर झाल्यास छायाचित्रकार या पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतही सुधारणा करणे आवश्यक ठरते. यास्तव छायाचित्रकार या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१२ रु.३२०००-१०१६०० ऐवजी एस-१३ रु. ३५४००-११२४०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

६. सहायक छायाचित्रकार :-

<u>संघटनेची मागणी</u> :- सहायक छायाचित्रकार हे पद वरिष्ठ तांत्रिक सहायक या पदाचे पदोन्नतीचे पद असूनही या दोन्ही पदांची वेतनश्रेणी एकच दर्शविली आहे. सहायक छायाचित्रकार हे पदोन्नतीचे पद असल्याने निम्न पद असलेले वरिष्ठ तांत्रिक सहायक या पदापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी असणे आवश्यक आहे. यास्तव, सहायक छायाचित्रकार ( वेतनश्रेणी एस-११ रु.३०१००-९५१००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु. ३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहायक छायाचित्रकार हे पद वरिष्ठ तांत्रिक सहायक या पदाचे पदोन्नतीचे पद असूनही या दोन्ही पदांची वेतनश्रेणी एकच दर्शविली आहे. सहायक छायाचित्रकार हे पदोन्नतीचे पद असल्याने निम्न पद असलेले वरिष्ठ तांत्रिक सहायक या पदापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी असणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने संबंधित संवर्गाचे दिनांक ०२.०१.१९८० रोजीचे सेवाप्रवेश नियम उपलब्ध करुन दिले आहेत. तसेच यानंतर गृह विभाग, दिनांक १३.०८.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार छायाचित्रण विभागातील कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता सुधारण्यात आली असून, पदवी अशी करण्यात आली आहे. सदर पदावर पदोन्नती आणि थेट भरतीद्वारे नियुक्ती केली जाते. तथापि, वरिष्ठ तांत्रिक सहायक या पदावरुन सहायक छायाचित्रकार या पदावर सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती दिल्याचे आदेश उपलब्ध आहेत.

वरिष्ठ तांत्रिक सहायक व सहायक छायाचित्रकार संवर्गाला दिनांक १३/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-८ रु. २५५००-८११०० ऐवजी एस-११ रु. ३०१०० - ९५१०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. वरिष्ठ तांत्रिक सहायक व पदोन्नतीचे पद सहायक छायाचित्रकार या दोन्ही संवर्गाला एस-११ ही वेतनश्रेणी मंजूर झाली आहे. यास्तव पदोन्नतीचे पद सहायक छायाचित्रकार या संवर्गाला एस-११ रु.३०१००-९५१०० ऐवजी एस-१२ रु.३२०००-१०१६०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

क) पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई

७. वरिष्ठ लिपिक :-

<u>संघटनेची मागणी</u>:- वरिष्ठ लिपिक ( वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देताना अनुज्ञेय दिनांकास काल्पनिक वेतननिश्चिती करुन दिनांक ०१.०१.२०१६ पासून प्रत्यक्ष लाभ देणेबाबत सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सन १९९२ ते १९९२ या कालावधीत नियुक्त झालेल्या कनिष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार उचित लाभ मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा करुन १२ व २४ वर्षे ऐवजी १०, २० व ३० वर्षांची सुधारित आश्वासित प्रगती योजना दि. ०१.०१.२०१६ पासून अस्तित्वात आली आहे. हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून त्यामुळे बहुसंख्य संवर्गांचा फायदा होत आहे. कमी कालावधीनंतर पुढील वेतनश्रेणीचा लाभ होत असल्यामुळे सुधारित आश्वासित प्रगती योजना आहे

तशीच स्विकारणे हिताचे ठरेल. त्यामुळे दि.०१.०१.२०१६ पूर्वीची तारीख व काल्पनिक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करणे आश्वासित प्रगती योजनेच्या तरतुदींनुसार योग्य ठरत नाही.

ख) संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि शासकीय रासायनिक विश्लेषक

८. संचालक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- वैद्यकीय व शिक्षण संशोधन संचालनालय व आरोग्य सेवा संचालनालय यांना संचालक पदास एस-२९ ही वेतनश्रेणी लागू आहे. यास्तव न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथील संचालक ( वेतनश्रेणी एस-२८ रु.१२४८००-२१२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२९ रु. १३११००-२१६६०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वैद्यकीय व शिक्षण संशोधन संचालनालय व आरोग्य सेवा संचालनालय, येथील संचालक पदांची वेतनश्रेणी विचारात घेता, संचालनालयाच्या आस्थापनेवरील संचालक, या पदांला उपरोक्त नमूद पदांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे उचित राहील.

<u>समितीची शिफारस</u> :- वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, आरोग्य सेवा संचालनालय आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय येथील संचालक या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. तसेच, वेतन समानीकरण समितीने ( ४ था वेतन आयोग ) जी वेतनश्रेणी मंजूर केली आहे, त्यास समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगात वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

९. उपसंचालक (गट-अ) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय न्यायसहायक प्रयोगशाळा व गुजरात व दिल्ली (सीबीआय) येथे उपसंचालक या पदाला वेतनश्रेणी एस-२५ लागू आहे. यास्तव संचालनालयातील उपसंचालक (गट-अ) ( वेतनश्रेणी एस-२४ रु.७११००-२११९००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२५ रु.७८८००-२०९२०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- केंद्रीय न्यायसहायक प्रयोगशाळा आणि इतर राज्यातील (गुजरात व दिल्ली) समकक्ष पदांची वेतनश्रेणी विचारात घेता, संचालनालयाच्या आस्थापनेवरील उपसंचालक, या पदाला सदर पदांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे उचित राहील.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने ( ४ था वेतन आयोग ) जी वेतनश्रेणी मंजूर केली आहे, त्यास समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ५ व्या , ६ व्या व ७ व्या वेतन आयोगात वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

१०. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी गट-अ :-

<u>संघटनेची मागणी</u> :- कृषि आयुक्तालय येथील प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-२३ आहे. यास्तव संचालनालयातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी गट-अ ( वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२३ रु.६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- कृषि आयुक्तालय येथील समकक्ष पदांचे विचारात घेता, संचालनालयाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी (गट-अ) या पदाला सदर पदाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे उचित राहील.

समितीची शिफारस :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी नाही.

११. लेखा अधिकारी गट-अ :-

संघटनेची मागणी :- कृषि आयुक्तालय येथील प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-२३ आहे. यास्तव संचालनालयातील लेखा अधिकारी गट-अ ( वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२३ रु.६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- कृषि आयुक्तालय येथील समकक्ष पदांचे वेतन विचारात घेता, संचालनालयाच्या आस्थापनेवरील लेखा अधिकारी (गट-अ) या पदाला सदर पदाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे उचित राहील.

समितीची शिफारस :- वित्त विभागांतर्गत संचालक, लेखा व कोषागारे मध्ये कार्यरत लेखा अधिकारी (गट अ ) या संवर्गासही वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५०० हीच अनुज्ञेय करण्यात आली आहे. ही बाब विचारात घेता, या संवर्गास मंजूर करण्यात आलेली वेतनश्रेणी योग्य असून त्यात त्रुटी आढळून येत नाही.

१२. सहायक रासायनिक विश्लेषक व इतर ६ संवर्ग :-

संघटनेची मागणी :- केंद्रीय न्याय सहायक प्रयोगशाळा व मध्यप्रदेश, गोवा, दिल्ली, हरियाणा, आसाम, छत्तीसगड येथे प्रस्तुत संवर्गाला एस-२० ही वेतनश्रेणी लागू असून जम्मु व काश्मिर येथे एस-१७ ही वेतनश्रेणी लागू आहे. यास्तव न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय येथील सहायक रासायनिक विश्लेषक व इतर ६ संवर्ग ( वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्रीय न्यायसहायक प्रयोगशाळा आणि इतर राज्यातील (मध्यप्रदेश, गोवा, दिल्ली व इतर) समकक्ष पदांचे वेतन विचारात घेता, संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक रासायनिक विश्लेषक व इतर ६, या पदाला सदर पदाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे उचित राहील.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने ( ४ था वेतन आयोग ) जी वेतनश्रेणी मंजूर केली आहे, त्यास समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ५ व्या , ६ व्या व ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

१३. प्रशासकीय अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी (भांडार) गट-ब :-

संघटनेची मागणी :- मंत्रालयीन संवर्ग कक्ष अधिकारी यांना एस-१६ आणि एस-१७ व चार वर्षांच्या सलग सेवेनंतर एस-२० ही वेतनश्रेणी लागू आहे. तसेच, भु-विज्ञान खनिकाम संचालनालय, शिक्षण संचालनालय, आयुष संचालनालय येथे प्रस्तुत संवर्गाला एस-२० ही वेतनश्रेणी लागू आहे. यास्तव संचालनालयातील प्रशासकीय अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी (भंडार) गट-ब (वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाप्रमाणेच प्रशासकीय अधिकारी या संवर्गाला वेतनश्रेणी मंजूर करणे उचित राहील.

समितीची शिफारस :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून वेतनश्रेणीही त्याप्रमाणे आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळुन येत नाही.

१४. अधिक्षक/ अधिक्षक (भंडार) गट-ब (अराजपत्रित) :-

संघटनेची मागणी :- महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग व धर्मादाय आयुक्त येथे प्रस्तुत संवर्गाला एस-१५ ही वेतनश्रेणी लागू आहे. यास्तव संचालनालयातील अधिक्षक/ अधिक्षक (भंडार) गट-ब (अराजपत्रित) ( वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- राज्य मानवी हक्क आयोग व धर्मादाय आयुक्त येथील वेतनश्रेणी एस-१५ सदर पदाला लागू करण्यात यावी.

समितीची शिफारस :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून वेतनश्रेणीही त्याप्रमाणे आहे. अधिक्षक/ अधिक्षक (भंडार) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गास ६ व्या वेतन आयोगाच्या समकक्ष असुधारित वेतनश्रेणीशी ७ व्या वेतन आयोगात सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. यास्तव या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१५. लिपिक-टंकलेखक :-

संघटनेची मागणी :- लिपिक-टंकलेखक ( वेतनश्रेणी एस-६ रु.१९९००-६३२००) या पदास मंत्रालय लिपिक संवर्गाप्रमाणे दरमहा रु.५०००/- ठोक भत्ता देण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- लिपिक या पदासाठी मंत्रालयीन लिपिक संवर्गाप्रमाणे विशेष वेतन रुपये ५०००/- प्रस्तावित करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- एखाद्या संवर्गाला विशिष्ट स्वरुपाचे भत्ते लागू करणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून, वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत भत्ते येत नाहीत.

इ) कारागृह महानिरीक्षक, पुणे

१६. वरिष्ठ प्रशासन अधिकारी :-

संघटनेची मागणी:- महाराष्ट्र शासनाचे इतर विभागातील समान पदनामाने कार्यरत असलेले अधिकारी यांचे कामाचे स्वरुपात साम्यता असूनदेखील वेतनामध्ये तफावत आहे. महाराष्ट्र शासनांतर्गत इतर विभागाप्रमाणे कारागृह विभागातील वरिष्ठ प्रशासन अधिकारी ( वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२३ रु.६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वरिष्ठ प्रशासन अधिकारी यांची सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० वरुन एस-२३ अशी सुधारित करण्यात यावी.

समितीची शिफारस :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून वेतनश्रेणीही त्याप्रमाणे आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

१७. स्वीय सहायक / प्रशासन अधिकारी/ रचना व कार्यपद्धती अधिकारी:-

संघटनेची मागणी:- महाराष्ट्र शासनाचे इतर विभागातील समान पदनामाने कार्यरत असलेले अधिकारी यांचे कामाचे स्वरुपात साम्यता असूनदेखील वेतनामध्ये तफावत आहे. महाराष्ट्र शासनांतर्गत इतर विभागाप्रमाणे कारागृह विभागातील स्वीय सहायक / प्रशासन अधिकारी/ रचना व कार्यपद्धती अधिकारी ( वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- स्वीय सहायक/ प्रशासन अधिकारी/ रचना व कार्यपद्धती अधिकारी व इतर विभागातील प्रशासन अधिकारी यांचे ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-१५ वरुन एस-२० अशी सुधारित करण्यात यावी.

समितीची शिफारस :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून वेतनश्रेणीही त्याप्रमाणे आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

१८. पर्यवेक्षक:-

संघटनेची मागणी:- कारागृह विभागातील तांत्रिक कर्मचाऱ्यांना औद्योगिक प्रशिक्षण शाळातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समकक्ष वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे. यास्तव पर्यवेक्षक ( वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- कारागृह विभागातील तांत्रिक संवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी जी पदे पदोन्नतीने भरली जातात त्या पदासाठी ७ व्या वेतन आयोगानुसार पर्यवेक्षक पदासाठी एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**समितीची शिफारस** :- पर्यवेक्षक हा संवर्ग निदेशक संवर्गाचे पदोन्नतीचे पद आहे. निम्न आणि पदोन्नतीच्या संवर्गात समान वेतनश्रेणी मंजूर झालेली आढळले. करिता, पर्यवेक्षक या पदोन्नतीच्या संवर्गास एस -१० रु. रु.२९२००-९२३०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९. निदेशक :-

**संघटनेची मागणी** :- कारागृह विभागातील तांत्रिक कर्मचाऱ्यांना औद्योगिक प्रशिक्षण शाळातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समकक्ष वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे. निदेशक (वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० रु.२९२००-९२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- कारागृह विभागातील तांत्रिक संवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी जी पदे पदोन्नतीने भरली जातात त्या पदासाठी ७ व्या वेतन आयोगानुसार निदेशक पदासाठी एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**समितीची शिफारस** :- निदेशक या संवर्गास ६ व्या वेतन आयोगाच्या समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. यास्तव, या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

युक्त, राज्य उत्पादन शुल्क

२०. उप अधीक्षक :-

**संघटनेची मागणी** :- राज्य वेतन सुधारणा समितीच्या उपरोक्त शिफारशींमुळे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या संवर्गाला एस-१५ हा सुधारित वेतनस्तर लागू झाला आहे. वेतन आयोगानुसार उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या संवर्गालाही एस-१५ हा वेतनस्तर लागू आहे. म्हणजेच निरीक्षक व उप अधीक्षक संवर्गाची वेतनसंरचना समान झाली आहे. उप अधीक्षक हे निरीक्षक संवर्गासाठी पदोन्नतीचे पद आहे. निरीक्षक पदावरुन अर्हता, पात्रता निकष पूर्ण केल्यानंतर पदोन्नतीने उप अधिक्षक या पदी निवड होते. निरीक्षक हे उप अधीक्षक संवर्गापेक्षा निम्न पद असूनही निरीक्षक व उप अधीक्षक संवर्गाचा वेतनस्तर समान झाले आहेत. यास्तव उप अधीक्षक ( वेतनश्रेणी एस-१५ रु. ४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु. ४४९०० -१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- उप अधीक्षक ( वेतनश्रेणी एस-१५ रु. ४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु. ४४९०० -१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी. सहायक आयुक्त या संवर्गास ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१५ हा वेतनस्तर लागू होता. मात्र राज्य वेतन सुधारणा समितीने सहायक आयुक्त संवर्गासाठी एस-१६ या वेतनस्तराची शिफारस केली आहे. (शासन निर्णय दि. १३.०२.२०२३) सहायक आयुक्त व उप अधीक्षक हे समकक्ष पद आहे तसेच निरीक्षक व उप अधीक्षक या संवर्गाची वेतनसंरचना (शासन निर्णय दि. १३.०२.२०२३) समान झाली

आहे. उप अधीक्षक हे निरीक्षक संवर्गासाठी पदोन्नतीचे पद असल्यामुळे उपअधीक्षक संवर्गासाठीही एस-१६ रु. ४४९००-१४२४०० हा वेतनस्तर लागू करणे आवश्यक होते. मात्र तसे न झाल्याने निरीक्षक हे उप अधीक्षक संवर्गापेक्षा निम्न पद असूनही निरीक्षक व उप अधीक्षक संवर्गाची वेतनसंरचना समान झाली आहे. सदरहू त्रुटी दूर करणे आवश्यक असल्याने उप अधीक्षक (वेतनश्रेणी एस-१५ रु. ४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु. ४४९०० -१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- उप अधीक्षक आणि सहायक आयुक्त हे समकक्ष संवर्ग आहेत. निरीक्षक संवर्गाचे पदोन्नतीचे पद उप अधीक्षक हे आहे. शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये निरीक्षक या संवर्गाची वेतनसंरचना एस-१४ वरुन एस-१५ केल्यामुळे निरीक्षक व उप अधीक्षक या संवर्गाची वेतनसंरचना समान झाली आहे. यास्तव, उप अधीक्षक या संवर्गास एस -१६ रु. ४४९०० -१४२४०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२१. दुय्यम निरीक्षक :-

<u>संघटनेची मागणी</u>:- केंद्रीय विभागातील उपनिरीक्षक (सीबीआय) यांचेप्रमाणे वेतनश्रेणी (ग्रेड पे) सुधारणा न करण्यात आल्याने सातव्या वेतन आयोगानुसार केंद्रीय विभागातील उपनिरीक्षक या पदाचे वेतन व राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक पदाचे वेतन यात तफावत दिसून येते. यास्तव दुय्यम निरीक्षक ( वेतनश्रेणी एस-१२ रु.३२०००-१०१६००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु.३८६००-१२२८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- दुय्यम निरीक्षक संवर्गास पोलीस उपनिरीक्षक, विक्रीकर निरीक्षक, सहायक मोटार वाहन निरीक्षक(गट-ब), दुर्गाधिकारी (श्रेणी २) या संवर्गाप्रमाणे एस-१४, रु.३८६००-१२२८०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- प्रस्तुत संवर्गाचा प्रस्ताव ६ व्या वेतन आयोगाच्या त्रुटी समितीसमोरही सादर झाला होता. सदर प्रस्तावावर समितीने पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत - "या संवर्गास पोलीस उपनिरीक्षक संवर्गाप्रमाणे सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. मात्र, हा संवर्ग पोलीस उपनिरीक्षक संवर्गाशी समकक्ष नाही. तसेच पोलिस विभागाकडील कायदा व सुव्यवस्थेची व्यापक जबाबदारी पाहता पोलिस उपनिरीक्षक संवर्गाप्रमाणे वेतन संरचनेची मागणी समर्थनीय वाटत नाही. तथापि, हा पोलिस उपनिरीक्षकाप्रमाणे गणवेशधारी व शस्त्रधारी संवर्ग असून या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या आणि पोलिस उपनिरीक्षक संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या व कार्यपद्धती यामध्ये काही अंशी साम्य दिसून येते. याच विभागातील इतर संवर्गाशी तुलना करता या संवर्गाची वेतनसंरचना न्यायोचित असावी या दृष्टीने या संवर्गास वेतन बँड पीबी -१, रु. ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रु.३५०० ही वेतन संरचना मंजूर करण्यात येत आहे." प्रस्तुत संवर्गाच्या मागणीमध्ये कोणताही नविन मुद्दा उपस्थित करण्यात आलेला नाही. या संवर्गाला ६ व्या वेतन आयोगाच्या त्रुटी समितीच्या शिफारशीनुसार मंजूर वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-१२ रु. ३२०००-१०१६०० लागू करण्यात आली आहे. करिता, या संवर्गास लागू करण्यात आलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

२२. सहायक दुय्यम निरीक्षक :-

<u>संघटनेची मागणी:-</u> राज्य शासनाच्या सेवेतील पोलीस महासंचालक विभाग व कारागृह विभागातील सहाय्यक फौजदार व कारागृह सुभेदार यांचेप्रमाणे सहायक दुय्यम निरीक्षक या संवर्गाची वेतनश्रेणी सुधारणा न करण्यात आल्याने सदर पदाचे वेतनामध्ये तफावत दिसून येते. सबब, सहायक दुय्यम निरीक्षक ( वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० रु.२९२००-९२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> कामकाजाचे विशिष्ट स्वरुप विचारात घेता सहायक दुय्यम निरीक्षक या पदाची विद्यमान वेतनश्रेणी एस-८ ऐवजी एस-१० करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> प्रस्तुत संवर्गाला याच मुद्दांवर सर्वकष विचार करुन, नुकताच वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०२/२०२३ अन्वये ७ व्या वेतन आयोगात वेतनश्रेणी एस-७ रु.२१७०० - ६९१०० ऐवजी एस-८ रु.२५५००-८११०० ही लागू करण्यात आली आहे. यास्तव, आता या संवर्गाच्या वेतनश्रेणीत पुन्हा सुधारणा करण्याची मागणी योग्य असल्याचे आढळून येत नाही. ।

ग) परिवहन आयुक्त

२३. अपर परिवहन आयुक्त :-

<u>संघटनेची मागणी:-</u>मोटर वाहन विभागातील सर्व कार्यकारी अधिकारी हे अभियांत्रिकी पदवी/पदवीका धारण करत असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाचे धोरण विचारात घेऊन इतर अभियांत्रिकी विभागाप्रमाणे समकक्ष वेतनस्तर मंजूर करणे आवश्यक आहे. यास्तव अपर परिवहन आयुक्त ( वेतनश्रेणी एस-२७ रु.१२३१००-२१५९००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२९ रु १३११००-२१६६०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाचे सुधारित सेवाप्रवेश नियम त्यानुसार विहित गट अ चा दर्जा उच्च शैक्षणिक अर्हता व विशेष तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य, सदर पदाशी असलेली केंद्र शासनातील अभियांत्रिकी पदवी ही अर्हता असलेल्या पदांशी समकक्षता, शासन निर्णय दिनांक १४/११/२००८ अन्वये, सहायक मोटार वाहन निरीक्षक ते परिवहन आयुक्त पदापर्यंत वेतनश्रेण्यांमध्ये करण्यात आलेली सुधारणा, राज्य शासनातील गट अ पदाच्या व अभियांत्रिकी शैक्षणिक अर्हता असलेल्या पदांच्या समकक्ष वेतनश्रेणी इत्यादी बाबी विचारात घेऊन अपर परिवहन आयुक्त या पदाची वेतनश्रेणी एस -२७ ऐवजी एस -२९ मंजूर करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२/परि-४ (२), दि.१४.११.२००८ अन्वये परिवहन विभागातील सहायक मोटर वाहन निरीक्षकांपासून अतिरिक्त परिवहन आयुक्तांपर्यंत सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत राज्य वेतन सुधारणा समितीने (हकीम समिती), २००८ यांनी या निर्णयाच्या परिणामस्वरूप इतर विभागाकडून विशेषतः परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांबरोबर सापेक्षता असलेल्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडून, अशा प्रकारे वेतनश्रेणीत सुधारणा

करण्याची मागणी येऊ शकते. या बाबींची समितीने काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर, परिवहन विभागातील विविध संवर्ग पदास अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणींमध्ये आवश्यक तो फरक राखून व इतर विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणींबरोबर असलेली सापेक्षता कायम ठेऊन जलसंपदा विभागाच्या दिनांक १६.४.१९८४ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा फायदा परिवहन विभागातील अधिकाऱ्यांना देणे शक्य होईल. त्यानुसार परिवहन विभागातील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत नुकतीच सुधारणा करण्यात आली असली तरी, त्यांना सुधारित वेतन संरचनेत तक्ता क्रमांक ३.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली होती. ( मुद्दा क्रमांक ३.११) सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२५. परिवहन सह आयुक्त :-

<u>संघटनेची मागणी</u>:- मोटर वाहन विभागातील सर्व कार्यकारी अधिकारी हे अभियांत्रिकी पदवी/पदवीका धारण करत असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाचे धोरण विचारात घेऊन इतर अभियांत्रिकी विभागाप्रमाणे समकक्ष वेतनस्तर मंजूर करणे आवश्यक आहे. यास्तव परिवहन सह आयुक्त ( वेतनश्रेणी एस-२५ रु.७८८००-२०९२००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२७ रु.१२३१००-२१५९००अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाचे सुधारित सेवाप्रवेश नियम त्यानुसार विहित गट अ चा दर्जा उच्च शैक्षणिक अर्हता व विशेष तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य, सदर पदाशी असलेली केंद्र शासनातील अभियांत्रिकी पदवी ही अर्हता असलेल्या पदांची समकक्षता, शासन निर्णय दिनांक १४/११/२००८ अन्वये, सहायक मोटार वाहन निरीक्षक ते परिवहन आयुक्त पदापर्यंत वेतनश्रेण्यांमध्ये करण्यात आलेली सुधारणा, राज्य शासनातील गट अ पदाच्या व अभियांत्रिकी शैक्षणिक अर्हता असलेल्या पदांच्या समकक्ष वेतनश्रेणी इत्यादी बाबी विचारात घेऊन परिवहन सह आयुक्त या पदाची वेतनश्रेणी एस -२५ ऐवजी एस -२७ मंजूर करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२/परि-४ (२), दि.१४/११/२००८ अन्वये परिवहन विभागातील सहायक मोटर वाहन निरीक्षकांपासून अतिरिक्त परिवहन आयुक्तांपर्यंत सर्व संवर्गातील अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत राज्य वेतन सुधारणा समितीने (हकीम समिती), २००८ यांनी या निर्णयाच्या परिणामस्वरूप इतर विभागांकडून विशेषतः परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांबरोबर सापेक्षता असलेल्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडून, अशा प्रकारे वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मागणी येऊ शकते. या बाबींची समितीने काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर, परिवहन विभागातील विविध संवर्ग पदास अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणींमध्ये आवश्यक तो फरक राखून व इतर विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणींबरोबर असलेली सापेक्षता कायम ठेऊन जलसंपदा विभागाच्या दि.१६.४.१९८४ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा फायदा परिवहन विभागातील अधिकाऱ्यांना देणे शक्य होईल. त्यानुसार परिवहन विभागातील अधिकाऱ्यांच्या

वेतनश्रेणीत नुकतीच सुधारणा करण्यात आली असली तरी, त्यांना सुधारित वेतन संरचनेत तक्ता क्रमांक ३.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली होती. (मुद्दा क्रमांक ३.११) सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२५. प्रादेशिक परिवहन अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी:-</u> मोटर वाहन विभागातील सर्व कार्यकारी अधिकारी हे अभियांत्रिकी पदवी/पदवीका धारण करत असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाचे धोरण विचारात घेऊन इतर अभियांत्रिकी विभागाप्रमाणे समकक्ष वेतनस्तर मंजूर करणे आवश्यक आहे. यास्तव प्रादेशिक परिवहन अधिकारी ( वेतनश्रेणी एस- २३ रु.६७७००-२०८७००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२५ रु.७८८००-२०९२०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाचे सुधारित सेवाप्रवेश नियम त्यानुसार विहित गट अ या दर्जा उच्च शैक्षणिक अर्हता व विशेष तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य, सदर पदाशी असलेली केंद्र शासनातील अभियांत्रिकी पदवी ही अर्हता असलेल्या पदांची समकक्षता, शासन निर्णय दिनांक १४/११/२००८ अन्वये, सहायक मोटार वाहन निरीक्षक ते परिवहन आयुक्त पदापर्यंत वेतनश्रेण्यांमध्ये करण्यात आलेली सुधारणा, राज्य शासनातील गट अ पदांच्या व अभियांत्रिकी शैक्षणिक अर्हता असलेल्या पदांच्या समकक्ष वेतनश्रेणी इत्यादी बाबी विचारात घेऊन प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस -२३ ऐवजी एस -२५ मंजूर करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२/परि-४ (२), दि.१४/११/२००८ अन्वये परिवहन विभागातील सहायक मोटर वाहन निरीक्षकांपासून अतिरिक्त परिवहन आयुक्तांपर्यंत सर्व संवर्गातील अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत राज्य वेतन सुधारणा समितीने (हकीम समिती), २००८ यांनी या निर्णयाच्या परिणामस्वरूप इतर विभागाकडून विशेषतः परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांबरोबर सापेक्षता असलेल्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडून, अशा प्रकारे वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मागणी येऊ शकते. या बाबींची समितीने काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर, परिवहन विभागातील विविध संवर्ग पदास अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणींमध्ये आवश्यक तो फरक राखुन व इतर विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणींबरोबर असलेली सापेक्षता कायम ठेऊन, जलसंपदा विभागाच्या दि.१६/०४/१९८४च्या शासन निर्णयातील तरतुदींचा फायदा परिवहन विभागातील अधिकाऱ्यांना देणे शक्य होईल. त्यानुसार परिवहन विभागातील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत नुकतीच सुधारणा करण्यात आली असली तरी, त्यांना सुधारित वेतन संरचनेत तक्ता क्रमांक ३.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली होती. (मुद्दा क्रमांक ३.११) सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आलेल्या असुधारित वेतनश्रेणींशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२६. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- मोटर वाहन विभागातील सर्व कार्यकारी अधिकारी हे अभियांत्रिकी पदवी/पदवीका धारण करत असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाचे धोरण विचारात घेऊन इतर अभियांत्रिकी विभागाप्रमाणे समकक्ष वेतनस्तर मंजूर करणे आवश्यक आहे. यास्तव उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ( वेतनश्रेणी एस-१७ रु.४७६००-१५११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२३ रु.६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाचे सुधारित सेवाप्रवेश नियम त्यानुसार विहित गट अ चा दर्जा उच्च शैक्षणिक अर्हता व विशेष तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य, सदर पदाशी असलेली केंद्र शासनातील अभियांत्रिकी पदवी ही अर्हता असलेल्या पदांची समकक्षता, शासन निर्णय दिनांक १४/११/२००८ अन्वये, सहायक मोटार वाहन निरीक्षक ते परिवहन आयुक्त पदापर्यंत वेतनश्रेण्यांमध्ये करण्यात आलेली सुधारणा, राज्य शासनातील गट अ पदाच्या व अभियांत्रिकी शैक्षणिक अर्हता असलेल्या पदांच्या समकक्ष वेतनश्रेणी इत्यादी बाबी विचारात घेऊन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस -१७ ऐवजी एस -२३ मंजूर करणे आवश्यक आहे.

**समितीची शिफारस** :- सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने करण्यात आलेली एस-१८ ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस मंजूर झाल्यास यांचे पदोन्नतीचे पद उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक ठरते. सबब, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गाला एस-१७ रु.४७६००-१५११०० ऐवजी एस-२० रु.५६१००-१७७५०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२७. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- मोटर वाहन विभागातील सर्व कार्यकारी अधिकारी हे अभियांत्रिकी पदवी/पदवीका धारण करत असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाचे धोरण विचारात घेऊन इतर अभियांत्रिकी विभागाप्रमाणे समकक्ष वेतनस्तर मंजूर करणे आवश्यक आहे तसेच प्रस्तुत संवर्गाचा गट अ मध्ये एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षणाअंतर्गत समावेश करण्यात आला आहे. यास्तव सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी ( वेतनश्रेणी एस-१६ रु.४४९००-१४२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर संवर्ग सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १५.०४.२०२४ अन्वये गट-अ मध्ये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट करण्यात आला आहे. या गटात इतर संवर्गाप्रमाणे एस-२० वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. तसेच या संवर्गाचे निम्न असलेले मोटार वाहन निरीक्षक या संवर्गालासुद्धा तोच वेतनस्तर एस-१६ निश्चित करण्यात आल्याने त्रुटी निर्माण झाली आहे. सदर संवर्गाला एस -२० मंजूर करणे आवश्यक आहे.

**समितीची शिफारस :-** एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ज्या संवर्गांचा समावेश आहे, त्या संवर्गांना एकसमान वेतनश्रेणी नसून विविध वेतनश्रेणी (एस-१८ ते एस-२३) आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. ०६/०३/२०२४ अन्वये वेतनश्रेणींच्या आधारे पदांचे गटनिहाय वर्गीकरण करण्यात येऊ नये असा निर्णय झाला आहे. तथापि, परिवहन विभागामध्ये सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी हे पद मोटार वाहन निरीक्षक या निम्न संवर्गातून पदोन्नतीने व सरळसेवेने ५०:५० या प्रमाणात भरण्यात येते. परंतु, या दोन्ही संवर्गांना ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१६ ही एकच वेतनश्रेणी विहित करण्यात आली आहे. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी हे पद पदोन्नतीचे असल्याने सदर पदाला एस-१६ रु. ४४९००-१४२४०० ऐवजी एस-१८ रु.४९१००-१५५८०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२८. मोटर वाहन निरीक्षक :-

**संघटनेची मागणी:-** मोटर वाहन विभागामध्ये "मोटर वाहन निरीक्षक" हा एक महत्वाचा संवर्ग असून विभागात ते Technical Expert म्हणून आपली भुमिका बजावत असतात. वाहनांस फिटनेस देणे, अपघातांचे विश्लेषण करणे अत्यावश्यक सेवेत कर्तव्य पार पाडणे, या सोबतच अंमलबजावणी पथकातही ते काम करतात. यासाठी आवश्यक शस्त्र हाताळण्याचे प्रशिक्षणही त्यांना प्राप्त आहे. असे असताना सुध्दा मोटार वाहन निरीक्षक (गट-अ, कनिष्ठ स्तर) या पदास वेतनाच्या बाबतीत समकक्षता ठरवली गेली नाही, त्यामुळे प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्या आहेत तसेच या पदांच्या बाबतीत दर्जा व वेतन या अनुषंगाने विसंगती निर्माण झाली आहे. सबब मोटार वाहन निरीक्षक (वेतनश्रेणी एस-१६ रु.४४९००-१४२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१८ रु.४९१००-१५५८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** मोटार वाहन निरीक्षक शैक्षणिक अर्हता, विशेष तांत्रिक ज्ञान, कौशल्य राज्य शासनाच्या इतर विभागातील अन्य पदांच्या अभियांत्रिक शैक्षणिक अर्हता असणाऱ्या समकक्ष पदांच्या वेतनश्रेणी शासन निर्णय दिनांक १४/११/२००८ अन्वये मोटार वाहन निरीक्षक या पदांच्या वेतनश्रेणी मध्ये करण्यात आलेली सुधारणा इत्यादी बाबी विचारात घेऊन मोटार वाहन निरीक्षक या पदाची वेतनश्रेणी एस-१६ वरुन एस-१८ करण्यात यावी.

**समितीची शिफारस :-** शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२/परि-४ (२), दिनांक १४.११.२००८ अन्वये परिवहन विभागातील सहायक मोटर वाहन निरीक्षकांपासून अतिरिक्त परिवहन आयुक्तांपर्यंत सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत राज्य वेतन सुधारणा समितीने (हकीम समिती), २००८ या निर्णयाच्या परिणामस्वरूप इतर विभागाकडून विशेषतः परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांबरोबर सापेक्षता असलेल्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडून, अशा प्रकारे वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मागणी येऊ शकते. या बाबींची समितीने काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर, परिवहन विभागातील विविध संवर्ग पदास अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणींमध्ये आवश्यक तो फरक राखून व इतर विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणींबरोबर असलेली सापेक्षता कायम ठेऊन जलसंपदा विभागाच्या दिनांक १६.४.१९८४ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा फायदा परिवहन विभागातील अधिकाऱ्यांना देणे शक्य होईल. त्यानुसार परिवहन विभागातील अधिकाऱ्यांच्या

वेतनश्रेणीत नुकतीच सुधारणा करण्यात आली असली तरी, त्यांना सुधारित वेतन संरचनेत तक्ता क्रमांक ३.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली होती ( मुद्दा क्रमांक ३.११) सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२९. सहायक मोटर वाहन निरीक्षक :-

<u>संघटनेची मागणी:-</u> सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक हे मोटार वाहन निरीक्षकास सहाय्यकाची भूमिका पार पाडतात. सदर पदाची थेट नियुक्तीची शैक्षणिक अर्हता अभियांत्रिकी पदविका असून, हे पद कनिष्ठ अभियंता या पदास समतुल्य आहे. यास्तव सहायक मोटर वाहन निरीक्षक ( वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहायक मोटर वाहन निरीक्षक शैक्षणिक अर्हता, विशेष तांत्रिक ज्ञान, कौशल्य राज्य शासनाच्या इतर विभागातील अन्य पदांच्या अभियांत्रिक शैक्षणिक अर्हता असणाऱ्या समकक्ष पदांच्या वेतनश्रेणी शासन निर्णय दिनांक १४/११/२००८ अन्वये सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदांच्या वेतनश्रेणी मध्ये करण्यात आलेली सुधारणा इत्यादी बाबी विचारात घेऊन सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदाची वेतनश्रेणी एस-१४ वरुन एस-१५ करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२/परि-४ (२), दिनांक १४.११.२००८ अन्वये परिवहन विभागातील सहायक मोटर वाहन निरीक्षकांपासून अतिरिक्त परिवहन आयुक्तांपर्यंत सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत राज्य वेतन सुधारणा समितीने (हकीम समिती), २००८ यांनी या निर्णयाच्या परिणामस्वरूप इतर विभागांकडून विशेषतः परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांबरोबर सापेक्षता असलेल्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडून, अशा प्रकारे वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मागणी केली जाऊ शकते. या बाबींची समितीने काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर, परिवहन विभागातील विविध संवर्ग पदास अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणींमध्ये आवश्यक तो फरक राखून व इतर विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणींबरोबर असलेली सापेक्षता कायम ठेऊन जलसंपदा विभागाच्या दिनांक १६.४.१९८४ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा फायदा परिवहन विभागातील अधिकाऱ्यांना देणे शक्य होईल. त्यानुसार परिवहन विभागातील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत नुकतीच सुधारणा करण्यात आली असली तरी, त्यांना सुधारित वेतन संरचनेत तक्ता क्रमांक ३.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली होती. ( मुद्दा क्रमांक ३.११) सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

****

## ३.८ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ)उद्योग संचालनालय | | | | |
| १ | उद्योग निरीक्षक (गट क) | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रू.३५४००-११२००० | एस-१४ रू.३८६००-१२२८०० |
| २ | अधिक्षक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रू.३५४००-११२००० | एस-१४ रू.३८६००-१२२८०० |
| | ब) मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय | | | | |
| ३ | अंतर्गत प्रशिक्षण अधिकारी/उपव्यवस्थापक/व्यवस्थापक (लहान मुद्रणालय) | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रू. ४४९००-१४२४०० | एस-२० रू.५६१००-१७७५०० |
| ४ | आस्थापना अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रू.४१८००-१३२३०० | एस-१७ रू.४७६००-१५११०० |
| ५ | कामगार कल्याण अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रू.४१८००-१३२३०० | एस-१७ रू.४७६००-१५११०० |
| ६ | यंत्र अभियंता | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रू.४१८००-१३२३०० | एस-१७ रू.४७६००-१५११०० |
| ७ | सहायक संचालक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रू.४१८००-१३२३०० | एस-१७ रू.४७६००-१५११०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | कला कार्य अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ९ | कार्यालय अधिक्षक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| १० | रद्दी ठसेकार | ५२००-२०२०० | १८०० | एस-५ रु.१८०००-५६९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० |
| | क) कामगार आयुक्त | | | | |
| ११ | सहायक कामगार आयुक्त गट-अ | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४९१००-१७७५०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| | ड)संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय | | | | |
| १२ | संचालक | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० |
| १३ | अपर संचालक | १५६००-३९१०० | ८९०० | एस-२४ रु.७११००-२११९०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| १४ | सह संचालक | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२४ रु.७११००-२११९०० |
| १५ | उप संचालक | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| १६ | सहायक संचालक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| | ड) मुख्य विद्युत निरीक्षक (निरीक्षण व शुल्क शाखा) | | | | |
| १७ | सहायक अभियंता श्रेणी-२ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | शाखा अभियंता | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु. ४४९००-१४२४०० |
| १९ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| | **फ) औद्योगिक न्यायालय** | | | | |
| २० | प्रबंधक/ अपर प्रबंधक/उपप्रबंधक/ क.अ. अधिकारी/ तसेच सचिव/सह सचिव (वर्ग-२) | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१९ रु.५५१००-१७५१०० |

**अ) उद्योग संचालनालय**

**१.उद्योग निरीक्षक (गट-क)**

संघटनेची मागणी :- उद्योग निरीक्षक, गट क संवर्गाची कर्तव्ये व जबाबदारी लक्षात घेता उद्योग निरीक्षक गट-क या संवर्गाची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार एस-१३ ऐवजी एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- उद्योग निरीक्षक गट-क संवर्गाची कर्तव्ये व जबाबदारी लक्षात घेता उद्योग निरीक्षक गट-क या संवर्गाची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार एस-१४ अशी सुधारित करण्यात यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय/लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**२. अधिक्षक :-**

संघटनेची मागणी :- उद्योग संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयातील प्रशासकीय जबाबदारी पार पाडण्यात अधिक्षक या पदाचा मोठा वाटा असतो. मैत्री अधिनियम, २०२३ आणि उद्योग संचालनालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा आणि विविध योजना व त्यानुषंगाने अधिक्षक या पदाकडून पार पाडण्यात येणाऱ्या प्रशासकीय जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणात आहेत. विभागाच्या सुधारित आकृतीबंध शासन निर्णय दि.७.११.२०१९ अन्वये अधिक्षक व शाखा प्रमुख या दोन संवर्गाचे एकत्रिकरण करून अधिक्षक पदाची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रे.वे.४२०० असा एकच

संवर्ग करण्यात आला. तत्पूर्वी अधिक्षक पदाची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रे.वे.४३०० अशी होती. उद्योग संचालनालयातील अधिक्षक हे पद आणि राज्य शासनातील इतर अधिक्षकांची पदे यांची पात्रता या विषयी समानता असून वेतनश्रेणीमध्ये मात्र तफावत आढळून येते. अधिक्षक या पदास वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी वेतनश्रेणी एस-१४ ही लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- अधिक्षक गट-क पदावरील कर्मचाऱ्यास सदर पदावरील येणारी कुंठीतता लक्षात घेता सदर कर्मचारी आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देखील अधिक्षक गट-क पदावरील १० वर्षे पदावधी पूर्ण झाल्यानंतरच एस-१५ या वेतनश्रेणीतील लाभासाठी पात्र होतो. तसेच तिसरा लाभ मिळण्यास संचालनालयातील सर्व अधिक्षक संवर्गातील कर्मचारी पात्र होतीलच असे नाही. सबब, अधिक्षक गट-क संवर्गावर अन्याय होत असल्याबाबत संचालनालयाने नमूद केले आहे. या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या लक्षात घेता वेतनश्रेणी एस-१४ सुधारित करण्याकरिता, विनंती करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय/ लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**ब) मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय**

**३. अंतर्गत प्रशिक्षण अधिकारी/उपव्यवस्थापक/ व्यवस्थापक (लहान मुद्रणालय) :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- शासकीय मुद्रणालयामध्ये मुद्रण कामाची गोपनीयता राखणे, दर्जेदार छपाई, प्रतींच्या संख्येवर नियंत्रण, इत्यादी कामे पार पाडावी लागतात यासाठी मुद्रणालयात दोन पाळीत काम केले जाते. शासकीय मुद्रणालयातील छपाईचे महत्व मुद्रणसेवा हा शासनाच्या कामकाजाचा अविभाज्य घटक आहे. शासकीय छपाईची कामे, प्रमाण नमुन्याचे मुद्रण, आकारणी तत्वावरील लेखन सामग्रीचा पुरवठा, शासकीय प्रकाशनांची विक्री, राजपत्रामध्ये अधिसूचना छपाई इत्यादी बाबींमध्ये विभागाला तसेच शासनाला महसूल प्राप्त होतो. सदर बाबी विचारात घेता अंतर्गत प्रशिक्षण अधिकारी या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१६ ऐवजी वेतनश्रेणी एस-२० लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- निम्न संवर्गातील पदांची वेतनश्रेणी व सदर पदांची वेतनश्रेणी समान आहे. तथापि, कर्तव्य व जबाबदाऱ्या भिन्न असून सदर पदांच्या जबाबदाऱ्यांमध्ये वाढ आहे. सबब, त्यामुळे वेतनत्रुटी झाली असून, सदर पदांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- प्रस्तुत संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सहायक व्यवस्थापक या संवर्गातून पदोन्नती दिली जाते. सहायक व्यवस्थापक या संवर्गास ७व्या वेतन

आयोगात एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी मंजुर करण्यात आली आहे. वास्तव पदोन्नतीच्या पदास यापेक्षा पुढील वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, अंतर्गत प्रशिक्षण अधिकारी/उपव्यवस्थापक/ व्यवस्थापक (लहान मुद्रणालय) या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४.आस्थापना अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- आस्थापना अधिकारी व सहायक संचालक या पदावरील अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज पार पाडावे लागते. तसेच सदरहू पदे एकाकी असून या पदांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. वास्तव आस्थापना अधिकारी या पदास वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी वेतनश्रेणी एस- १७ लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- आस्थापना अधिकारी व सहायक संचालक या पदावरील अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज पार पाडावे लागते. तसेच सदरहू पदे एकाकी असून या पदांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. त्यामुळे या पदांची सुधारित वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

५.कामगार कल्याण अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u> :- कामगार कल्याण अधिकारी हे एकाकी पद आहे. सदर पदाला पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. यापदास वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी वेतनश्रेणी एस-१७ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदरहू पद एकाकी असून या पदाला पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. त्यामुळे या पदांची सुधारित वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

६.यंत्र अभियंता :-

<u>संघटनेची मागणी</u> :- यंत्र अभियंता हे एकाकी पद आहे. सदर पदाला पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. यंत्र अभियंता या पदास वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी वेतनश्रेणी एस-१७ लागु करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदरहू पद एकाकी असून या पदाला पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. त्यामुळे या पदांची सुधारित वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**७.सहायक संचालक :-**

**संघटनेची मागणी :-** सहायक संचालक हे एकाकी पद आहे. सदर पदाला पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. सहायक संचालक या पदास वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी वेतनश्रेणी एस-१७ लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सहायक संचालक या पदावरील अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज पार पाडावे लागते. तसेच सदरहू पद एकाकी असून या पदांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. त्यामुळे या पदांची सुधारित वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**८.कला कार्याधिकारी :-**

**संघटनेची मागणी :-** कला कार्याधिकारी हे एकाकी पद आहे. सदर पदाला पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही . सबब, या पदास वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी वेतनश्रेणी एस-१७ लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** कला कार्याधिकारी या पदावरील अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज पार पाडावे लागते. तसेच सदरहू पद एकाकी असून या पदाला पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. त्यामुळे या पदाची सुधारित वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**९.कार्यालय अधिक्षक :-**

**संघटनेची मागणी :-** लेखा व कोषागारे संचालनालयातील सहायक लेखा अधिकारी या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि कार्यालय अधीक्षक या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ह्या सारख्याच आहेत. मात्र सहायक लेखा अधिकारी संवर्गाची वेतनश्रेणी तुलनेने अधिक आहे. सबब, कार्यालय अधिक्षक या पदास वेतनश्रेणी एस-१४ ऐवजी वेतनश्रेणी एस-१५ लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** लेखा व कोषागारे संचालनालयातील सहायक लेखा अधिकारी या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि कार्यालय अधीक्षक या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ह्या

सारख्याच आहेत. मात्र सहायक लेखा अधिकारी संवर्गाची वेतनश्रेणी तुलनेने अधिक आहे. सदर पदाच्या कामाचे स्वरुप, कार्यभार तसेच पदोन्नती टप्पे लक्षात घेता वेतनश्रेणीत सुधारणा करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१०.रबरी ठसेकार :-

संघटनेची मागणी :- सदरहू पद तांत्रिक असून एकाकी पद आहे. या पदास पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. रबरी ठसेकार या पदास वेतनश्रेणी एस-५ ऐवजी वेतनश्रेणी एस-६ लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदरहू पद तांत्रिक असून एकाकी पद आहे. या पदास पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. सदर पदाच्या कामाचे स्वरुप, कार्यभार लक्षात घेता सुधारित वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या, ५ व्या व ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

क) कामगार आयुक्त

११.सहायक कामगार आयुक्त गट-अ :-

संघटनेची मागणी :- कामगार आयुक्त कार्यालयात वर्ग-१/ गट-अ दर्जाच्या पदाची वेतनश्रेणी म्हणजेच एस-२० अस्तित्वात नाही. सहायक कामगार आयुक्त यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या, सदर पदाला असलेले अर्धन्यायिक अधिकार, तसेच या पदाशी समतुल्य असणाऱ्या केंद्र शासनाच्या श्रम विभागातील सहायक कामगार आयुक्त या पदाची वेतनश्रेणी विचारात घेता,सहायक कामगार आयुक्त गट- अ या पदास वेतनश्रेणी एस १८ ऐवजी वेतनश्रेणी एस-२० लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सहायक कामगार आयुक्त यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या, सदर पदाला असलेले अर्धन्यायिक अधिकार, तसेच या पदाशी समतुल्य असणाऱ्या केंद्र शासनाच्या श्रम विभागातील सहायक कामगार आयुक्त या पदाची वेतनश्रेणी विचारात घेता, कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, या संवर्गास एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ज्या संवर्गाचा समावेश आहे त्या संवर्गांना एकसमान वेतनश्रेणी नसून विविध वेतनश्रेणी (एस-१८ ते एस-२३) आहेत. सामान्य

प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६.०३.२०२४ अन्वये वेतनश्रेणींच्या आधारे पदांचे गटनिहाय वर्गीकरण करण्यात येऊ नये असा निर्णय झाला आहे. प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

ड) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

१२. संचालक :-

संघटनेची मागणी :- राज्याचे प्रमुख असलेले संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांना समकक्ष असलेल्या इतर विभागाच्या पदांपेक्षा कमी वेतनश्रेणी आहे. कामाचे स्वरुप पाहता संचालक पदाचे वेतनस्तर एस-२५ रू.७८८००-२०९२०० ऐवजी एस-२७ रू.१२३१००-२१५९००देण्यात येऊन वेतन स्तरातील विसंगती दूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील संचालक या संवर्गाला एस-२५ ऐवजी एस-२७ ही वेतनश्रेणी लागू करणे उचित होईल.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, ४ थ्या वेतन आयोगामध्ये प्रस्तुत संवर्गाला उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ५व्या, ६व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१३.अपर संचालक :-

संघटनेची मागणी :- अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य आणि सह संचालक, उद्योग संचालनालय ही दोन्ही क्षेत्रीय प्रमुख असून या पदाची कार्य व जबाबदारी समान आहेत. मात्र दोनही पदाच्या वेतन स्तरामध्ये फरक आहे. तरी अपर संचालक पदाचे वेतनस्तर एस-२४ रू.६७७००-२११९०० ऐवजी एस-२५ रु. ७८८००-२०९२०० देण्यात येऊन वेतन स्तरातील विसंगती दूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील अपर संचालक या संवर्गाला एस-२४ ऐवजी एस-२५ ही वेतनश्रेणी लागू करणे उचित होईल.

समितीची शिफारस :- प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१४.सह संचालक :-

संघटनेची मागणी :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील सह संचालक या पदाचे उद्योग अधिक्षकीय अधिकारी, उदयोग संचालनालय यांच्याशी तुलना केली असता सह संचालक या पदाची कामाची व्याप्ती अधिक आहे. तरी, सहसंचालक पदाचे वेतनस्तर एस-२३ रु. ६७७००-

२०८७०० ऐवजी एस २४ रु.७११००-२११९०० देण्यात येऊन वेतन स्तरातील विसंगती दूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील सह संचालक या संवर्गाला एस-२३ ऐवजी एस-२४ ही वेतनश्रेणी लागू करणे उचित होईल.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, ४ थ्या वेतन आयोगामध्ये प्रस्तुत संवर्गाला उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ५व्या , ६व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**१५.उप संचालक :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील उप संचालक या पदाचे उप संचालक, उदयोग संचालनालय शैक्षणिक अर्हता आणि अनुभव यांच्याशी तुलना केली असता उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य या पदाकरिता, ७ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. तरी, उपसंचालक पदाचे वेतनस्तर एस-२० रु.५६१००-१७७५०० ऐवजी एस-२३ रु.६७७००-२०८७०० देण्यात येऊन वेतन स्तरातील विसंगती दूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील उप संचालक या संवर्गाला एस-२० ऐवजी एस-२३ ही वेतनश्रेणी लागू करणे उचित होईल.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, ४ थ्या वेतन आयोगामध्ये प्रस्तुत संवर्गाला उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ५व्या , ६व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**१६.सहायक संचालक :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- कामाचे स्वरूप पाहता संचालक पदाचे वेतनस्तर एस-१५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस-२० रु.५६१००-१७७५०० देण्यात येऊन वेतन स्तरातील विसंगती दूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील सहायक संचालक या संवर्गाला एस-१५ ऐवजी एस-२० ही वेतनश्रेणी लागू करणे उचित होईल.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेलेनाही. तथापि, ४ थ्या वेतन आयोगामध्ये प्रस्तुत संवर्गाला उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर वेतनश्रेणीशी

समकक्ष वेतनश्रेणी ५व्या , ६व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

ड) मुख्य विद्युत निरीक्षक (निरीक्षण व शुल्क शाखा)

१७.सहायक अभियंता श्रेणी -२:-

<u>संघटनेची मागणी</u>:- ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या आस्थापनेवरील सहायक अभियंता श्रेणी-२ या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, व मृद व जलसंधारण विभाग या विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्याप्रमाणे राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शासन निर्णय दि.१३.२.२०२३ प्रमाणे एस-१५ ऐवजी एस-१६ ही सुधारित वेतनसंरचना वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वित्त विभागाच्या दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड २ मधील वेतनश्रेण्या व अनुषंगिक शिफारशी ऊर्जा विभागाच्या आस्थापनेवरील प्रस्तुत पदांना लागू करण्याची विनंती राज्यवेतन त्रुटी निवारण समितीस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिपत्याखालील ऊर्जा विभागातील सहायक अभियंता श्रेणी-२ या पदाची वेतनश्रेणी व सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता श्रेणी-२ या पदाची वेतनश्रेणी ४ थ्या वेतन आयोगापासुन ७ व्या वेतन आयोगापर्यंत समान होती. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील प्रस्तुत संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. यास्तव उद्योग ऊर्जा कामगार विभागाच्या अधिपत्याखालील ऊर्जा विभागातील सहायक अभियंता श्रेणी-२ या संवर्गास एस-१५ रु. ४१८००-१३२३०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१८.शाखा अभियंता :-

<u>संघटनेची मागणी</u> :- ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या आस्थापनेवरील शाखा अभियंता या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, व मृद व जलसंधारण विभाग या विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्याप्रमाणे राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शासन निर्णय दि.१३.२.२०२३ प्रमाणे एस-१५ ऐवजी एस-१६ ही सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वित्त विभागाच्या दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड २ मधील वेतनश्रेण्या व

अनुषंगिक शिफारशी ऊर्जा विभागाच्या आस्थापनेवरील प्रस्तुत पदांना लागू करण्याची विनंती राज्यवेतन त्रुटी निवारण समितीस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिपत्याखालील ऊर्जा विभागातील शाखा अभियंता या पदाची वेतनश्रेणी व सार्वजनिक बांधकाम विभागातील शाखा अभियंता या पदाची वेतनश्रेणी ४थ्या वेतन आयोगापासुन ७ व्या वेतन आयोगापर्यंत समान होती. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील प्रस्तुत संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. वास्तव उद्योग ऊर्जा कामगार विभागाच्या अधिपत्याखालील ऊर्जा विभागातील शाखा अभियंता ह्या संवर्गास एस-१५ रु. ४१८००-१३२३०० ऐवजी एस -१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९.कनिष्ठ अभियंता :-

<u>संघटनेची मागणी</u> :- ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, व मृद व जलसंधारण विभाग या विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्याप्रमाणे राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शासन निर्णय दि.१३.२.२०२३ प्रमाणे एस-१४ ऐवजी एस-१५ ही सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वित्त विभागाच्या दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवाल खंड २ मधील वेतनश्रेण्या व अनुषंगिक शिफारशी ऊर्जा विभागाच्या आस्थापनेवरील प्रस्तुत पदांना लागू करण्याची विनंती राज्यवेतन त्रुटी निवारण समितीस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- उदयोग ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिपत्याखालील ऊर्जा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाची वेतनश्रेणी व सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाची वेतनश्रेणी ४ थ्या वेतन आयोगापासून ७ व्या वेतन आयोगापर्यंत समान होती. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील प्रस्तुत संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासननिर्णयान्वये एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. वास्तव उदयोग ऊर्जा कामगार विभागाच्या अधिपत्याखालील ऊर्जा विभागातील कनिष्ठ अभियंता या संवर्गास एस-१४ रु.३८६००-१२२८०० ऐवजी एस-१५ रु.४१८००-१३२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

क) औद्योगिक न्यायालय

२०.प्रबंधक/ अपर प्रबंधक/उपप्रबंधक/ क.अ. अधिकारी/ तसेच सचिव/सह सचिव (वर्ग-२) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- प्रबंधक, जिल्हा न्यायालय आणि औद्योगिक व कामगार न्यायालय, कर्मचारी भरपाई आयुक्त कार्यालय, वेतन मंडळे , मुंबई या कार्यालयांच्या आस्थापनेवर असलेली उपप्रबंधक व कनिष्ठ अन्वेषक अधिकारी (औद्योगिक न्यायालये) सचिव व सह -सचिव (कामगार न्यायालये/वेतन मंडळ) प्रबंधक व अप्पर प्रबंधक (कर्मचारी भरपाई आयुक्त, मुंबई) ही पदे समकक्ष असून त्यांची वेतनश्रेणी देखील समान आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार प्रबंधक, जिल्हा न्यायालय या पदास मा.शेट्टी आयोगानुसार ५व्या वेतन आयोगानुसार देण्यात आलेली रु.८०००-२७५-१३५०० व सहाव्या वेतन आयोगानुसार रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५०००/- अशी सुधारित वेतनश्रेणी औद्योगिक व कामगार न्यायालय, श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय व वेतन मंडळे मुंबई या आस्थापनेवरील प्रबंधक/अपर प्रबंधक इ. पदांना लागू करण्यात यावी. सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-१६ ऐवजी एस-१९ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर पदांना निम्न असलेल्या सहायक प्रबंधक या पदास व सदर पदांस सातव्या वेतन आयोगामध्ये एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यामुळे वरिष्ठ पदावर पदोन्नती दिली तरी वेतनामध्ये कोणताही फरक आढळून येत नाही. तसेच शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार जिल्हा न्यायालयातील प्रबंधक या पदाला एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. तरी, वस्तुस्थिती विचारात घेता सदर पदांना एस-१९ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या शासन निर्णय, दिनांक २०.०५.२०१६ अन्वये औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई येथील न्यायालयीन कर्मचारी यांना मा. शेट्टी आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या आहेत. शेट्टी आयोगाच्या शिफारशीमध्ये बदल करण्याचे अधिकार या समितीच्या कार्यक्षेत्रात येत नाही. सदर शासन निर्णयानुसार वेतनश्रेणी वाढ करताना प्रबंधक/अपर प्रबंधक, (श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय), उपप्रबंधक /अन्वेषण अधिकारी (औद्योगिक न्यायालय मुंबई), सचिव/सह सचिव (कामगार न्यायालय/वेतनमंडळे), सहायक प्रबंधक औद्योगिक न्यायालय, सहायक प्रबंधक, अराजपत्रित (श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय) यांची ५ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी रु.६५००-१०५०० सुधारून ती रु.७४५०-११०५० अशी करण्यात आली आहे. सदर वेतनश्रेणीशी अनुरूप वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात एस-१६ रु. ४४९००-१४२४०० मंजूर करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

*****

## ३.९ विधि व न्याय विभाग

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ)उच्च न्यायालय, मुंबई | | | | |
| १ | वाहनचालक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | आश्वासित प्रगती योजना लाभ |
| | ब) जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय (ग्रामीण) | | | | |
| २ | पुस्तक बांधणीकार | ५२००-२०२००<br>५२००-२०२०० | १९००<br>१८०० | एस-६ रु.१९९००-६३२००<br>एस-५ रु.१८०००-५६९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० |
| | क) कौटुंबिक न्यायालय | | | | |
| ३ | विवाह समुपदेशक | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२६ रु.८२२००-२११५०० |
| | ड) धर्मादाय आयुक्त | | | | |
| ४ | धर्मादाय सह आयुक्त (गट अ) | १५६००-३९१०० | ७६०० | एस २५ रु. ७८८००-२०९२०० | एस २७ रु.१२३१००-२१५९००(२५% अधिक त्यांना निवडश्रेणी वेतनस्तर लागू करणेबाबत) |
| ५ | सहायक धर्मादाय आयुक्त (गट अ) | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु. ४९१०० - १५५८०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | प्रशासकीय अधिकारी गट-ब | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ७ | अधिक्षक (गट-ब) | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस १७- रु.४७६००-१५११०० |
| ८ | निरीक्षक (गट-क) | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| | **इ) निबंधक भागिदारी संस्था** | | | | |
| ९ | सहायक निबंधक (गट-ब) | ९३००-३४८०० | ४४०० | एस १५ रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| | **ई) विधि व न्याय विभाग, मंत्रालय (खुद्द)** | | | | |
| १० | विधि सल्लागार नि-सह सचिव | ३७४००-६७००० | ८७०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| ११ | सॉलिसिटर नि-सह सचिव | ३७४००-६७००० | ८७०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| १२ | सह सचिव (विधि) | ३७४००-६७००० | ८७०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| १३ | उप विधि सल्लागार-नि-उप सचिव | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| १४ | उप सचिव (विधि) | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| १५ | सॉलिसिटर (मु.वि.)-नि-उप सचिव | १५६००-३९१०० | ७६०० | एस २५ रु.७८८००-२०९२०० | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| १६ | सहायक सॉलिसिटर-नि- | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु.७८८००- | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उप सचिव | | | २०९२०० | |
| १७ | सहायक विधि सल्लागार-नि-अवर सचिव | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| १८ | अवर सचिव (विधि) | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| १९ | अधिक्षक (विधि) | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० तसेच विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| २० | सहायक (विधि) | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० तसेच विशेष वेतन मंजूर करणेबाबत |
| | फ) महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण | | | | |
| २१ | अधिक्षक (विधि) | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० (४ वर्षानंतर) |
| २२ | कक्ष अधिकारी/ आस्थापना अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० एस-२० रु.५६१००-१७७५०० (४ वर्षानंतर) |

अ)उच्च न्यायालय, मुंबई

१.वाहनचालक:-

<u>संघटनेची मागणी:-</u> १२ वर्षानंतर वरिष्ठ वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे. पे. ४२०० व २४ वर्षानंतरची वरिष्ठ वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रे. पे. ५४०० अशी मिळणे अपेक्षित आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- मुंबई उच्च न्यायालयातील वाहन चालकांना आश्वासित प्रगती योजनेचा १०/२०/३० नुसार मिळणारा लाभ यामधील वेतनश्रेणीमध्ये योग्य ती सुधारणा करुन त्यानुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- उच्च न्यायालय, मुंबई येथील वाहनचालक संवर्गाची मागणी ही आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत एस-१३ व एस-२० वेतनश्रेणी लागू करण्याबाबत आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१९ अन्वये ७व्या वेतन आयोगांतर्गत आश्वासित प्रगतीयोजना लागू करण्यासंबंधी तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत. हा शासनाचा

धोरणात्मक निर्णय असल्यामुळे शासनातील सर्वच संवर्गांना या तरतुदी बंधनकारक आहेत. प्रस्तुत संवर्गाची मागणी योजनेअंतर्गत तरतुदीपेक्षा भिन्न आहे. प्रसंगतः असेही निदर्शनास आणण्यात येत की, वाहनचालक हा गट-क मधील एकाकी संवर्ग आहे तर, त्यांनी मागणी केलेली वेतनश्रेणी अनुक्रमे गट-ब (अराजपत्रित) व गट-अ (राजपत्रित) या संवर्गांना विहित करण्यात येते. यास्तव सदर मागणी न्यायसंगत आढळत नाही. सदर बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही. ।

ब) जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय (ग्रामीण):-

२.पुस्तक बांधणीकार :-

संघटनेची मागणी:- पुस्तक बांधणीकार या संवर्गाला माननीय शेट्टी आयोगाच्या लागू झालेल्या दिनांकापासून किंवा ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस -६ रु. १९९००-६३२०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- पुस्तक बांधणीकार या पदनामाचे एकूण ३ संवर्ग आढळून येतात. त्यापैकी २ संवर्गपदे गट-क व ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी अनुक्रमे एस-६ तसेच १ संवर्गपद गट-ड ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-५ अशी आहेत. तीनही संवर्गपदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. त्यामुळे उक्त नमूद केलेल्या तीनही संवर्गाचे पुस्तक बांधणीकार गट-क ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-६ समायोजित करणे योग्य होईल.

समितीची शिफारस :- सदर संवर्गाची वेतनश्रेणी समान करणे ही बाब वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही. पुस्तक बांधणीकार या पदनामाचे एकूण ३ संवर्ग आढळून येतात. त्यापैकी २ संवर्ग पद गट-क व ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी अनुक्रमे एस-६ तसेच १ संवर्गपद गट-ड सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-५ अशी आहेत. तीनही संवर्गपदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. यास्तव, समान जबाबदारीच्या पदांचा योग्य आढावा घेऊन आकृतीबंध अंतिम करताना पुस्तक बांधणीकार या पदाच्या अनुषंगाने विधि व न्याय विभागाने सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सल्ल्याने निर्णय घेणे योग्य राहील.

ब) कौटुंबिक न्यायालय

३. विवाह समुपदेशक :-

संघटनेची मागणी:- शासन अधिसूचना दिनांक ०३.०५.२०१९ अन्वये कौटुंबिक न्यायालयाच्या प्रबंधक या प्रशासकीय पदाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली असून विवाह समुपदेशक या वैधानिक पदाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आलेली नाही. ४ थ्या, ५ व्या आणि ६ व्या वेतन आयोगामध्ये प्रबंधक या पदाची वेतनश्रेणी विवाह समुपदेशक या पदापेक्षा कमी होती. तथापि, ७ व्या वेतन आयोगामध्ये उपरोक्त नमूद दोन्ही संवर्गांची वेतनश्रेणी समान झाली असून विवाह समुपदेशक या पदाच्या वेतनश्रेणीत कोणताही बदल नाही. सबब, प्रस्तुत संवर्गाच्या (वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५००) ऐवजी एस-२६ रु.७८८००-२११५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- कौटुंबिक न्यायालयातील विवाह समुपदेशक, गट-अ एस-२० या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२६ अशी सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** कौटुंबिक न्यायालयातील प्रबंधक या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये बदल झाल्यामुळे प्रबंधक व विवाह समुपदेशक या दोन्ही संवर्गाची वेतनश्रेणी समान झाली आहे. विवाह समुपदेशक या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच कौटुंबिक न्यायालयाअंतर्गत प्रस्तुत संवर्ग सुरुवातीपासूनच प्रबंधक संवर्गापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी घेत आहे. शेट्टी समिती न्यायेत्तर संवर्गाला सुद्धा लागू झाली असल्यामुळे प्रबंधक यांची वेतनश्रेणी समुपदेशक पेक्षा जास्त झाली आहे. सदर बाब विचारात घेता प्रस्तुत संवर्गास अधिक वेतनश्रेणी मंजूर करणे उचित होईल. वास्तव सदर संवर्गाला एस-२० रु.५६१००-१७७५०० ऐवजी एस-२३ रु.६७७००-२०८७०० ही वेतनश्रेणी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

क) धर्मादाय आयुक्त

४. धर्मादाय सह आयुक्त (गट अ) :-

**संघटनेची मागणी :-** धर्मादाय सह आयुक्त, गट-अ ( वेतनश्रेणी एस-२५ रु. ७८८००-२०९२००) या संवर्गाच्या मंजूर पदसंख्येच्या २० टक्के अधिकाऱ्यांना, सदर संवर्गात ५ वर्षांच्या सलग व नियमित सवेनंतर एस-२७ रु. १२३१००-२१५९००हा निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यात यावा.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** धर्मादाय संघटनेतील धर्मादाय सह आयुक्त संवर्गातून वरिष्ठ संवर्गात पदोन्नती नसल्यामुळे, तेथे निश्चितच कुंठितता आहे तसेच धर्मादाय संघटनेच्या कार्यालयांतील वेतन व वेतनेतर बाबींवर झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती सार्वजनिक न्यास प्रशासन निधीच्या अंशदानामधून करण्यात येते. त्यामुळे वरिष्ठ वेतनस्तर लागू केल्यास, वाढीव वेतनावरील खर्चाचा भार शासनावर पडणार नाही. धर्मादाय सह आयुक्त, गट अ ( वेतनश्रेणी एस-२५ रु. ७८८००-२०९२००) या संवर्गाच्या मंजूर पदसंख्येच्या २० टक्के अधिकाऱ्यांना, सदर संवर्गात ५ वर्षाच्या सलग व नियमित सवेनंतर एस-२७ रु. १२३१००-२१५९००हा निवडश्रेणी वेतनस्तर लागू करणे संयुक्तिक होईल असे विभागाचे स्पष्ट मत आहे.

**समितीची शिफारस** :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ नुसार एस-२० ते एस-२६ वेतनस्तर लागू असणाऱ्या संवर्गानाच निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्याचे निदेश आहेत. धर्मादाय सह आयुक्त-गट-अ (सध्याची वेतनश्रेणी एस-२५) या संवर्गाला यापुढे पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ मध्ये अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत. तथापि, ज्या संवर्गाना पुढील पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही, अशा संवर्गाना उपरोक्त शासन निर्णयातील "नमूद केलेले वेतनश्रेणी / वेतनस्तर आणि पदोन्नतीच्या पदाचा वेतनस्तर यापैकी जो वेतनस्तर कमी असेल तो वेतनस्तर निवडश्रेणी वेतनस्तर म्हणून मंजूर करण्यात यावा." ही अट शिथिल करुन विहित निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यात यावा. प्रस्तुत संवर्गास वेतनश्रेणी एस-२७ रु.१२३१००-२१५९००ही वेतनश्रेणी निवडश्रेणी म्हणून लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. सहायक धर्मादाय आयुक्त (गट अ) :-

**संघटनेची मागणी:-** धर्मादाय संघटनेतील सहायक धर्मादाय आयुक्त ( वेतनश्रेणी एस-१८ रु. ४९१००-१५५८००) या पदाची वेतनश्रेणी राज्यातील इतर वर्ग-१ अधिकारी असणाऱ्या (उदा. Civil

Judge Junior Division, Assistant Director of Accounts, Suptnd. of land records ) या एस-२० रु. ५६१००-१७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सहायक संचालक (लेखा) यांचे कामकाज हे सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याशी समतुल्य आहे. परंतु, त्यांच्या वेतनापेक्षा सहायक धर्मादाय आयुक्त यांचे वेतन कमी असल्याचे दिसून येते. तसेच, राज्य शासनाच्या इतर विभागातील 'सहायक आयुक्त' हे पदनाम (उदा.- सहायक राज्यकर आयुक्त, सहायक पोलीस आयुक्त, सहायक आयुक्त (अन्न), सहायक आयुक्त (औषधे), इ.) असलेल्या समकक्ष पदांना तसे इतर समकक्ष पदांना (उदा- सहायक लेखा संचालक, अधीक्षक (भूमी अभिलेख), अधीक्षक, तुरुंग उद्योग, इ.) एस २० रु. ५६१००-१७७५०० ही वेतनश्रेणी लागू आहे. या तुलनेत, सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता, या पदास लागू असलेली एस-१८ रु. ४९१००-१५५८०० ही वेतनश्रेणी निश्चितच कमी असल्याचे दिसून येते. धर्मादाय संघटनेच्या कार्यालयांतील वेतन व वेतनेतर बाबींवर झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती सार्वजनिक न्यास प्रशासन निधीच्या अंशदानामधून करण्यात असल्यामुळे, सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२० रु. ५६१००- १७७५०० अशी सुधारणा केल्यास वाढीव वेतनातील खर्चाचा भार शासनावर पडणार नाही. सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ (वेतनश्रेणी एस-१८ रु. ४९१००-१५५८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२० रु. ५६१००-१७७५०० अशी सुधारणा करणे उचित राहील.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला संघटनेने नमूद केलेल्या संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रसंगत: नमूद करण्यात येते की, शासनातील सर्वच गट-अ संवर्गांना एस-२० ही वेतनश्रेणी लागू आहे ही वस्तुस्थिती नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

६. प्रशासकीय अधिकारी गट-ब :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनाच्या इतर विभागातील प्रशासकीय अधिकारी (उदा. इलेक्ट्रॉनिकस आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, गृह कल्याण केंद्र) तसेच राज्य शासनाच्या इतर विभागातील प्रशासकीय अधिकारी (उदा. मंत्रालय उपहारगृह, शिक्षण संचालनालय, भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालय इ.) यांच्या वेतनश्रेणीप्रमाणे धर्मादाय आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी गट-ब राजपत्रित या पदाला एस-१५ ऐवजी एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> धर्मादाय संघटनेतील प्रशासकीय अधिकारी, राज्य शासनाच्या इतर विभागातील प्रशासकीय अधिकारी आणि केंद्र शासनाच्या इतर विभागातील प्रशासकीय अधिकारी यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या या सारख्याच म्हणजे प्रशासकीय स्वरुपाच्याच आहेत. तथापि, धर्मादाय संघटनेतील प्रशासकीय अधिकारी यांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी राज्य शासनाच्या इतर विभागातील प्रशासकीय अधिकारी यांच्या वेतनश्रेणींशी तुलना करता त्याप्रमाणात खूप कमी आहे. भारतीय राज्य घटनेतील Equal pay for equal work हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा मुलभूत हक्क आहे. त्यामुळे धर्मादाय संघटनेतील प्रशासकीय अधिकारी

यांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी/तफावत दूर होणे आवश्यक आहे. धर्मादाय संघटनेतील सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच इतर सर्व खर्च महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत असलेल्या सार्वजनिक न्यास प्रशासन निधीतुन भागवला जातो. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी पदाच्या वेतनश्रेणीत ७ व्या वेतन आयोगानुसार एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारणा केल्यास राज्य शासनाच्या तिजोरीवर कसलाही भार पडणार नाही.

**<u>समितीची शिफारस :-</u>** प्रशासकीय अधिकारी हा संवर्ग शासन निर्णय, दिनांक १४.०३.२०१२ अन्वये नव्याने निर्माण करण्यात आला असून, सेवाप्रवेश नियम दिनांक ०२.०१.२०२४ रोजीच्या अधिसूचनेअन्वये नुकतेच अस्तित्वात आले आहेत. तसेच दिनांक २०.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली असून, प्रशासकीय अधिकारी या संवर्गास एस-१५ ही वेतनश्रेणी दर्शविण्यात आली आहे. विभागाने या शासन निर्णयानंतर कोणतेही नवीन तथ्य सादर केलेले नाही. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही. -

**७. अधिक्षक (गट-क) :-**

**<u>संघटनेची मागणी:-</u>** केंद्र शासनाच्या डाक विभागातील सहायक डाक अधिक्षक संवर्ग पदाच्या वेतनश्रेणीप्रमाणे अधीक्षक (वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-११२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ रु. ४७६००-१५११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>** :- धर्मादाय संघटनेतील अधीक्षक यांची शैक्षणिक पात्रता पदव्युत्तर पदवी ही असून त्यांची कर्तव्य व जबाबदारी प्रशासकीय व अर्धन्यायिक स्वरुपाची आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या डाक विभागातील सहायक डाक अधिक्षक पदाच्या वेतनश्रेणीचा, शैक्षणिक पात्रतेचा तुलनात्मक अभ्यास केल्यास धर्मादाय संघटनेतील अधीक्षक या पदाची वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६०० -११२८०० ही वेतनश्रेणी निश्चितच कमी असल्याचे दिसून येते. धर्मादाय संघटनेतील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच इतर सर्व खर्च महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत असलेल्या सार्वजनिक न्यास प्रशासन निधीतुन भागवला जातो. त्यामुळे अधिक्षक पदाच्या वेतनश्रेणीत ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारणा केल्यास राज्य शासनाच्या तिजोरीवर कसलाही भार पडणार नाही. त्यामुळे डाक विभागातील सहायक डाक अधिक्षक संवर्ग पदाच्या वेतनश्रेणीप्रमाणे धर्मादाय संघटनेतील अधिक्षक पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ रु. ४७६००-१५११०० अशी सुधारणा करणे उचित राहील.

**<u>समितीची शिफारस :-</u>** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला संघटनेने नमूद केलेल्या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. विधि व न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक २०.१२.२०२२ नुसार धर्मादाय आयुक्त कार्यालयांच्या पदांच्या सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार जनसंपर्क अधिकारी व अधिक्षक या पदांचा अधिक्षक हा एकच संवर्ग करण्यात आला आहे. तसेच या संवर्गातून पदोन्नतीचे दोन मार्ग उपलब्ध आहेत. अ) सहायक धर्मादाय आयुक्त – विधि पदवीधर , विभागीय परीक्षा, ५ वर्षाचा अनुभव इ. ब) प्रशासकीय अधिकारी– कोणतीही पदवी. अधिक्षक या संवर्गाचे पदोन्नतीचे पद प्रशासकीय अधिकारी या

पदाची वेतनश्रेणी एस-१५ आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

८. निरीक्षक (गट-क) :-

<u>संघटनेची मागणी:-</u> धर्मादाय संघटनेतील निरीक्षक ( वेतनश्रेणी एस-१३ रु. ३५४००-११२४००) पदास केंद्र शासनाच्या आयकर विभागातील आयकर निरीक्षक व डाक विभागातील डाक निरीक्षक यांच्या सहाव्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेणी असणाऱ्या पदाच्या वेतनश्रेणीप्रमाणे एस-१६ रु. ४४९००-१४२४०० हा वेतनस्तर लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-</u> धर्मादाय संघटनेतील निरीक्षक व केंद्र शासनाच्या आयकर निरीक्षक व डाक निरीक्षक पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या समांतर असल्याचे दिसते. सदर पदाच्या वेतनश्रेणीत सुधारणा केली तरी राज्य शासनाच्या तिजोरीवर कसलाही आर्थिक भार पडणार नाही. त्यामुळे धर्मादाय संघटनेतील निरीक्षक पदास एस-१६ रु. ४४९००-१४२४०० हा वेतनस्तर लागू करणे उचित राहील.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला संघटनेने नमूद केलेल्या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

ख) निबंधक, भागिदारी संस्था

९. सहायक निबंधक (गट-ब) :-

<u>संघटनेची मागणी:</u> भागिदारी संस्थेच्या आस्थापनेवरील सहायक निबंधक भागीदारी संस्था, गट ब (राजपत्रित) या पदास गट-अ चा दर्जा देऊन वेतनश्रेणी एस- १५ रु. ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणी ऐवजी ७ व्या वेतन आयोगातील गट- अ पदाची सुरुवातीची वेतनश्रेणी एस- २० रु. ५६१००-१७७५०० अशी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य या विभागांतर्गत सहायक निबंधक (वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) हे गट-ब (राजपत्रित) दर्जाचे पद आहे. निबंधक भागीदारी संस्थेच्या पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक कार्यालयात सदर पदास कार्यालय प्रमुखाचा दर्जा आहे. सदर पदाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व कामकाजाचा व्याप विचारात घेता, सदर पदास मंजूर वेतन निश्चितच कमी असल्याचे दिसून येते. तसेच, सहायक निबंधक भागीदारी संस्था, गट-ब (राजपत्रित) वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००- १३२३०० या पदावरुन उप निबंधक भागीदारी संस्था, गट-अ वेतनश्रेणी एस-२३ रु. ६७७००-२०८७०० या पदावर पदोन्नती देण्यात येते. सदर दोन पदांच्या वेतनस्तरामध्ये मोठी तफावत दिसून येते. उप निबंधक या संवर्गात केवळ १ पद मंजूर असून, सहायक निबंधक या निम्न संवर्गातील ७ अधिकाऱ्यांमधून केवळ १ अधिकाऱ्याची पदोन्नती होते. त्यामुळे, सहायक निबंधक या संवर्गाच्या

पदोन्नतीमध्ये देखील कुंठितता आहे. या बाबी विचारात घेता, सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची मागणी संयुक्तिक वाटते.

<u>समितीची शिफारस :-</u> सदर संवर्गासाठी मागणी केलेली वेतनश्रेणी ही त्रुटी नसून वाढीव वेतनश्रेणी मागणीची आहे. विधि व न्याय विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १३.१२.२०१९ नुसार निबंधक भागीदारी संस्था या कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार या संवर्गाची ७ पदे मंजूर आहेत. तसेच दिनांक २३.०९.२०२१ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले असून, त्यामध्ये या संवर्गास गट-ब (राजपत्रित) असा दर्जा दर्शविण्यात आला आहे. या संवर्गास ४ थ्या वेतन आयोगापासून लागू असलेल्या वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी वेळोवेळी मंजूर करण्यात आली आहे. प्रस्तुत, संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

**इ) विधि व न्याय विभाग, मंत्रालय (खुद्द) (विधि संवर्ग)**

**१०. विधि सल्लागार नि-सह सचिव :-**

<u>संघटनेची मागणी:-</u> शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये विधि व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील विधि संवर्गाचे अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि, विधि संवर्गाचे उर्वरित अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. सदर संवर्गाला ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

**११. सॉलिसिटर नि-सह सचिव :-**

<u>संघटनेची मागणी:-</u> शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये विधि व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील विधि संवर्गाचे अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि, विधि संवर्गाचे उर्वरित अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. सदर संवर्गाला ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

**१२. सह सचिव (विधि) :-**

<u>संघटनेची मागणी:-</u> शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये विधि व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील विधि संवर्गाचे अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि, विधि संवर्गाचे उर्वरित अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. सदर संवर्गाला ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

१३. उप विधि सल्लागार-नि-उप सचिव :-

संघटनेची मागणी :- शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये विधि व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील विधि संवर्गाचे अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि, विधि संवर्गाचे उर्वरित अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. सदर संवर्गाला ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

१४. उप सचिव (विधि) :-

संघटनेची मागणी:- शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये विधि व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील विधि संवर्गाचे अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि, विधि संवर्गाचे उर्वरित अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. सदर संवर्गाला ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

१५. सॉलिसिटर (मु.वि.) -नि-उप सचिव :-

संघटनेची मागणी:- शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये विधि व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील विधि संवर्गाचे अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि, विधि संवर्गाचे उर्वरित अधिकारी यांना विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. सदर संवर्गाला ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

१६. सहायक सॉलिसिटर-नि-उप सचिव :-

संघटनेची मागणी:- सदर पद सॉलिसिटर (मु. वि)-नि- उप सचिव या पदास समकक्ष असून या दोन्ही पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या समान असल्याने सॉलिसिटर (मु. वि)-नि- उप सचिव या पदाप्रमाणे विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पद सॉलिसिटर (मु. वि)-नि- उप सचिव या पदास समकक्ष असून या दोन्ही पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या समान असल्याने सॉलिसिटर (मु. वि)-नि - उप सचिव या पदाप्रमाणे विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे. ४ थ्या व ५ व्या वेतन

आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

१७. सहायक विधि सल्लागार-नि-अवर सचिव :-

संघटनेची मागणी:- ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते तथापि, ६ व्या वेतन आयोगापासून विशेष वेतन देण्यात आलेले नाही. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

१८. अवर सचिव (विधि) :-

संघटनेची मागणी:- या संवर्गासाठी यापुर्वी विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. सदर पदे मंत्रालयीन अवर सचिव पदांना समकक्ष असली तरी या पदासाठी आवश्यक विशेष शैक्षणिक अर्हता, पदांचे तांत्रिक स्वरुप, संवर्गाचे प्रशासकिय यंत्रणेतील स्थान, या पदांची कर्तव्य व जबाबदाऱ्या विभागातील इतर विधि संवर्गाप्रमाणेच आहे. यास्तव, प्रस्तुत संवर्गाला विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- या संवर्गासाठी यापुर्वी विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. सदर पदे मंत्रालयीन अवर सचिव पदांना समकक्ष असली तरी या पदासाठी आवश्यक विशेष शैक्षणिक अर्हता, पदांचे तांत्रिक स्वरुप, संवर्गाचे प्रशासकिय यंत्रणेतील स्थान, व पदांची कर्तव्य व जबाबदाऱ्या विभागातील इतर विधि संवर्गाप्रमाणेच आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन या संवर्गासाठीही विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

१०) विधि सल्लागार नि-सह सचिव,
११) सॉलिसिटर नि-सह सचिव,
१२) सह सचिव (विधि),
१३) उप विधि सल्लागार-नि-उप सचिव,
१४) उप सचिव (विधि),
१५) सॉलिसिटर (मु.वि.) -नि-उप सचिव,
१६) सहायक सॉलिसिटर-नि-उप सचिव,
१७) सहायक विधि सल्लागार-नि-अवर सचिव,
१८) अवर सचिव (विधि)

शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांक ११८२८ (ए)/सी, दिनांक ३०.०५.१९७४ अन्वये दिनांक ०१.०६.१९७४ पासून विधि विधान शाखेची (Legislation Branch) त्यामधील पदांना सुधारित वेतनश्रेणी देऊन पुनर्रचना करण्यात आली व त्यांना सुधारित उच्चतर विशेष वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. ३ ऱ्या वेतन आयोगानंतर शासनाने या अधिकाऱ्यांना मंत्रालयीन विभागातील इतर अधिकाऱ्यांपेक्षा उच्चतर विशेष वेतनश्रेणी चालू ठेवली. ४थ्या वेतन आयोगानंतर

शासनाने उच्चतर विशेष वेतनश्रेणी ही संकल्पना चालू न ठेवता विधि विधान शाखेतील काही पदांना योग्य ती उच्चतर वेतनश्रेणी उपलब्ध नसल्यामुळे सुधारित वेतनश्रेणी + विशेष वेतन ही संकल्पना वेतनात वाढ करण्यासाठी अंमलात आणली. ५ व्या वेतन आयोगानंतरही या विशेष वेतनाच्या रक्कमेत वाढ करण्यात आली. ६ व्या वेतन आयोगानंतर "ब" शाखेची (विधि विधान) पुनर्रचना करण्यामागचा मूळ उद्देश व हेतु, कामकाजाचे तांत्रिक स्वरुप व अधिकारी स्तराची संपूर्ण संरचना ( Hierarchy of Organization Level) कायम राहावी या दृष्टिकोनातून विशेष वेतन ग्रेड वेतनामध्ये वाढ सुचवून पुढे चालू ठेवण्यात आले.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये विधि व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील याच पदांना ६ व्या वेतन आयोगात मंजूर केलेले विशेष वेतन विचारात घेऊन ७ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सदर विशेष वेतन केवळ "ब" शाखेतील विशिष्ठ कामकाज विचारात घेऊन मंजूर करण्यात आले आहे. हे पाहता असे विशेष वेतन सरसकट सर्व पदांना मंजूर करणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे.

१९. अधीक्षक (विधि) :-

संघटनेची मागणी:- अधीक्षक (विधि) या संवर्गाचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेता प्रस्तुत संवर्गास एस -२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. तसेच सदर संवर्गास विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- या संवर्गासाठी यापूर्वी विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नसले तरी या पदासाठी आवश्यक विशेष शैक्षणिक अर्हता, पदांचे तांत्रिक स्वरुप संवर्गाचे प्रशासकीय यंत्रणेतील स्थान या पदांची कर्तव्य व जबाबदारी या सर्व बाबी विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- सदर संवर्गासाठी मागणी केलेली वेतनश्रेणी ही त्रुटी नसून वाढीव वेतनश्रेणी मागणीची आहे. ६ व्या वेतन आयोगापासून काही विशिष्ट संवर्ग वगळता इतर संवर्गांना मिळणारे विशेष वेतन बंद करण्यात आले आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२०. सहायक (विधि) :-

संघटनेची मागणी:- सहायक (विधि) या संवर्गाचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेता एस-१७ ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. तसेच विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- या संवर्गासाठी यापूर्वी विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नसले तरी या पदासाठी आवश्यक विशेष शैक्षणिक अर्हता, पदांचे तांत्रिक स्वरुप संवर्गाचे प्रशासकीय यंत्रणेतील स्थान या पदांची कर्तव्य व जबाबदारी या सर्व बाबी विचारात घेऊन विशेष वेतन मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- सदर संवर्गासाठी मागणी केलेली वेतनश्रेणी ही त्रुटी नसून वाढीव वेतनश्रेणी मागणीची आहे. ६ व्या वेतन आयोगापासून काही विशिष्ट संवर्ग वगळता इतर संवर्गांना मिळणारे विशेष वेतन बंद करण्यात आले आहे. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

फ) महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण

२१. अधिक्षक (विधि) :-

संघटनेची मागणी:- वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ११.०२.२०१३ अन्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी या संवर्गाला ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर रु. १५६००-३९१०० ग्रे. वे. रु. ५४०० लागू करण्यात आले आहे. त्याप्रमाणे प्रस्तुत संवर्गाला ७ व्या वेतन आयोगानुसार ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर एस- २० हा वेतनस्तर लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- मंत्रालयीन कक्ष अधिकारी या पदाप्रमाणे राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या अधिक्षक विधी यांना ७ व्या वेतन आयोगानुसार ४ वर्षांनंतर एस -२० ( ५६१००-१७७५०० ) करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- सदर संवर्गासाठी मागणी केलेली वेतनश्रेणी ही त्रुटी नसून वाढीव वेतनश्रेणी मागणी आहे. तसेच ५ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीतील त्रुटी/असमानता दूर करण्यासाठी नेमलेल्या वेतन त्रुटी उच्चस्तर व वेतन असमानता समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याकरिता, शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार वित्त विभागाने दि.२७.२.२००६ अन्वये कक्ष अधिकारी संवर्गाकरिता, ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर अकार्यात्मक वेतनश्रेणी (Non Functional) लागू करण्यात आली. ही शासनाची धोरणात्मक बाब असल्यामुळे ती केवळ मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गापुरतीच लागू आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२२. कक्ष अधिकारी/ आस्थापना अधिकारी :-

संघटनेची मागणी:- वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ११.०२.२०१३ अन्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी या संवर्गाला सुधारित वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रे. वे. ४८०० व ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर रु. १५६००-३९१०० ग्रे. वे. रु. ५४०० लागू करण्यात आले आहे. त्याप्रमाणे प्रस्तुत संवर्गाला ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१७ रु. ४७६००-१५११०० व ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर एस-२० हा वेतनस्तर लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- मंत्रालयीन कक्ष अधिकारी या पदाप्रमाणे राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या कक्ष अधिकारी, आस्थापना अधिकारी व अधिक्षक विधी यांना ७ व्या वेतन आयोगानुसार एस -१७ रु. (रु.४७६००-१५११०० ) आणि ४ वर्षानंतर एस -२० (रु.५६१००-१७७५००) करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- सदर संवर्गासाठी मागणी केलेली वेतनश्रेणी ही त्रुटी नसून वाढीव वेतनश्रेणी मागणी आहे. तसेच ५ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीतील त्रुटी/असमानता

दूर करण्यासाठी नेमलेल्या वेतन त्रुटी उच्चस्तर व वेतन असमानता समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याकरिता, शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार वित्त विभागाने दि.२७.२.२००६ अन्वये कक्ष अधिकारी संवर्गाकरिता, ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर अकार्यात्मक वेतनश्रेणी (Non Functional) लागू करण्यात आली. ही शासनाची धोरणात्मक बाब असल्यामुळे ती केवळ मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गापुरतीच लागू आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

## ३.१० मराठी भाषा विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रु. | मागणी केलेली वेतनश्रेणी रु. |
| | अ) भाषा संचालनालय | | | | |
| १ | भाषा संचालक | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० |
| २ | भाषा उपसंचालक | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु. ५६१००-१७७५०० | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० |
| ३ | सहायक भाषा संचालक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ४ | पर्यवेक्षक गट-क | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | सुधारित वेतन श्रेणी नमूद केलेली नाही. |
| ५ | अनुवादक गट-क | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० (४ वर्षांनंतर) |
| | ब) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई | | | | |
| ६ | सचिव | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु. ६७७००-२०८७०० | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० |

अ) भाषा संचालनालय

१.भाषा संचालक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील समकक्ष पदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणींतील तफावत दूर करुन त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार एस-२५ ऐवजी एस-२७ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील व भाषा संचालनालयातील पदे यांच्या वेतनश्रेणीतील ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेनुसार तफावत आढळून येते. ६ व्या वेतन आयोगानुसार उपरोक्तप्रमाणे असणारी वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन प्रस्तुत संवर्गाला त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत पदाला केंद्र शासनातील निदेशक या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, चौथ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणींना शिफारस केलेल्या सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत वेतन समानीकरण समितीने शिफारस केली होती. त्याप्रमाणे प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी चौथ्या वेतन आयोगामध्ये सुधारित करण्यात आली असून, ५व्या, ६व्या व ७व्या वेतन आयोगामध्ये समकक्ष वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२.भाषा उपसंचालक (अ.व.शा)/ भाषा उपसंचालक (विधि):-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील समकक्ष पदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार एस-२० ऐवजी एस-२५ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील व भाषा संचालनालयातील पदे यांच्या वेतनश्रेणीतील ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेनुसार तफावत आढळून येते. सबब, ६ व्या वेतन आयोगानुसार उपरोक्तप्रमाणे असणारी वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन प्रस्तुत संवर्गाला त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत पदाला केंद्र शासनातील उप निदेशक या पदाला समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, ४ थ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणींना शिफारस केलेल्या सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत वेतन समानीकरण समितीने शिफारस केली होती. त्याप्रमाणे प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी चौथ्या वेतन आयोगामध्ये सुधारित करण्यात आली असून, ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये समकक्ष वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

३.सहायक भाषा संचालक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील समकक्ष पदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१५ ऐवजी एस-२० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील व भाषा संचालनालयातील पदे यांच्या वेतनश्रेणीतील ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेनुसार तफावत आढळून येते. सबब, ६ व्या वेतन आयोगानुसार उपरोक्तप्रमाणे असणारी वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन प्रस्तुत संवर्गाला त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत पदाला केंद्र शासनातील सहायक भाषा निदेशक या पदाला समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, ४ थ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणींना शिफारस केलेल्या सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत वेतन समानीकरण समितीने शिफारस केली होती. त्याप्रमाणे प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी ४ थ्या वेतन आयोगामध्ये सुधारित करण्यात आली असून, ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये समकक्ष वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

४.पर्यवेक्षक गट-क :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील समकक्ष पदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१४ ऐवजी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील व भाषा संचालनालयातील पदे यांच्या वेतनश्रेणीतील ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेनुसार तफावत आढळून येते. सबब, ६ व्या वेतन आयोगानुसार उपरोक्तप्रमाणे असणारी वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन प्रस्तुत संवर्गाला त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. पर्यवेक्षक गट-क या संवर्गाला सहाव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी एस-१४ ही सातव्या वेतन आयोगामध्ये लागू करण्यात आली आहे. सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

५. अनुवादक गट-क :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र सरकारच्या राजभाषा विभागातील समकक्ष पदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्या आधारे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१६ (४ वर्षांच्या सेवेनंतर) मंजूर करणेबाबत.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- केंद्रातील अनुवादकांच्या वेतनश्रेणी नुसार ४ वर्षानंतर एस-१६ ही वेतनश्रेणी भाषा संचालनालयातील अनुवादकांना लागू करण्यात यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत पदाला केंद्र शासनाकडील कनिष्ठ हिंदी अनुवादक या पदाशी समकक्ष ठरविले आहे. त्यानुसार चौथ्या वेतन आयोगामध्ये रु.१४००-२६०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये समकक्ष वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी नाही.

ब)महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ

६.सचिव :-

संघटनेची मागणी :- सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८.३.२०२३ व वित्त विभागाच्या दि.१३.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकाकी पदांना निवडश्रेणी वेतनस्तर लागू होत नाही. तथापि, त्यामुळे सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई या एकाकी पदावर नामनिर्देशनाव्दारे नियुक्त अधिकाऱ्यास आर्थिक कुंठिततेला सामोरे जावे लागते. ही आर्थिक कुंठितता दूर करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८.३.२०२३ च्या शासन निर्णयानुसार ७ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनस्तर एस-२५ हा निवडश्रेणी वेतनस्तर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातील सचिव या एकाकी पदास लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८.३.२०२३ व वित्त विभागाच्या दि.१३.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकाकी पदांना निवडश्रेणी वेतनस्तर लागू होत नाही. तथापि, त्यामुळे सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई या एकाकी पदावर नामनिर्देशनाव्दारे नियुक्त अधिकाऱ्यास आर्थिक कुंठिततेला सामोरे जावे लागते. ही आर्थिक कुंठितता दूर करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८.३.२०२३ च्या शासन निर्णयानुसार ७ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनस्तर एस-२५ हा निवडश्रेणी वेतनस्तर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातील सचिव या एकाकी पदास लागू करण्यात यावा.

समितीची शिफारस :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २८/०३/२०२३ नुसार एस २० व त्यापुढील वेतनस्तर असणाऱ्या ज्या संवर्गाची मंजूर पदसंख्या किमान ४ इतकी आहे, अशा संवर्गानाच निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्याचे निदेश आहेत. प्रस्तुतचे सचिव पद एकाकी पद आहे व यापुढे पदोन्नतीची संधीपण उपलब्ध नाही. तसेच सदर पद नामनिर्देशनाने भरण्यात येते. परिणामी सदर पदावर कार्यरत अधिकाऱ्यास कुंठीततेस सामोरे जावे लागते. एकाकी पद असल्याने उपरोक्त नमूद शासन निर्णयातील निवडश्रेणीबाबतचा अपेक्षित फायदा लागू होत नाही. अशा परिस्थितीत उपरोक्त शासन निर्णयातील एकूण मंजूर पदसंख्या व पदोन्नतीबाबत अटी व शर्ती शिथिल करुन, सदर पदावर किमान ५ वर्षाची सेवा झाल्यानंतर त्या पुढील वेतनश्रेणी लागू करणे योग्य ठरेल. त्यानुसार प्रस्तावातील वेतनश्रेणी एस-२४ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**********

## ३.११ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रु. | मागणी केलेली वेतनश्रेणी रु. |
| अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | | | | | |
| १ | प्राचार्य | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १२३१००-२१५९०० |
| २ | मुख्य प्रशासकीय अधिकारी (गट-अ) | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ३ | उप प्राचार्य किंवा प्राध्यापक-नि-उपप्राचार्य | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० |
| ४ | अधिसेविका | ९३००-३४८०० | ४९०० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० (खंड-२ नुसार) | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ५ | सहायक अधिसेविका | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० (खंड-२ नुसार) | एस-२४ रु.७११००-२११९०० |
| ६ | सार्वजनिक आरोग्य परिचारिका | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० (खंड-२ नुसार) | एस-१७ रु. ४७६००-१५११०० |
| ७ | बालरोग तज्ञ परिसेविका | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० (खंड-२ नुसार) | एस-१७ रु. ४७६००-१५११०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | मनोरुग्ण तज्ञ परिसेविका | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु. ४४९००-१४२४०० (खंड-२ नुसार) | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ९ | प्राध्यापक | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| १० | सहयोगी प्राध्यापक | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ११ | जीवरसायनशास्त्रज्ञ (गट-ब) | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस २० रु.५६१००-१७७५०० |
| १२ | प्रशासकीय अधिकारी (गट-ब) | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५, रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| १३ | अधिव्याख्याता/ सहायक प्राध्यापक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-२१ रु.५७१००-१८०८०० |
| १४ | पाठ्यनिर्देशिका | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१९ रु.५५१००-१७५१०० |
| १५ | समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय)/ समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु. ४४९००-१४२४०० |
| १६ | आहारतज्ञ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १७ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१३ रु.३५४००-१४२४०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १८ | ई.सी.जी.तंत्रज्ञ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१३ रु.३५४००-१४२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| १९ | परिसेविका | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु. ३८६००-१२२६०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| २० | अधिपरिचारीका | ९३००- | ४२०० | एस-१३ | एस-१६ ४४९००- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३४८०० | | रु.३५४००-११२४०० | १४२४०० |
| २१ | कलाकार/ छायाचित्रकार | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु. २९२००-९२३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| २२ | ग्रंथपाल | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० (काही ठिकाणी एस-१४ रु.३८६००-१२२८००) व (काही ठिकाणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| २३ | विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| २४ | दंत तंत्रज्ञ | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| २५ | दंत आरोग्य तज्ञ | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| २६ | स्वच्छता निरीक्षक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| २७ | दूरध्वनी चालक | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-१० रु. २९२००-९२३०० |
| २८ | भांडारपाल/ वस्त्रपाल | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| २९ | शिंपी | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| ३० | जोडारी, सुतार, बाष्पक परीचर, नळ कारागीर | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३१ | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करण्याबाबत |
| | ब) आयुष संचालनालय | | | | |
| ३२ | सहायक संचालक,आयुष गट-ब | ९३००-३४८०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ३३ | जिल्हा आयुष अधिकारी | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ३४ | प्रशासकीय अधिकारी गट-ब | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२००० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |

अ)वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय

१.प्राचार्य :-

संघटनेची मागणी:- केंद्र शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या आणि राज्य शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या प्राचार्य या संवर्गाच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. वास्तव, प्रस्तुत संवर्गाला एस-२३ ऐवजी केंद्र शासनाप्रमाणे रु. १२३१००- २१५९०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पद उप प्राचार्य किंवा प्राध्यापक -नि-उपप्राचार्य या पदामधून पदोन्नतीने भरली जातात. त्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी ही निम्न संवर्गापेक्षा वरची असल्याने सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये कोणताही बदल करण्याची शिफारस करण्यात आलेली नाही.

समितीची शिफारस :- वेतनसमानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित न करण्याच्या विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत आहे. प्रस्तुत, संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ सातव्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२.मुख्य प्रशासकीय अधिकारी (गट-अ) :-

संघटनेची मागणी:- राज्य शासनातील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता, जलसंपदा विभागातील मुख्य प्रशासकीय अधिकारी यांच्या तुलनेत या वैद्यकीय महाविद्यालयातील अधिकारी यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणात आहेत. तथापि, त्यांच्या तुलनेत वेतनश्रेणीमध्ये तफावत आहे. सबब, मुख्य प्रशासकीय अधिकारी (गट-अ)

(वेतनश्रेणी एस-२० रु. ५६१००-१७७५००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२३ रु.६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना एस-२० ही वेतनश्रेणी लागू आहे. मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना कोणतीही पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. राज्य शासनातील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता, जलसंपदा विभागातील मुख्य प्रशासकीय अधिकारी यांच्या तुलनेत या वैद्यकीय महाविद्यालयातील अधिकारी यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणात आहेत. याबाबत पूर्वी बक्षी समितीकडे निवेदन सादर केले होते. तथापि, बक्षी समितीने सदर मागणीचा विचार केला नाही. मुख्य प्रशासकीय अधिकारी या पदाकरिता, एस-२३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून त्याप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -२० ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

३. प्राध्यापक तथा उपप्राचार्य :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या आणि राज्य शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या प्राध्यापक तथा उपप्राचार्य या संवर्गाच्या वेतनामध्ये खुप तफावत आहे. यास्तव, प्रस्तुत संवर्गाला एस -२० ऐवजी केंद्र शासनाप्रमाणे एस -२५ ही वेतनश्रेणी लागू करत यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पद प्राध्यापक या पदामधून पदोन्नतीने भरली जातात. त्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी ही Feeder Cadre पेक्षा वरची असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने ४ था वेतन आयोग प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्राध्यापक या संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याची शिफारस मंजूर झाल्यास सदर संवर्गाची वेतनश्रेणी एस-१९ अशी सुधारित होईल. प्राध्यापक संवर्गाची वेतनश्रेणी एस-१९ यापेक्षा उपप्राचार्य या संवर्गास उच्च वेतनश्रेणी एस-२०, रु.५६१००-१७७५०० अशी मंजूर आहे. सदर संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

४.अधिसेविका :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनाच्या परिचारिका संवर्गातील अधिसेविका व राज्य शासनाच्या परिचारिका संवर्गातील अधिसेविका यांच्या वेतनामध्ये खुप तफावत आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस -१८ ऐवजी एस -२५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सदर पद सहायक अधिसेविका या पदामधून पदोन्नतीने भरली जातात. त्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी ही Feeder Cadre पेक्षा वरची असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग )प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, वित्त विभाग सेवा-९, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये नुकतेच सदर पदाची वेतनश्रेणी एस-१६ रु.४४९००-१४२४०० वरुन एस-१८ रु.४९१००-१५५८०० अशी करण्यात आली आहे. प्रस्तुत, संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

५.सहायक अधिसेविका :-

**संघटनेची मागणी:-** केंद्र शासनाच्या परिचारिका संवर्गातील सहायक अधिसेविका व राज्य शासनाच्या परिचारिका संवर्गातील सहायक अधिसेविका यांच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस -१७ ऐवजी एस -२४ ही वेतनश्रेणी लागु करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सदर पद परिसेविका या पदामधून पदोन्नतीने भरली जातात. त्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी ही Feeder Cadre पेक्षा वरची असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग )प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, वित्त विभाग सेवा-९, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये नुकतेच सदर पदाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० वरुन एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी करण्यात आली आहे. प्रस्तुत, संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. सदर संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

६.सार्वजनिक आरोग्य परिचारिका :-

**संघटनेची मागणी:-** केंद्र शासनाच्या परिचारिका संवर्गातील सार्वजनिक आरोग्य परिचारिका व राज्य शासनाच्या परिचारिका संवर्गातील सार्वजनिक आरोग्य परिचारिका यांच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस -१६ ऐवजी एस -१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सदर पद अधिपरिचारिकामधून पदोन्नतीने भरली जात असल्याने सदर पदाची वेतनश्रेणी अधिपरिचारिका या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. सध्याची वेतनश्रेणी ही अधिपरिचारिका पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असल्याने यामध्ये कोणताही बदल करण्याची शिफारस करण्यात आलेली नाही.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग )प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, वित्त विभाग सेवा-९, शासन

निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये नुकतेच सदर पदाची वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० वरुन एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी करण्यात आली आहे. प्रस्तुत, संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित न करण्याच्या विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत आहे. सदर संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

७. बालरोग तज्ञ परिसेविका :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनाच्या परिचारिका संवर्गातील बालरोग तज्ञ परिसेविका व राज्य शासनाच्या परिचारिका संवर्गातील बालरोग तज्ञ परिसेविका यांच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस -१६ ऐवजी एस -१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पद अधिपरिचारिकामधून पदोन्नतीने भरली जात असल्याने सदर पदांची वेतनश्रेणी अधिपारिचारिका या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. सध्याची वेतनश्रेणी ही अधिपरिचारिका पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असल्याने यामध्ये कोणताही बदल करण्याची शिफारस करण्यात आलेली नाही.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग )प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, वित्त विभाग सेवा-९, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये नुकतेच सदर पदाची वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० वरुन एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी करण्यात आली आहे. प्रस्तुत, संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित न करण्याच्या विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत आहे. सदर संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

८. मनोरुग्णतज्ञ परिसेविका :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनाच्या परिचारिका संवर्गातील मनोरुग्ण तज्ञ परिसेविका व राज्य शासनाच्या परिचारिका संवर्गातील मनोरुग्ण तज्ञ परिसेविका यांच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस -१६ ऐवजी एस -१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पद अधिपरिचारिकामधून पदोन्नतीने भरली जात असल्याने सदर पदांची वेतनश्रेणी अधिपारिचारिका या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. सध्याची वेतनश्रेणी ही अधिपरिचारिका पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असल्याने यामध्ये कोणताही बदल करण्याची शिफारस करण्यात आलेली नाही.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग )प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, वित्त विभाग सेवा-९, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये नुकतेच सदर पदाची वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० वरुन एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी करण्यात आली आहे. प्रस्तुत, संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित न करण्याच्या विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत आहे. सदर संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

९. प्राध्यापक :-

संघटनेची मागणी :- "निरंक"

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पद सहयोगी प्राध्यापक या पदानधुन पदोन्नतीने भरली जातात. त्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी ही Feeder Cadre पेक्षा वरची असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

समितीची शिफारस :- प्राध्यापक हे पद सहयोगी प्राध्यापक या संवर्गामधून पदोन्नतीने भरले जाते. सहयोगी प्राध्यापक या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१८ रू.४९१००-१५५८०० अशी सुधारित करण्याची समितीने केलेली शिफारस मान्य झाल्यास प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा आवश्यक ठरेल. सबब, प्राध्यापक या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१९ रू.५५१००-१७५१०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१०. सहयोगी प्राध्यापक :-

संघटनेची मागणी:- केंद्र शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या आणि राज्य शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या सहयोगी प्राध्यापक या संवर्गाच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. यास्तव, प्रस्तुत संवर्गाला एस -१६ ऐवजी केंद्र शासनाप्रमाणे एस २३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पद सहायक प्राध्यापक या पदामधून पदोन्नतीने भरली जातात. त्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी ही Feeder Cadre पेक्षा वरची असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

समितीची शिफारस :- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णय, दिनांक २१.०४.२०१४ अन्वये प्रस्तुत संवर्ग नव्याने निर्माण करण्यात आला आहे. सहयोगी प्राध्यापक हे पद अधिव्याख्याता/सहायक प्राध्यापक या संवर्गामधून पदोन्नतीने भरले जाते. अधिव्याख्याता या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारित करण्याची समितीने केलेली शिफारस मान्य झाल्यास प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक ठरेल. सहयोगी प्राध्यापक या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१८ रू.४९१००-१५५८०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

११.जीवरसायनशास्त्रज्ञ (गट-ब) :-

संघटनेची मागणी:- राज्यातील जीवरसायशास्त्रज्ञ गट-ब या पदास ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१५ ही वेतनश्रेणी तर केंद्र शासन सेवेतील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार जीवरसायनशास्त्रज्ञ गट-अ या पदाची वेतनश्रेणी एस-२० आहे. सबब, समान काम समान वेतन या अनुषंगाने जीवरसायनशास्त्रज्ञ (गट-ब) (वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- राज्यातील जीवरसायशास्त्रज्ञ गट-ब या पदास ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१५ ही वेतनश्रेणी तर केंद्र शासन सेवेतील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार जीवरसायनशास्त्रज्ञ गट-अ या पदाची वेतनश्रेणी एस-२० आहे. राज्यातील

शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील जीवरसायनशास्त्रज्ञ गट-ब हे केंद्र शासनाकडील समतुल्य पद असल्याने सदर पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, शैक्षणिक अर्हता व अनुभव समान आहे. यास्तव, एस-२० ही केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाकडील जीवरसायनशास्त्रज्ञ या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. राज्यात हा संवर्ग गट -ब मध्ये कार्यरत आहे. केंद्र शासनाकडील संवर्ग गट - अ मध्ये आहे. या संवर्गास ६ व्या वेतन आयोगातील मंजूर वेतन संरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -१५ मंजूर करण्यात आली आहे. या कारणास्तव या संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

**१२. प्रशासकीय अधिकारी गट-ब :-**

<u>संघटनेची मागणी:-</u> राज्य शासनातील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता, जलसंपदा विभागातील मुख्य प्रशासकीय अधिकारी यांच्या तुलनेत वैद्यकीय महाविद्यालयातील अधिकारी यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणात आहेत. तथापि, त्यांच्या तुलनेत वेतनश्रेणीमध्ये तफावत आहे. सबब, प्रशासकीय अधिकारी गट-ब ( वेतनश्रेणी एस-१५ रु. ४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> प्रशासकीय अधिकारी यांना एस-१५ ही वेतनश्रेणी लागू आहे. राज्य शासनातील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता, जलसंपदा विभागातील प्रशासकीय अधिकारी यांच्या तुलनेत वैद्यकीय महाविद्यालयातील अधिकारी यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणात आहेत. याबाबत पूर्वी बक्षी समितीकडे निवेदन सादर केले होते. तथापि, बक्षी समितीने सदर मागणीचा विचार केला नाही. प्रशासकीय अधिकारी या पदाकरिता, एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून त्याप्रमाणे वेतनश्रेणी देय आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -१५ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

**१३. अधिव्याख्याता /सहायक प्राध्यापक:-**

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या आणि राज्य शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या अधिव्याख्याता या संवर्गाच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. यास्तव, प्रस्तुत संवर्गाला एस - १५ ऐवजी केंद्र शासनाप्रमाणे एस -२१ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सदर पद पाठ्यनिर्देशिका या पदामधून पदोन्नतीने भरली जातात. त्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी ही Feeder Cadre पेक्षा वरची असणे आवश्यक आहे. त्यानुळे सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

**समितीची शिफारस :-** वेतनसमानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, अधिव्याख्याता हे पद पाठ्यनिर्देशिका या संवर्गामधून पदोन्नतीने भरले जाते. पाठ्यनिर्देशिका या संवर्गाची वेतनश्रेणी व अधिव्याख्याता या पदाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी समान झाली आहे. यास्तव, अधिव्याख्याता या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१४. पाठ्यनिर्देशिका :-

**संघटनेची मागणी:-** केंद्र शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या आणि राज्य शासनाच्या नर्सिंग स्कूल व कॉलेजच्या पाठ्यनिर्देशिका या संवर्गाच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. यास्तव, प्रस्तुत संवर्गाला एस -१५ ऐवजी केंद्र शासनाप्रमाणे एस -१९ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** केंद्र शासनाच्या परिचर्या महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील वेतनश्रेणी व राज्य शासनाच्या परिचर्या महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील वेतनश्रेणीमध्ये फार तफावत दिसून येत आहे. या व्यतिरिक्त राज्य शासनाच्या वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांना UGC स्केल प्रमाणे वेतनश्रेणी देण्यात येते. परंतु परिचर्या महाविद्यालयातील अध्यापकांना त्याप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात येत नाही. सदर बाबी विचारात घेता अध्यापकीय संवर्गांना प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**समितीची शिफारस :-** वेतनसमानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही.प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१५. समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय)/ समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) :-

**संघटनेची मागणी :-** समाजसेवा अधिक्षक या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या ह्या केंद्र शासनातील मेडीकल सोशल वर्कर यांच्या प्रमाणे आहेत. केंद्र शासनातील मेडीकल सोशल वर्कर यांना ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर आहे.समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय)/ समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) ( वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु. ४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय/ मनोविकृती) यांनी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१४ या वेतनश्रेणीऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. यापूर्वी याबाबत बक्षी समितीकडे या पदाचे निवेदन सादर केले होते.

समाजसेवा अधिक्षक या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या ह्या केंद्र शासनातील मेडीकल सोशल वर्कर यांच्या प्रमाणे आहेत. केंद्र शासनातील मेडीकल सोशल वर्कर यांना ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर आहे. तसेच AIIMS रायपूर येथे समकक्ष पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी मंजुर आहे. त्यानुसार संचालनालयाच्या अधिपत्याखालील समाजसेवा अधीक्षक या पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> प्रस्तुत संवर्गाला वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) केंद्र शासनातील मेडीकल सोशल वर्कर या पदाला समकक्ष ठरविलेले नाही. सदरहू संवर्ग हा गट ब (अराजपत्रित) असून त्यास अनुसरुन त्यांना ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी देण्यात आली आहे. या संवर्गाच्या संदर्भात वेतनत्रुटी आढळत नाही.

१६. आहारतज्ञ :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनातील आहारतज्ञ या पदास एस-१४ ही वेतनश्रेणी लागू आहे. केंद्र शासनातील आहारतज्ञ या पदाचे सेवा प्रवेश नियम व कर्तव्य व जबाबदाऱ्या ह्या राज्यातील आहारतज्ञ या पदाप्रमाणेच आहेत.आहारतज्ञ ( वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> केंद्र शासनातील आहारतज्ञ या पदास एस-१४ ही वेतनश्रेणी लागू आहे. केंद्र शासनातील आहारतज्ञ या पदाचे सेवा प्रवेश नियम व कर्तव्य व जबाबदाऱ्या ह्या राज्यातील आहारतज्ञ या पदाप्रमाणेच आहेत. वास्तव, केंद्रशासनाप्रमाणे समकक्ष वेतनश्रेणी एस-१६ मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतनसमानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाकडील आहारतज्ञ या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास ४ थ्या, ५ व्या व ६ व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यास समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगातही मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१७. क्ष-किरण तंत्रज्ञ :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनामध्ये क्ष-किरण तंत्रज्ञ या पदाकरिता, एस-१६ अशी वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. केंद्र शासनातील पदास देखील राज्यशासनातील कर्मचाऱ्यांप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पदाचे कर्तव्य जबाबदाऱ्या लागू आहेत. क्ष-किरण तंत्रज्ञ (वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> केंद्र शासनामध्ये क्ष-किरण तंत्रज्ञ या पदाकरिता, एस-१६ अशी वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. केंद्र शासनातील पदास देखील राज्यशासनातील

कर्मचाऱ्यांप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पदाचे कर्तव्य जबाबदाऱ्या लागु आहेत. सबब, शासकीय पदवीधर क्ष-किरण तंत्रज्ञ या पदास एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) " या संवर्गाचे तांत्रिक स्वरुप लक्षात घेऊन रु १४००-२३०० वेतन श्रेणीची शिफारस केली होती व त्यानुसार सदर वेतनश्रेणी मंजुर केली होती या संवर्गाला ५व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे.या संवर्गाला मंजुर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१८. ई.सी.जी. तंत्रज्ञ :-

संघटनेची मागणी:- परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच ई.सी.जी.तंत्रज्ञ या पदावरील कर्मचारी सुद्धा अतिजोखमीची रुग्णसेवा पुरवित असतात. कोविड काळात विविध संसर्गजन्य रुग्णांच्या प्रत्यक्ष संपर्कात येऊन सेवा पुरविल्या आहेत. सबब, ई.सी.जी. तंत्रज्ञ (वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु.३८६००-१२२८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच ई.सी.जी.तंत्रज्ञ या पदावरील कर्मचारी सुद्धा अतिजोखमीची रुग्णसेवा पुरवित असतात. कोविड काळात विविध संसर्गजन्य रुग्णांच्या प्रत्यक्ष संपर्कात येऊन सेवा पुरविल्या आहेत. तसेच आपत्कालीन विभागातील रुग्ण हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब इ. व्याधींनी ग्रस्त रुग्णांना सेवा पुरवितात. यास्तव, ई.सी.जी. तंत्रज्ञ या पदास एस-१४ ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानिकरण समितीने (४ था वेतन आयोग) " या संवर्गाचे तांत्रिक स्वरुप लक्षात घेऊन रु १४००-२३०० वेतन श्रेणीची शिफारस केली होती व त्यानुसार सदर वेतनश्रेणी मंजुर केली होती या संवर्गाला ५व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे.या संवर्गाला मंजुर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१९.परिसेविका :-

संघटनेची मागणी:- केंद्र शासनाच्या परिचारिका संवर्गातील परिसेविका व राज्य शासनाच्या परिचारिका संवर्गातील परिसेविका यांच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. प्रस्तुत संवर्गाला एस - १४ ऐवजी एस - १७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पद अधिपरिचारिकामधून पदोन्नतीने भरली जात असल्याने सदर पदांची वेतनश्रेणी अधिपरिचारिका या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. सध्याची वेतनश्रेणी ही अधिपरिचारिका पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असल्याने यामध्ये कोणताही बदल करण्याची शिफारस करण्यात आलेली नाही.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग )प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही प्रस्तुत, संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित न

करण्याच्या विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत आहे. त्यामुळे या संवर्गाची उपरोक्त नमूद तिन्ही संवर्गाशी तुलना होऊ शकत नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२०. अधिपरिचारीका :-

<u>संघटनेची मागणी:-</u> महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे की, शसन अधिसुचना दिनांक ३०.०१.२०१९ नुसार ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. त्यामध्ये केंद्र शासनाच्या परिचारिका व राज्य शासनाच्या परिचारिका यांच्या वेतनामध्ये खूप तफावत आहे. शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये परिचारिका संवर्गातील सार्वजनिक आरोग्य, परिचारिका, मानसोपचार परिचारिका, बालरोग्य परिचारिका, सहायक अधिसेविका व अधिसेविका या पदावरील कार्यरत संवर्गावर होणारा अन्याय काही अंशी कमी केला आहे. परंतु अधिपरिचारिका, परिसेविका व पाठ्यनिर्देशिका यांच्यावरील अन्याय अजुन कायम आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या वेतनश्रेणीप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> केंद्र शासनाच्या परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागू असलेली वेतनश्रेणी राज्य शासनातील परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२१. कलाकार/ छायाचित्रकार :-

<u>संघटनेची मागणी :-</u> छायाचित्रकार / कलाकार या पदास केंद्र शासनामध्ये एस-१३ ही वेतनश्रेणी मंजूर आहे. सदर पदाचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेता, कलाकार/ छायाचित्रकार ( वेतनश्रेणी एस-१० रु. २९२००-९२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु. ३८६००-१२२८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- छायाचित्रकार / कलाकार या पदास केंद्र शासनामध्ये एस-१३ ही वेतनश्रेणी मंजूर आहे. तथापि, सदर संवर्गातील कर्मचाऱ्यांनी केंद्र शासनाप्रमाणे समतुल्य वेतनश्रेणीची मागणी केलेली नाही. त्याऐवजी एस-१४ ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत मागणी केलेली आहे. वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाची व सार्वजनिक आरोग्य विभागातील कलाकार-नि- छायाचित्रकार या संवर्गाला ४ थ्या वेतन आयोगापासून ६ व्या वेतन आयोगापर्यंत समान वेतनश्रेणी मंजूर असून, ६ व्या वेतन आयोगातील असुधारित

वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस १० ही लागू करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२२.ग्रंथपाल :-

<u>संघटनेची मागणी:-</u> ग्रंथपाल या संवर्गास वेतनश्रेणी काही महाविद्यालयामध्ये एस-१०, काही महाविद्यालयामध्ये एस-१४ रु.३८६००-१२२८०० व काही महाविद्यालयामध्ये एस-१५ रु.४१८००-१३२३०० आहे. ग्रंथपाल या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये तफावत असल्याने, या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु. ३८६००-१२२८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> संचालनालयाच्या अधिनस्त संस्थेमध्ये ग्रंथपाल या पदाला एस-१०, एस-१४ व एस-१५ या वेगवेगळ्या वेतनश्रेण्या मंजूर आहेत. सदर पदाची कर्तव्ये समान असून त्यांचे सेवाप्रवेश नियम देखील एकच आहेत. मात्र या पदाकरिता, संस्थानिहाय मंजूर पदाच्या वेतनश्रेणीत तफावत आढळून येते. त्यामुळे शासनसेवेने पदभरती करत असताना न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. चंद्रपूर, गोंदिया व जळगाव या संस्थेमध्ये ग्रंथपाल पदाकरिता, ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१५ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली असून, सदरची वेतनश्रेणी ही मुख्य ग्रंथपाल वर्ग-२ या पदाची आहे. ग्रंथपाल या पदाची सेवाशर्ती, कर्तव्य व शैक्षणिक अर्हतेनुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन ग्रंथपाल या पदास एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयातील संवर्ग / पदे यांचे निरीक्षण करता असे आढळून येते की, सदर संचालनालयात वरिष्ठ ग्रंथपाल, मुख्य ग्रंथपाल आणि ग्रंथपाल असे स्वतंत्र संवर्ग अस्तित्वात आहेत. तसेच, सहायक ग्रंथपाल व ग्रंथपाल सहायक असे संवर्गही आहेत. या संवर्गांना एस-८ ते एस-१५ अशा विविध वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत. वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष आयुक्तालयाच्या पत्र क्रमांक DMER-२१०१५/८/२०२४-STAT, दिनांक ०६.०५.२०२४ अन्वये ग्रंथपाल या पदाच्या सेवाशर्ती, कर्तव्ये व शैक्षणिक अर्हतेनुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन ग्रंथपाल या संवर्गास एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे. वास्तव यासंबंधात सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ग्रंथपाल या पदाला समरूप वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे. याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने वित्त विभागाच्या सल्ल्याने अंतिम निर्णय घेणे उचित होईल.

२३. विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ :-

<u>संघटनेची मागणी:-</u> विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ या पदाची शैक्षणिक अर्हता बी.एससी अशी आहे. सदर पदाचे कामाचे स्वरुप हे क्ष-किरण तंत्रज्ञ, ई.सी.जी. तंत्रज्ञ, लॅबोरेटरी तंत्रज्ञ या पदांपेक्षा अतिधोकादायक व जबाबदारीचे आहे. वास्तव विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ ( वेतनश्रेणी एस-१० रु.२९२००-९२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ या पदाची शैक्षणिक अर्हता ही ई.सी.जी. तंत्रज्ञ, एम.आर.आय.तंत्रज्ञ व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या प्रमाणेच बी.एस.सी. अशी आहे. विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ या संचालनालयाच्या अधिपत्याखालील "विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांनी "कॅथलॅब तंत्रज्ञ" या पदवी वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ आणि "कॅथलॅब तंत्रज्ञ" या पदाची वेतनश्रेणी, सेवाप्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदारी व इतर समान आहे. विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ या पदाची शैक्षणिक अर्हता ही ई.सी.जी. तंत्रज्ञ, एम. आर. आय. तंत्रज्ञ व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या प्रमाणेच बी.एस.सी. अशी आहे. तरीही विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ या पदाची वेतनश्रेणी एस-१० (२९२००-९२३००) व इतर पदांची वेतनश्रेणी एस-१३ (३५४००-११२४००) अशी आहे. कार्डीओलॉजी विभागामध्ये कार्यरत "विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ" पदावरील कामचे स्वरुप जोखमीचे आहे. त्यांना सतत रेडीऐशन झोनमध्ये काम करावे लागते. सबब, विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ या पदाकरिता, एस-१० (२९२००-९२३०० ) ऐवजी एस- १३ (३५४००-११२४००) ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाचा प्रस्ताव सादर करताना विभागाच्या मते समकक्ष असलेल्या अन्य संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच सेवाप्रवेश नियम इ. बाबत तुलनात्मक अभ्यास करुन, सर्वंकष समर्थनीय वेतनत्रुटी असल्याबाबतचा प्रस्ताव सादर केला नाही. या संवर्गास ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्याच समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगातही मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२४. दंत तंत्रज्ञ :-

<u>संघटनेची मागणी:-</u> दंत महाविद्यालय व रुग्णालयात दंत तंत्रज्ञ या पदांना एस -१० ही वेतनश्रेणी लागू आहे. केंद्र शासनाने दंततंत्रज्ञ पदाच्या जाहिरात मध्ये नमूद केलेली शैक्षणिक व संचालनालयाच्या स्पर्धा परीक्षेतील दंत तंत्रज्ञ पदाची शैक्षणिक अर्हता समान आहे. दंत तंत्रज्ञ (वेतनश्रेणी एस-१० रु.२९२००-९२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> दंत महाविद्यालय व रुग्णालयात दंत तंत्रज्ञ या पदांना एस -१० ही वेतनश्रेणी लागू आहे. केंद्र शासनाने दंततंत्रज्ञ पदाच्या जाहिरात मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व संचालनालयाच्या स्पर्धा परीक्षेतील दंत तंत्रज्ञ पदाची शैक्षणिक अर्हता समान आहे. यास्तव, दंत तंत्रज्ञ या पदास एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करावी.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) दंत तंत्रज्ञ या पदाला केंद्र शासनातील दंत तंत्रज्ञ या पदाला समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१० रु.२९२००-९२३०० ही लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२५. दंत आरोग्य तज्ञ :-

<u>संघटनेची मागणी</u>:- या पदास केंद्र शासनाने ५ व्या वेतन आयोगांतर्गत रु. ४०००-६००० वरुन रु.५०००-८००० अशी सुधारित वेतनश्रेणी लागू केली होती. मात्र राज्यामध्ये ५ व्या वेतन आयोगांतर्गत सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही. दंत आरोग्य तज्ञ ( वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- दंत आरोग्य तज्ञ या पदास केंद्र शासनाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत दिनांक ०१.०८.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या पदास केंद्र शासनाने ५ व्या वेतन आयोगांतर्गत रु. ४०००-६००० वरुन रु.५०००-८००० अशी सुधारित वेतनश्रेणी लागू केली होती. मात्र राज्यामध्ये ५ व्या वेतनआयोगांतर्गत सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही. सदर त्रुटीचे निवारण ५ व्या व ६ व्या वेतनआयोगामध्ये न झाल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल करण्यात आली. सदरचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे. याचिकेच्या अनुषंगाने वित्त विभागाने सादर केलेल्या शपथपत्रामध्ये आयोगातील त्रुटीच्या अनुषंगाने बक्षी समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीचा पहिला खंड सादर करण्यात आला असून, दुसरा खंड दोन आठवड्यात सादर करण्यात येईल असे नमूद केले आहे. तथापि, शासनाच्या दिनांक १३.०२.२०२१ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दंत आरोग्य तज्ञ या पदास सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही. सबब, वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबत प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात आला आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) दंत आरोग्य तज्ञ या पदाला केंद्र शासनातील दंत आरोग्य तज्ञ या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-८ रु.२५५००-८११०० लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२६. स्वच्छता निरीक्षक :-

<u>संघटनेची मागणी</u>:- केंद्र शासनाने ७ व्या वेतन आयोगातील अहवालानुसार ग्रेड वेतन २४०० वरुन ग्रेड वेतन २८०० पर्यंत वाढ करण्यास मंजूरी दिली आहे. स्वच्छता निरीक्षक या पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव हे समान आहेत. यास्तव स्वच्छता निरीक्षक (वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० रु.२९२००-९२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- केंद्र शासनाने ७ व्या वेतन आयोगातील अहवालानुसार ग्रेड वेतन २४०० वरुन ग्रेड वेतन २८०० पर्यंत वाढ करण्यास मंजूरी दिली आहे. स्वच्छता निरीक्षक या पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव हे समान आहेत. स्वच्छता निरीक्षक या पदास एस -८ ऐवजी एस-१० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाकडील संबंधित संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास ४ थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यास समकक्ष वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगातही मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२७. दूरध्वनी चालक :-

**संघटनेची मागणी:-** शिक्षण संचालनालयात दूरध्वनीचालक या पदास एस-७ ही वेतनश्रेणी मंजूर आहे. यास्तव सदर विभागातील दूरध्वनी चालक ( वेतनश्रेणी एस-७ रु.२१७००-६९१००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० रु. २९२००-९२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** शिक्षण संचालनालयात दूरध्वनीचालक या पदास एस-७ ही वेतनश्रेणी मंजूर आहे. केंद्रशासनामध्ये दूरध्वनीचालक या पदास एस-१० ही वेतनश्रेणी लागू आहे. सदर पदावरील कर्मचाऱ्यास शासन सेवेत पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. सदर ५व केंद्र शासनातील दूरध्वनीचालक या पदास समकक्ष आहे. केंद्राप्रमाणे एस-७ ऐवजी एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाकडील दूरध्वनीचालक या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

२८. भांडारपाल/ वस्त्रपाल :-

**संघटनेची मागणी:-** महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागामध्ये (महिला व बालकल्याण/ सार्वजनिक आरोग्य विभाग/ कारागृह विभाग) इ. ठिकाणी सदर संवर्गातील पदांना मंजूर वेतनश्रेणीमध्ये तफावत आहे. यास्तव भांडारपाल/ वस्त्रपाल (वेतनश्रेणी एस-६ रु.१९९००-६३२००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय रुग्णालयातील तांत्रिक कर्मचारी (शिंपी, सहायक वस्त्रपाल, वस्त्रपाल, वस्त्रभांडारपाल व इतर तत्सम पदे) यांना ७व्या वेतन आयोगामध्ये एस-६ ही वेतनश्रेणी लागू केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागामध्ये (महिला व बालकल्याण/ सार्वजनिक आरोग्य विभाग/ कारागृह विभाग) इ. ठिकाणी सदर संवर्गातील पदांना मंजूर वेतनश्रेणीमध्ये तफावत आहे. वेतनश्रेणी एस-६ ऐवजी एस-१३ अशी सुधारणा करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** विभागाने प्रस्तुत संवर्गाचा प्रस्ताव सादर करताना विभागाच्या मते समकक्ष असलेल्या अन्य विभागाच्या संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच सेवाप्रवेश नियम इ. बाबत तुलनात्मक अभ्यास करुन, सर्वंकष समर्थनीय वेतनत्रुटी असल्याबाबतचा प्रस्ताव सादर केला

नाही. सदर संदर्भास ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगातही मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२९. शिंपी :-

<u>संघटनेची मागणी:-</u> महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागामध्ये (महिला व बालकल्याण/ सार्वजनिक आरोग्य/ कारागृह विभाग) इ. ठिकाणी सदर संवर्गातील पदांना मंजूर वेतनश्रेणीमध्ये तफावत आहे. सबब, शिंपी ( वेतनश्रेणी एस-६ रु.१९९००-६३२००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-८ रु.२५५००-८११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय रुग्णालयातील तांत्रिक कर्मचारी (शिंपी, सहायक वस्त्रपाल, वस्त्रपाल, वस्त्रभांडारपाल व इतर तत्सम पदे) यांना ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-६ ही वेतनश्रेणी लागू केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागामध्ये (महिला व बालकल्याण/ सार्वजनिक आरोग्य/ कारागृह विभाग) इ. ठिकाणी सदर संवर्गातील पदांना मंजूर वेतनश्रेणीमध्ये तफावत आहे. प्रस्तुत संवर्गाला एस-६ ऐवजी एस-८ अशी सुधारणा करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाचा प्रस्ताव सादर करताना विभागाच्या मते समकक्ष असलेल्या अन्य विभागाच्या संवर्गांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच सेवाप्रवेश नियम इ. बाबत तुलनात्मक अभ्यास करुन, सर्वंकष समर्थनीय वेतनत्रुटी असल्याबाबतचा प्रस्ताव सादर केला नाही. या संवर्गास ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगातही मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

३०. जोडारी, सुतार, बाष्पक परीचर, नळ कारागीर :-

<u>संघटनेची मागणी:-</u> महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागामध्ये (कृषि आयुक्तालय, पोलीस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक) इ. ठिकाणी सदर संवर्गातील पदांना मंजूर वेतनश्रेणीमध्ये तफावती आहेत. सबब, जोडारी, सुतार, बाष्पक परीचर, नळ कारागीर (वेतनश्रेणी एस-६ रु.१९९००-६३२००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-८ रु.२५५००-८११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागामध्ये (कृषि आयुक्तालय, पोलीस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक) इ. ठिकाणी सदर संवर्गातील पदांना मंजूर वेतनश्रेणीमध्ये तफावती आहेत. सबब, सदर पदांना एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> राज्य वेतन सुधारणा समितीच्या (सुब्रमनियन समिती) अहवाल भाग-२ मध्ये वेतनश्रेणीचे सांगीकरण करताना परिच्छेद ४.१२ नुसार माध्यमिक शालांत परीक्षा अधिक २ वर्षाची पदविका/ प्रमाणपत्र ही अर्हता सेवाप्रवेशामध्ये अंतर्भूत असलेल्या पदांकरिता, समितीने रु.४०००-६००० (एस-७) या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानुसार आय.टी.आय. प्रमाणपत्र धारकांसाठी ६ व्या वेतन आयोगात रु. २४०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात

आले आहे. या वेतन संरचनेशी समकक्ष ७ व्या वेतन आयोगामध्ये सुधारित वेतनश्रेणी एस - ८ रु. २५५०० - ८१५०० ही आहे. यामुळे या संवर्गातील आय.टी.आय. प्रमाणपत्र धारकांसाठी एस-६ रु.१९९००-६३२०० ऐवजी एस -८ रु. २५५००-८११०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३१. लिपिक-टंकलेखक :-

संघटनेची मागणी:- लिपिक-टंकलेखक आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अदा करताना ज्या दिनांकास २० वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेली आहे. त्या दिनांकास ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे दि.०१.०४.२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार ७ व्या वेतन आयोगामध्ये आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पुढील पदाच्या वेतनश्रेणीवर काल्पनिक वेतननिश्चिती करुन प्रत्यक्ष लाभ दिनांक ०१.०१.२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संचालनालयाच्या अधिनस्त संस्थेत सन १९९३, १९९४, १९९५ या वर्षात नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगामध्ये सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत २० वर्षाचा दुसरा लाभ अनुक्रमे २०१३, २०१४, २०१५ मध्ये अनुज्ञेय करण्यात आला आहे. तथापि, दिनांक ०५.०३.२०१९ व दिनांक ०७.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदरच्या लाभाची अंमलबजावणी दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून करण्यात आली आहे. परंतु सदरचा लाभ अदा करताना ज्या दिनांकास २० वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेली आहे. त्या दिनांकास ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे दि.०१.०४.२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार ७ व्या वेतन आयोगामध्ये आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पुढील पदाच्या वेतनश्रेणीवर काल्पनिक वेतननिश्चिती करुन प्रत्यक्ष लाभ दिनांक ०१.०१.२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा करुन १२ व २४ वर्षे ऐवजी १०, २० व ३० वर्षांची सुधारित आश्वासित प्रगती योजना दि. ०१/०१/२०१६ पासून अस्तित्वात आली आहे. हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून त्यामुळे बहुसंख्य संवर्गांचा फायदा होत आहे. सेवेच्या कमी कालावधीनंतर पुढील वेतनश्रेणीचा लाभ होत असल्यामुळे सुधारित आश्वासित प्रगती योजना आहे तशीच स्विकारणे हिताचे ठरेल. त्यामुळे दि. ०१/०१/२०१६ पूर्वीची तारीख व काल्पनिक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करणे योजनेच्या तरतुदींनुसार योग्य ठरत नाही.

ब) आयुष संचालनालय

३२. सहायक संचालक,आयुष गट-ब :-

संघटनेची मागणी:- सार्वजनिक आरोग्य विभाग किंवा वैद्यकीय शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेले सहायक संचालकाचे पद एस-२३ या वेतनश्रेणीतील आहे. सबब, सहायक संचालक,आयुष गट-ब (वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२३ रु.६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सार्वजनिक आरोग्य विभाग किंवा वैद्यकीय शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेले सहायक संचालकाचे पद एस-२३ या वेतनश्रेणीतील आहे.

निवासी वैद्यकीय अधिकारी या पदावरुन सहायक संचालक, आयुष या पदावर पदोन्नती देण्यात येणार असल्याने सहायक संचालक आयुष या पदाची वेतनश्रेणी किमान एस-२१ करता येईल, असे विभागाचे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- या संवर्गाला ५व्या , ६व्या व ७व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. प्रस्तुत संवर्गाला वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत नव्याने विचार करण्याकरिता, विभागाने या समितीसमोर कोणतेही नवीन मुद्दे उपस्थित केले नाहीत. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

३३. जिल्हा आयुष अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी</u>:- जिल्हा आयुष अधिकारी हे जिल्हा परीषदेमध्ये कार्यरत असतात. जिल्ह्यातील आयुर्वेद / होमिओपॅथीक/ युनानी दवाखान्यावरील नियंत्रणाचे काम जिल्हा आयुष अधिकारी यांचे असते. सार्वजनिक आरोग्य विभागातील कार्यरत जिल्हा आयुष अधिकारी यांना एस-२० ही वेतनश्रेणी लागू आहे. यास्तव जिल्हा आयुष अधिकारी (वेतनश्रेणी एस-१६ रु.४४९००-१४२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२० रु.५६१००-१७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- जिल्हा आयुष अधिकारी हे जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असतात. जिल्ह्यातील आयुर्वेद / होमिओपॅथीक/ युनानी दवाखान्यावरील नियंत्रणाचे काम जिल्हा आयुष अधिकारी यांचे असते. सार्वजनिक आरोग्य विभागातील कार्यरत जिल्हा आयुष अधिकारी यांना एस-२० ही वेतनश्रेणी लागू आहे. यास्तव आयुष संचालनालयातील सदर पदाला एस-२० ही वेतनश्रेणी लागू करता येईल, असे विभागाचे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वैद्यकीय शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०९/०६/२०२३ अन्वये सदर संवर्गाचे आयुर्वेद विस्तार अधिकारी या पूर्वीच्या पदनामामध्ये बदल करताना, त्यावेळी गट- अ दर्जाची मागणी करता येणार नाही अथवा जिल्हा स्तरावरील इतर संवर्गाशी तुलना करुन त्यांच्याप्रमाणे वेतन संरचनेची मागणी करता येणार नाही अशी अट समाविष्ट करण्यात आली आहे. तसेच सदर संवर्गाचे सेवाप्रवेश नियम सुधारित करुन शैक्षणिक अर्हता सुधारण्याचे विचाराधीन आहे. त्यामुळे वरील बाबींची पूर्तता झाल्याशिवाय उपरोक्त शासन निर्णय प्रमाणे वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करता येणार नाही. या संवर्गाला ५व्या, ६व्या व ७व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

३४. प्रशासकीय अधिकारी गट-ब :-

<u>संघटनेची मागणी</u>:- सुधारित वेतन आयोगामध्ये शासनाच्या विविध विभागामध्ये असलेल्या तृतीय श्रेणीतील पदांच्या दर्जात व वेतनमानात प्रशासकीय अधिकारी पदापेक्षा वाढ करण्यात आलेली आहे. शासनाच्या विविध विभागातंर्गत प्रशासकीय अधिकारी पदावर कार्यरत अधिकाऱ्यांची जबाबदारी व कर्तव्ये ही जवळपास सारखीच असून देखील शासनाच्या विविध विभागातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत तफावत आहे. जसे आयुष संचालनालय अंतर्गत प्रशासकीय अधिकारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर

(एस -१५ रु.४१८००-१३२०००) ही वेतनश्रेणी लागू आहे. परंतु, सातव्या वेतन आयोगानुसार काही विभागातील प्रशासकीय अधिकारी यांना (एस -२० रु. ५६१००-१७७५००) ही वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आली आहे. यास्तव, आयुष संचालनालय अधिनस्त विविध कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी या पदाचा दर्जा वर्ग असा करुन सोबत जोडण्यात आलेल्या विविध विभागातील प्रशासकीय अधिकारी यांना अनुज्ञेय करण्यात आलेल्या वेतनश्रेणीनुसार आयुष संचालनालयातील प्रशासकीय अधिकारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार देण्यात आलेल्या (एस -१५ रु. ४१८००-१३२०००) या वेतनश्रेणी ऐवजी (एस-२० रु. ५६१००-१७७५००) ही वेतनश्रेणी मंजूर करणेत करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर प्रशासकीय अधिकारी, गट-ब, राजपत्रित अशी एकूण १७ पदे मंजूर आहेत. सदर पदावर प्रशासकीय कामकाजाव्यतिरिक्त आहरण व संवितरण अधिकारी, शासकीय जन माहिती अधिकारी, तक्रार निवारण अधिकारी इ. जबाबदारीची कामे पार पाडावी लागतात. आयुष संचालनालयातील प्रशासकीय अधिकारी हे पद वगळता, इतर कार्यालयामध्ये कार्यालयप्रमुख तथा नियंत्रक अधिकारी यांचेनंतर सर्वोच्च जबाबदारीचे पद आहे. महाविद्यालय/रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची मोठया प्रमाणात असलेली संख्या विचारात घेता प्रशासकीय अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी या पदाची जबाबदारी पार पाडणे तसेच सदर पदावर असलेला इतर कर्तव्य व जबाबदाऱ्यांचा भार विचारात घेता, प्रशासकीय अधिकारी पदाची वेतनश्रेणी किमान एस १७ करता येईल असे या विभागाचे मत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत व त्याप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर आहे. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -१५ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

******

## ३.१२ इतर मागास व बहुजन कल्याण विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रु. | मागणी केलेली वेतनश्रेणी रु. |
| | अ) इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे | | | | |
| १ | वसतीगृह अधीक्षक | ५२००-२०२०० | २८०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१२ रु.३२०००-१०१६०० |

अ)इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे

१.वसतीगृह अधीक्षक-:

<u>संघटनेची मागणी :-</u> आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांतील वसतीगृह अधीक्षक (महिला / पुरुष) यांना राज्य वेतन सुधारणा समितीने शिफारस केलेल्या सातव्या वेतन आयोगातील उक्त तक्त्यातील "एस- ८ रु. २५५००-८११००" ऐवजी एस - १२ ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सबब, त्याच धर्तीवर विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक / माध्यमिक निवासी आश्रमशाळांमधील वसतीगृह अधीक्षक यांना एस-८ रु. २५५०० - ८११०० ऐवजी एस-१२ रु. ३२०००-१०१६०० वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांतील वसतीगृह अधीक्षक (महिला / पुरुष) यांना राज्य वेतन सुधारणा समितीने एस-८ ऐवजी एस-१२ रु. ३२०००-१०१६०० हा सुधारित वेतनस्तर मंजूर केला असून त्याच धर्तीवर विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक / माध्यमिक निवासी आश्रमशाळांमधील वसतीगृह अधीक्षक यांना एस-१२ रु. ३२००० -१०१६०० हा सुधारित वेतनस्तर मंजूर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामधून इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन अधिसूचना, दिनांक ०९.०३.२०१७ अन्वये स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील क्षेत्रीय कार्यालये व कर्मचारी इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे वर्ग करण्यात आले आहेत. विभागाने उपलब्ध करून दिलेला तुलनात्मक तक्ता तपासला असता, आदिवासी विकास विभागातील अधीक्षक संवर्गास ५ व्या वेतन आयोगात रु.४०००-६०००, ६ व्या वेतन आयोगात रु.५२०० -२०२०० + ग्रेड वेतन रु.२४०० व ७व्या

वेतन आयोगात एस-८ रु.२५५००-८११०० ही वेतनश्रेणी मंजूर होती तर, इतर मागास बहुजन कल्याण विभागातील वसतीगृह अधीक्षक या संवर्गास ५ व्या वेतन आयोगामध्ये रु.४५००-७००० व ६ व्या वेतन आयोगामध्ये रु.५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.२८०० व ७व्या वेतन आयोगामध्ये एस-८ रु.२५५००-८११०० ही वेतनश्रेणी मंजुर करण्यात आली होती. वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १३.०२.२०२३ अन्वये आदिवासी विकास विभागातंर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील अधीक्षक (पुरुष/ महिला) यांची वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११०० वरुन एस-१२ रु.३२०००-१०१६०० अशी सुधारित करण्यात आली आहे. सबब इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अधिनस्त असलेल्या आश्रमशाळांमधील वसतीगृह अधीक्षक या संवर्गाची शैक्षणिक अर्हता व कामकाजाचे स्वरुप विचारात घेता एस-८ रु.२५५००-८११०० ऐवजी एस-१२ रु.३२०००-१०१६०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

********

३.१३ नियोजन विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ) अर्थ व सांख्यिकी संचालनालय | | | | |
| १ | अपर संचालक | ३७४००-६७००० | ८७०० | एस-२७ रु-१२३१००-२१५९००(खंड-२ नुसार) | बक्षी समिती खंड २-नुसार वेतनश्रेणी मिळावी |
| २ | सह संचालक | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु . ७८८००-२०९२०० (खंड-२ नुसार) | बक्षी समिती खंड २-नुसार वेतनश्रेणी मिळावी. |
| ३ | उप संचालक | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० (खंड-२ नुसार) | बक्षी समिती खंड २-नुसार वेतनश्रेणी मिळावी |
| ४ | संशोधन अधिकारी | ९३००-३४८०० | ४५०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० (खंड-२ नुसार) | बक्षी समिती खंड २-नुसार वेतनश्रेणी मिळावी |
| ५ | सहायक संशोधन अधिकारी | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ६ | सांख्यिकी सहायक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| ७ | अन्वेषक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु .२५५००-८११०० (खंड-२ नुसार) | बक्षी समिती खंड २-नुसार वेतनश्रेणी मिळावी |

अ) अर्थ व सांख्यिकी संचालनालय

१. अपर संचालक :-

संघटनेची मागणी : बक्षी समिती खंड-२ नुसार दि. ०१.०१.२०१६ रोजीची वेतननिश्चिती करताना संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्याचे वेतन हे खंड १ मधील वेतनापेक्षा कमी वेतनावर निश्चित

होत असेल तर संबंधितांचे वेतन संरक्षित करुन त्या वेतनावर नवीन वेतनस्तरावरील लगतच्या वेतनाचा लाभ देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ अन्वये सदर पदाला एस-२७ ही वेतनश्रेणी लागु करण्यात आली आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनत्रुटीसंदर्भातील प्रस्ताव राज्य वेतन त्रुटी निवारण समितीकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दि. १३/०२/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-२५ रु.७८८००-२०९२०० वरुन एस-२७ रु.१२३१००-२१५९००अशी करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे.

तरीही वेतनश्रेणीत वाढ करुनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करुन वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी रास करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तदनंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. सह संचालक :-

<u>संघटनेची मागणी:-</u> बक्षी समिती खंड २ नुसार दि. ०१.०१.२०१६ रोजीची वेतननिश्चिती करताना संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याचे वेतन हे खंड १ मधील वेतनापेक्षा कमी वेतनावर निश्चित होत असेल तर संबंधितांचे वेतन संरक्षित करुन त्या वेतनावर नवीन वेतन स्तरावरील लगतच्या वेतनाचा लाभ देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ अन्वये सदर पदाला एस-२५ ही वेतनश्रेणी लागु करण्यात आली आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनत्रुटीसंदर्भातील प्रस्ताव राज्य वेतन त्रुटी निवारण समितीकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दि. १३/०२/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-२३ रु.७८८००-२०९२०० वरुन एस-२५ रु.१२३१००-२१५९००अशी करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक

वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे.

तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. उप संचालक :-

<u>संघटनेची मागणी:-</u> बक्षी समिती खंड २ नुसार दि. ०१.०१.२०१६ रोजीची वेतननिश्चिती करताना संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्याचे वेतन हे खंड १ मधील वेतनापेक्षा कमी वेतनावर निश्चित होत असेल तर संबंधितांचे वेतन संरक्षित करुन त्या वेतनावर नवीन वेतन स्तरावरील लगतच्या वेतनाचा लाभ देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ अन्वये सदर पदाला एस-२३ ही वेतनश्रेणी लागु करण्यात आली आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनत्रुटीसंदर्भातील प्रस्ताव राज्य वेतन त्रुटी निवारण समितीकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वित्त विभाग, शासन निर्णय दि. १३/०२/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-२३ रु.७८८००-२०९२०० वरुन एस-२५ रु.१२३१००-२१५९००अशी करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे.

तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. संशोधन अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी:-</u> बक्षी समिती खंड २ नुसार दि. ०१.०१.२०१६ रोजीची वेतननिश्चिती करताना संबंधित अधिकारी/ कर्मचा-याचे वेतन हे खंड १ मधील वेतनापेक्षा कमी वेतनावर निश्चित होत असेल तर संबंधितांचे वेतन संरक्षित करुन त्या वेतनावर नवीन वेतन स्तरावरील लगतच्या वेतनाचा लाभ देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ अन्वये सदर पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनत्रुटीसंदर्भातील प्रस्ताव राज्य वेतन त्रुटी निवारण समितीकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-१५ रु.००-०० वरुन एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशीच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधिताना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे.

तरीही वेतनश्रेणीत वाढ करुनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करुन वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करुन वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करुन नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. सहायक संशोधन अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी:-</u> अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील सहायक संशोधन अधिकारी हे पद भारतीय सांख्यिकी दुय्यम सेवेतील वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी ग्रे. वे. ६६०० या पदाशी समकक्ष पद असल्याने सदर पदाला एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील सहायक संशोधन अधिकारी पदाची वेतनश्रेणी एस-१४ ऐवजी एस-१५ करण्यात यावी अशी विनंती संचालनालयाने

केली आहे. याबाबतचा प्रस्ताव राज्य वेतनत्रुटी समितीकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाकडील केंद्रीय सांख्यिकी सहायक या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ५व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केलेली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये वेतन त्रुटी आढळत नाही.

६. सांख्यिकी सहायक :-

<u>संघटनेची मागणी</u>:- सांख्यिकी सहायक (वेतनश्रेणी एस-१० रु.२९२००-९२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सांख्यिकी सहायक पदाची वेतनश्रेणी एस-१० ऐवजी एस-१३ करण्यात यावी अशी विनंती संचालनालयाने केली आहे. याबाबतचा प्रस्ताव राज्य वेतनत्रुटी समितीकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- सांख्यिकी सहायक संवर्गास वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) रु.१२०० - २०४० वेतनश्रेणी मंजूर केली होती. या संवर्गाची किमान शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन ५ व्या वेतन आयोगात राज्य सुधारणा समिती, १९९७ ने समकक्ष वेतनश्रेणीहून उच्च रु. ४५००-७००० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गास सदर वेतनश्रेणी मंजूर केली होती. या वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ६ व्या व ७ व्या वेतन आयोगात विहीत केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये वेतन त्रुटी आढळत नाही.

७. अन्वेषक :-

<u>संघटनेची मागणी</u>:- बक्षी समिती खंड २ नुसार दि. ०१.०१.२०१६ रोजीची वेतननिश्चिती करताना संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्याचे वेतन हे खंड १ मधील वेतनापेक्षा कमी वेतनावर निश्चित होत असेल तर संबंधितांचे वेतन संरक्षित करुन त्या वेतनावर नवीन वेतन स्तरावरील लगतच्या वेतनाचा लाभ देण्यात यावा.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- शासन निर्णय दि. १३.०२.२०२३ अन्वये सदर पदाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनत्रुटीसंदर्भातील प्रस्ताव राज्य वेतन त्रुटी निवारण समितीकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-६ रु.००-०० वरुन एस-८ रु. २५५००-८११०० अशी करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२२/०२/२०२४ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशींच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी

समोर आलेल्या त्रुटीबाबत संबंधितांना जुन्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतन संरक्षित करण्यात आले आहे.

तरीही वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चित करतेवेळी काही कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी राहते. वेतन संरक्षित करून वेतनश्रेणी वाढीचा निर्णय लागू होत नसल्यामुळे वेतन त्रुटी झाली आहे. या संवर्गाच्या नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन निश्चती करते वेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या कर्मचाऱ्यांना त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे जेणे करून नवीन वेतन श्रेणीत वेतन पूर्वी पेक्षा कमी राहणार नाही, अशी शिफारिश करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

---

३.१४ सार्वजनिक आरोग्य विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रु. | मागणी केलेली वेतनश्रेणी रु. |
| | अ) आरोग्य सेवा संचालनालय | | | | |
| १ | उपसंचालक (वाहतूक) | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० | एस- २७ रु. १२३१००-२१५९०० |
| २ | जिल्हा आरोग्य अधिकारी | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० (खंड-२ नुसार एस-२४ रु.७११००-२११९००) | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० |
| ३ | जिल्हा शल्य चिकित्सक | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० (खंड-२ नुसार एस-२४ रु.७११००-२११९००) | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० |
| ४ | वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० |
| ५ | सहायक संचालक (वाहतूक) | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ६ | मुख्य प्रशासकीय अधिकारी | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००- | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | १७७५०० | |
| ७ | वैद्यकीय अधिकारी गट-अ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० (३५% व्यवसाय रोध भत्ता लागू करणे, केंद्र शासनाप्रमाणे इतर भत्ते लागू करणे, आश्वासित प्रगती योजना लागू करताना सर्व वैद्यकीय अधिकारी यांना एस-२५ वेतनश्रेणी लागू करणे) |
| ८ | वैद्यकीय अधिकारी गट-ब | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ९ | सांख्यिकी अधिकारी | ९३००-३४८०० | ४५०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-३६ रु.४४९००-१४२४०० |
| १० | जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२००० | एल-२२ रु.६००००-१९०८०० |
| ११ | जिल्हा हिवताप अधिकारी संवर्ग | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १२ | सार्वजनिक आरोग्य परिचारिका निर्देशिका | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १३ | पाठ्यनिर्देशिका | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १४ | सेवा व्यवस्थापक/भांडार अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १५ | आरोग्य | ९३००- | ४४०० | एस-१५ रु. | एस-२० रु.५६१००- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | साधनसामग्री देखभाल अधिकारी (गट-ब) | ३४८०० | | ४१८०० - १३२३०० | १७७५०० |
| १६ | जीव वैद्यकीय अभियंता सामान्य राज्य सेवा गट -ब | ९३००- ३४८०० | ४४०० | एस -१५ रु. ४१८०० - १३२३०० | एस -२० रु .५६१०० - १७७५०० |
| १७ | अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| १८ | समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| १९ | समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| २० | व्यवसायोपचार तज्ञ | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| २१ | अधिक्षक | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस-१५ रु.४१८००- १३२३०० |
| २२ | परिसेविका | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| २३ | बालरुग्ण तज्ञ परिचारीका | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| २४ | आहारतज्ञ | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस -१६ रु.४४९००- १४२४०० |
| २५ | इ.सी.जी. तंत्रज्ञ | ९३००- ३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००- ११२४०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० |
| २६ | आरोग्य पर्यवेक्षक | ९३००- ३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००- | एस-१५ रु .४१८००- १३२००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ११२४०० | |
| २७ | सहायक अधिक्षक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| २८ | अधिपरिचारीका | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| २९ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ३० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (सध्याचे पदनाम प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी) | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ३१ | रक्त पेढी तंत्रज्ञ (सध्याचे पदनाम रक्त पेढी वैज्ञानिक अधिकारी) | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ३२ | औषध निर्माता | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| ३३ | अभिलेखापाल | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| ३४ | नेत्र चिकित्सा अधिकारी | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| ३५ | आरोग्य निरीक्षक | ५२००-२०२०० | २५०० | एस-९ रु.२६४००-८३६०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| ३६ | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ३७ | दंत आरोग्यक | ५२००- | २४०० | एस-८ | एस-१३ रु.३५४०० - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०२०० | | रु.२५५००-८११०० | ११२४०० |
| ३८ | सांख्यिकी अन्वेषक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ३९ | दंतयांत्रिकी व दंत तंत्रज्ञ | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ४० | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| ४१ | अर्धकुशल कारागीर | ५२००-२०२०० | १८०० | एस-५ रु.१८०००-५६९०० | एस-७ रु.२१७००-६९१०० |
| ४२ | पुरुष परिचर (मनोरुग्णालय) | ४४४०-७४४० | १६०० | एस-३ रु.१६६००-५२४०० | एस-५ रु.१८०००-५६९०० |
| ४३ | अकुशल कारागीर | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ रु.१५०००-४७६०० | एस-३ रु.१६६००-५२४०० |
| ४४ | अकुशल कारागीर (तांत्रिक) | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ रु.१५०००-४७६०० | एस-३ रु.१६६००-५२४०० |

अ) आरोग्य सेवा संचालनालय

१. उपसंचालक (वाहतूक) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- उपसंचालक ( वाहतूक ) हे पद केंद्र शासनातील अधिक्षक अभियंता या पदाला समकक्ष आहे. सदर पदावरील नियुक्ती ही थेट भरती असून अभियांत्रिकी पदवी व १० वर्षाचा तांत्रिक अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून होते. प्रस्तुत पदाचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेता, वेतनश्रेणीत एस-२५ रु. ७८८००- २०९२०० या ऐवजी एस- २७ रु.१२३१००-२१५९००अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पद हे राज्यस्तरीय विभागप्रमुखाचे असून राज्यातील ७० जिल्हा कार्यशाळा , १६ विभागीय कार्यशाळा आणि मुख्यालय व उपमुख्यालय येथे कार्यरत आहे. प्रस्तुत पदाला शासकीय मालमत्तेचे व्यवस्थापन, संनियंत्रण, देखभाल, दुरुस्ती व अनुषंगिक कामकाज करण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. सदर पद सामान्य राज्य गट -अ सेवेतील

असून वैद्यकीय संवर्गातील उपसंचालक पदास आयुक्तालयांतर्गत एस-२५ वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे. त्यामुळे सदर पदास सद्य:स्थितीमध्ये अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी योग्य आहे.

समितीची शिफारस :- सदर पद हे सामान्य राज्य गट -अ सेवेतील असून वैद्यकीय संवर्गातील उपसंचालक पदास आयुक्तालयांतर्गत एस-२५ वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे. त्यामुळे सदर पदास सद्य:स्थितीमध्ये अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी योग्य आहे या विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत आहे. तसेच वेतन सामानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

२. जिल्हा आरोग्य अधिकारी :-

संघटनेची मागणी:- जिल्हा आरोग्य अधिकारी (वेतनश्रेणी एस-२३ रु.६७७००-२०८७००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२५ रु. ७८८००- २०९२०० अशी सुधारणा करण्यात यावी. वैद्यकीय अधिकारी गट- अ (वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५०० ) या पदाच्या वेतनश्रेणीत कार्यरत अधिकाऱ्यांना ३५ % व्यवसाय रोध भत्ता लागू करून दि. ०१.०१.२०१६ पासून आजपर्यंतची फरकाची रक्कम रोखीने देण्यात यावी. केंद्र शासनाप्रमाणे इतर भत्ते लागू करणे, आश्वासित प्रगती योजना लागू करताना सर्व वैद्यकीय अधिकारी यांना सरसकट एस -२५ वेतनश्रेणी लागू करणे. केंद्र शासन व इतर राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टर्स अधिकाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग यांना वेतन , भत्ते व अनुषंगिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने शिफारस विनंती स्वीकृत करण्यात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्रस्तुत संवर्गाला खंड -२ मध्ये एस-२४ ची मागणी होती. तथापि, वित्त विभागाने दिनांक १३.०२.२०२३ अन्वये एस-२५ लागू केला आहे. सबब, निवडश्रेणी वेतनस्तर एस-२४ व एस-२५ यापैकी कोणत्या द्यावा. तसेच दिनांक ०१.०१.२०१६ ते २८.०२.२०२३ या कालावधीत सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सदरचे लाभ देण्याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १३.०२.२०२३ नुसार जिल्हा आरोग्य अधिकारी या संवर्गाला एस-२४ रु.७११००-२११९०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू केली आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ अन्वये २५% पदांना निवडश्रेणी वेतनस्तर एस-२५ मंजूर करण्याबाबत आवश्यक त्या स्पष्ट सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी नाहीत. तसेच भत्त्यासंबंधी निर्णय घेणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून, वेतनत्रुटी समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

३. जिल्हा शल्य चिकित्सक:-

संघटनेची मागणी:- केंद्र शासन व इतर राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टर्स अधिकाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व

विशेषज्ञ संवर्ग यांना वेतन , भत्ते व अनुषंगिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने शिफारस विनंती स्वीकृत कराव्यात. जिल्हा शल्य चिकित्सक (वेतनश्रेणी एस-२३ रु.६७७००-२०८७००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२५ रु. ७८८००- २०९२०० अशी सुधारणा करण्यात यावी. वैद्यकीय अधिकारी गट- अ ( वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५०० ) या पदाच्या वेतनश्रेणीत कार्यरत अधिकाऱ्यांना ३५ % व्यवसाय रोध भत्ता लागू करुन दि. ०१.०१.२०१६ पासून आजपर्यंची फरकाची रक्कम रोखीने देण्यात यावी. केंद्र शासनाप्रमाणे इतर भत्ते लागू करणे, आश्वासित प्रगती योजना लागू करताना सर्व वैद्यकीय अधिकारी यांना सरसकट एस -२५ वेतनश्रेणी लागू करणे. केंद्र शासन व इतर राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टर्स अधिकाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग यांना वेतन, भत्ते व अनुषंगिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने शिफारस विनंती स्वीकृत कराव्यात.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** प्रस्तुत संवर्गाला खंड -२ मध्ये एस-२४ ची मागणी होती. तथापि, वित्त विभागाने दिनांक १३.०२.२०२३ अन्वये एस-२५ लागू केला आहे. तसेच, निवडश्रेणी वेतनस्तर एस-२४ व एस-२५ यापैकी कोणत्या द्यावा. शल्य चिकित्सक ऐवजी जिल्हा शल्यचिकित्सक असे शुद्धिपत्रक निर्गमित करावे. तसेच दिनांक ०१.०१.२०१६ ते २८.०२.२०२३ या कालावधीत सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सदरचे लाभ देण्याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

<u>**समितीची शिफारस**</u> :- वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ नुसार जिल्हा आरोग्य अधिकारी या संवर्गाला एस-२४ रु.७११००-२११९०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू केली आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ अन्वये निवडश्रेणी वेतनस्तर मंजूर करण्याबाबत आवश्यक त्या स्पष्ट सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी नाहीत. तसेच भत्त्यासंबंधी निर्णय घेणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून, वेतनत्रुटी समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

**४. वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग :-**

<u>**संघटनेची मागणी**</u> :- वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग (वेतनश्रेणी एस-२३ रु.६७७००-२०८७००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२५ रु. ७८८००- २०९२०० अशी सुधारणा करण्यात यावी. वैद्यकीय अधिकारी गट- अ ( वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५०० ) या पदाच्या वेतनश्रेणीत कार्यरत अधिकाऱ्यांना ३५ % व्यवसाय रोध भत्ता लागू करुन दि. ०१.०१.२०१६ पासून आजपर्यंची फरकाची रक्कम रोखीने देण्यात यावी. केंद्र शासनाप्रमाणे इतर भत्ते लागू करणे, आश्वासित प्रगती योजना लागू करताना सर्व वैद्यकीय अधिकारी यांना सरसकट एस -२५ वेतनश्रेणी लागू करणे. केंद्र शासन व इतर राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टर्स अधिकाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग यांना वेतन , भत्ते व अनुषंगिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने शिफारस विनंती स्वीकृत कराव्यात.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग (वेतनश्रेणी एस-२३ रु.६७७००-२०८७००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२५ रु. ७८८००- २०९२०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही. तसेच भत्त्यासंबंधी निर्णय घेणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून, वेतनत्रुटी समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

५. सहाय्यक संचालक ( वाहतूक ) :-

**संघटनेची मागणी:-** सहाय्यक संचालक ( वाहतूक ) हे पद केंद्र शासनातील कार्यकारी अभियंता या पदाला समकक्ष आहे. सदर पदावरील नियुक्ती ही थेट भरती असून अभियांत्रिकी पदवी व ५ वर्षांचा तांत्रिक अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून होते. प्रस्तुत पदाचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेता, सदर पदाच्या वेतनश्रेणीत एस-२० रु.५६१००-१७७५०० ऐवजी एस-२३ रु.६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सदर पद हे अभियांत्रिकी संवर्गातील असून राज्यातील ३५ जिल्हा कार्यशाळा , ८ विभागीय कार्यशाळा आणि मुख्यालय व उपमुख्यालय येथे कार्यरत आहे. प्रस्तुत पदाला शासकीय मालमत्तेचे व्यवस्थापन, संनियंत्रण, देखभाल, दुरुस्ती व अनुषंगिक कामकाज करण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. सदर पद हे सामान्य राज्य गट -अ सेवेतील असून वेतनश्रेणी इतर सामान्य राज्य सेवा गट-अ पदांशी समकक्ष असल्याने एकसमान वेतनश्रेणी असणे आवश्यक आहे. यास्तव सदर पदास अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी योग्य आहे.

**समितीची शिफारस :-** सदर पद हे सामान्य राज्य गट -अ सेवेतील असून वेतनश्रेणी इतर सामान्य राज्य सेवा गट-अ पदांशी समकक्ष असल्याने एकसमान वेतनश्रेणी असणे आवश्यक आहे. यास्तव सदर पदास अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी योग्य आहे, या विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत आहे. तसेच वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

६. मुख्य प्रशासकीय अधिकारी :-

**संघटनेची मागणी:-** प्रशासकीय कामकाजाचा व्याप व अतिरिक्त जबाबदारी लक्षात घेता तसेच इतर विभागातील पदांची वेतनश्रेणी पाहता आरोग्य विभागातील पदांची वेतनश्रेणी कमी असून तफावत आहे. मुख्य प्रशासकीय अधिकारी (वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२३ रु. ६७७००-२०८७०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :-** मुख्य प्रशासकीय अधिकारी पद एकाकी पद असल्याने त्यास पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाही. यास्तव बक्षी समितीने शिफारस केल्यामुळे निवडश्रेणी वेतनस्तर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतल्यानंतर लागू करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u> :-** विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन तथ्य सादर केलेले नाही. तसेच सादर संवर्ग बहुतांश शासकीय कार्यालयात वेगवेगळ्या वेतनश्रेणीत कार्यरत आहेत. सबब, एका कार्यालयातील पदाची वेतनश्रेणी सुधारित करणे योग्य ठरणार नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणी मध्ये त्रुटी आढळत नाही.

आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणे हा शासनाचा धोरणात्मक शासन निर्णय दिनांक २८/०३/२०२३ रोजीचा असून त्यानुसारच सर्व संवर्गांना लाभ देण्यात येत आहे.

**७. वैद्यकीय अधिकारी गट-अ :-**

**<u>संघटनेची मागणी</u>:-** केंद्र शासन व इतर राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टर्स अधिकाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग यांना वेतन, भत्ते व अनुषंगिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने शिफारस विनंती स्वीकृत करण्यात. वैद्यकीय अधिकारी गट- अ (वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५००) व विशेषज्ञ संवर्ग (वेतनश्रेणी एस-२३ रु.६७७००-२०८७००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-२५ रु. ७८८००-२०९२०० अशी सुधारणा करण्यात यावी. वैद्यकीय अधिकारी गट- अ (वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५००) या पदाच्या वेतनश्रेणीत कार्यरत अधिकाऱ्यांना ३५ % व्यवसाय रोध भत्ता लागू करुन दि. ०१.०१.२०१६ पासून आजपर्यंची फरकाची रक्कम रोखीने देण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :-** वैद्यकीय अधिकारी (गट-अ) यांच्या अनुषंगाने आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून प्राप्त झालेला वेतनत्रुटी बाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी समितीच्या विचारार्थ पाठविण्यास हरकत नसावी.

**<u>समितीची शिफारस</u> :-** प्रस्तुत संवर्गाला आश्वासित प्रगती योजनेमध्ये एस-२३ ऐवजी एस-२५ ही वेतनश्रेणी कोणत्या कारणास्तव लागू करण्यात यावी याबाबत विभागाने कोणतेही कारण दिलेले नाही. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ अन्वये आश्वासित प्रगती योजना व निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ते निर्देश देण्यात आले आहेत. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही. तसेच भत्त्यासंबंधी निर्णय घेणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून, वेतनत्रुटी समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

**८. वैद्यकीय अधिकारी गट-ब :-**

**<u>संघटनेची मागणी</u> :-** सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गातील अधिकारी यांना एस-१६ ही वेतनश्रेणी तर वैद्यकीय

अधिकारी (जिल्हा तांत्रिक सेवा) गट-ब BAMS यांना एस-२० ही वेतनश्रेणी लागू आहे. मूळ गट-ब या संवर्गात सर्व BAMS वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. सदर पदे प्रामुख्याने दुर्गम व ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे येथे कार्यरत आहेत. सबब, सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये एस-१६ ऐवजी एस-२० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> गट-ब वैद्यकीय अधिकारी या संवर्गाला सध्या लागू असलेल्या वेतनश्रेणीमध्ये वेतन तफावत निर्माण झाली आहे असे दिसून येत नाही. तथापि, सामान्य राज्यसेवा दंतशल्य चिकित्सक या संवर्गासाठी एस-२० ही वेतनश्रेणी मंजूर आहे. विभागामध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गात समान पद समान कर्तव्य व जबाबदाऱ्या मात्र वेतनात तफावत आहे असे पद नाही.

<u>समितीची शिफारस :-</u> राज्यात जिल्हा तांत्रिक सेवा गट ब (जिल्हा परिषद), महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट- ब या स्वतंत्र आणि परस्पर पूरक सेवा कार्यरत होत्या. महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ हा संवर्ग उपरोक्त २ संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. सद्य:स्थितीत शासनाने दिनांक ०३.०१.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून, न्यायालयीन आदेशानुसार जिल्हा तांत्रिक सेवा मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिनांक १८.०७.२०१३ पासून गट-अ मध्ये थेट समावेशन केले आहे. तसेच या निर्णयातील परिच्छेद ३ प्रमाणे अन्य कोणत्याही वैद्यकीय अधिकारी गट-ब यांना हा निर्णय लागू असणार नाही, असा स्पष्टपणे उल्लेख केला आहे. तसेच इतर संवर्ग दंत शल्य चिकित्सक, अधिसेविका या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न असून, त्यांच्या वेतनश्रेणीशी केलेली तुलना समर्थनीय नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

९. सांख्यिकी अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी:-</u> अर्थ व सांख्यिकी संचालनालय सांख्यिकी अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-१६ आहे. तथापि, आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सांख्यिकी अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-१५ अशी आहे. सांख्यिकी अधिकारी (वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्या कार्यालयातील सांख्यिकी अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-१६ अशी आहे. तथापि, आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सांख्यिकी अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस- १५ अशी आहे. सदर दोन्ही पदांची शैक्षणिक अर्हता, सेवा प्रवेश नियम आणि कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. त्यामुळे समान काम- समान वेतन या तत्वानुसार आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील सांख्यिकी अधिकारी या पदास एस- १६ ही वेतन श्रेणी मंजूर करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील सांख्यिकी

अधिकारी व संशोधन अधिकारी हे दोन्ही संवर्ग स्वतंत्र असून, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील संशोधन अधिकारी या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी एस-१६ अशी सुधारित करण्यात आली आहे. तथापि, सांख्यिकी अधिकारी संवर्गास एस-१५ हीच वेतनश्रेणी मंजूर आहे. आरोग्य सेवा आयुक्तालयातील प्रस्तुत संवर्गास ४थ्या, ५व्या, ६व्या वेतनआयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतनआयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

१०. जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी ( गट -ब ) :-

संघटनेची मागणी:- सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन येथील जिल्हा विस्तार व आरोग्य अधिकारी व आंध्रप्रदेश राज्यातील जिल्हाविस्तार अधिकारी व आरोग्य अधिकारी या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. सबब, समान पदाप्रमाणे प्रस्तुत संवर्गाला एस-१५ ऐवजी आंध्रप्रदेश येथील जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-२२ रु.६०००० -१९०८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्रस्तुत पद हे राजपत्रित पद आहे. या पदाची कार्यकक्षा ही संपूर्ण जिल्हा आहे. सदर संवर्गातील अधिकारी जिल्हा आरोग्य कार्यालयाबरोबरच जिल्हा शल्य चिकित्सक या कार्यालयाची सुद्धा आरोग्य विषयक प्रचार पाहतात. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस-२२ ही किमान वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- संघटनेने आंध्र प्रदेश राज्यातील जिल्हा विस्तार व आरोग्य अधिकारी या संवर्गाशी केलेली तुलना अप्रस्तुत आहे. वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी हे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरले जाते व राजपत्रित वर्ग-२ चे पद आहे. तसेच सदर संवर्गास जिल्हास्तरावरील प्रशासकीय व वित्तीय अधिकार देण्यात आलेले आहेत. प्रस्तुत संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता सदर संवर्गास एस-१६ रु. ४४९००-१४२४०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस आहे.

११. जिल्हा हिवताप अधिकारी संवर्ग :-

संघटनेची मागणी :- अवैद्यकीय आरोग्य अधिकारी व जिल्हा हिवताप अधिकारी ही पदे याच पदोन्नतीच्या साखळीतील पुढील पदे असल्यामुळे त्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणे क्रमप्राप्त आहे. यास्तव सदर संवर्गाची वेतनश्रेणी एस-१७ अशी सुधारित करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- आरोग्य कर्मचारी, आरोग्य निरीक्षक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, अवैधकीय आरोग्य अधिकारी या पदोन्नती साखळीतील वरिष्ठ पद व निम्न पदांची वेतनश्रेणी समान होत असल्याने पदोन्नती पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक असल्यामुळे समान काम समान वेतन या तत्वानुसार या विभागातील उक्त संवर्गाच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- जिल्हा हिवताप अधिकारी हा संवर्ग अवैद्यकीय आरोग्य अधिकारी या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. अवैद्यकीय आरोग्य अधिकारी या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये एस-१४ ऐवजी एस-१५ ही सुधारणा करण्याची शिफारस मान्य झाल्यास अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) व जिल्हा हिवताप अधिकारी या दोन्ही संवर्गाची वेतनश्रेणी समान होईल. यास्तव प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीतही सुधारणा करणे आवश्यक ठरेल. सबब, जिल्हा हिवताप अधिकारी या संवर्गाला एस-१५ रु. ४१८००-१३२३०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१२. सार्वजनिक आरोग्य परिचारिका निर्देशिका :-

संघटनेची मागणी:- सार्वजनिक आरोग्य परिचारीका निर्देशिका हे पद सार्वजनिक आरोग्य परिचारीका या पदापेक्षा वरिष्ठ आहे. तथापि, असे असताना सार्वजनिक आरोग्य परिचारीका निर्देशिका या पदाची वेतनश्रेणी कमी ठेवण्यात आली आहे. सबब, सार्वजनिक आरोग्य परिचारिका निर्देशिका ( वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ रु.४७६००- १५११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सार्वजनिक आरोग्य परिचारीका निर्देशिका हे पद सार्वजनिक आरोग्य परिचारीका या पदापेक्षा वरिष्ठ आहे. तथापि, असे असताना सार्वजनिक आरोग्य परिचारीका निर्देशिका या पदाची वेतनश्रेणी कमी ठेवण्यात आली असल्याने वेतनश्रेणी मधील असमानता दूर होणे आवश्यक असून वेतनश्रेणी एस-१७ अशी सुधारित होणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ नुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक अधिसेविका या संवर्गाला एस- १५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू केली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील सार्वजनिक आरोग्य परिचारिका निर्देशिका व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक अधिसेविका या दोन्ही संवर्गांना चौथ्या वेतन आयोगापासून समान वेतनश्रेणी लागू आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस-१७ रु.४७६००-१५११०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१३. पाठ्यनिर्देशिका :-

संघटनेची मागणी:- ७ व्या वेतन आयोगामध्ये सदर पदाचा विचार करण्यात आलेला नाही. नवीन सेवाप्रवेश नियमानुसार सदर पद हे वरिष्ठ असल्याने पाठ्यनिर्देशिका ( वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१७ रु.४७६००- १५११०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ७ व्या वेतन आयोगामध्ये सदर पदाचा विचार करण्यात आलेला नाही. नवीन सेवाप्रवेश नियमानुसार सदर पद हे वरिष्ठ असल्याने वेतनश्रेणी एस-१७ अशी सुधारित होणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याच्या अनुषंगाने कोणतेही समर्थनीय कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. तदव, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१४. सेवा व्यवस्थापक/ भांडार अधिकारी :-

संघटनेची मागणी:- सदर पदाच्या समकक्ष इतर केंद्रीय तसेच राज्य शासकीय विभागातील पदांना एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर बाब तसेच पदाची कर्तव्ये जबाबदाऱ्या आणि कार्यक्षेत्र व कामकाजाचे स्वरुप विचारात घेता, सेवा व्यवस्थापक/ भांडार अधिकारी ( वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पदाच्या समकक्ष इतर केंद्रीय तसेच राज्य शासकीय विभागातील पदांना एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर बाब तसेच पदाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि कार्यक्षेत्र व कामकाजाचे स्वरुप विचारात घेता सदर पदास एस-२० ही वेतनश्रेणी सुधारित होणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाकडील तसेच राज्य शासकीय विभागातील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास ४ थ्या , ५ व्या व ६ व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यास समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगातही मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१५. आरोग्य साधनसामग्री देखभाल अधिकारी ( गट ब ):-

संघटनेची मागणी:- आरोग्य साधनसामग्री देखभाल अधिकारी व वरिष्ठ जीव वैद्यकीय अभियंता ही पदे समकक्ष आहेत. या राज्यस्तरिय मंजूर पदाच्या अर्हता कार्यव्याप्ती कर्तव्य व जबाबदाऱ्या आणि पदाचा दर्जा विचारात घेता, प्रस्तुत संवर्गाच्या ( एस -१५ रु. ४१८०० - १३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस -२० रु. ५६१०० - १७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

शासकीय विभागाचे अभिप्राय :- आरोग्य साधनसामग्री देखभाल अधिकारी हे अभियांत्रिकी संवर्गातील पद आहे. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत संदर्भ सेवा रुग्णालय येथील वरिष्ठ जीव वैद्यकीय अभियंता गट ब पदाच्या मंजूर वेतनश्रेणी (१५६०० -३९१०० ग्रे. वे. रु. ५४०० व ७ व्या वेतन आयोगानुसार एस - २० रु. ५६१०० -१७७५००) आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या समान अर्हतेच्या इतर अभियांत्रिकी विभाग जसे की, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जलसंपदा विभागातील राज्यस्तरीय अभियांत्रिकी अधिकाऱ्यांना मंजूर वेतनश्रेणीप्रमाणे ७ व्या वेतन आयोगानुसार आरोग्य साधनसामग्री देखभाल अधिकारी पदाकरिता, एस -२० ही वेतनश्रेणी मंजूर होणे योग्य वाटते.

समितीची शिफारस :- आरोग्य साधनसामग्री देखभाल अधिकारी हे अभियांत्रिकी संवर्गातील राज्यस्तरीय पद आहे. या संवर्गाचे कामकाजाचे स्वरुप, कामाचा विस्तार, उपकरणे व

साधनसामुग्रीची संख्या, अखत्यारीखालील अभियांत्रिकी व तांत्रिक कर्मचारी यांची जबाबदारी ही सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत संदर्भ सेवा रुग्णालयास मंजूर वरिष्ठ जीव वैद्यकीय अभियंता पदाच्या कर्तव्ये व जबाबदारी व कामकाज समकक्ष असल्यामुळे प्रस्तुत संवर्गास एस-१५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस-१७ रु. ४७६००-१५११०० ही वेतनश्रेणी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे. प्रसंगत: नमूद करण्यात येते की, आरोग्य साधनसामुग्री देखभाल अधिकारी व जीव वैद्यकीय अभियंता हे दोन्ही संवर्ग समकक्ष आणि गट-ब मध्ये असल्यामुळे त्यांना एकसमान वेतनश्रेणी मंजूर करणे योग्य ठरेल.

१६. जीव वैद्यकीय अभियंता सामान्य राज्य सेवा गट :-

<u>संघटनेची मागणी</u>:- आरोग्य साधनसामुग्री देखभाल व दुरुस्ती विभागांतर्गत जीव वैद्यकीय अभियंता हे राज्य स्तरावरील व परिमंडळ स्तरावरील कार्यरत पद आहे. आरोग्य साधनसामुग्री देखभाल अधिकारी पदाचे समकक्ष असलेल्या जीव वैद्यकीय अभियंता या पदाच्या अर्हता अनुभव कार्यव्याप्ती कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेता प्रस्तुत संवर्गाला ( एस -१५ रु. ४१८०० - १३२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस -२० रु. ५६१०० - १७७५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत संदर्भ सेवा रुग्णालय येथील वरिष्ठ जीव वैद्यकीय अभियंता गट ब पदाच्या मंजूर वेतनश्रेणी (१५६०० -३९१०० ग्रे. वे. रु. ५४०० व ७ व्या वेतन आयोगानुसार एस - २० रु. ५६१०० -१७७५००) आहे. वरिष्ठ जीव अभियंता हे पद संस्थास्तर तर जीव वैद्यकीय अभियंता हे राज्यस्तरीय पद आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या समान अर्हतेच्या इतर अभियांत्रिकी विभाग जसे की, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जलसंपदा विभागातील राज्यस्तरीय अभियांत्रिकी अधिकाऱ्यांना मंजूर वेतनश्रेणीप्रमाणे ७ व्या वेतन आयोगानुसार जीव वैद्यकीय अभियंता पदाकरिता, एस -२० ही वेतनश्रेणी मंजूर होणे योग्य ठरेल.

<u>समितीची शिफारस</u> :- जीव वैद्यकीय अभियंता ही अभियांत्रिकी संवर्गातील राज्यस्तरीय पदे आहेत. जीव वैद्यकीय अभियंता या संवर्गाचे प्रारुप सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार सदर संवर्गाचे कामकाजाचे स्वरुप, कामाचा विस्तार, उपकरणे व साधनसामुग्रीची संख्या, अखत्यारीखालील अभियांत्रिक व तांत्रिक कर्मचारी यांची जबाबदारी इ.बाबी विचारात घेता, सदर संवर्गाला एस-१५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस आहे. तसेच संदर्भ रुग्णालयात या पदाची वेतनश्रेणी एस -२० रु. ५६१०० - १७७५०० दर्शविली आहे, त्या संदर्भ रुग्णालयामध्ये जीव वैद्यकीय अभियंता या पदाशी समकक्ष असल्यामुळे व संवर्ग गट-ब मध्ये असल्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी एस-१७ रु.४७६००-१५११०० मंजूर करण्यात यावी. प्रसंगत: असे निदर्शनास आले आहे की, संदर्भ रुग्णालयात अद्याप या पदांवर नियमित नियुक्त्या नसून झालेल्या नियुक्त्या कंत्राटी पद्धतीने झाल्याचे आढळते.

१७. अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमातील हे जिल्हास्तरीय पद आहे. आरोग्य पर्यवेक्षक या पदाचे पदोन्नतीचे पद आहे. या पदास पदोन्नतीचे निम्न पदाप्रमाणे एस-१४ ही समान वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. तथापि, आरोग्य सेवा

संचालनालयातील वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक आरोग्य परिचारिका निर्देशक या समकक्ष पदास एस-१५ ही वेतनश्रेणी लागू आहे. सदर पदांचे सेवाप्रवेश नियम व कर्तव्य आणि जबाबदाऱ्या समान असल्यामुळे अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) ( वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६०० १२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- आरोग्य कर्मचारी, आरोग्य निरीक्षक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, अवैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदोन्नती साखळीतील वरिष्ठ पद व निम्न पदांची वेतनश्रेणी समान होत असल्याने पदोन्नती पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक असल्यामुळे समान काम समान वेतन या तत्वानुसार या विभागातील उक्त संवर्गाच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) हा संवर्ग आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये एस-१३ ऐवजी एस-१४ ही सुधारणा करण्याची शिफारस मान्य झाल्यास आरोग्य पर्यवेक्षक व अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) या दोन्ही संवर्गाची वेतनश्रेणी समान होईल. यास्तव प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीतही सुधारणा करणे आवश्यक ठरेल. सबब, अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) या संवर्गाला एस-१४ रु. ३८६००-१२२८०० ऐवजी एस-१५ रु. ४१८००-१३२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१८. समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय):-

<u>संघटनेची मागणी</u>:- समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) या पदाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या आणि रुग्णालयाच्या उपयोगी असे पद असल्याने, समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय ( वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु. ४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदरील संवर्गाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेता सदर संवर्गास एस-१४ वेतनस्तर वरुन एस-१६ या वाढीव वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी केलेली मागणी ही त्रुटी नसून अधिकची वेतनश्रेणी मिळण्यासंबंधी आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१९. समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) :-

<u>संघटनेची मागणी</u>:- समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) या पदाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या आणि रुग्णालयाच्या उपयोगी असे पद असल्याने, समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) ( वेतनश्रेणी एस-

१४ रु. ३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु. ४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदरील संवर्गाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेता सदर संवर्गास एस-१४ वेतनस्तर वरुन एस-१६ या वाढीव वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी केलेली मागणी ही त्रुटी नसून अधिकची वेतनश्रेणी मिळण्यासंबंधी आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२०. व्यवसायोपचार तज्ञ :-

<u>संघटनेची मागणी:- :-</u> प्रस्तुत संवर्गाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेता, व्यवसायोपचार तज्ञ ( वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु. ४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सहसंचालक (पुणे) यांचे दिनांक १०.०५.२०२४ रोजीचे पत्रान्वये सदर संवर्गास एस-२० देण्याची मागणी केली आहे. सदर पदाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेता सदर संवर्गाची वेतनश्रेणी एस-१६ सुधारित करणे आवश्यक आहे..

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी केलेली मागणी ही त्रुटी नसून अधिकची वेतनश्रेणी मिळण्यासंबंधी आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२१. अधिक्षक :-

<u>संघटनेची मागणी</u>:- शासन निर्णय दिनांक २०.०२.२०१७ अन्वये विधि व न्याय विभागातील अधिक्षक पदाप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिक्षक ( वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-आयुक्तालयांतर्गत असलेल्या अधिक्षक या पदाची ७ व्या वेतन आयोगातील पदाची वेतनश्रेणी एस-१५ अशी सुधारित करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणतेही ठोस कारण दिलेले नाही. या संवर्गाची तुलना विधि व न्याय विभागातील अधिक्षक संवर्गाशी केली आहे. परंतु वेतनसमानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) या संवर्गाला विधि व न्याय विभागातील अधिक्षक या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गाला ६ व्या वेतन

आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२२. परिसेविका :-

संघटनेची मागणी:- नवीन सेवाप्रवेश नियमानुसार परिसेविका/सार्वजनिक आरोग्य परिचारीका/ मनोरुग्ण तज्ञ परिचारीका/ बालरुग्ण तज्ञ परिचारीका ही पदे समकक्ष असल्यामुळे परिसेविका ( वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-१२२६००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- नविन सेवाप्रवेश नियमानुसार परिसेविका/सार्वजनिक आरोग्य परिचारीका/ मनोरुग्ण तज्ञ परिचारीका/ बालरुग्ण तज्ञ परिचारीका ही पदे समकक्ष असल्यामुळे वेतनश्रेणी एस-१६ अशी समान होणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- सार्वजनिक आरोग्य परिचारिका/बालरोग परिचारिका / मनोरुग्ण परिचारिका या संवर्गांना अधिकची विशेष शैक्षणिक अर्हता विहित असून त्यांचे कामकाज सर्वस्वी भिन्न आहे असे विभागाकडून सांगण्यात आले. त्यामुळे या संवर्गाची उपरोक्त नमूद तिन्ही संवर्गाशी तुलना होऊ शकत नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२३. बालरुग्ण तज्ञ परिचारीका :-

संघटनेची मागणी:- वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये विभागातील बालरुग्ण तज्ञ परिचारीका या संवर्गाला एस-१४ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. बालरुग्ण तज्ञ परिचारीका या संवर्गाचे कामकाज दोन्ही विभागातील समान असल्याने, सार्वजनिक आरोग्य विभागातील बालरुग्ण तज्ञ परिचारीका ( वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-१२२६००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- नविन सेवाप्रवेश नियमानुसार परिसेविका/सार्वजनिक आरोग्य परिचारीका/ मनोरुग्ण तज्ञ परिचारीका/ बालरुग्ण तज्ञ परिचारीका ही पदे समकक्ष असल्यामुळे वेतनश्रेणी एस-१६ अशी समान होणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ नुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील बालरुग्ण परिचारिका या संवर्गाला एस-१४ रु. ३८६००-१२२८०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू केली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील बालरुग्ण तज्ञ परिचारिका व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील बालरुग्ण परिचारिका या दोन्ही संवर्गांना ४ थ्या वेतन आयोगापासून समान वेतनश्रेणी लागू आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२४. आहारतज्ञ :-

**संघटनेची मागणी:-** केंद्र शासनाच्या Dietician या संवर्गास एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. आहारतज्ञ ( वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> केंद्र शासनाच्या Dietician या संवर्गास एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या सदर पदाची वेतनश्रेणी सुधारित करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाकडील आहारतज्ञ या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास ४ थ्या , ५ व्या व ६ व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यास समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगातही मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२५. ई.सी.जी. तंत्रज्ञ :-

<u>संघटनेची मागणी:-</u> डायलिसिस तंत्रज्ञ, फिजिओथेरपी, हिस्टोपॅथ तंत्रज्ञ, रसायन तंत्रज्ञ, आहारतज्ञ या संवर्गांना एस-१४ ही वेतनश्रेणी लागू आहे. ई.सी.जी. तंत्रज्ञ हे पद उपरोक्त संवर्गांना समकक्ष असल्याने प्रस्तुत संवर्गाच्या (वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु.३८६००-१२२८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> "समान काम समान वेतन" या तत्वानुसार डायलिसिस तंत्रज्ञ, फिजिओथेरपी, हिस्टोपॅथ तंत्रज्ञ, रसायन तंत्रज्ञ, आहारतज्ञ या संवर्गाप्रमाणेच या विभागातील ई. सी. जी. तंत्रज्ञ संवर्गाच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्यांना एस -१४ रु.३८६००-१२२८०० अशी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन तथ्य सादर केलेले नाही. तुलना केलेल्या डायलिसिस तंत्रज्ञ, फिजिओथेरपी, हिस्टोपॅथ तंत्रज्ञ, रसायन तंत्रज्ञ, आहारतज्ञ या संवर्गांना पूर्वीपासूनच वेगवेगळी वेतनश्रेणी मंजूर आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी ७ व्या वेतन आयोगात समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

२६. आरोग्य पर्यवेक्षक :-

<u>संघटनेची मागणी:-</u> आरोग्य पर्यवेक्षक हा संवर्ग प्रयोगशाळा तंत्रज्ञ (एस-१३) आणि आरोग्य सहायक (एस-९) या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. आरोग्य पर्यवेक्षक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ या दोन्ही संवर्गाची वेतनश्रेणी समान असल्याने आरोग्य पर्यवेक्षक ( वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१५ रु.४१८००-१३२००० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>. आरोग्य कर्मचारी, आरोग्य निरीक्षक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) या पदोन्नती साखळीतील

वरिष्ठ ५८ व निम्न पदांची वेतनश्रेणी समान होत असल्याने पदोन्नती पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक असल्यामुळे समान काम समान वेतन या तत्वानुसार या विभागातील प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्यांना सातव्या वेतन आयोगातील सुधारित सुधारित वेतनश्रेणी मंजूर करावी.

<u>समितीची शिफारस :-</u> आरोग्य पर्यवेक्षक हा संवर्ग प्रयोगशाळा तंत्रज्ञ (एस-१३) आणि आरोग्य सहायक (एस-९) या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. प्रयोगशाळा तंत्रज्ञ या निम्न संवर्गास एस-१३ ही वेतन मंजूर असल्याने आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. सबब, आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गाला एस-१३ रु. ३५४००-११२४०० ऐवजी एस-१४ रु. ३८६००-१२२८०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२७. सहायक अधिक्षक :-

<u>संघटनेची मागणी:-</u> शासन निर्णय दिनांक २०.०२.२०१७ अन्वये विधि व न्याय विभागातील सहायक अधिक्षक पदाप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागातील सहायक अधिक्षक ( वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु.३८६००-१२२८०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सहायक अधिक्षक या पदाची ७ व्या वेतन आयोगातील पदाची वेतनश्रेणी एस-१४ अशी सुधारित करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणतेही ठोस कारण दिलेले नाही. या संवर्गाची तुलना विधि व न्याय विभागातील सहायक अधिक्षक संवर्गाशी केली आहे. परंतु वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) या संवर्गाला विधि व न्याय विभागातील सहायक अधिक्षक या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२८. अधिपरिचारीका :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या अधिपरिचारीका संवर्गाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत यास्तव अधिपरिचारीका ( वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु.३८६००-१२२८००अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** कर्तव्य व जबाबदाऱ्यांच्या अनुषंगाने एस-१४ ही वेतनश्रेणी सुधारित होणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग)प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाच्या कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. विभागाने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील

असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजुर केली आहे. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२९. क्ष-किरण तंत्रज्ञ :-

**संघटनेची मागणी:-** सदर पदाचे कामकाज तांत्रिक स्वरुपाचे असून, एमआरआय काढणे, एक्सरे काढणे इ. कामकाज पार पाडावे लागते. सदर पदाच्या कामकाजाचे स्वरुप विचारात घेता, ( वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४००अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सदर पदाचे कार्य क्ष-किरण विभागातील तांत्रिक स्वरुपाचे असून एमआयआर काढणे, एक्स रे काढणे अशी कर्तव्ये सदर पदावर काम करणाऱ्या कर्मचारी यांना करावी लागतात. त्यामुळे पदाच्या जबाबदारीस अनुसरुन वेतनश्रेणी एस-१६ अशी सुधारित करणे आवश्यक आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) या संवर्गाचे तांत्रिक स्वरुप लक्षात घेऊन रु १४००-२३०० वेतन श्रेणीची शिफारस केली होती व त्यानुसार सदर वेतनश्रेणी मंजूर केली होती या संवर्गाला ५ व्या , ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे.या संवर्गाला मंजुर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

३०. प्रयोगशाळा तंत्रज्ञ :-

**संघटनेची मागणी:-** परिचारिका, बालरोग परिचारिका, माध्यमिक शिक्षक, पोलीस निरीक्षक इत्यादी पदांना लागु असलेली प्रयोगशाळा तंत्रज्ञ ( वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१६ रु.४४९००-१४२४००अशी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाचे कर्तव्य तांत्रिक स्वरुपाचे आहे. पदाच्या कर्तव्य व जबाबदारीनुसार ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी एस-१६ अशी सुधारित होणे आवश्यक आहे.

**समितीची शिफारस :-** सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक ०६.०६.२०१६ अन्वये प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाचे पदनाम बदलून प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी असे करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयानुसार या पदांच्या वेतन व भत्ते व तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये कोणताही फरक पडणार नसल्याने भविष्यात नामसाधर्म्याच्या आधारे उच्च वेतनश्रेणी व राजपत्रित दर्जा देण्याची मागणी करता येणार नाही, या अटीसह मंजूरी देण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

३१. रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी:-</u> ६ व्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेणी घेणाऱ्या बालरोग परिचारीका, शिक्षक, पोलीस निरीक्षक या पदांना ७ व्या वेतन आयोगात वेतनश्रेणी एस-१५ व एस-१६ लागू करण्यात आली. तथापि, रक्त पेढी वैज्ञानिक अधिकारी ही पदे विज्ञान पदवीधर असताना सदर समकक्ष पदाना समान वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे. वास्तव, रक्त पेढी वैज्ञानिक अधिकारी ( वेतनश्रेणी एस-१३ रु.३५४००-११२४०० ) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१५ रु.४१८००-१३२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- ६ व्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेणी घेणाऱ्या बालरोग परिचारीका, शिक्षक, पोलीस निरीक्षक या पदांना ७ व्या वेतन आयोगात वेतनश्रेणी एस-१५ व एस-१६ लागू करण्यात आली. तथापि, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी व रक्त पेढी वैज्ञानिक अधिकारी ही पदे विज्ञान पदवीधर असताना सदर समकक्ष पदांना समान वेतनश्रेणी लागू करण्याच्या दृष्टीने प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी व रक्त पेढी वैज्ञानिक अधिकारी या पदांनाही एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबत संघटनानी विनंती केली आहे. त्यानुसार गुणवत्तेनुसार समितीने कृपया निर्णय घ्यावा.

<u>समितीची शिफारस :-</u> सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक ०६.०६.२०१६ अन्वये रक्तपेढी तंत्रज्ञ या पदाचे पदनाम बदलून रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी असे करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयानुसार या पदांच्या वेतन व भत्ते व तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये कोणताही फरक पडणार नसल्याने भविष्यात नामसाधर्म्याच्या आधारे उच्च वेतनश्रेणी व राजपत्रित दर्जा देण्याची मागणी करता येणार नाही, या अटीसह मंजूरी देण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

३२. औषध निर्माता :-

<u>संघटनेची मागणी:-</u> राज्य शासनाच्या सेवेतील कनिष्ठ अभियंता, अव्वल कारकून, सहायक अधिक्षक या संवर्गाची शैक्षणिक अर्हता औषध निर्माता संवर्गापेक्षा न्यूनतम असूनही या संवर्गांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू आहे. समान काम, समान वेतन या तत्वानुसार औषध निर्माता ( वेतनश्रेणी एस-१० रु.२९२००-९२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> राज्य शासनाच्या सेवेतील कनिष्ठ अभियंता, अव्वल कारकून, सहायक अधिक्षक या संवर्गाची शैक्षणिक अर्हता औषध निर्माता संवर्गापेक्षा न्यूनतम असूनही या संवर्गांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू असल्याने समान काम समान वेतन या तत्वानुसार या विभागातील औषध निर्माता संवर्गाच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्यांना एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन तथ्य सादर केलेले नाही. तुलना केलेल्या कनिष्ठ अभियंता, अव्वल कारकून, सहायक

अधिक्षक या संवर्गाना पूर्वीपासूनच वेगवेगळी वेतनश्रेणी मंजूर आहे तसेच सदर पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या व औषध निर्माता या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

३३. अभिलेखापाल :-

<u>संघटनेची मागणी:-</u> राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागामध्ये अभिलेखापाल या पदाची ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी एस-१३ अशी आहे. यास्तव अभिलेखापाल (वेतनश्रेणी एस-१० रु.२९२००-९२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागामध्ये अभिलेखापाल या पदाची ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी एस-१३ या व समान कर्तव्ये व जबाबदाऱ्या असणाऱ्या पदास समान वेतनश्रेणी असणे आवश्यक आहे. त्यामुळे या विभागाच्या अभिलेखापाल संवर्गासही एस-१३ अशी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> सार्वजनिक आरोग्य विभागातील अभिलेखापाल व वैद्यकीय शिक्षण विभागातील अभिलेखापाल यांच्या वेतनश्रेणीमध्ये ३ ऱ्या वेतन आयोगापासून भिन्न आहे. विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याच्या अनुषंगाने कोणतेही नवीन तथ्य दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

३४. नेत्र चिकित्सा अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी:-</u> नेत्रचिकित्सा अधिकारी हे एकाकी पद असून सदर संवर्गास पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. केंद्र शासनाकडील तसेच इतर राज्यात नेत्र चिकित्सा अधिकारी या संवर्गाकरिता, पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे. सबब, नेत्र चिकित्सा अधिकारी (वेतनश्रेणी एस १० रु.२९२००-९२३००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१४ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> नेत्रचिकित्सा अधिकारी हे एकाकी पद असून सदर संवर्गास पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. केंद्र शासनाकडील तसेच इतर राज्यात नेत्र चिकित्सा अधिकारी या संवर्गाकरिता, पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे. सदर बाब तसेच, सदर पदाच्या शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेऊन सदर पदास एस-१४ ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत संघटनांकडून विनंती करण्यात येत असल्यामुळे त्या संदर्भात समितीने गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा.

<u>समितीची शिफारस :-</u> सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक २६.११.२००८ अन्वये नेत्रचिकित्सा सहाय्यक या पदाचे पदनाम बदलून नेत्रचिकित्सा अधिकारी असे करण्यात आले

आहे. सदर शासन निर्णयानुसार या पदांच्या कर्तव्यात अथवा वेतन व भते यानध्ये कोणताही बदल होणार नाही. या अटीसह मंजूरी देण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी नाही.

३५. आरोग्य निरीक्षक :-

संघटनेची मागणी:- आरोग्य कर्मचारी या निम्न संवर्गातून आरोग्य निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात येते. ७ व्या वेतन आयोगातील बक्षी समिती खंड-२ मध्ये आरोग्य कर्मचारी या पदास एस-९ मंजूर करण्यात आली आहे. तथापि, पदोन्नतीच्या आरोग्य निरीक्षक या पदाचीही वेतनश्रेणी एस-९ अशी असल्याने निम्न संवर्गाची व पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी समान झाली आहे. आरोग्य निरीक्षक ( वेतनश्रेणी एस-९ रु.२६४०० -८३६००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१३ रु.३५४००-११२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- राष्ट्रीय किटकजन्य रोग कार्यक्रम अंतर्गत आरोग्य कर्मचारी या निम्न संवर्गातून आरोग्य निरिक्षक या पदावर पदोन्नती देण्यात येते. ७ व्या वेतन आयोगातील बक्षी समिती खंड-२ मध्ये आरोग्य कर्मचारी या पदास एस-९ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. तथापि, पदोन्नतीच्या आरोग्य निरिक्षक या पदाचीही वेतनश्रेणी एस-९ अशी असल्याने निम्न संवर्गाची व पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी समान झाली आहे. त्यामुळे आरोग्य निरिक्षक पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सदर कर्मचाऱ्यांच्या संघटनांकडून एस-१३ अशी सुधारित वेतनश्रेणी मिळण्याबाबत मागणी करण्यात येत असून त्या संदर्भात समितीने गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा.

समितीची शिफारस :- आरोग्य निरीक्षक हा संवर्ग आरोग्य कर्मचारी या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ आरोग्य कार्यकर्ता या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये एस-८ ऐवजी एस-९ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. यास्तव आरोग्य कर्मचारी व आरोग्य निरीक्षक या दोन्ही संवर्गाची वेतनश्रेणी समान होत आहे. यास्तव प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीतही सुधारणा करणे आवश्यक ठरेल. सबब, आरोग्य कर्मचारी या संवर्गाला एस-९ रु. २६४००- ८३६०० ऐवजी एस-१० रु. २९२००-९२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३६. वरिष्ठ लिपिक :-

संघटनेची मागणी:- लेखा व कोषागारे मध्ये सदर पदांची वेतनश्रेणी एस-१३ अशी सुधारित करण्यात आली आहे. केंद्र शासनामध्ये ॲटोमिक एनर्जी मधील वरिष्ठ लिपिकाला एस-१३ ही वेतनश्रेणी लागू आहे. वरिष्ठ लिपिक ( वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० रु.२९२००-९२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- लेखा व कोषागारे मध्ये सदर पदांची वेतनश्रेणी एस-१३ अशी सुधारित करण्यात आली आहे. केंद्र शासनामध्ये ॲटोमिक एनर्जी मधील वरिष्ठ लिपिकाला एस-

१३ ही वेतनश्रेणी लागू आहे. त्यानुसार वरिष्ठ लिपिक या पदाला एस-१० ही वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणतेही ठोस कारण दिलेले नाही. तसेच वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) या संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्ग महाराष्ट्र शासनाच्या बहुतांश कार्यालयांमध्ये कार्यरत आहे.सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

३७. दंत आरोग्यक :-

<u>संघटनेची मागणी:-</u> केंद्र शासनाच्या Dental Hygienist या संवर्गास एस-१३ ही वेतनश्रेणी लागू आहे. सबब सदर संवर्गास कामकाजाचे स्वरुप विचारात घेता, दंत आरोग्यक ( वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीस एस-१० रु.२९२०० -९२३००अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> केंद्र शासनाच्या Dental Hygienist या संवर्गास एस-१३ ही वेतनश्रेणी आहे. त्यामुळे सदर पदाची वेतनश्रेणी एस-१३ अशी सुधारित करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) दंत आरोग्यक या पदाला केंद्र शासनातील दंत आरोग्य तज्ञ या पदाला समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-८ रु.२५५००-८११०० ही लागू करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

३८. सांख्यिकी अन्वेषक :-

<u>संघटनेची मागणी:-</u> अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्या कार्यालयात समकक्ष पद सांख्यिकी सहायक या पदनामाने असून सदर पदाची वेतनश्रेणी एस-१० आहे. तथापि, आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सांख्यिकी अन्वेषक या पदाची वेतनश्रेणी पदाचे राज्य आरोग्य व जिवनविषयक आकडेवारी, पुणे या कार्यालयातील सांख्यिकी अन्वेषक या पदाची वेतनश्रेणी एस-८ अशी आहे. सदर दोन्ही पदांची शैक्षणिक अर्हता, सेवा प्रवेश नियम आणि कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. त्यामुळे समान काम समान वेतन या तत्वानुसार आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या सांख्यिकी अन्वेषक (वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० रु.२९२००-९२३०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्या कार्यालयात समकक्ष पद सांख्यिकी सहाय्यक या पदनामाने असून सदर पदाची वेतनश्रेणी एस -१० अशी आहे. तथापि, आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सांख्यिकी अन्वेषक या पदाची वेतनश्रेणी पदाचे व राज्य आरोग्य व जीवनविषयक आकडेवारी, पुणे या कार्यालयातील सांख्यिकी अन्वेषक या पदाची

वेतनश्रेणी एस-८ अशी आहे. सदर दोन्ही पदांची शैक्षणिक अर्हता, सेवा प्रवेश नियम आणि कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. त्यामुळे समान काम समान वेतन या तत्वानुसार आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील सांख्यिकी अन्वेषक या पदास एस-१० ही वेतन श्रेणी मंजूर करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या, ५व्या, ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

३९. दंतयांत्रिकी व दंत तंत्रज्ञ :-

संघटनेची मागणी:- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात सदर पदाचे समकक्ष पद दंततंत्रज्ञ असे असून दंतयांत्रिकी व दंत तंत्रज्ञ ( वेतनश्रेणी एस-७) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-१० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात सदर पदाचे समकक्ष पद दंततंत्रज्ञ असे असून सदर पदाला एस-१० ही वेतनश्रेणी लागू आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागातील दंत तंत्रज्ञ या पदाची सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक अर्हता तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्या समान आहेत. सबब, सदर पदासाठी एस-१० मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामध्ये दंत तंत्रज्ञ हा संवर्ग कार्यरत असून सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये दंत यांत्रिक हा संवर्ग कार्यरत आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील दंत तंत्रज्ञ व सार्वजनिक आरोग्य विभागातील दंत यांत्रिक यांचे सेवाप्रवेश नियम तपासले असता सार्वजनिक आरोग्य विभागातील दंत तंत्रज्ञ यांची शैक्षणिक अर्हता वैद्यकीय शिक्षण विभागातील दंत तंत्रज्ञ या पदापेक्षा निम्न आहे. तसेच प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये ३ ऱ्या वेतन आयोगापासून तफावत आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी नाही.

४०. लिपिक नि टंकलेखक :-

संघटनेची मागणी:- शासन निर्णय दिनांक ०६.०६.२०१७ अन्वये प्रस्तुत संवर्गाची शैक्षणिक अर्हता पदवी करण्यात आली असल्याने टंकलेखक नि लिपिक ( वेतनश्रेणी एस-६ रु.१९९००-६३२००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-८ रु.२५५००-८१५०० अशी सुधारणा करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शैक्षणिक अर्हता पदवी करण्यात आली असल्याने एस-८ ही वेतनश्रेणी लागू करणे योग्य ठरते.

**<u>समितीची शिफारस :-</u>** विभागाने प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणतेही ठोस कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्ग महाराष्ट्र शासनाच्या बहुतांश कार्यालयांमध्ये कार्यरत आहे.सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

**४१. अर्धकुशल कारागीर :-**

**<u>संघटनेची मागणी:-</u>** तांत्रिक कामकाजाचे स्वरुप आणि तांत्रिक शैक्षणिक अर्हता असूनही सदर पदास अत्यल्प शैक्षणिक अर्हता असणाऱ्या शिपाई, स्वच्छतागार या पदांएवढीच वेतनश्रेणी या पदावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय आहे. अर्धकुशल कारागीर ( वेतनश्रेणी एस -५ रु.१८०००-५६९००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-७ रु.२१७००-६९१०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>** तांत्रिक कामकाजाचे स्वरुप आणि तांत्रिक शैक्षणिक अर्हता असूनही सदर पदास अत्यल्प शैक्षणिक अर्हता असणाऱ्या शिपाई, स्वच्छतागार या पदांएवढीच वेतनश्रेणी या पदावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय आहे. त्यामुळे या पदास एस-७ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

**<u>समितीची शिफारस :-</u>** विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

**४२. पुरुष परिचर (मनोरुग्णालय) :-**

**<u>संघटनेची मागणी:-</u>** सदर संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या या मनोरुग्ण आणि मनोरुग्णालय प्रशासनाच्या उपयोगी असल्याने पुरुष परिचर (मनोरुग्णालय) ( वेतनश्रेणी एस-३ रु.१६६००-५२४००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-५ रु.१८०००-५६९०० अशी सुधारणा करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>** सदर संवर्गास एस-३ वेतनस्तर वरुन एस-५ या वाढीव वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक आहे. सदर संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या या मनोरुग्ण आणि मनोरुग्णालय प्रशासनाच्या उपयोगी असल्याने वेतनस्तर वाढविण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस :-</u>** विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी केलेली मागणी ही त्रुटी नसून अधिकच्या वेतनश्रेणी मिळण्यासंबंधी आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

**४३. अकुशल कारागीर :-**

**<u>संघटनेची मागणी:-</u>** तांत्रिक कामकाजाचे स्वरुप आणि तांत्रिक शैक्षणिक अर्हता असूनही सदर पदास अत्यल्प शैक्षणिक अर्हता असणाऱ्या शिपाई, स्वच्छतागार या पदांएवढीच वेतनश्रेणी या

पदावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय आहे. अकुशल कारागीर ( वेतनश्रेणी एस-१ रु.१५०००-४७६००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-३ रु.१६६००-५२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- तांत्रिक कामकाजाचे स्वरुप आणि तांत्रिक शैक्षणिक अर्हता असूनही सदर पदास अत्यल्प शैक्षणिक अर्हता असणाऱ्या शिपाई, स्वच्छतागार या पदांएवढीच वेतनश्रेणी या पदावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय आहे. त्यामुळे या पदास एस-३ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

४४. अकुशल कारागीर (तांत्रिक) :-

<u>संघटनेची मागणी</u>:- तांत्रिक कामकाजाचे स्वरुप आणि तांत्रिक शैक्षणिक अर्हता असूनही सदर पदास अत्यल्प शैक्षणिक अर्हता असणाऱ्या शिपाई, स्वच्छतागार या पदांएवढीच वेतनश्रेणी या पदावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय आहे. अकुशल कारागीर ( वेतनश्रेणी एस-१ रु.१५०००-४७६००) या पदाच्या वेतनश्रेणीत एस-३ रु.१६६००-५२४०० अशी सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :-तांत्रिक कामकाजाचे स्वरुप आणि तांत्रिक शैक्षणिक अर्हता असूनही सदर पदास अत्यल्प शैक्षणिक अर्हता असणाऱ्या शिपाई, स्वच्छतागार या पदांएवढीच वेतनश्रेणी या पदावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय आहे. त्यामुळे या पदास एस-३ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

****************

## ३.१५ सार्वजनिक बांधकाम विभाग

<u>प्रस्तावाचा सारांश</u>

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ) सार्वजनिक बांधकाम विभाग सर्व मंडळे | | | | |
| १ | विशेष अधीक्षक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस १८ रु.४९१००-१५५८०० |
| २ | प्रमुख आरेखक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ३ | आरेखक श्रेणी-१ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ४ | अधीक्षक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ५ | प्रथम लिपिक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ६ | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ७ | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१२ रु.३२०००-१०१६०० |
| ८ | कनिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ९ | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | आश्वासित प्रगती योजनेचा मिळणेबाबत |
| | ब) मुख्य अभियंता (विद्युत) | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | तारतंत्री | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ २५५००-८१९०० |
| | क) संचालक, उपवने व उद्याने | | | | |
| ११ | संचालक | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| १२ | सहायक संचालक | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| १३ | उद्यान अधीक्षक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १४ | उद्यान पर्यवेक्षक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| | ड) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन | | | | |
| १५ | कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १६ | सहायक कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |

अ)सार्वजनिक बांधकाम विभाग सर्व मंडळे

१ विशेष अधीक्षक-:

संघटनेची मागणी :- प्रस्तुत संवर्ग हा लिपिकवर्गीय संवर्ग आहे. शासनाने आरोग्य विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, महसूल विभाग, विक्रिकर विभाग, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय खुद्द इ. विभागातील लिपिक समकक्ष पदांच्या वेतन श्रेण्या बदलुन दिल्या असून त्यांचा लाभ आमच्या दोन्ही विभागांना दिलेला नाही. सबब, शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेवून लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय दूर करावा. सदर संवर्गाला एस-१५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस १८ रु.४९१००-१५५८०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना., महाराष्ट्र राज्य, नाशिक व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ लिपिक ते विशेष अधीक्षक या संवर्गातील पदांना

सुधारित वेतनसंरचना मिळणेबाबत सादर केलेला प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समिती, २०२४ समोर सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून त्याप्रमाणे वेतनश्रेणीही घेत आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -१५ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

२ प्रमुख आरेखक:-

<u>संघटनेची मागणी :-</u> प्रमुख आरेखक हे पद १०० टक्के आरेखक श्रेणी-१ मधून पदोन्नतीने भरण्यात येत असल्यामुळे उच्च शैक्षणिक अर्हता व पदोन्नतीचे पद तसेच प्रादेशिक स्तराच्या कार्यालयातील अतिरिक्त जबाबदारीचे कार्यकारी पद असल्यामुळे प्रमुख आरेखक पदास रू.५४००/- एस-२० हा वेतनस्तर मंजूर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- प्रमुख आरेखक हे पद १०० टक्के आरेखक श्रेणी-१ मधून पदोन्नतीने भरण्यात येत असल्यामुळे उच्च शैक्षणिक अर्हता व पदोन्नतीचे पद असून प्रादेशिक स्तराच्या कार्यालयातील अतिरिक्त जबाबदारीचे कार्यकारी दर्जाचे असल्यामुळे एस-२० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

३ आरेखक श्रेणी-१ :-

<u>संघटनेची मागणी</u> :- वेतनश्रेणीची जुनी समानता कायम ठेवून आरेखक श्रेणी-१ या पदाला ७व्या वेतन आयोगात कनिष्ठ अभियंता या पदाप्रमाणे रू.४४००/- ग्रेड पे म्हणजेच एस-१५ हा वेतनस्तर एस-१४ ऐवजी देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- ५ व्या, ६ व्या व ७ व्या आयोगामध्ये आरेखक श्रेणी-१ या पदाची वेतनश्रेणी अभियांत्रिकी संवर्गातील कनिष्ठ अभियंता या पदाच्या वेतनश्रेणीशी समान आहे. वास्तव कनिष्ठ अभियंता यांना देय केलेली उच्च वेतनश्रेणी एस-१५ ही आरेखक श्रेणी-१ या पदाला मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ (सुकथनकर समिती- भाग-२) परिच्छेद क्र.४.१४ अन्वये तांत्रिक क्षेत्रात दरम्यान झालेल्या प्रगतीनुसार ५ व्या केंद्रीय वेतन आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे अनुरेखक

श्रेणीतील पदे टप्प्याटप्प्याने समाप्त करण्याबाबत शिफारस केली आहे. या शिफारशीच्या अनुषंगाने झालेल्या प्रगतीबाबत अद्यापही ज्ञात झाले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

४.अधीक्षक :-

संघटनेची मागणी :- प्रस्तुत संवर्ग हा लिपिक वर्गीय संवर्ग आहे. शासनाने आरोग्य विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, महसूल विभाग, विक्रिकर विभाग, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय खुद्द इ. विभागातील लिपिक समकक्ष पदांच्या वेतनश्रेण्या बदलून दिल्या असून त्यांचा लाभ आमच्या दोन्ही विभागांना दिलेला नाही. सबब, शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेऊन लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय दूर करावा. सदर संवर्गाला एस-१४ रु.३८६००-१२२८०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, नाशिक व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ लिपिक ते विशेष अधीक्षक या संवर्गातील पदांना सुधारित वेतनसंरचना मिळणेबाबत सादर केलेला प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समिती, २०२४ समोर सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-१४ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

५.प्रथम लिपिक:-

संघटनेची मागणी :- प्रस्तुत संवर्ग हा लिपिक वर्गीय संवर्ग आहे. शासनाने आरोग्य विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, महसूल विभाग, विक्रिकर विभाग, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय खुद्द इ. विभागातील लिपिक समकक्ष पदांच्या वेतन श्रेण्या बदलुन दिल्या असुन त्यांचा लाभ आमच्या दोन्ही विभागांना दिलेला नाही. सबब, शासनाने जाणिवपुर्वक निर्णय घेवन लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय दुर करावा. सदर संवर्गाला एस-१३ रु.३५४०० -११२४०० ऐवजी एस-१५ रु.४१८००-१३२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, नाशिक व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ लिपिक ते विशेष अधीक्षक या संवर्गातील पदांना

सुधारित वेतनसंरचना मिळणेबाबत सादर केलेला प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समिती, २०२४ समोर सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून त्याप्रमाणे वेतनश्रेणीही मंजूर आहे. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -१३ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

६.स्थापत्य अभियांत्रिकी सहायक :-

<u>संघटनेची मागणी :-</u> सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी ही छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व सोलापूर महानगर पालिकेमध्ये कार्यरत असणाऱ्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यका प्रमाणे एस-१० ही वेतनश्रेणी देण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> एस-८ ऐवजी एस-१० वेतनश्रेणी मिळणेबाबतचे निवेदन वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

७.वरिष्ठ लिपिक :-

<u>संघटनेची मागणी :-</u> प्रस्तुत संवर्ग हा लिपिक वर्गीय संवर्ग आहे. शासनाने आरोग्य विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, महसूल विभाग, विक्रिकर विभाग, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय खुद्द इ. विभागातील लिपिक समकक्ष पदांच्या वेतन श्रेण्या बदलून दिल्या असून त्यांचा लाभ आमच्या दोन्ही विभागांना दिलेला नाही. सबब, शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेऊन लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय दूर करावा. सदर संवर्गाला एस-८ रु.२५५००-८११०० ऐवजी एस-१२ रु.३२०००-१०१६०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, नाशिक व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ लिपिक ते विशेष अधीक्षक या संवर्गातील पदांना सुधारित वेतनसंरचना मिळणेबाबत सादर केलेला प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समिती, २०२४ समोर सादर करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून त्याप्रमाणे वेतनश्रेणीही मंजूर आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -८ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

८.कनिष्ठ लिपिक :-

**संघटनेची मागणी :-** प्रस्तुत संवर्ग हा लिपिक वर्गीय संवर्ग आहे. शासनाने आरोग्य विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, महसूल विभाग, विक्रिकर विभाग, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय खुद्द इ. विभागातील लिपिक समकक्ष पदांच्या वेतन श्रेण्या बदलुन दिल्या असून त्यांचा लाभ आमच्या दोन्ही विभागांना दिलेला नाही. सबब, शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेऊन लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय दूर करावा. सदर संवर्गाला एस-६ रु.१९९००-६३२०० ऐवजी एस-१० रु.२९२००-९२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, नाशिक व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ लिपिक ते विशेष अधीक्षक या संवर्गातील पदांना सुधारित वेतनसंरचना मिळणेबाबत सादर केलेला प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समिती, २०२४ समोर सादर करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असून त्याप्रमाणे वेतनश्रेणीही मंजूर आहे. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -६ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

९.लिपिक-टंकलेखक:- क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक संवर्ग

**संघटनेची मागणी :-** दि.१.१.२०१६ पूर्वी ज्या दिनांकास आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय होतो त्या दिनांकास त्यांची प्रथमतः सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करण्यात यावी व पुढील वेतनवाढी अनुज्ञेय करून तद्नंतर सातव्या वेतन आयोगात वेतननिश्चिती करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वी ज्या दिनांकास लाभ अनुज्ञेय होता त्या दिनांकास प्रथमतः सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करुन त्यानुसार पुढील वेतनवाढी अनुज्ञेय करण्यात याव्यात व तद्नंतर ७ व्या वेतन आयोगानुसार त्यांची वेतननिश्चिती करावी. परंतु प्रत्यक्ष लाभ दिनांक ०१.०१.२०१६ पासून शासन निर्णयाच्या दिनांकापासून अनुज्ञेय करावेत.

**समितीची शिफारस :-** आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा करुन १२ व २४ वर्षे ऐवजी १०, २० व ३० वर्षांची सुधारित आश्वासित प्रगती योजना दिनांक ०१.०१.२०१६ पासून अस्तित्वात आली आहे. हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून त्यामुळे बहुसंख्य संवर्गाचा फायदा होत आहे. कमी कालावधीनंतर पुढील वेतनश्रेणीचा लाभ होत असल्यामुळे सुधारित आश्वासित प्रगती योजना आहे तशीच ठेवणे हिताचे ठरेल. त्यामुळे दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वीची तारीख व काल्पनिक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करणे योग्य ठरत नाही.

ब)मुख्य अभियंता विद्युत

१०.तारतंत्री :-

**संघटनेची मागणी :-** इतर विभागात कार्यरत असलेल्या तारतंत्री पदाच्या (एस-८) वेतनश्रेणीप्रमाणे एस-६ ऐवजी एस-८ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सार्वजनिक बांधकाम विभागातील तारतंत्री पदावर कार्यरत असणारे कर्मचारी व अन्य विभागातील तारतंत्री पदावर कार्यरत असणारे कर्मचारी यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या यामध्ये साम्य असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातील तारतंत्री पदाची वेतनश्रेणी अन्य विभागातील तारतंत्री पदाच्या वेतनश्रेणी एस-८ इतकी असणे आवश्यक आहे.

**समितीची शिफारस :-** सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि.३०.९.१९५९ रोजीच्या सेवाप्रवेश नियमान्वये वीजतंत्री, मुख्य तारतंत्री व तारतंत्री हे तीनही संवर्ग स्वतंत्र आहेत. त्याचप्रमाणे या संवर्गाशी शैक्षणिक अर्हता वेगवेगळी असल्याचे आढळले. १९५९ या संवर्गाला स्वतंत्र वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गांना स्वतंत्र दर्शवत वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत. प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या, ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात विहित करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळत नाही.

क) संचालक, उपवने व उद्याने

११.संचालक :-

**संघटनेची मागणी :-** महाराष्ट्र राज्य राजपत्र दि.२४.४.२०१७ महाराष्ट्र नागरी सेवा अन्वये संचालक, उपवने व उद्याने, मुंबई यांना विभागप्रमुख म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे. त्यानुसार त्यांच्या जबाबदारी व कामांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे या पदाची वेतनश्रेणी एस-२३ ऐवजी एस-२५ अशी सुधारित करण्यात यावी ही विनंती.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** महाराष्ट्र राज्य राजपत्र दिनांक २४.०४.२०१७ अन्वये संचालक, उपवने व उद्याने, मुंबई यांना विभागप्रमुख म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे. त्यानुसार त्यांच्या जबाबदारी व कामांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे संचालक, उपवने व उद्याने या पदास विभागप्रमुख म्हणून एस-२५ ही वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- ६ व्या वेतन आयोगाशी संबंधित वेतनत्रुटी निवारण समिती, २०१२ अन्वये वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ११.०२.२०१३ अन्वये प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीत रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.५४०० ऐवजी रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.६६०० अशी सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार ७ व्या वेतनआयोगामध्ये समकक्ष एस-२३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. यास्तव पुन्हा त्याच मुद्यांवर अधिक वेतनश्रेणी मिळण्याची मागणी योग्य ठरत नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळत नाही.

१२.सहायक संचालक :-

संघटनेची मागणी :- सहाव्या वेतन आयोगानुसार उद्यान अधीक्षक या पदास ४४००/- ग्रेड पे मंजूर असून सहाय्यक संचालक या पदास रु.४६००/- इतका ग्रेड पे मंजूर आहे. म्हणजेच निम्न पद उद्यान अधीक्षक व पदोन्नतीचे पद सहाय्यक संचालक यांच्या वेतनामध्ये फक्त रु.२००/- ग्रेड पे चा फरक आहे. सबब, सहाय्यक संचालक या पदास सातव्या वेतन आयोगामध्ये एस-२० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सहाव्या वेतन आयोगानुसार उद्यान अधीक्षक या पदास रु.४४००/- ग्रेड पे मंजूर असून सहायक संचालक या पदास रु.४,६००/-इतका ग्रेड पे मंजूर आहे. म्हणजेच निम्न पद उद्यान अधीक्षक व पदोन्नतीचे पद सहायक संचालक यांच्या वेतनामध्ये फक्त रु.२००/- ग्रेड पे चा फरक आहे. सबब, सहायक संचालक या पदास सातव्या वेतन आयोगामध्ये एस-२० ही वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे.सबब, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळत नाही.

१३.उद्यान अधीक्षक :-

संघटनेची मागणी :- ४ थ्या वेतन आयोगामध्ये एन.बी.नाईक यांच्या अध्यक्षतेखालील गठीत वेतन समानीकरण समितीने उद्यान अधीक्षक या पदाला कृषि विभागातील कृषि अधिकारी या पदाशी समकक्ष ठरविले आहे. ७ व्या वेतन आयोगामध्ये जिल्हा कृषि अधिकाऱ्यांना एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर झाली आहे. त्यामुळे उद्यान अधीक्षकांनाही समकक्षतेनुसार एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ४थ्या वेतन आयोगामध्ये एन.बी.नाईक यांच्या अध्यक्षतेखालील गठीत वेतन समानीकरण समितीने उद्यान अधीक्षक या पदाला कृषि विभागातील कृषि अधिकारी या पदाशी समकक्ष ठरविले आहे. सातव्या वेतन आयोगामध्ये जिल्हा कृषि अधिकाऱ्यांना एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर झाली आहे. त्यामुळे उद्यान अधीक्षकांनाही समकक्षतेनुसार एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- या संवर्गाची मागणी वेतनत्रुटीची नसून अधिक वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत आहे. या संवर्गास ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळत नाही.

१४. उद्यान पर्यवेक्षक :-

संघटनेची मागणी :- उद्यान पर्यवेक्षक या पदास शैक्षणिक अर्हता बी.एस.सी अशी आहे. जी स्थापत्य विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाच्या शैक्षणिक अर्हतेशी समतुल्य आहे. तसेच, ४ थ्या वेतन आयोगात उद्यान पर्यवेक्षक या पदाची वेतनश्रेणी कनिष्ठ अभियंतापेक्षा जास्त होती. सबब, उद्यान पर्यवेक्षक या पदास एस-१४ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- उद्यान पर्यवेक्षक या पदास शैक्षणिक अर्हता बी.एस.सी. (कृषि/उद्यान विद्या) अशी आहे. जी स्थापत्य विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाच्या शैक्षणिक अर्हतेशी समतुल्य आहे. तसेच ४ थ्या वेतन आयोगात उद्यान पर्यवेक्षक या पदाची वेतनश्रेणी कनिष्ठ अभियंता पेक्षा जास्त होती. सबब, उद्यान पर्यवेक्षक या पदास ही वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- या संवर्गाची मागणी वेतनत्रुटीची नसून अधिक वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत आहे. या संवर्गास ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळत नाही.

ड) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन

१५.कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ :-

संघटनेची मागणी:- सार्वजनिक बांधकाम विभागातील समस्तर शाखेतल्या स्थापत्य/ विद्युत/ यांत्रिकी व जलसंपदा, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी खात्यांच्या अंतर्गत असलेल्या शाखा अभियंता यांना दि.१३.२.२०२३ नुसार एस-१६ वेतनस्तर मंजूर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागातील समकक्ष असलेल्या कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ या पदास सुधारित वेतनश्रेणी लागू करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- दोन्ही संवर्गामध्ये मिळून केवळ ३३ इतकी पदे मंजूर असल्याने शासनावर फार मोठा आर्थिक भार पडणार नाही. सदर पदांना समस्तर असलेल्या शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता ही दोन पदे मृद व जलसंधारण व जलसंपदा विभागाअंतर्गत आहेत. सदर पदांना अनुक्रमे एस-१५ व एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ यांना एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

समितीची शिफारस :- कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील शाखा अभियंता या संवर्गाच्या वेतनश्रेणी ४थ्या, ५व्या, ६व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये समान होत्या.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील शाखा अभियंता या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ वरून एस-१६ अशी सुधारित करण्यात आली आहे. सबब, कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ या संवर्गाला एस-१५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे.

१६.सहायक कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ :-

संघटनेची मागणी :- सार्वजनिक बांधकाम विभागातील समस्तर शाखेतल्या स्थापत्य / विद्युत/ यांत्रिकी व जलसंपदा, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी खात्यांच्या अंतर्गत असलेल्या कनिष्ठ अभियंता यांना दि.१३.२.२०२३ नुसार एस-१५ वेतनस्तर मंजूर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक विभागातील समकक्ष असलेल्या सहायक कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ या पदास ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर एस-१४ ऐवजी एस-१५ ही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- दोन्ही संवर्गांमध्ये मिळून केवळ ३३ इतकी पदे मंजूर असल्याने शासनावर फार मोठा आर्थिक भार पडणार नाही. सदर पदांना समस्तर असलेल्या शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता ही दोन पदे मृद व जलसंधारण व जलसंपदा विभागाअंतर्गत आहेत. सदर पदांना अनुक्रमे एस-१४ व एस-१५ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे सहायक कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ यांना एस-१५ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

समितीची शिफारस :- सहायक कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ या संवर्गाची ७ व्या वेतनआयोगामध्ये मूळ वेतनश्रेणी एस-१२ रु. ३२००० -१०१६०० अशी असून, सदर संवर्गाला ४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१४ रु.३८६००-१२२८०० अशी वेतनश्रेणी मंजूर आहे. वास्तव सहायक कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ हा संवर्ग सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता या संवर्गाशी समकक्ष ठरत नाही. प्रस्तुत संवर्गास ४थ्या, ५व्या, ६ व्या वेतनआयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतनआयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

**********************

## ३.१६ महसूल व वन विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ) महसूल विभाग | | | | |
| १ | नायब तहसीलदार | ९३००-३४८०० | ४३०० | एस १४ रु.३८६०० -१२२८०० | एस १६- रु. ४४९००-१४२४०० |
| २ | मंडळ अधिकारी (गट-क) | ५२००-२०२०० | ३५०० | एस-१२ रु.३२०००-१०१६०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| ३ | तलाठी (गट क) | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ४ | महसूल सहायक (गट-क) | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| | ब) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख | | | | |
| ५ | उपसंचालक भूमी अभिलेख | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ६ | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ७ | उपअधीक्षक भूमी अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१९ रु.५५१००-१७५१०० |
| ८ | मुख्यालय सहायक/ शिरस्तेदार/ वरिष्ठ लिपिक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| ९ | परिरक्षण भूकरमापक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१२ रु.३२०००-१०१६०० |
| १० | भूकरमापक /कनिष्ट लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | क) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक अधिक्षक | | | | |
| ११ | मुद्रांक अधिक्षक/ अतिरिक्त नोंदणी महानिरीक्षक | १५६००- ३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७०० - २०८७०० | एस-२७ रु.१२३१००- २१५९०० |
| १२ | नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक | १५६००- ३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००- २०८७०० | एस-२५ रु.७८८००- २०९२०० |
| १३ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी | १५६००- ३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००- १७७५०० | एस-२३ रु.६७७००- २०८७०० |
| १४ | सहदुय्यम निबंधक वर्ग-२/ सह जिल्हा निबंधक वर्ग-२/ मुद्रांक उपअधिक्षक | ९३००- ३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००- १३२३०० | एस-१७ रु.४७६००- १५११०० |
| १५ | दुय्यम निबंधक श्रेणी-१/ मुद्रांक निरीक्षक | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- १२२८०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| १६ | वरिष्ठ लिपिक/ पर्यवेक्षक | ५२००- २०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००- ८११०० | एस-१२ रु.३२०००- १०१६०० |
| | ड) मुख्य वनसंरक्षक | | | | |
| १७ | मुख्य वन सांख्यिक | १५६००- ३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००- २०८७०० | एस-२५ रु.७८८००- २०९२०० |
| १८ | वनसांख्यिक | १५६००- ३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००- १७७५०० | एस-२३ रु.६७७००- २०८७०० |
| १९ | वनक्षेत्रपाल (गट-ब) राजपत्रित | ९३००- ३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००- १३२३०० | एस-१८ रु.४९१००- १५५८०० |
| २० | शाखा अभियंता | ९३००- ३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००- १३२३०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| २१ | सहायक अभियंता | ९३००- ३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००- १३२३०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| २२ | कनिष्ठ अभियंता | ९३००- ३४८०० | ४३०० | एस १४-रु.३८६०० -१२२८०० | एस-१५ रु.४१८००- १३२३०० |
| २३ | सहायक वनसांख्यिक | ९३००- ३४८०० | ४३०० | एस-१५ रु.४१८००- १३२३०० | एस-१६ रु.४४९००- १४२४०० |
| २४ | कलाकार | ५२००- | २८०० | एस-१० रु.२९२००- | एस-१३ रु.३५४००- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०२०० | | ९२३०० | ११२४०० |
| २५ | लेखापाल | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१२ रु.३२०००-१०१६०० |
| २६ | वनपाल | ५२००-२०२०० | २५०० | एस ९ रु.२६४००-८३६०० | एस १३ रु.३५४००-११२४०० |
| २७ | वनरक्षक | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-९ रु.२६४००-८३६०० |

अ)महसूल विभाग

१.नायब तहसीलदार :-

<u>संघटनेची मागणी :-</u> शासन निर्णय दि.१३.११.१९९८ अन्वये नायब तहसिलदार संवर्गातील पदांना गट-ब राजपत्रित अधिकारी दर्जा देण्यात आला आहे. तथापि, त्यांच्या सध्याच्या वेतनश्रेणीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सबब, ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१४ ऐवजी एस-१६ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> नायब तहसीलदार पदाची कर्तव्ये व जबाबदारी विचारात घेऊन या संवर्गाला ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१४ ऐवजी एस-१६ वेतनश्रेणी करण्याची आवश्यकता आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> नायब तहसिलदार या संवर्गाच्या दि.१३.१०.१९९८ रोजीच्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीने (अव्वल कारकुन/मंडळ अधिकारी) ६६% व नामनिर्देशनाने ३३% पदे भरण्याची तरतूद आहे. शासनाने दि.१३.११.१९९८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे नायब तहसिलदार संवर्गातील सर्व पदांना राजपत्रित अधिकारी गट-ब असा दर्जा देताना वेतनश्रेणीचा प्रश्न सध्या प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या, ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२.मंडळ अधिकारी (गट-क) :-

<u>संघटनेची मागणी :-</u> मंडळ अधिकारी संवर्गाकडून पार पाडल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्या व कर्तव्य पाहता सदर पदाची वेतनश्रेणी एस-१२ ऐवजी एस-१३ रु.३५४००-११२४०० देण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> महसूल विभागातील मंडळ अधिकारी संवर्गाच्या कामाची पध्दत व जबाबदाऱ्या हया व्यापक स्वरूपाच्या असल्याने, वेतनत्रुटीतील ही तफावत दूर करण्यासाठी मंडळ अधिकारी, गट-क या संवर्गास ६ व्या वेतन आयोगानुसार पी.बी.९-(५२००-२०२००+ग्रेड वेतन रु.३५००) व ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१२ (३२०००-१०१६००) या अनुज्ञेय करण्यात आलेल्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात येऊन मंडळ अधिकारी, गट-क या संवर्गास ६ व्या वेतन

आयोगानुसार पी.बी.२- (९३००-३४८००+ग्रेड वेतन ४२००) व ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१३(३५४००-११२४००) ही वेतनश्रेणी अनुज्ञेय करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> प्रस्तुत संवर्गाचा प्रस्ताव वेतनश्रेणी त्रुटीबाबत नसून वेतन उंचावण्यासंबंधी आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

३.तलाठी (गट-क) :-

<u>संघटनेची मागणी :-</u> तलाठी संवर्गाची वेतनश्रेणी उत्तराखंड येथे रु.५२००-२०२०० ग्रे.वे.रु.२८००/- व पंजाब येथे रू.१०३००-३४८०० ग्रे.वे.३२००/- आहे. तर महाराष्ट्र राज्यामध्ये रु.५२००-२०२०० ग्रे.वे.२४००/- (७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११००) अशी आहे. तलाठी संवर्गाकडून पार पाडल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये पाहता सदर पदाची वेतनश्रेणी एस-८ ऐवजी एस-१० रु.२९२००-९२३०० देण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> तलाठी गट-क संवर्गाच्या वेतनश्रेणींमध्ये एस-८ ऐवजी एस-१० वेतनश्रेणी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४थ्या वेतन आयोग ) तलाठी या संवर्गाला कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाचा प्रस्ताव वेतनश्रेणी त्रुटीबाबत नसून वेतन उंचावण्यासंबंधी आहे. प्रस्तुत संवर्गाने वेतनाची तुलना इतर राज्यांशी तुलना केली आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

४.महसूल सहायक (गट-क) :-

<u>संघटनेची मागणी :-</u> महसूल सहायक हे पद तलाठी पदाचे पर्यवेक्षणीय पद आहे. तसेच त्यांची कामाची पद्धत व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. महसूल विभागातील महसूल सहायक संवर्ग व तलाठी संवर्ग यांची शैक्षणिक पात्रता पदवी ही एकसारखीच असतांना वेतनश्रेणीमध्ये तफावत दिसून येते. महसूल सहायक व तलाठी संवर्गातील कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या व कर्तव्य पाहता महसूल सहायक संवर्गाची वेतनश्रेणी एस-६ वरून एस-८ करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> महसूल सहायक व तलाठी ही दोन्ही पदे गट-क संवर्गातील असून, या दोन्ही संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार त्यांची शैक्षणिक पात्रता पदवी ही एकसारखीच आहे. महसूल सहायक संवर्गाची कामाची पद्धत व जबाबदाऱ्या ह्या व्यापक स्वरूपाच्या असल्याने, वेतनत्रुटीतील ही तफावत दूर करण्यासाठी महसूल सहायक, गट-क संवर्गाच्या वेतनात सुधारणा करून ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-६ या ऐवजी महसूल

विभागातील तलाठी संवर्गाशी एस-८ समतुल्य करून ही वेतनसंरचनेतील तफावत दूर करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयातील "लिपिक गट-क" या संवर्गाचे पदनाम बदलून महसूल सहायक असे दि.२०.८.२०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयात असेही नमूद केले आहे की, "सदर पदनाम बदलामुळे भविष्यात वेतनश्रेणी वाढीसंदर्भात प्राप्त होणारी कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही." प्रस्तुत संवर्ग सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश विभागांमध्ये कार्यरत असून त्याप्रमाणे वेतनश्रेणीही मंजूर आहे. या संवर्गांना इतर विभागातील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

**ब) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख**

**५. उपसंचालक भूमी अभिलेख :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- सातव्या वेतन आयोगानुसार उपसंचालक भूमी अभिलेख या पदाला तुलनात्मक पद अतिरिक्त जिल्हाधिकारी हे आहे . यास्तव सदर पदाला लागू असलेली एस-२५ वेतनश्रेणीप्रमाणे उपसंचालक भूमी अभिलेख या पदाला एस-२३ ऐवजी एस-२५ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी मूळ अर्ज क्र. ४३६/२०१७ मध्ये दि.१४.१.२०२० रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस अवमान याचिका दाखल झाली आहे. सबब, प्रस्तुत समितीने भूमि अभिलेख विभागातील भूकरमापकांचे काम व वेतन याबाबत मा.न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार वन विभाग व पिंपरी-चिंचवड म.न.पा. मधील सर्वेक्षक पदाचे काम/कर्तव्ये व जबाबदारी तसेच वेतनश्रेणी यांचा केलेला तुलनात्मक अभ्यास विचारात घेतला आहे. यास्तव वन विभाग व पिंपरी चिंचवड म.न.पा मधील सर्वेक्षक पदांचा तसेच महसूल विभागातील तुलनात्मक पदांचा वेतनस्तर लागू करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) उप संचालक, भूमि अभिलेख या संवर्गाला महसुल विभागातील अतिरिक्त जिल्हाधिकारी या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

६.जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख:-

<u>संघटनेची मागणी</u> :- सातव्या वेतन आयोगानुसार जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख या पदाला तुलनात्मक ५८ उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) हे आहे . यास्तव सदर पदाला लागू असलेली एस-२३ वेतनश्रेणी प्रमाणे जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख या पदाला एस २० ऐवजी एस-२३ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी मूळ अर्ज क्र. ४३६/२०१७ मध्ये दि.१४.१.२०२० रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस अवमान याचिका दाखल झाली आहे. सबब, प्रस्तुत समितीने भूमि अभिलेख विभागातील भूकरमापकांचे काम व वेतन याबाबत मा.न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार वन विभाग व पिंपरी-चिंचवड न.न.पा. मधील सर्व्हेक्षक पदाचे काम/कर्तव्ये व जबाबदारी तसेच वेतनश्रेणी यांचा केलेला तुलनात्मक अभ्यास विचारात घेतला आहे. यास्तव वन विभाग व पिंपरी चिंचवड म.न.पा मधील सर्व्हेक्षक पदांचा तसेच महसूल विभागातील तुलनात्मक पदांचा वेतनस्तर लागू करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग ) जिल्हा अधिक्षक भूमिअभिलेख या संवर्गाला महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

७.उपअधीक्षक भूमी अभिलेखक /नगर भूमापन अधिकारी:-

<u>संघटनेची मागणी</u> :- सातव्या वेतन आयोगानुसार उपअधीक्षक भूमी अभिलेख/नगर भूमापन अधिकारी या पदांना तुलनात्मक पद तहसिलदार हे आहे . यास्तव सदर पदाला लागू असलेली एस-१९ वेतनश्रेणी प्रमाणे उपअधीक्षक भूमी अभिलेख/नगर भूमापन अधिकारी या पदांना एस-१५ ऐवजी एस-१९ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, नागपूर यानी मूळ अर्ज क्र. ४३६/२०१७ मध्ये दि.१४.१.२०२० रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस अवमान याचिका दाखल झाली आहे. सबब, प्रस्तुत समितीने भूमि अभिलेख विभागातील भूकरमापकांचे काम व वेतन याबाबत मा.न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार वन विभाग व पिंपरी-चिंचवड न.न.पा. मधील सर्व्हेक्षक पदाचे काम/कर्तव्ये व जबाबदारी तसेच वेतनश्रेणी यांचा केलेला तुलनात्मक अभ्यास विचारात घेतला आहे. यास्तव वन विभाग व पिंपरी चिंचवड म.न.पा मधील सर्व्हेक्षक पदांचा तसेच महसूल विभागातील तुलनात्मक पदांचा वेतनस्तर लागू करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग ) उप अधिक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी या संवर्गांना महसुल विभागातील तहसिलदार या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

८.मुख्यालय सहायक/ शिरस्तेदार/ वरिष्ठ लिपिक :-

**संघटनेची मागणी :-** सातव्या वेतन आयोगानुसार मुख्यालय सहायक/शिरस्तेदार/वरिष्ठ लिपिक या पदाला तुलनात्मक पद नायब तहसिलदार हे आहे. यास्तव सदर पदाला लागू असलेली एस-१४ वेतनश्रेणी प्रमाणे मुख्यालय सहायक/शिरस्तेदार/वरिष्ठ लिपिक या पदांना एस-१३ ऐवजी एस-१४ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी मूळ अर्ज क्र. ४३६/२०१७ मध्ये दि.१४.१.२०२० रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस अवमान याचिका दाखल झाली आहे. सबब, प्रस्तुत समितीने भूमि अभिलेख विभागातील भूकरमापकांचे काम व वेतन याबाबत मा.न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार वन विभाग व पिंपरी-चिंचवड म.न.पा. मधील सर्व्हेक्षक पदाचे काम/कर्तव्ये व जबाबदारी तसेच वेतनश्रेणी यांचा केलेला तुलनात्मक अभ्यास विचारात घेतला आहे. यास्तव वन विभाग व पिंपरी चिंचवड न.न.पा मधील सर्व्हेक्षक पदांचा तसेच महसूल विभागातील तुलनात्मक पदांचा वेतनस्तर लागू करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग ) मुख्यालय सहायक/शिरस्तेदार/वरिष्ठ लिपिक या संवर्गाला महसुल विभागातील नायब तहसिलदार या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

९.परिरक्षण भूकरमापक :-

**संघटनेची मागणी :-** सातव्या वेतन आयोगानुसार परिरक्षण भूमापक या पदाला तुलनात्मक पद मंडल अधिकारी आहे. यास्तव सदर पदाला लागू असलेली एस-१२ वेतनश्रेणी प्रमाणे परिरक्षण भूमापक या पदाला एस-८ ऐवजी एस-१२ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी मूळ अर्ज क्र. ४३६/२०१७ मध्ये दि.१४.१.२०२० रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस अवमान याचिका दाखल झाली आहे. सबब, प्रस्तुत समितीने भूमि अभिलेख विभागातील भूकरमापकांचे काम व वेतन याबाबत मा.न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार वन विभाग

व पिंपरी-चिंचवड म.न.पा. मधील सर्व्हेक्षक पदाचे काम/कर्तव्ये व जबाबदारी तसेच वेतनश्रेणी यांचा केलेला तुलनात्मक अभ्यास विचारात घेतला आहे. यास्तव वन विभाग व पिंपरी चिंचवड म.न.पा मधील सर्व्हेक्षक पदांचा तसेच महसूल विभागातील तुलनात्मक पदांचा वेतनस्तर लागू करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतनसमानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गाला मंडल अधिकारी या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या, ५व्या, ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही. :

१०.भूकरमापक /कनिष्ठ लिपिक:-

<u>संघटनेची मागणी :-</u> सातव्या वेतन आयोगानुसार भुकरमापक/कनिष्ठ लिपिक या पदाला तुलनात्मक पद तलाठी/ वन विभाग व पिंपरी चिंचवड महानगर पालिका सर्व्हेक्षक हे आहे. यास्तव सदर पदांना लागू असलेली एस-८ ह्या वेतनस्तराप्रमाणे भुकरमापक या पदाला एस-६ ऐवजी एस-८ हा वेतनस्तर सुधारित करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> समान काम समान वेतन या तत्वानुसार भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्गातील पदांनादेखील शासनाच्या इतर विभागातील सर्व्हेअर पदाप्रमाणे सातव्या वेतन ७ व्या वेतन आयोगातील एस-८ वेतनश्रेणी देण्याची मागणी होत आहे. तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ यांनी मूळ अर्ज ४३६/२०१७ मध्ये दि.१४.०१.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस्तव अवमान याचिका दाखल झाली आहे. सबब, प्रस्तुत समितीने भूमि अभिलेख विभागातील भूकरमापकांचे काम व वेतन याबाबत मा. न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार वन विभाग व पिंपरी-चिंचवड म.न.पा. मधील सर्व्हेक्षक पदाचे काम/ कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच वेतनश्रेणी यांचा तुलनात्मक अभ्यास विचारात घेतला आहे. वन विभाग व पिंपरी -चिंचवड म.न.पा. मधील सर्व्हेक्षक पदांना तसेच महसूल विभागातील तुलनात्मक पदांचा वेतनस्तर लागू करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतनसमानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गाला तलाठी संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या, ५व्या, ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

क)नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक अधिक्षक

११.मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय)/(अतिरिक्त नोंदणी महानिरीक्षक) :-

<u>संघटनेची मागणी :-</u> मुद्रांक अधिक्षक या पदाची वेतनश्रेणी एस-२३ वरुन एस-२७ करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** सदर पदांचे पदनामास अनुसरून सुधारित आकृतिबंध व सेवाप्रवेश नियम या संबंधी कार्यवाही सुरू असल्याने सदर पदाच्या वेतन संरचनेमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही न करणे उचित होईल.

**समितीची शिफारस :-** विभागाच्या अभिप्रायांप्रमाणे कार्यवाही अजूनही विभागाच्या स्तरावर आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत कोणतीही नवीन कारणे विभागाने सादर केलेली नाहीत. वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग ) मुद्रांक अधिक्षक या संवर्गाला कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१२.नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक :-

**संघटनेची मागणी :-** नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक या संवर्गाला एस-२३ ऐवजी एस-२५ ही वेतनश्रेणी लागु करण्यात यावी. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.२८.३.२०२३ नुसार नोंदणी उप महानिरीक्षक या संवर्गात ३ वर्षे पूर्ण झालेल्या अधिकाऱ्या एस-२७ निवडश्रेणी वेतनस्तर मंजूर करण्यात यावा.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** उपमहानिरीक्षक व महसूल विभागातील अतिरिक्त जिल्हाधिकारी हे दोन्ही संवर्ग समकक्ष आहेत. अतिरिक्त जिल्हाधिकारी या पदाला सुधारित वेतनस्तर एस-२५ लागू आहे. सबब, नोंदणी उपमहानिरीक्षक या पदाला एस-२५ हा वेतनस्तर लागू करण्यात यावा. तसेच शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ नुसार एस-२५ व एस-२६ या संवर्गातील अधिकाऱ्यांना निवडश्रेणी वेतनस्तर एस-२७ लागू केला आहे. त्याचप्रमाणे नोंदणी उपमहानिरीक्षक संवर्गात ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना एस-२७ निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यात यावा.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग ) नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक या संवर्गाला कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ नुसार एस-२० ते एस-२६ वेतनस्तर लागु असणाऱ्या संवर्गानाच निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्याचे निदेश आहेत. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२३ मध्ये अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत. त्यानुसार वरील संवर्गाला निवडश्रेणी वेतनस्तर लागू होईल.

१३.सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी :-

संघटनेची मागणी :- सह जिल्हा निबंधक वर्ग-१ या संवर्गातील अधिकारी जिल्हा स्तरावर कार्यरत असून जिल्हा स्तरावरील प्रशासकीय नियंत्रक आहेत. सातव्या वेतन आयोगानुसार सह जिल्हा निबंधक वर्ग १ संवर्गास वेतनस्तर एस-२० ऐवजी एस-२३ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सह जिल्हा निबंधक संवर्गातील अधिकाऱ्यांना मिळणारी वेतनश्रेणी ही इतर विभागातील अधिकारी जसे निवडश्रेणी उपजिल्हाधिकारी, उपसंचालक लेखा, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेप्रमाणे मिळणे आवश्यक आहे. स्तव, सह जिल्हा निबंधक संवर्गाचा वेतनस्तर एस-२० ऐवजी एस-२३ मंजूर करण्यात यावा.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी या संवर्गाला कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१४.सहदुय्यम निबंधक वर्ग-२/ सह जिल्हा निबंधक वर्ग-२/ मुद्रांक उपअधिक्षक :-

संघटनेची मागणी :- तालुका स्तरावरील दुय्यम निबंधक श्रेणी-१ व जिल्हा स्तरावरील सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत. सह दुय्यम निबंधक या संवर्गाचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेता सदर पदाला एस-१५ ऐवजी एस-१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- जिल्हा स्तरावरील सह दुय्यम निबंधक वर्ग-२ व तालुका स्तरावरील दुय्यम निबंधक श्रेणी-१ या दोन्ही पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. सदर पदावर कर्तव्य बजावत असताना अनेक कायद्यांशी संबंध येतो. यास्तव दोन्ही पदांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सहदुय्यम निबंधक वर्ग-२/सह जिल्हा निबंधक वर्ग-२/ मुद्रांक उप अधिक्षक या संवर्गांना कोणत्याही पदांशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१५.दुय्यम निबंधक श्रेणी-१/ मुद्रांक निरीक्षक :-

संघटनेची मागणी :- तालुका स्तरावरील दुय्यम निबंधक श्रेणी-१ व जिल्हा स्तरावरील सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत.सह दुय्यम निबंधक या संवर्गाला एस-१५ ही वेतनश्रेणी लागू आहे. दोन्ही पदांचा कायद्याशी संबंध तसेच महसुल वसुली जमा करण्याची

जबाबदारी असते. यास्तव दुय्यम निबंधक श्रेणी-१ या पदाचा वेतनस्तर एस-१४ ऐवजी एस-१६ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- जिल्हा स्तरावरील सह दुय्यम निबंधक वर्ग-२ व तालुका स्तरावरील दुय्यम निबंधक श्रेणी-१ या दोन्ही पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. सदर पदावर कर्तव्य बजावत असताना अनेक कायद्यांशी संबंध येतो. यास्तव दोन्ही पदांच्या वेतनश्रेणींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) दुय्यम निबंधक श्रेणी-१ / मुद्रांक निरीक्षक या संवर्गांना कोणत्याही पदांशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणींमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१६.वरिष्ठ लिपिक/ पर्यवेक्षक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- महसूल विभागातील अव्वल कारकून व नोंदणी विभागातील वरिष्ठ लिपिक/पर्यवेक्षक यांचे कामाचे स्वरूप व जबाबदाऱ्या सारखेच आहेत. यास्तव महसूल विभागातील अव्वल कारकून यांना लागू असलेली एस-१२ ही वेतनश्रेणी नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील वरिष्ठ लिपिक/पर्यवेक्षक यांना एस-८ ऐवजी लागू करण्यात यावी..

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- महसूल विभागातील अव्वल कारकुन व नोंदणी विभागातील वरिष्ठ लिपिक/ पर्यवेक्षक यांचे कामाचे स्वरुप सारखेच असल्यामुळे महसूल विभागातील अव्वल कारकून यांना ६ व्या वेतन आयोगानुसार मिळणारे ग्रेड पे रु.३५०० आहे. व या विभागातील वरिष्ठ लिपिक/पर्यवेक्षक यांचे ग्रेड वेतन रु.२४००/- आहे. त्यामुळे महसूल विभागाप्रमाणेच या विभागातील वरिष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना एस-१२ ही वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) वरिष्ठ लिपिक/पर्यवेक्षक या संवर्गांना कोणत्याही पदांशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणींमध्ये त्रुटी आढळत नाही.

ड) मुख्य वन संरक्षक

१७.मुख्य वन सांख्यिक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्या कार्यालयातील सहसंचालक या पदाला सुधारित वेतनस्तर मंजूर करण्यात आला आहे. याच

धर्तीवर या पदाशी समकक्ष वन विभागातील मुख्य वन सांख्यिक' या पदाला वेतनस्तर एस-२३ ऐवजी वेतनस्तर एस-२५ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सेवाप्रवेश नियम, शैक्षणिक अर्हता, वित्तिय भार कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या विचार करता अर्थ व सांख्यिकी संचालक, नियोजन विभाग यांचेकडील सहसंचालक, उपसंचालक व संशोधन अधिकारी या पदांच्या वेतनश्रेणीमध्ये वित्त विभागाने दि.१३.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा केल्याप्रमाणे वन विभागातील मुख्य वन सांख्यिकी, वन सांख्यिकी आणि सहायक वन सांख्यिकी या पदांची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीस सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) मुख्य वन सांख्यिक या संवर्गाला नियोजन विभागातील सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१८.वनसांख्यिक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्या कार्यालयातील उपसंचालक या पदाला सुधारित वेतनस्तर मंजूर करण्यात आला आहे. याच धर्तीवर या पदाशी समकक्ष वन विभागातील 'वनसांख्यिक' या पदाला वेतनस्तर एस-२० ऐवजी वेतनस्तर एस-२३ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सेवाप्रवेश नियम, शैक्षणिक अर्हता, वित्तिय भार कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांचा विचार करता अर्थ व सांख्यिकी संचालक, नियोजन विभाग यांचेकडील सहसंचालक, उपसंचालक व संशोधन अधिकारी या पदांच्या वेतनश्रेणीमध्ये वित्त विभागाने दि.१३.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा केल्याप्रमाणे वन विभागातील मुख्य वन सांख्यिकी, वन सांख्यिकी आणि सहायक वन सांख्यिकी या पदांची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीस सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) वनसांख्यिक' या संवर्गाला उपसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१९.वनक्षेत्रपाल:-

<u>संघटनेची मागणी</u> :- वन विभागातील वनक्षेत्रपाल संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, दुर्गम, आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात सेवा करणे, तसेच अखिल भारतीय वनसेवा व भारतीय पोलीस

सेवेतील अधिकाऱ्यांना समकक्षतेचा लाभ देण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन वन विभागाच्या अधिपत्याखालील वनक्षेत्रपाल संवर्गाची ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी (एस-१५) गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलिस निरीक्षक संवर्गाप्रमाणे (एस-१८) अशी सुधारित करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>** वनविभागातील वनक्षेत्रपाल संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, दुर्गम,आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात सेवा करणे, तसेच अखिल भारतीय वन सेवा व भारतीय पोलिस सेवेतील अधिकाऱ्यांना समकक्षतेचा लाभ देण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन वन विभागाच्या अधिपत्याखालील वनक्षेत्रपाल (गट ब) राजपत्रित संवर्गाची ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी (एस-१५ रू.४१८००-१३२३००) गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलिस निरीक्षक संवर्गाप्रमाणे (एस-१८ रू.४९१००-१५५८००) अशी सुधारित करण्यात यावी.

**<u>समितीची शिफारस :-</u>** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग ) या संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच सेवाप्रवेश नियमानुसार सदर संवर्गात पदोन्नतीने, मर्यादित विभागीय स्पर्धात्मक परिक्षेद्वारे निवडीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे २५:२५:५० या प्रमाणात पदस्थापना केली जाते. वनपाल पदावरून वनक्षेत्रपाल पदावर पदोन्नतीकरिता, वनपालाने किमान माध्यमिक शालांत परीक्षा (पदवी नसून) उत्तीर्ण केलेली असावी अशी अट आहे. मुख्य वन संरक्षक कार्यालयातील वनक्षेत्रपाल व पोलीस सेवेतील पोलीस निरीक्षक या दोन्ही संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या, ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजुर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२०. शाखा अभियंता :-

**<u>संघटनेची मागणी :-</u>** वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व मृद व जलसंधारण विभागातील शाखा अभियंता या पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील सदर पदांची व वन विभागातील प्रस्तुत संवर्गाची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने वन विभागातील शाखा अभियंता या पदास एस-१५ ऐवजी वेतनस्तर एस-१६ लागू करण्यात यावा.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>** वित्त विभाग, शा.नि.दि.१३.२.२०२३ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, जलसंपदा विभाग व मृद संधारण विभागातील १. सहायक अभियंता श्रेणी-२,गट ब २.शाखा अभियंता, गट ब ३.कनिष्ठ अभियंता, गट ब या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा केलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामधील सदर पदांची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने, वन विभागातील शाखा अभियंता गट ब (एस-१६ रु.४४९००-१४२४००) व कनिष्ठ अभियंता,गट ब (एस-१५ रु.४१८००-१३२३००) अशी वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

समितीची शिफारस :- सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील अभियंता संवर्गाला व महसुल व वन विभागातील मुख्य वनसंरक्षक या कार्यालयातील अभियंता संवर्गाला ४ थ्या वेतन आयोगापासून ७ व्या आयोगापर्यंत वेतनश्रेणी समान आहेत. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील शाखा अभियंता या संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, वन विभागाच्या शाखा अभियंता या संवर्गाला वेतनश्रेणी एस-१५ रु. ४१८००-१३२३०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२१.सहायक अभियंता:-

संघटनेची मागणी :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व मृद व जलसंधारण विभागातील सहायक अभियंता या पदाला एस-१६ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील सदर पदांची व वन विभागातील प्रस्तुत संवर्गाची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने वन विभागातील सहायक अभियंता या पदास एस-१५ ऐवजी वेतनस्तर एस-१६ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील १. सहायक अभियंता श्रेणी-२,गट ब २.शाखा अभियंता, गट ब ३.कनिष्ठ अभियंता, गट ब या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा केलेली आहे. सदर विभागातील पदांची व वन विभागातील पदांची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने, वन विभागातील १. सहायक अभियंता गट ब या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१६ (रु.४४९००-१४२४००) अशी सुधारित करण्यात यावी.

समितीची शिफारस :- सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील अभियंता संवर्गाला व महसुल व वन विभागातील मुख्य वनसंरक्षक या कार्यालयातील अभियंता संवर्गाला ४ थ्या वेतन आयोगापासून ७ व्या आयोगापर्यंत वेतनश्रेणी समान आहेत. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील सहायक अभियंता या संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, वन विभागाच्या सहायक अभियंता या संवर्गाला वेतनश्रेणी एस-१५ रु. ४१८००-१३२३०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२२.कनिष्ठ अभियंता :-

संघटनेची मागणी :- वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व मृद व जलसंधारण विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाला एस-१५ ही वेतनश्रेणी सुधारित करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील सदर पदांची

व वन विभागातील प्रस्तुत संवर्गाची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने वन विभागातील कनिष्ठ अभियंता या पदास एस-१४ ऐवजी वेतनस्तर एस-१५ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.२.२०२३ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील १. सहायक अभियंता श्रेणी-२, गट ब २.शाखा अभियंता, गट ब ३.कनिष्ठ अभियंता, गट ब या पदांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा केलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामधील सदर पदांची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने, वन विभागातील १. शाखा अभियंता गट ब (एस-१६ रु.४४९००-१४२४००) व कनिष्ठ अभियंता,गट ब (एस-१५ रु.४१८००-१३२३००) अशी वेतनश्रेणी सुधारित करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील अभियंता संवर्गाला व महसुल व वन विभागातील मुख्य वनसंरक्षक या कार्यालयातील अभियंता संवर्गाला ४ थ्या वेतन आयोगापासून ७ व्या आयोगापर्यंत वेतनश्रेणी समान आहेत. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील कनिष्ठ अभियंता या संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१४ ऐवजी एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, वन विभागाच्या कनिष्ठ अभियंता या संवर्गाला वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-१२२८०० ऐवजी एस-१५ रु.४१८००-१३२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२३.सहायक वनसांख्यिक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्या कार्यालयातील संशोधन अधिकारी या पदाला सुधारित वेतनस्तर मंजूर करण्यात आला आहे. याच धर्तीवर या पदाशी समकक्ष वन विभागातील सहायक वनसांख्यिक या पदाला वेतनस्तर एस-१५ ऐवजी वेतनस्तर एस-१६ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सेवाप्रवेश नियम, शैक्षणिक अर्हता, स्थित्य गार कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या विचार करता अर्थ व सांख्यिकी संचालक, नियोजन विभाग यांचेकडील सहसंचालक, उपसंचालक व संशोधन अधिकारी या पदांच्या वेतनश्रेणीमध्ये वित्त विभागाने दि.१३.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा केल्याप्रमाणे वन विभागातील मुख्य वन सांख्यिकी, वन सांख्यिकी आणि सहायक वन सांख्यिकी या पदांची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीस सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सहायक वन सांख्यिक या संवर्गाला संशोधन अधिकारी, अर्थ व सांख्यिकी कार्यालय या पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी

७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२४.कलाकार :-

संघटनेची मागणी :- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय क्षेत्र, दिल्ली, संरक्षण मंत्रालय, माहिती व प्रसारण मंत्रालय, संस्कृती मंत्रालय, आरोग्य कुटुंब कल्याण, मंत्रालय येथील कलाकार पदाला एस-१३ ही वेतनश्रेणी लागू आहे. सबब केंद्र शासनाप्रमाणे सदर संवर्गाला वेतनस्तर एस-१० ऐवजी वेतनस्तर एस-१३ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली व संरक्षण मंत्रालय, माहिती व प्रसारण मंत्रालय, या विभागांतर्गत कलाकार हे पद कार्यरत असून सदर पदास सातव्या वेतन आयोगामध्ये वेतनस्तर एस-१३ वेतनश्रेणी आहे त्याच धर्तीवर वन विभागातील कलाकार या पदाची वेतनश्रेणी सुधारित करणे आवश्यक आहे. कलाकार मंजूर पदसंख्या १ आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग ) या संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच महसुल व वन विभाग शासन निर्णय दि.१३.९.२०१९ अन्वये सुधारित आकृतीबंधात कलाकार /चित्रकार हा संवर्ग मृत संवर्ग म्हणून दर्शविला आहे. यास्तव यासंवर्गाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणे योग्य ठरत नाही.

२५.लेखापाल:-

संघटनेची मागणी :- वन विभागातील लेखापाल व महसूल विभागातील अव्वल कारकून या पदाची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या बहुतांशी समान स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे या पदांची वेतनसंरचना देखील समान असणे आवश्यक आहे. तथापि, सातव्या वेतन आयोगामध्ये वन विभागातील लेखापाल पदाची वेतनश्रेणी अव्वल कारकून पदापेक्षा कमी असल्याने सदर वेतनसंरचनेतील तफावत दूर होणे आवश्यक आहे. त्यामुळे वन विभागातील लेखापाल संवर्गाची वेतनसंरचना एस-१० ऐवजी अव्वल कारकून संवर्गाप्रमाणे एस-१२ अशी सुधारित करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- वन विभागातील लेखापाल व महसूल विभागातील अव्वल कारकून या पदाची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या बहुतांशी समान स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे या पदांची वेतनसंरचना देखील समान असणे आवश्यक आहे. तथापि, सातव्या वेतन आयोगामध्ये वन विभागातील लेखापाल पदाची वेतनश्रेणी अव्वल कारकून पदापेक्षा कमी असल्याने सदर वेतनसंरचनेतील तफावत दूर होणे आवश्यक आहे. त्यामुळे वन विभागातील लेखापाल संवर्गाची वेतनसंरचना अव्वल कारकून संवर्गाप्रमाणे एस-१२ अशी सुधारित करण्यात शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग )लेखापाल संवर्गाला महसुल विभागातील अव्वल कारकून या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच या दोनही

संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या यामध्ये तफावत आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

२६.वनपाल :-

<u>संघटनेची मागणी :-</u> श्री. एस.के. श्रीवास्तव, संचालक वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांनी सहाव्या वेतन आयोगाला दिनांक २५.०१.२००७ रोजी दिलेल्या पत्रात uniform pay scale recommadation for subordinate forest service personal throughout the country या विषयानुसार वनपाल पदास सहायक पोलीस उपनिरीक्षक / महसुल निरीक्षक या पदाची समकक्षता दिलेली आहे. याबाबी विचारात घेऊन वन विभागातील वनपाल पदाची वेतनश्रेणीएस-९ ऐवजी एस-१३ अशी सुधारित करण्याची विनंती आहे.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** केंद्र सरकार ने दि.२५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये वनपाल या पदाला समकक्ष ठरविलेल्या पोलिस उपनिरीक्षक/महसुल निरीक्षक या पदाची एस-१३ ही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने श्री. एस.के. श्रीवास्तव, संचालक वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांनी सहाव्या वेतन आयोगाला दिनांक २५.०१.२००७ रोजी दिलेल्या पत्रात uniform pay scale recommendation for subordinate forest service personal throughout the country या विषयाबाबत अभिप्राय दिले आहेत. तथापि, उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीबाबत विभागाने काहीही कळविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन तथ्य सादर केलेले नाही. तसेच वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग ) वनपाल या संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२७.वनरक्षक :-

<u>संघटनेची मागणी :-</u> श्री. एस.के. श्रीवास्तव, संचालक वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांनी सहाव्या वेतन आयोगाला दिनांक २५.०१.२००७ रोजी दिलेल्या पत्रात uniform pay scale recommadation for subordinate forest service personal throughout the country या विषयानुसार वनरक्षक पदास पोलीस हवालदार / पटवारी या पदाची समकक्षता दिलेली आहे. सबब,वन विभागातील वनरक्षक पदाची वेतनश्रेणी एस-७ वरुन एस-९ अशी सुधारित करण्याची विनंती आहे.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** केंद्र सरकार ने दि.२५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये वनरक्षक या पदाला समकक्ष ठरविलेल्या पोलिस हवालदार/पटवारी या पदाची एस-९ ही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी.

**समितीची शिफारस :-** विभागाने श्री. एस.के. श्रीवास्तव, संचालक, वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांनी ६व्या वेतन आयोगाला दि. २५.०१.२००७ रोजी दिलेल्या पत्रात uniform pay scale recommendation for subordinate forest service personal throughout the country या विषयाबाबत अभिप्राय दिले आहेत. तथापि, उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीबाबत विभागाने काहीही कळविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन तथ्य सादर केलेले नाही. तसेच वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग ) वनरक्षक या संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनसंरचनेशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

******************

## ३.१७ ग्राम विकास विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | विद्यमान वेतनसंरचना | | सातवा वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड वेतन | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) | मागणी केलेले वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) |
| | अ) महाराष्ट्र अभियंता सेवा | | | | |
| १ | शाखा अभियंता/ सहायक अभियंता श्रेणी–२ | ९३००–३४८०० | ४४०० | एस–१५ रु.४१८००–१३२३०० | एस–१६ रु.४४९००–१४२४०० |
| २ | कनिष्ठ अभियंता | ९३००–३४८०० | ४३०० | एस-१४ रु. ३८६००–१२२८०० | एस–१५ रु.४१८००–१३२३०० |
| ३ | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | ५२००–२०२०० | २४०० | एस–८ रु.२५५००–८११०० | एस–१२ रु.३२०००–१०१६०० एस–१३ रु.३५४००–११२४०० |
| | ब) जिल्हा परिषद विकास सेवा | | | | |
| ४ | कृषी अधिकारी गट क तांत्रिक | ९३००-३४८०० | ४४०० | एस–१५ १५६००–३९१०० | एस–२० रु.५६१०–१७७५०० (१० वर्षानंतर एस. २० ५६१००–१७७५००) |
| ५ | सहायक गट विकास अधिकारी गट–ब | ९३००–३४८०० | ४४०० | एस–१५ रु.४१८००–१३२३०० | एस–१९ रु.५५१००–१७५१०० |
| ६ | विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी–२ | ९३००–३४८०० | ४४०० | एस–१५ रु.४१८००–१३२३०० | एस–१६ रु.४४९००–१४२४०० |
| ७ | विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी–३ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००–१२२८०० | एस–१५ रु.४१८००–१३२३०० |
| ८ | पदवीधर शिक्षक प्राथमिक | ९३०० ३४८०० | ४३०० | एस–१४ रु.३८६००–१२२८०० | पदवीधर शिक्षकांचा वेतनश्रेणीतील तफावत दूर करणेबाबत |
| ९ | सहायक लेखा अधिकारी | ९३००–३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००- | एस–१५ रु.४१८००–१३२३०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (जिल्हा परिषद सेवेतील) | | | १२२८०० | |
| १० | कनिष्ठ लेखाधिकारी (जिल्हापरिषद सेवेतील) | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| ११ | सहायक प्रशासन अधिकारी | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० |
| १२ | आरोग्य पर्यवेक्षक तथा विस्तार अधिकारी आरोग्य | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| १३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| १४ | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १५ | जिल्हापरिषद प्राथमिक शिक्षक | ५२०० - २०२०० (१२ वर्षा नंतर ९३००-३४८००) | २८०० (४२००) | एस-१० रु.२९२००-९२३०० | प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्यात यावी. |
| १६ | औषध निर्माता | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| १७ | आरोग्य सहाय्यिका (LHV) | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| १८ | आरोग्य सहायक तथा आरोग्य निरीक्षक | ५२००-२०२०० | २५०० | एस-९ रु.२६४००-८३६०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| १९ | सहाय्यकारी परिचारीका | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रसाविका (ए.एन.एम.) | | | | |
| २० | वरिष्ठ लिपिक (लेखा) (जिल्हा परिषद) | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| २१ | वरिष्ठ सहायक (लिपिक) | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१२ रु.३२०००-१०१६०० |
| २२ | ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | आश्वासित प्रगती योजनेचा लाभ सुधारित करणेबाबत |
| २३ | आरोग्य सेवक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-९ रु.२६४००-८३६०० |
| २४ | कनिष्ठ सहायक (लेखा) (जिल्हा परिषद) | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-७ रु.२१७००-६९१०० |
| २५ | कनिष्ठ सहायक (लिपिक) | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-१०- रु.२९२००-९२३०० |
| २६ | पशुवैद्यकीय व्रणोपचारक | ४४४०-७४४० | १६०० | एस-३ रु.१६६००-५२४०० | एस-५ रु.१८०००-५६९०० |
| २७ | शिपाई/ परिचर | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ रु.१५०००-४७६०० | एस-६ रु.१९९००-६३२०० |

अ)महाराष्ट्र अभियंता सेवा

१.शाखा अभियंता/ (दर्जोन्नती पद) सहायक अभियंता श्रेणी-२ :-

<u>संघटनेची</u> मागणी :- शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा, व मृद व जलसंधारण या विभागातील शाखा अभियंता यांना लागू करण्यात आलेला वेतनस्तर एस१५ ऐवजी एस-१६ जिल्हा परिषदेतील शाखा अभियंता यांना लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभागांतर्गत असणारे कनिष्ठ अभियंता व ग्रामविकास विभागातील जिल्हा परिषदांमधील कनिष्ठ अभियंता यांचे सेवा प्रवेश नियम, सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी, कामाचे स्वरुप सारखेच आहे. त्यामुळे जिल्हा परिषद अभियंता संघटना महाराष्ट्र (राज्यस्तर) यांनी दिनांक २८.१२.२०२३ व दिनांक ०२.०४.२०२४ रोजीच्या निवेदनान्वये केलेल्या मागणीच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदांमधील कनिष्ठ अभियंता संवर्गासाठी एस-१४ ऐवजी एस-१५, तसेच दर्जोन्नती प्राप्त शाखा अभियंता व सहायक अभियंता श्रेणी-२ या संवर्गासाठी

एस-१५ ऐवजी एस-१६ हा सुधारित वेतनस्तर मंजूर करण्याबाबत वेतन त्रुटी समितीस शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- ग्रामविकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग येथील शाखा अभियंता/ सहायक अभियंता या संवर्गाची वेतनश्रेणी ६ व्या व ७ व्या वेतनआयोगामध्ये सारखीच मंजूर होती. सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील प्रस्तुत संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, ग्राम विकास विभागातील जिल्हा परिषदांमधील शाखा अभियंता/सहायक अभियंता श्रेणी-२ या संवर्गाला एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२.कनिष्ठ अभियंता :-

संघटनेची मागणी :- शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये सा.बां.वि., जलसंपदा, व मृद व जलसंधारण या विभागातील कनिष्ठ अभियंता यांना लागू करण्यात आलेला वेतनस्तर एस-१४ ऐवजी एस-१५ जिल्हा परिषदेतील कनिष्ठ अभियंता यांना लागू करण्यात यावी .

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभागांतर्गत असणारे कनिष्ठ अभियंता व ग्रामविकास विभागातील जिल्हा परिषदांमधील कनिष्ठ अभियंता यांचे सेवा प्रवेश नियम, सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी, कामाचे स्वरुप सारखेच आहे. त्यामुळे जिल्हा परिषद अभियंता संघटना महाराष्ट्र (राज्यस्तर) यांनी दिनांक २८.१२.२०२३ व दिनांक ०२.०४.२०२४ रोजीच्या निवेदनान्वये केलेल्या मागणीच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदांमधील कनिष्ठ अभियंता संवर्गासाठी एस-१४ ऐवजी एस-१५, तसेच दर्जोन्नती प्राप्त शाखा अभियंता व सहायक अभियंता श्रेणी-२ या संवर्गासाठी एस-१५ ऐवजी एस-१६ हा सुधारित वेतनस्तर मंजूर करण्याबाबत वेतन त्रुटी समितीस शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- ग्रामविकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग येथील कनिष्ठ अभियंता/ या संवर्गाची वेतनश्रेणी ६व्या व ७व्या वेतनआयोगामध्ये सारखीच मंजूर होती. सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील प्रस्तुत संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, ग्राम विकास विभागातील जिल्हा परिषदांमधील कनिष्ठ अभियंता या संवर्गाला एस-१४ ऐवजी एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३.स्थापत्य अभियांत्रिकी :-

संघटनेची मागणी :- सार्वजनिक बांधकाम विभागातील वास्तुशास्त्रीय आरेखक यांच्या तुलनेत स्थापत्य अभियांत्रिकी सहायक हे पद प्रगत आहे. सबब, वेतनश्रेणी एस-८ ऐवजी वेतनश्रेणी एस-

१२ ही वेतनश्रेणी लागू करावी व ४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :-** स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदाचे महाराष्ट्र जिल्हा सेवा प्रवेश नियम,१९६७ मधील सेवाप्रवेश नियम सोबत जोडले आहेत. परंतु वास्तुशास्त्रीय आरेखक या पदासोबत तुलना करून संघटनेने त्यांच्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. वास्तुशास्त्रीय आरेखक या पदाचे सेवा प्रवेश नियम संघटनेकडून प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदाचे वास्तुशास्त्रीय आरेखक या पदासोबत सेवा प्रवेश नियम व जबाबदारी तथा कर्तव्ये यांच्या अनुषंगाने तुलना करणे शक्य होत नाही. तथापि, संघटनेने मागणी केल्याप्रमाणे प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच विभागाचे प्रस्तावास अनुसरून तुलनात्मक तक्ता उपलब्ध करुन दिला नसल्यामुळे या संवर्गाची त्रुटी संबंधित मागणीबाबत विचार करणे शक्य होत नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

**४.कृषी अधिकारी गट क तांत्रिक -:**

**<u>संघटनेची मागणी</u> :-** कृषी अधिकारी गट क तांत्रिक यांची वेतनश्रेणी एस-१५ असून त्यांना १० वर्षाचा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ एस-१५ मिळतो. त्याऐवजी वेतनस्तर एस २० लागू करण्यात यावा.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :-** कृषी अधिकारी व सहायक गट विकास अधिकारी यांची वेतनश्रेणी एकच असलेने १० वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ गट विकास अधिकारी या पदाचा एस-२० (५६१००-१७७५००) नुसार देणेत यावा.

**<u>समितीची शिफारस</u> :-** सहायक गट विकास अधिकारी या संवर्गाला समितीने शिफारस केलेली एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर झाल्यास, सदर संवर्गाला आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत सहायक गट विकास अधिकारी या पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल. प्रस्तुत संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

**५.सहायक गट विकास अधिकारी गट-ब :-**

**संघटनेची <u>मागणी</u> :-** ग्राम विकास विभागाअंतर्गत असलेल्या सहायक गट विकास अधिकारी या पदास समकक्ष असलेल्या महसूल विभागातील नायब तहसिलदार या पदाला वेतनश्रेणी एस-१७ देण्याबाबत शासनाने तत्वतः मान्यता दिलेली आहे. सदर पद हे महाराष्ट्र विकास सेवेतील

जबाबदारीचे वर्ग २ संवर्गातील पद असल्यामुळे या संवर्गास देखिल एस-१५ या वेतनश्रेणी ऐवजी एस-१९ ही वेतनश्रेणीस मान्यता देण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सहाव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सहायक गट विकास अधिकारी या पदाची निम्न पदाशी जिल्हा परिषदेमधील समकक्ष पदाशी व महसूल विभागातील समकक्ष पदाशी ४ थ्या, ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगातील अनुज्ञेय वेतनश्रेणीशी तुलना करता सहायक गट विकास अधिकारी या पदास एस-१९ ही वेतनसंरचना मंजूर करण्याची वेतन त्रुटी समितीस शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> सहायक गट विकास अधिकारी हा संवर्ग कृषी अधिकारी गट-क यांचे पदोन्नतीचे संवर्ग असून दोन्ही पदांची वेतनश्रेणी एक समान एस-१५ झाली आहे. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. यास्तव, प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

६.विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ :-

<u>संघटनेची मागणी :-</u> विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ हे विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ या पदाच्या पदोन्नतीचे पद आहे. विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ या पदास विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ पेक्षा एक स्तर वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक असल्याने सदर संवर्गाला एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- विस्तार अधिकारी श्रेणी -२(शिक्षण) हे पद विस्तार अधिकारी श्रेणी-३ या पदास वरिष्ठ आहे. विस्तार अधिकारी श्रेणी-२ या पदास विस्तार अधिकारी श्रेणी-३ पेक्षा एक स्तर वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. त्यामुळे सदर पदास नैसर्गिक न्यायतत्वानुसार वरिष्ठ वेतनसंरचना एस-१६ मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन तथ्य आढळून आले नाही. प्रस्तुत संवर्गास ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

७.विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३:-

<u>संघटनेची मागणी</u> :- विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ हे केंद्र प्रमुख या पदाच्या पदोन्नतीचे पद असून सदर पदाची वेतनश्रेणी केंद्रप्रमुखापेक्षा कमी आहे. सबब, सदर संवर्गाला एस-१४ ऐवजी एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> विस्तार अधिकारी श्रेणी (शिक्षण) श्रेणी ३ हे पद केंद्रप्रमुख पदापेक्षा वरिष्ठ दर्जाचे असून त्याची कर्तव्ये व जबाबदाऱ्या केंद्रप्रमुख पदापेक्षा जास्त असून ते पर्यवेक्षकीय पद आहे. सहाव्या वेतन आयोगामध्ये विस्तार अधिकारी ३ या पदास केंद्रप्रमुख

पदापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आली आहे. त्यामुळे सदरहू पदास एस-१५ ही सुधारित वेतनसंरचना मंजुर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>**समितीची शिफारस**</u> :- ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभागाच्या दि.१०.६.२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ या पदाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार प्राथमिक शिक्षक/माध्यमिक शिक्षक/केंद्रप्रमुख/मुख्याध्यापक या संवर्गातील उमेदवारांमधून मर्यादित विभागीय परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीमधून योग्य उमेदवारांच्या निवडीने नामनिर्देशनाने सदर पद भरले जाते. प्रस्तुत संवर्गात नामनिर्देशनाने ५०%, निवडीद्वारे २५% आणि पदोन्नतीने २५% या प्रमाणात पदस्थापना केली जाते. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-१४ ही मंजूर करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये ग्राम विकास विभागातील अन्य विस्तार अधिकारी संवर्गाला एस-१३ ऐवजी एस-१४ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असून, विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ या संवर्गास ही वेतनश्रेणी समकक्ष आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

८.जिल्हा परिषद पदवीधर शिक्षक :-

<u>**संघटनेची मागणी**</u> :- दि.१.१.२०१६ रोजी ६व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे रु.४२०० घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनाला २.५७ या गुनकाने गुणुन ७ व्या वेतन आयोगात वेतननिश्चिती केली आहे. त्यांची वेतनस्तर निश्चिती बरोबर झाली आहे. मात्र दि.१.१.२०१६ रोजी ६व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे.रु.४३०० व रु.४४०० घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनाला २.५७ ने गुणुन ७व्या वेतन आयोगात वेतननिश्चिती केल्यास त्यांचे वेतन हे ६व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे ४२०० घेणाऱ्या कर्मचाऱ्यापेक्षा कमी मिळत आहे. ६व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार सेवाजेष्ठ कर्मचाऱ्यांना कनिष्ठ कर्मचाऱ्यापेक्षा कमी वेतन घेता येत नाही. या करिता, कनिष्ठ कर्मचाऱ्याला मिळणारे वेतन हे सेवाजेष्ठ कर्मचाऱ्याला लागू करण्याची तरतुद नमूद करण्यात आली आहे.त्यानुसार सेवाजेष्ठ कर्मचारी व सेवाकनिष्ठ कर्मचारी हे समान टप्प्यावर वेतन घेत होते. परंतु ७ व्या वेतन आयोगामध्ये अशी तरतुद नसल्यामुळे ६व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे.४३०० व रु.४४०० वेतनश्रेणी घेणारे कर्मचारी ६ व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे.रु.४२०० वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्यापेक्षा कमी वेतन घेत आहेत. हा त्यांच्यावर अन्याय आहे. यास्तव कर्मचाऱ्यांची ७ व्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी निवारण करण्यात यावी.

<u>**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय**</u> :- जिल्हा परिषदेमधील कार्यरत पदवीधर शिक्षकांची संख्या पाहता पदवीधर शिक्षकांना एस-१३ वेतनस्तरमधून एस-१४ मध्ये व एस-१४ मधून एस-१५ मध्ये वरिष्ठ वेतनश्रेणी घेताना वित्त विभागाकडील दिनांक २२.०२.२०२४ च्या परिपत्रकान्वये शासन अधिसूचना दिनांक ३१.०१.२०१९ नुसार लागू झालेल्या जुन्या वेतनस्तरातील वेतन घेणे चालू ठेवण्यास विकल्प देण्याची सुविधा देण्याचा विचार करता येईल किंवा कसे याबाबत वेतनत्रुटी समितीस शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- संघटनेने/ विभागाने दि.१.१.२०१६ रोजी ६व्या वेतन आयोगानुसार ग्रे.पे.रु.४३०० व रु.४४०० घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनाला २.५७ ने गुणून ७व्या वेतन आयोगात वेतननिश्चती केल्यास त्यांचे वेतन हे ६व्या वेतन आयोगानुसार ग्रे.पे ४२०० घेणाऱ्या कर्मचाऱ्यापेक्षा कमी मिळत असल्याबाबत निदर्शनास आणले आहे. जिल्हा परिषदेकडील शिक्षकीय संवर्ग हे शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकीय संवर्गाशी समकक्ष आहेत. या संवर्गांना शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकीय संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्यात येते. या संवर्गांना चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारशींनुसार लाभ अनुज्ञेय आहेत.

प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणींशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. महाराष्ट्र शासनातील सर्व कर्मचाऱ्यांची ७व्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती ही महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील विहित तरतुदींनुसार करण्यात येते. तथापि, संघटनेने सादर केलेल्या उदाहरणांवरुन काही प्रसंगी सहायक शिक्षक यांचे वेतन दिनांक ०१.०१.२०१६ रोजी एस-१३ मध्ये आणि सहायक शिक्षक पदावरुन पदवीधर शिक्षक म्हणून नियुक्ती झालेल्या पदवीधर शिक्षकांचे वेतन एस-१४ या वेतनश्रेणीत निश्चित करताना सहायक शिक्षकांपेक्षा पदवीधर शिक्षकांचे दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे मूळ वेतन कमी होत असल्याचे निदर्शनास येते. अशा प्रसंगी पदवीधर शिक्षकांचे मूळ वेतन दिनांक ०१.०१.२०१६ रोजी कमी होत असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील नियम ७ (१) (अ) (एक) अन्वये, त्याच वेतनश्रेणीतील पुढील टप्प्यावर निश्चित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तसेच, काही प्रसंगी सहायक शिक्षक यांची दिनांक ०१.०१.२०१६ नंतर पदवीधर शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्यास, दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वी पदवीधर शिक्षक म्हणून नियुक्ती झालेल्या पदवीधर शिक्षकांपेक्षा एस-१४ या वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करताना जास्त वेतन निश्चित होत असल्याचे निदर्शनास येते. अशा प्रसंगी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ नियम ७ मधील टिप ५ प्रमाणे, "त्याच्या कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या वेतनापेक्षा कमी वेतनावर निश्चित होत असेल, तर त्या बाबतीत त्याचे वेतन कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या वेतनापर्यंत वाढविण्यात येईल" या तरतुदीनुसार वेतननिश्चिती करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त दोन्हीही प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तदनंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

९.सहायक लेखा अधिकारी (जिल्हा परिषद सेवेतील) :-

संघटनेची मागणी :- महाराष्ट्र जिल्हा परिषदांमधील लेखासंवर्ग हा तांत्रिक संवर्ग असून त्यास लिपिक संवर्गाप्रमाणे वेतनश्रेण्या न देता लेखापद्धतीस असलेल्या जबाबदारीचे वित्तीय कामकाजानुसार राज्य शासनातील लेखाअधिकारी कार्यालयातील संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात याव्यात वास्तव प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-१४ ऐवजी एस-१५ लागू करण्यात यावा.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेतील सहायक लेखा अधिकारी व राज्य शासकीय सेवेतील सहायक लेखा अधिकारी यांची वेतनश्रेणी ६ वा वेतन आयोगापर्यंत एकच होती. सहायक लेखा अधिकारी हे पदोन्नतीचे पद असून या पदास आधिच्या सर्व पदांना असलेल्या विभागीय परीक्षा देऊन विहित मुदतीत उत्तीर्ण होऊन अगर सूट मिळवून पदोन्नतीने यावे लागते. एनपीएससी द्वारे घेण्यात येणारी परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास सहायक लेखा अधिकारी पदोन्नतीसाठीची ज्येष्ठता गमवावी लागते. लेखा संवर्गाच्या वेतनश्रेणीबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.७५६९/२०१७ प्रलंबित आहे. तरी जिल्हा परिषदेतील सहायक लेखा अधिकारी यांना राज्य शासन सेवेतील सहायक लेखा अधिकारी यांच्या प्रमाणे ७ वा वेतन आयोगात एस-१५ वेतनश्रेणी देणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गच्या वेतनसंरचेमध्ये त्रुटी आढळत नाही.

**१०.कनिष्ठ लेखाधिकारी (जिल्हापरिषद सेवेतील) :-**

**संघटनेची मागणी :-** महाराष्ट्र जिल्हा परिषदांमधील लेखासंवर्ग हा तांत्रिक संवर्ग असून त्यास लिपिक संवर्गाप्रमाणे वेतनश्रेण्या न देता लेखापदास असलेल्या जबाबदारीचे वित्तीय कामकाजानुसार राज्य शासनातील लेखाअधिकारी कार्यालयातील संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात याव्यात यास्तव प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-१३ ऐवजी एस-१४ लागू करण्यात यावा.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटना यांनी मागणी केल्याप्रमाणे जिल्हा परिषद सेवेतील कनिष्ठ लेखाधिकारी यांना राज्यशासन सेवेतील कनिष्ठ लेखाधिकारी यांच्याप्रमाणे ७ व्या वेतन आयोगात एस-१४ वेतनश्रेणी मिळणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाशी राज्य शासनाकडील ज्या संवर्गाशी तुलना केली आहे, त्या संवर्गाचे सेवा प्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तुलनात्मक तक्ता विभागाने उपलब्ध करुन दिला नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गच्या वेतनसंरचेमध्ये त्रुटी आढळत नाही.

११.सहायक प्रशासन अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी :-</u> जिल्हा परिषद जिल्हा सेवा येथील सहायक प्रशासन अधिकारी या संवर्गाला महसुल विभागातील सहायक प्रशासन अधिकाऱ्यांप्रमाणे समकक्ष कामकाज पार पाडावे लागते. यास्तव प्रस्तुत संवर्गाला एस-१४ ऐवजी एस-१८ हा वेतनस्तर लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> प्रस्तुत पदांचे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील सेवाप्रवेश नियम सादर केले आहेत. परंतु महसूल विभागातील ज्या पदांसोबत तुलना करुन संघटनेने सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. त्या पदांचे सेवा प्रवेश नियम संघटनेकडून या विभागास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील सदर पदांचे राज्य शासनाकडील समकक्ष पदांसोबत सेवा प्रवेश नियम व जबाबदारी तथा कर्तव्ये यांच्या अनुषंगाने तुलना करणे शक्य होत नाही. तथापि, संघटनेने मागणी केल्याप्रमाणे वेतनत्रुटी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण नमूद केलेले नाही. तसेच वेतन समानीकरण समिती (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनाकडील अथवा केंद्र शासनातील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. सदर संवर्गाच्या वेतनसंरचेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१२.आरोग्य पर्यवेक्षक तथा विस्तार अधिकारी आरोग्य :-

<u>संघटनेची मागणी :-</u> वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये ग्राम विकास विभागातील विस्तार अधिकारी या पदास एस-१४ अशी वेतननिश्चिती करण्यातआली आहे. विस्तार अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक हे पद पंचायत समिती स्तरावर असलेल्या इतर विस्तार अधिकाऱ्यांच्या समकक्ष आहे. सबब, सदर पदास एस-१३ ऐवजी एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> पंचायत स्तरावर कार्यरत असलेले विस्तार अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक हे पद पंचायत समिती स्तरावर असलेल्या इतर विस्तार अधिकाऱ्यांच्या समकक्ष आहे. तालुकास्तरावरुन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमाचा आढावा घेणारे व मार्गदर्शन करणारे हे पद आहे. या पदास सध्या एस-१३ अनुज्ञेय आहे. वित्त विभागाच्या दि.१३.२.२०२३ रोजीच्या खंड २ च्या अहवालानुसार ग्राम विकास विभागातील विस्तार अधिकारी या पदाची एस-१४ अशी निश्चित करण्यात आली आहे. सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, जिल्हा परिषदेमधील रिक्त होणाऱ्या विस्तार अधिकारी या पदाचे बहुउद्देशीय कर्मचारी योजनांतर्गत पर्यवेक्षक या पदांमध्ये रू.३९५-८०० या वेतन श्रेणीत रुपांतर करण्यात यावे, सह संचालक आरोग्य सेवा यांचेकडील दि.२२.९.१९८६ रोजीच्या परिपत्रकात नमूद आहे. त्यामुळे आरोग्य पर्यवेक्षक या पदास विस्तार अधिकारी आरोग्य ही एकच आहेत. यानुषंगाने आरोग्य पर्यवेक्षक या पदास एस-१४ ही वेतनश्रेणी अनुज्ञेय करणे योग्य राहील.

**समितीची शिफारस** :- वित्त विभागाच्या, शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये ग्राम विकास विभागातील विस्तार अधिकारी या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१४ अशी सुधारित करण्यात आली आहे. सदर शिफारशी मध्ये ग्राम विकास विभागाच्या अधिनस्त असलेले सर्वच विस्तार अधिकारी यांचा समावेश होतो. करिता, प्रस्तुत संवर्गाचे स्वतंत्र नामाभिदान करण्याची आवश्यकता नाही. सदर संवर्गाला एस-१४ वेतनश्रेणी अनुज्ञेय असून, त्याप्रमाणे वेतननिश्चिती करण्याची शिफारस समिती करीत आहेत.

**१३.प्रयोगशाळा तंत्रज्ञ :-**

**संघटनेची मागणी** :- प्रयोगशाळा तंत्रज्ञ या संवर्गाला पदोन्नतीची संधी नाही. सदर संवर्ग एकाकी आहे, ७ व्या वेतन आयोगात प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१५ ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- ज्या पदांसोबत तुलना करून संघटनेने त्यांच्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. त्या पदांचे सेवा प्रवेश नियम संघटनेकडून या विभागास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाचे इतर पदासोबत सेवा प्रवेश नियम व जबाबदारी तथा कर्तव्ये यांच्या अनुषंगाने तुलना करणे शक्य होत नाही. तथापि, संघटनेने मागणी केल्याप्रमाणे प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस** :-वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच विभागाचे प्रस्तावास अनुसरुन तुलनात्मक तक्ता उपलब्ध करुन दिला नसल्यामुळे या संवर्गाची त्रुटी संबंधित मागणीबाबत विचार करणे शक्य होत नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनसंरचेमध्ये त्रुटी आढळत नाही.

**१४.कनिष्ठ प्रशासन अधिकारी :-**

**संघटनेची मागणी** :-महसूल विभागातील समकक्ष पदाचा वेतनस्तर एस-१६ हा आहे. सबब प्रस्तुत संवर्गाला कामकाजाचे स्वरुप विचारात घेता एस-१३ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय** :- प्रस्तुत पदांचे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील सेवाप्रवेश नियम सादर केले आहेत. परंतु महसूल विभागातील ज्या पदांसोबत तुलना करुन संघटनेने सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. त्या पदांचे सेवा प्रवेश नियम संघटनेकडून या विभागास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील सदर पदांचे राज्य शासनाकडील समकक्ष पदांसोबत सेवा प्रवेश नियम व जबाबदारी तथा कर्तव्ये यांच्या अनुषंगाने तुलना करणे शक्य होत नाही. तथापि, संघटनेने मागणी केल्याप्रमाणे वेतनत्रुटी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नविन कारण नमूद केलेले नाही. तसेच वेतन समानीकरण समिती (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनाकडील अथवा केंद्रशासनातील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१५.जिल्हापरिषद प्राथमिक शिक्षक :-

संघटनेची मागणी :- शासनाने दि.१.१.२०१६ पासून सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाचा लाभ दिला आहे. त्यावेळी ६ व्या वेतन आयोगाचे बेसिक ७ व्या वेतन आयोगामध्ये रुपांतरीत करताना बेसिक * गुणिले २.५७ हे सुत्र वापरले. दि.१.१.२०१६ पुर्वी ज्या शिक्षकांना १२ वर्षे पुर्ण झालेली आहेत, त्यांच्या वेतनात ग्रेड वेतन मधील फरक रु.१४०० गुणिले २.५७ म्हणजेच ३५९८ इतकी वाढ झाली आहे. दि.१.१.२०१६ नंतर १२ वर्षे पुर्ण होणाऱ्या शिक्षकांना एस-१० मधून एस-१३ हा वेतनस्तर निश्चित करताना त्यांच्या मुळ वेतनात जेष्ठ शिक्षकांप्रमाणे रु.३५९८ इतकी वाढ अपेक्षित असताना ती फक्त रु.७०० इतकीच होत आहे. जी अत्यंत तोकडी व अपेक्षेपेक्षा ५ पट कमी आहे. तरी सदर अन्याय दूर करण्याची विनंती केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ७ व्या वेतन आयोगात वरिष्ठ वेतनश्रेणी प्राप्त होताना मिळणारी कमी वाढ या मागणी केली आहे. मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका दाखल केली आहे. सदर याचिका दिनांक ०८.०३.२०२३ रोजी निकाली काढल्या आहेत. संपूर्ण राज्य भरातील जिल्हा परिषदांमधील शिक्षकांची संख्या पहाता त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी देताना अतिरिक्त तरतूद करावयाची झाल्यास शासनाच्या तिजोरीवर येणारा आर्थिक भार लक्षात घेऊन उचित तरतूद करणे आवश्यक आहे. सदर तरतुदींचा विचार करुन प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- संघटनेने प्राथमिक शिक्षकांना ७ व्या वेतन आयोगात वरिष्ठ वेतनश्रेणी प्राप्त होताना कमी वाढ मिळत असल्याबाबत मागणी केली आहे. जिल्हा परिषदेकडील शिक्षकीय संवर्ग हे शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकीय संवर्गाशी समकक्ष आहेत. या संवर्गांना शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकीय संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्यात येते. या संवर्गांना चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारशींनुसार लाभ अनुज्ञेय आहेत. ७ वा वेतन आयोग लागू करण्याचा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून, त्यानुषंगाने वेतननिश्चिती करताना होणारा फरक अपरिहार्य आहे. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. सदर संवर्गाच्या वेतनसंरचेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१६. औषध निर्माता :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र शासनाच्या औषध निर्माता या संवर्गाला लागू असलेली एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. तसेच आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत एस१४, एस-१५ ह्या वेतनश्रेण्या लागू करुन वेतनत्रुटी दूर करावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- औषध निर्माता या पदास एस-१३ या सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. तसेच औषध निर्माता या पदास आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत ७ व्या वेतन आयोगात सुधारित एस-१३ वेतनश्रेणी नंतर एस-१४ व एस-१५ असे लाभ मिळणेबाबतची मागणी केली आहे. प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष दर्शविलेले नाही. विभागाने सदर संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याकरिता, कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१७.आरोग्य सहाय्यिका (LHV) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- प्रस्तुत संवर्गाचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेता, महिला आरोग्य अभ्यागिता या पदास एस-१० ऐवजी एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- या पदास ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. त्यामुळे सदर पदास एस-१३ हा वेतनस्तर देण्यामागचे प्रयोजन लक्षात येत नाही.महिला आरोग्य अभ्यागता या पदास एस-१३ हा वेतनस्तर देय केल्यास आरोग्य सहायक पुरुष या संवर्गाकडून वेतनस्तर वाढविण्याची मागणी होऊ शकते. त्यामुळे महिला आरोग्य अभ्यागता या पदास एस-१३ हा वेतनस्तर देणे उचित होणार नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करणबाबत कोणतेही नवीन कारण नमूद केलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळत नाही.

१८.आरोग्य सहायक तथा आरोग्य निरीक्षक :-

<u>संघटनेची मागणी</u> :-आरोग्य सहायक तथा आरोग्य निरीक्षक हे पद सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य निरीक्षक या पदाशी समकक्ष आहे. आरोग्य सहायिका (महिला) या पदाची वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१० अशी करण्यात आली आहे. आरोग्य सहायक (पुरुष) आणि आरोग्य सहायिका(महिला) ही दोन्ही पदे समकक्ष असताना आरोग्य सहायक (पुरुष) या पदाची वेतनश्रेणी आरोग्य सहायिका(महिला) या पदाच्या वेतनश्रेणी पेक्षा आहे. सबब, सदर संवर्गाला एस-९ ऐवजी एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ग्राम विकास विभागांतर्गत जि.प मध्ये आरोग्य सहायक (पुरुष)व (स्त्री) ही पदे मंजूर असून सदरची पदे अनुक्रमे आरोग्य सेवक (पुरुष) व आरोग्य सेवक (स्त्री) या संवर्गातून महाराष्ट्र जि.परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) १९६७ नुसार जिल्हा परिषदेतंर्गत १०० टक्के पदोन्नतीने भरले जातात. संबंधित पदे आरोग्य विभागामार्फत प्रतिनियुक्तीने भरण्यात येत नाहीत. सोबत सेवाप्रवेश नियमांच्या प्रती जोडल्या आहेत. त्यानुषंगाने आरोग्य सहायक या पदास एस-१० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्याची शिफारस वेतनत्रुटी समितीस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- आरोग्य सहायक तथा आरोग्य निरीक्षक या पदावर आरोग्य सेवक या संवर्गातून पदोन्नती दिली जाते. आरोग्य सेवक या पदाची वेतनश्रेणी एस-९ अशी सुधारित करण्याची केलेली शिफारस मान्य झाल्यास आरोग्य सहायक तथा आरोग्य निरीक्षक या पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी समकक्ष होत असल्याने सुधारित करणे आवश्यक आहे. यास्तव प्रस्तुत संवर्गाला एस-९ रु.२६४००-८३६०० ऐवजी एस-१० रु.२९२००-९२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९. सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका (ए.एन.एम.) :-

संघटनेची मागणी :- ग्राम विकास विभागाअंतर्गत असलेल्या सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका या पदास समकक्ष असलेल्या ग्रामसेवक, कृषिसेवक, शिक्षणसेवक, सहायकारी परिचारीका प्रसविका यांचे प्रमाणे या पदाला वेतनश्रेणी एस-१० ही वेतनश्रेणी एस-८ ऐवजी लागु करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेच्या निवेदनामध्ये सहाय्यकारी परिचारिका प्रसाविका व महिला आरोग्य अभ्यागता या दोन पदांची वेतनत्रुटी दूर करणेबाबत मागणी केली आहे. त्यासोबतच परिचारीका व आरोग्य सेवक हे स्वतंत्र पद असुन परीचारिका हे पद तांत्रिक व जोखमीचे असल्याने या पदांची वेतनश्रेणी ही वेगवेगळी असणे आवश्यक आहे, असे म्हटले आहे. परंतु उक्त निवेदनामध्ये संघटनेला नेमकी मागणी स्पष्ट होत नाही. तथापि, संघटनेने मागणी केल्याप्रमाणे सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका यांची वेतनत्रुटी दूर करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य कार्यकर्ता/ बहुउद्देशिय आरोग्य कार्यकर्ता/आरोग्य सेवक व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक परिचारीका प्रसाविका या संवर्गाची वेतनश्रेणी एस-८ वरून एस-९ अशी सुधारित करण्यात आली आहे. आरोग्य विभागातील बहुउद्देशिय आरोग्य कार्यकर्ता, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक परिचारीका प्रसाविका व ग्रामविकास विभागाकडील जि.प. अंतर्गत सहायक परिचारिका प्रसाविका (A.N.M) हे पद एकच आहे. या दोन्ही पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस-८ रु.२५५००-८११०० ऐवजी एस-९ रु.२६४००-८३६०० ही वेतनश्रेणी लागु करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२०. कनिष्ठ लिपिक (लेखा) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- महाराष्ट्र जिल्हा परिषदांमधील लेखासंवर्ग हा तांत्रिक संवर्ग असून त्यास लिपिक संवर्गाप्रमाणे वेतनश्रेण्या न देता लेखापदास असलेल्या जबाबदारीचे वित्तीय कामकाजानुसार राज्य शासनातील लेखाअधिकारी कार्यालयातील संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात याव्यात यास्तव प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-८ ऐवजी एस-१० लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- जिल्हा परिषदेतील वरिष्ठ लिपिक (लेखा) व राज्य शासकीय सेवेतील वरिष्ठ लिपिक यांचे कामकाज व जबाबदाऱ्या समान आहेत. शा.नि. दि.११.०२.२०२३ नुसार राज्य शासन सेवेतील वरिष्ठ लिपिक (लेखा) यांना २८०० ग्रेड पे ची वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, जिल्हा परिषदेतील वरिष्ठ लिपिक (लेखा) यांना ७ वा वेतन आयोगामध्ये एस-१० ही वेतनश्रेणी मिळणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस** :- वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाची राज्य शासनाकडील ज्या संवर्गाशी तुलना केली आहे, त्या संवर्गाचे सेवा प्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तुलनात्मक तक्ता विभागाने उपलब्ध करुन दिला नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

२७.वरिष्ठ सहायक (लिपिक) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- महसूल विभागातील अव्वल कारकून या पदाची वेतनश्रेणी एस-१२ आहे. जिल्हापरिषदे कडील वरिष्ठ लिपिक पदाचे काम हे महसूल विभागातील अव्वल कारकुन पेक्षा जास्त असून वेतनश्रेणी एस८ आहे. यास्तव वरिष्ठ सहायक(लिपिक) या पदाला वेतनस्तर एस-८ ऐवजी एस-१२ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- प्रस्तुत पदांचे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील सेवाप्रवेश नियम सादर केले आहेत. परंतु महसूल विभागातील ज्या पदांसोबत तुलना करुन संघटनेने सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे, त्या पदांचे सेवा प्रवेश नियम संघटनेकडून या विभागास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील सदर पदांचे राज्य शासनाकडील समकक्ष पदांसोबत सेवा प्रवेश नियम व जबाबदारी तथा कर्तव्ये यांच्या अनुषंगाने तुलना करणे शक्य होत नाही. तथापि, संघटनेने मागणी केल्या प्रमाणे वेतनत्रुटी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नविन कारण नमूद केलेले नाही. सदर संवर्ग हा राज्य शासनाकडील बहुतांश कार्यालयांमध्ये कार्यरत असून, एस-८ याच वेतनश्रेणीत वेतन घेत आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन

आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

२८.ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी :-

<u>संघटनेची मागणी :-</u> सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुदेयनुसार सलग १० वर्षांच्या सेवेनंतर कृषी सहायक पदाप्रमाणे सुधारित वेतनस्तर कृषी पर्यवेक्षक एस-१३ यांचे वेतन सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> ग्राम पातळीवर ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या कामात कोणतीही भिन्नता नसल्यामुळे ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी या दोन पदाचे एकत्रिकरण करून एकच पंचायत विकास अधिकारी हे पद निर्माण करण्याच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यासाठी दि.११.५.२०२२ च्या शासन निर्णयान्वये तज्ञ समिती गठीत करण्यात आली. नवनिर्मित पदास सुधारित वेतनसंरचना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव स्वतंत्रपणे वित्त विभागाला सादर करण्यात आला आहे. उक्त प्रक्रीया हि दिर्घ कालावधीची असल्याने याचिकाकर्त्यांनी रीट याचिकेमध्ये केलेल्या मागणीच्या अनुषंगाने ग्रामसेवकांना कृषी सहायकांप्रमाणे १२ वर्षानंतर (सुधारित १० वर्षानंतर) आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मिळणाऱ्या ग्राम विकास अधिकारी या लाभासाठी रु.९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० (एस-१३) अनुज्ञेय करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दि.२४.९.२०२४ अन्वये "ग्रामसेवक" व "ग्रामविकास अधिकारी" ही दोन्ही पदे एकत्रित करून "ग्रामपंचायत अधिकारी" या नामाभिधानाने नविन पद अस्तित्वात आले आहे. तसेच त्या शासन निर्णयाद्वारे आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभ प्रस्तावानुरूप अनुज्ञेय करण्यात आला आहे. तरी आता या प्रकरणी कोणतीही मागणी शिल्लक राहत नाही.

२९.आरोग्य सेवक :-

<u>संघटनेची मागणी :-</u> राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ खंड-२ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका यांना एस-९ ही वेतनश्रेणी लागु केली आहे. सार्वजनिक आरोग्यविभाग, वैद्यकीयशिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि ग्राम विकास विभागामधील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका हे पद एकच आहे. त्यानुसार ग्राम विकास विभागातील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका या पदांना वेतनश्रेणी एस-८ ऐवजी एस-९ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ग्राम विकास विभागाकडील जि.प.अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर कार्यरत असलेले आरोग्यसेवक व आरोग्य सेविका (सहा.परिचारिका प्रसाविका) या संवर्गास सध्या एस-८ ही वेतनश्रेणी लागू आहे. बक्षी समितीव्दारे घेतलेल्या सार्व. आरोग्य विभाग, ग्राम विकास विभागाच्या वेतनत्रुटी विषयक साक्षीवेळी प्रस्तुत संघटनेने आरोग्य

सेवक व आरोग्य सेविका या संवर्गास एस-९ (२६४०० ते ८३६००) वेतनश्रेणीची मागणी केली होती. परंतु राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ अहवाल खंड -२ मध्ये सार्वजनिक आरोग्य कार्यकर्ता तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक परिचारीका प्रसाविका यांना शिफारस केल्याप्रमाणे एस-९ वेतनश्रेणी लागू करण्यात आली. आरोग्य विभागातील बहुउद्देशिय आरोग्य कार्यकर्ता, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक परिचारीका प्रसाविका व ग्रामविकास विभागाकडील जि.प. अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर कार्यरत असलेले आरोग्य सेवक व आरोग्य सेविका हे पद एकच आहे. या दोन्ही पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने उक्त संवर्गाप्रमाणेच ग्रामविकास विभागाकडील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका या संवर्गास एस-९ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, सार्व.आरो शा.नि.क्र.एन्युआर १०९०/२०५/प्र.क्र.४८/९/सेवा-६, दि.२१.९.१९९३ मध्ये प्राथ. आरोग्य केंद्र/उपकेंद्र स्तरावरील सहा.परीचारिका प्रसाविका हा संवर्ग सुप्त संवर्ग म्हणून समजण्यात यावा. तसेच नव्याने निर्माण करण्यात आलेल्या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही होईपर्यंत आरोग्य सेवक हे पद सहा.परिचारिका प्रसाविका या पदासाठी विहित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार भरण्यात यावीत, असेही नमूद आहे. आरो. विभागातील बहुउद्देशिय आरोग्य कार्यकर्ता, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक परिचारिका प्रसाविका संवर्गाप्रमाणेच ग्रामविकास विभागाकडील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका या संवर्गास एस-९ वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्याबाबत वेतनत्रुटी निवारण समितीस शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य कार्यकर्ता/ बहुउद्देशिय आरोग्य कार्यकर्ता आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक परिचारीका प्रसाविका या संवर्गाची वेतनश्रेणी एस-८ वरून एस-९ अशी सुधारित करण्यात आली आहे. विभागाने आरोग्य विभागातील बहुउद्देशिय आरोग्य कार्यकर्ता, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सहायक परिचारीका प्रसाविका व ग्रामविकास विभागाकडील जि.प. अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर कार्यरत असलेले आरोग्य सेवक व आरोग्य सेविका हे पद एकच आहे. या दोन्ही पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत असे नमूद केले आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाला एस-८ रु.२५५००-८११०० ऐवजी एस-९ रु.२६४००-८३६०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३०.कनिष्ठ सहायक (लेखा) (जिल्हा परिषद) :-

संघटनेची मागणी :- महाराष्ट्र जिल्हा परिषदांमधील लेखासंवर्ग हा तांत्रिक संवर्ग असून त्यास लिपिक संवर्गाप्रमाणे वेतनश्रेण्या न देता लेखापदास असलेल्या जबाबदारीचे वित्तीय कामकाजानुसार राज्य शासनातील लेखाअधिकारी कार्यालयातील संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात याव्यात यास्तव प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-६ ऐवजी एस-७ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटना यांनी मागणी केल्याप्रमाणे जिल्हा परिषद सेवेतील कनिष्ठ सहायक (लेखा) यांना राज्यशासन सेवेतील कनिष्ठ सहायक (लेखा) यांच्याप्रमाणे ७ व्या वेतन आयोगात एस-७ वेतनश्रेणी मिळणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाची राज्य शासनाकडील ज्या संवर्गाशी तुलना केली आहे, त्या संवर्गाचे सेवा प्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तुलनात्मक तक्ता विभागाने उपलब्ध करुन दिला नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचेमध्ये त्रुटी आढळत नाही.

३१.कनिष्ठ सहायक (लिपिक) :-

संघटनेची मागणी :- महसूल विभागातील महसूल सहायक या पदाचे वेतन एस-१० आहे यास्तव वरिष्ठ सहायक(लिपिक) या पदाला वेतनस्तर वेतनस्तर एस-६ ऐवजी एस-१० लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्रस्तुत पदांचे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील सेवाप्रवेश नियम सादर केले आहेत. परंतु महसूल विभागातील ज्या पदांसोबत तुलना करुन संघटनेने सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. त्या पदांचे सेवा प्रवेश नियम संघटनेकडून या विभागास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील सदर पदांचे राज्य शासनाकडील समकक्ष पदांसोबत सेवा प्रवेश नियम व जबाबदारी तथा कर्तव्ये यांच्या अनुषंगाने तुलना करणे शक्य होत नाही. तथापि, संघटनेने मागणी केल्या प्रमाणे वेतनत्रुटी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण नमूद केलेले नाही. सदर संवर्ग हा राज्य शासनाकडील बहुतांश कार्यालयांमध्ये कार्यरत असून, एस-६ या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेत आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. सदर संवर्गाच्या वेतनसंरचेमध्ये त्रुटी आढळत नाही.

३२.पशुवैद्यकीय व्रणोपचारक :-

संघटनेची मागणी :- जिल्हा परिषदांमधील व्रणोपचारक संवर्गाला कृषी व पदुम विभाग आणि राज्य कामगार विमा योजना विभागातील व्रणोपचारकापेक्षा कमी वेतन मिळते. ही तफावत दूर होणे आवश्यक आहे. यास्तव सदर संवर्गाला वेतनस्तर एस-३ ऐवजी एस-५ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- जिल्हा परिषद, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग व राज्य कामगार विमा योजना या तिन्ही विभागांतील व्रणोपचारक वर्ग-ड

या पदाचे स्वरूप सारखेच आहे. त्यानुषंगाने समान न्याय तत्त्वानुसार या तिन्ही विभागांतील व्रणोपचारकांना समान वेतनश्रेणी व ग्रेड वेतन मिळणे गरजेचे आहे. परंतु, उक्त तिन्ही विभागांतील व्रणोपचारकांच्या वेतनश्रेणीमध्ये तफावत दिसून येते. उक्त तिन्ही विभागातील व्रणोपचारकांच्या कामाचे स्वरूप सारखे असल्याने ही तफावत दूर करून जिल्हा परिषदांमधील व्रणोपचारकांना देखील ७व्या वेतन आयोगानुसार शासनाच्या इतर विभागातील व्रणोपचारकांप्रमाणे वेतनश्रेणी एस-५ मंजूर करणेबाबत वेतन त्रुटी समितीस शिफारस करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

**३३.शिपाई/ परिचर :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- वेतनस्तर एस-१ ऐवजी एस-६ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- प्रस्तुत पदांचे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील सेवाप्रवेश नियम सादर केले आहेत. परंतु महसूल विभागातील ज्या पदांसोबत तुलना करून संघटनेने सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. त्या पदांचे सेवा प्रवेश नियम संघटनेकडून या विभागास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील सदर पदांचे राज्य शासनाकडील समकक्ष पदांसोबत सेवा प्रवेश नियम व जबाबदारी तथा कर्तव्ये यांच्या अनुषंगाने तुलना करणे शक्य होत नाही. तथापि, संघटनेने मागणी केल्या प्रमाणे वेतनत्रुटी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नविन कारण नमूद केलेले नाही. सदर संवर्ग हा राज्य शासनाकडील बहुतांश कार्यालयांमध्ये कार्यरत असून, एस-१ या वेतनश्रेणीमध्ये वेतन देत आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचेमध्ये त्रुटी आढळत नाही.

*****************

## ३.१८ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ) शिक्षण संचालनालय | | | | |
| १ | प्राचार्य (अध्यापक विद्यालयातील शिक्षक) | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | पदोन्नती व वरिष्ठ वेतनश्रेणीतील तफावत दूर करणे. |
| २ | केंद्रप्रमुख | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ३ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | ९३००-३४८०० | ४३००/४४०० Senior Scale (४८००) | एस-१४ रु. ३८६००-१२२६०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० अथवा एस-१४ याच वेतनश्रेणीत १ वेतनवाढ जास्त देवून वेतनातील तफावत दूर करावी. |
| ४ | समुपदेशक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु. ३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४००, एस-१७ रु.४७६००-१५११०० (वरिष्ठ वेतनश्रेणी), एस-२० रु.५६१००-१७७५०० (निवडश्रेणी) |
| ५ | मुख्य लिपिक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | संगीत शिक्षक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१४ रु. ३८६००-१२२८०० |
| ७ | ग्रंथपाल (पदवीधर व ग्रंथशास्त्रातील पदवी अथवा पदविका) | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१४ रु.३५४००-११२४०० |
| ८ | ग्रंथपाल (अशासकीय माध्यमिक शाळेतील मॅट्रीक व ग्रंथालयाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र) | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० (कालबद्ध पदोन्नती नंतर( |
| ९ | प्रयोगशाळा सहायक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| १० | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-९ रु.२६४००-८३६०० |
| ११ | प्रयोगशाळा परीचर | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| १२ | कनिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-७ रु.२१७००-६९१०० |
| | ब) शिक्षण आयुक्तालय, पुणे | | | | |
| १३ | विधि अधिकारी | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० |
| १४ | महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (प्रशिक्षण शाखा) /अधिव्याख्याता | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १५ | अधीक्षक, सारांसे (गट-ब) | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १६ | तबला वादक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |

अ) शिक्षण संचालनालय

१.प्राचार्य (अध्यापक विद्यालयातील शिक्षक) :-

संघटनेची मागणी :- प्राध्यापकाला त्याच्या सेवेची १२ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी प्राचार्य पद मिळाल्यास ग्रे.वे.४६०० वरून ग्रे.वे ४८०० होतो. तोच सेवेच्या १२ वर्षानंतर मिळाल्यास ग्रे.वे.४६०० वरून ग्रे.वे.५४०० होतो. अध्यापक विद्यालयातील पदव्युत्तर शिक्षकांच्या निवडश्रेणीची अट रद्द करावी. महाविद्यालयीन प्राध्यापकांना युजीसीच्या नियमानुसार पीएचडी धारकांना दोन मानवी वेतनवाढ देण्यात येते. त्याप्रमाणे विशेष वेतनवाढ देण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- विभागाची यास सहमती आहे.

समितीची शिफारस :- प्रस्तुत संवर्गाने केलेली मागणी, पदव्युत्तर शिक्षकांच्या निवडश्रेणीची अट रद्द करणे तसेच प्राध्यापकांना युजीसीच्या नियमानुसार पीएचडी धारकांना दोन मानवी वेतनवाढ देणे हे विषय आस्थापना विषयक व धोरणात्मक बाब असून या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

२.केंद्रप्रमुख :-

संघटनेची मागणी :- केंद्र प्रमुखाचे वेतन हे माध्यमिक मुख्याध्यापकांपेक्षा कमी आहे. केंद्र प्रमुखांना पदोन्नतीची १ वेतन वाढ मिळावी व ती पदोन्नती होणाऱ्या तारखेपासून लागू करावी. तसेच केंद्र प्रमुखांना शाळांना भेटी देण्यासाठी ४ थ्या वेतन आयोगामध्ये रू.२००/- प्रवास भत्ता होता. त्यामुळे प्रचलित नियमानुसार सुधारणा करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- विभागाची सहमती आहे.

समितीची शिफारस :- शालेय शिक्षण विभागातील शिक्षकीय संवर्गांना चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी अनुज्ञेय आहेत. चट्टोपाध्याय समितीच्या शिफारशीनुसार सदर संवर्गाला वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीचे निकष लागू असून, शासनाचे आश्वासित प्रगती योजनेचे निकष (वेतनवाढीसंबंधी) लागू होत नाहीत. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ०१.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंद्रप्रमुखांची पदे भरण्याबाबतचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर पदावर ५० % पदोन्नतीने प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या संवर्गामधून ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंडीत नियमित सेवा पूर्ण केली असेल अशा उमेदवारांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे नियुक्ती केली जाते. प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकांना ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१४ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सेवाप्रवेश नियमानुसार मुख्याध्यापक पदाच्या वेतनश्रेणीशी केलेली तुलना या संवर्गाच्या पदोन्नती श्रृंखलेचा भाग नसल्यामुळे अप्रस्तुत आहे. स्वब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही. तसेच प्रवास भत्ता मंजूर करणे ही बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

३.प्रशिक्षित पदवीधर शिक्षक :-

संघटनेची मागणी :-

१.पदवीधर शिक्षकांची वेतन निश्चिती करताना १ वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी.

२.विकल्प देण्याची पुन्हा एकदा संधी द्यावी.

३. एस १० मधून एस-१३ मध्ये स्थानांतर होत असताना एस-११ व एस-१३ या मॅट्रिक्स लेल पार कराव्या लागत असल्याने या दोन मॅट्रिक्स लेलच्या दोन लेवल वाढवण्यात याव्यात. नग एस-१३ मध्ये वेतन निश्चिती करण्यात यावी.

४. प्रशिक्षित पदवीधर पदासाठी पुढीलप्रमाणे वेतन सुधारणा देण्यात यावी.

अ. प्रशिक्षित पदवीधर एस-१५, एस-१६ (वरिष्ठ वेतनश्रेणी), एस-१७ (निवडश्रेणी २० % पदे)

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- विभागाची सहमती आहे.

समितीची शिफारस :- संघटनेने/ विभागाने वरीलप्रमाणे ४ मागण्या केल्या आहेत. शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकीय संवर्ग व जिल्हा परिषदेकडील शिक्षकीय संवर्ग समकक्ष आहेत. या संवर्गांना पहिल्या सहाव्या आयोगाच्या शिफारशीनुसार लाभ अनुज्ञेय आहेत.

प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. महाराष्ट्र शासनातील सर्व कर्मचाऱ्यांची ७व्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती ही महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील विहित तरतुदींनुसार करण्यात येते. ७वा वेतन आयोग लागू करण्याचा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून, त्याअनुषंगाने वेतननिश्चिती करताना होणारा फरक अपरिहार्य आहे.

तथापि, संघटनेने सादर केलेल्या उदाहरणांवरुन काही प्रसंगी सहायक शिक्षक यांचे वेतन दिनांक ०१.०१.२०१६ रोजी एस-१३ मध्ये आणि सहायक शिक्षक पदावरुन पदवीधर शिक्षक म्हणून नियुक्ती झालेल्या पदवीधर शिक्षकांचे वेतन एस-१४ या वेतनश्रेणीत निश्चित करताना सहायक शिक्षकांपेक्षा पदवीधर शिक्षकांचे दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे मूळ वेतन कमी होत असल्याचे निदर्शनास येते. अशा प्रसंगी पदवीधर शिक्षकांचे मूळ वेतन दिनांक ०१.०१.२०१६ रोजी कमी होत असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील नियम ७ (१) (अ) (एक) अन्वये, त्याच वेतनश्रेणीतील पुढील टप्प्यावर निश्चित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रसंगी प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४.समुपदेशक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- सदर संवर्गाला ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगामध्ये असलेले विशेष वेतन ६ व्या वेतन आयोगामध्ये बंद करण्यात आले आहे. यास्तव समुपदेशक संवर्गाला एस-१४ ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४००, एस-१७ रु.४७६००-१५११०० (वरिष्ठ वेतनश्रेणी), एस-२० रु.५६१००-१७७५०० (निवडश्रेणी) लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> -: विभागाची सहमती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन तथ्य सादर केले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

५.मुख्य लिपिक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- लिपिक संवर्गातील शालेय शिक्षण विभागातील व इतर विभागातील कर्मचारी यांच्या वेतनश्रेणी व त्यांना मिळणारे लाभ, बढती इत्यादी तुलना केली असता फारच अल्पशी वाढ दिसून येते. लिपिक संवर्गातील राज्य कर्मचारी हे संबंधित टेबलचे एकच नेमून दिलेले काम पहातो तर, शालेय कर्मचारी अनेक टेबलचे काम एकटा पहात असतो. यास्तव प्रस्तुत संवर्गाला वेतनश्रेणी एस-१३ ऐवजी एस-१४ लागू करावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- विभागाची सहमती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय/ लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-१३ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

६.संगीत शिक्षक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र शासनाच्या नवोदय विद्यालय व केंद्रीय विद्यालय यामधील संगीत शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी मिळत आहे. सबब, संगीत शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाची दखल घेऊन संगीत शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी. तसेच एस.एस.सी सह संगीत विशारद व एस.एस.सी. शिवाय संगीत विशारद यांच्यासाठी दोन स्वतंत्र वेतनश्रेणी देण्यात याव्यात.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- विभागाची अंशतः सहमती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच संगीत शिक्षणाची अर्हता व इतर क्षेत्रातील

पदवी यांची समकक्षता कशी ठरविली जावी यासंबंधी स्पष्टता नाही. तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार या संवर्गाच्या कामकाजासंबंधी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन कोणत्या पद्धतीने करण्यात येईल याबाबतही माहिती नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

७.ग्रंथपाल (पदवीधर व ग्रंथशास्त्रातील पदवी अथवा पदविका) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- पदवीधर ग्रंथपालांना पदवीधर शिक्षकांप्रमाणे ५व्या , ६ व्या व ७ व्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करून वेतनस्तर एस-१० ऐवजी एस-१४ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- विभागाची सहमती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

८.ग्रंथपाल (अशासकीय माध्यमिक शाळेतील मॅट्रीक व ग्रंथालयाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- ग्रंथपाल (अशासकीय माध्यमिक शाळेतील मॅट्रीक व ग्रंथालयाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र) या संवर्गाला अद्याप पर्याप्त कालबद्ध वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली नाही. सबब, सदर संवर्गाला आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वेतनश्रेणी एस-१३ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- विभागाची सहमती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच आश्वासित प्रगती योजना लागू करणे हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून, वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

९.प्रयोगशाळा सहायक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्राप्रमाणे राज्यात वेतन देण्यात येते व समान शैक्षणिक पात्रता, समान काम, समान वेतन हे केंद्र व राज्य शासनाने धोरण स्विकारले, त्याप्रमाणे केंद्रीय विद्यालयातील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अकृषि विद्यापीठातील, महानगरपालिकेतील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील व समाजकल्याण विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील प्रयोगशाळा सहायकांना केंद्राप्रमाणे ६ वा वेतन आयोग देण्यात आलेला आहे. मात्र शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील प्रयोगशाळा सहाय्यक यांना केंद्राप्रमाणे चौथा, पाचवा, सहावा व सातवा वेतन आयोगात वेतन श्रेणी दिलेली नाही. केंद्राप्रमाणे व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रयोगशाळा सहायक या संवर्गाला कालबद्ध पदोन्नती देताना एस-१३ ही वेतनश्रेणी लागू करावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** विभागाची सहमती आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने या संवर्गाच्या कामकाजाचे स्वरुप लक्षात घेवून या संवर्गास ४थ्या वेतन आयोगात समकक्ष रु.९५०-१५०० या वेतनश्रेणी ऐवजी रु.९७५-१६६० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस केली होती. सदर वेतनश्रेणीनुसार ५व्या, ६व्या व ७व्या वेतन आयोगात समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत. तसेच आश्वासित प्रगती योजना लागू करणे हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

१०.वरिष्ठ लिपिक :-

**संघटनेची मागणी :-** लिपिक संवर्गातील शालेय शिक्षण विभागातील व इतर विभागातील कर्मचारी यांच्या वेतनश्रेणी व त्यांना मिळणारे लाभ, बढती इत्यादी तुलना केली असता फारच अल्पशी वाढ दिसून येते. लिपिक संवर्गातील राज्य कर्मचारी हे संबंधित टेबलचे एकच नेमून दिलेले काम पहातो तर, शालेय कर्मचारी अनेक टेबलचे काम एकटा पहात असतो. यास्तव प्रस्तुत संवर्गाला वेतनश्रेणी एस-८ ऐवजी एस-९ लागू करावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** विभागाची सहमती आहे.

**समितीची शिफारस :-** सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय/लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -८ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

११.प्रयोगशाळा परिचर :-

**संघटनेची मागणी :-** केंद्राप्रमाणे राज्यात वेतन देण्यात येते व समान शैक्षणिक पात्रता, समान काम, समान वेतन हे केंद्र व राज्य शासनाने धोरण स्विकारले, त्याप्रमाणे केंद्रीय विद्यालयातील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अकृषि विद्यापीठातील, महानगरपालिकेतील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील व समाजकल्याण विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील प्रयोगशाळा परिचर यांना केंद्राप्रमाणे ६ वा वेतन आयोग देण्यात आलेला आहे. मात्र शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील प्रयोगशाळा सहाय्यक यांना केंद्राप्रमाणे चौथा, पाचवा, सहावा व सातवा वेतन आयोगात वेतन श्रेणी दिलेली नाही. केंद्राप्रमाणे व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रयोगशाळा परिचर या संवर्गाला कालबद्ध पदोन्नती देताना एस-८ ही वेतनश्रेणी लागू करावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** विभागाची सहमती आहे.

समितीची शिफारस :- वेतनसमानीकरण समितीने (४थ्या वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच मा. उच्च न्यायालयाकडे या संदर्भात रिट याचिका क्रमांक ६०२८/२०१४, ५६९४/२०१३ आणि ५६९६/२०१३ दाखल झाल्याचे प्रस्तावात नमूद असून, यावर मा. न्यायालयाचे कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत. विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. सबब, या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळून येत नाही. तसेच आश्वासित प्रगती योजना लागू करणे हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

१२.कनिष्ठ लिपिक :-

संघटनेची मागणी :- लिपिक संवर्गातील शालेय शिक्षण विभागातील व इतर विभागातील कर्मचारी यांच्या वेतनश्रेणी व त्यांना मिळणारे लाभ, बढती इत्यादी तुलना केली असता फारच अल्पशी वाढ दिसून येते. लिपिक संवर्गातील राज्य कर्मचारी हे संबंधित टेबलचे एकाच नेमून दिलेले काम पहातो तर, शालेय कर्मचारी अनेक टेबलचे काम एकटा पहात असतो. यास्तव प्रस्तुत संवर्गाला वेतनश्रेणी एस-६ ऐवजी एस-७ लागू करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- विभागाची सहमती आहे.

समितीची शिफारस :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -६ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

ब) शिक्षण आयुक्तालय, पुणे

१३.विधि अधिकारी :-

संघटनेची मागणी :- गृह विभागातील विधि अधिकारी यांच्या वेतनश्रेणीबाबत केलेल्या बदलाप्रमाणे एस-१६ वरून एस-१८ अशी दुरूस्ती करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वित्त विभाग शासन निर्णय, दि.१३/०२/२०२३ अन्वये गृह विभागातील विधि अधिकारी यांच्या वेतनश्रेणीमध्ये वेतनस्तर एस-१६ वरुन एस- १८ अशी करण्यात आलेली आहे. सद्यःस्थितीत शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत येणाऱ्या विधि अधिकारी यांची वेतनश्रेणी ही एस-१६ अशी आहे. उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार गृह विभागातील विधि अधिकारी यांच्या वेतनश्रेणीबाबत केलेल्या बदलाप्रमाणे शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत येणाऱ्या विधि अधिकारी यांचे कर्तव्य लक्षात घेता त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये वेतनस्तर एस-१६ वरुन एस-१८ अशी वेतन श्रेणी लागू करणेबाबत विचार व्हावा असे वाटते.

<u>समितीची शिफारस :-</u> शालेय शिक्षण विभागातील विधि अधिकारी व गृह विभागातील विधि अधिकारी यांची वेतनश्रेणी ५व्या, ६व्या व ७व्या वेतन आयोगामध्ये समान होती. तथापि, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये गृह विभागातील विधि अधिकारी यांची वेतनश्रेणी एस-१६ वरुन एस-१८ अशी मंजूर करण्यात आली आहे. सबब प्रस्तुत संवर्गालाही एस-१६ रु.४४९००-१४२४०० ऐवजी एस-१८ रु.४९१००-१५५८०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१४.महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (प्रशिक्षण शाखा) /अधिव्याख्याता :-

<u>संघटनेची मागणी :-</u> महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब (प्रशासन शाखा) या संवर्गातील उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदांप्रमाणे महाराष्ट्र शिक्षणसेवा गट ब (प्रशिक्षण शाखा) या संवर्गातील अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या पदाची वेतनत्रुटी दूर करुन ६ व्या वेतन आयोगानुसार ४४०० ऐवजी ४८०० ग्रेड वेतन लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पदाची कर्तव्ये विचारात घेता सदरची वेतन त्रुटी दूर करुन रु.७५००-१२००० या वेतन श्रेणीतील समकक्ष असणारी सुधारित संरचनेनुसार रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ४८००/- (सातव्या आयोगानुसार एस-१७) अशी वेतन श्रेणी लागू करणेबाबत विचार व्हावा.

<u>समितीची शिफारस:-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याच्या अनुषंगाने कोणतेही नवीन कारण नमूद केलेले नाही. तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (प्रशासन शाखा) व महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (शिक्षण प्रशिक्षण शाखा) हे दोन्ही वेगवेगळे संवर्ग आहेत. प्रस्तुत संवर्गाला ५ व्या व ६ व्या वेतन आयोगातील मंजूर वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१५.अधीक्षक, सारासे (गट-ब) :-

<u>संघटनेची मागणी :-</u> शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.५.११.२००८ व शुध्दीपत्रक दि.२८.८.२०१४ अन्वये महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब व महाराष्ट्र शिक्षणसेवा गट - क (प्रशासन शाखा) या संवर्गातील सर्व पदांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. परंतु अधीक्षक स.रा.से या पदाची वेतनश्रेणी सुधारित केली नाही. सबब, अधीक्षक, सामान्य राज्य सेवा (गट ब) राजपत्रित या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करुन सातव्या वेतन आयोगानुसार एस-१४ ऐवजी एस-१६ (४४९००-१४२४००) ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> अधीक्षक सा.रा.से (गट-ब) राजपत्रित या पदाची कर्तव्ये विचारात घेता, सदर पदाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करुन एस-१६ ही वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत निर्णय घेणे योग्य राहील.

**समितीची शिफारस :-** विभागाने ज्या संवर्गाशी तुलना केली आहे त्या संवर्गाचे व प्रस्तुत संवर्गाचे सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदारी यांचे तुलनात्मक विश्लेषण उपलब्ध करुन दिलेले नाही. तसेच वेतन समानीकरण समितीने या संवर्गाला ४थ्या वेतन आयोगात रु.५००-९०० या समकक्ष वेतनश्रेणी ऐवजी रु.१६४०-२९०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस केली होती. सदर वेतनश्रेणीनुसार ५व्या, ६व्या व ७व्या वेतन आयोगात समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळत नाही.

१६.तबला वादक :-

**संघटनेची मागणी :-** शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ नुसार राज्यवेतन सुधारणा समितीने केलेली शिफारस शासनाने मान्य करुन ज्या संवर्गांना सुधारित वेतनस्तर मंजूर केलेल्या अशा संवर्गातील अ.क्र.१०० वरील तबलजी संवर्गाला समितीने शिफारस केलेल्या सातव्या वेतन आयोगातील सुधारित वेतन स्तर एस-८- २५५००-८११०० दिलेला असून, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्र.६६, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ०३.०३.२०२३ नुसार तबलजी संवर्ग (अ.क्र. ४२) पदाच्या सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर वाढ न देता पूर्वीप्रमाणेच एस-६, १९९००-६३२०० नमूद करण्यात आली आहे, तसेच त्रिस्तरीय वेतनश्रेणीसुद्धा नमूद करण्यात आलेली नाही. वास्तव शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ नुसार एस-८ ही वेतनश्रेणी देण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** तबलजी संवर्ग या पदाला वेतन मॅट्रीक्स मधील दुरुस्ती करुन या पदाची शैक्षणिक पात्रता व महत्व लक्षात घेऊन एस-६ ऐवजी एस-८ अशी वेतनश्रेणी लागू करणेबाबत विचार व्हावा असे वाटते.

**समितीची शिफारस :-** प्रस्तुत संवर्गाला वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३.२.२०२३ अन्वये एस-६ ऐवजी एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ०४.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये तबलजी यांच्या वेतनश्रेणीत एस-६ ऐवजी एस-८ अशी सुधारणा करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेत कोणतीही त्रुटी नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाला त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भातील बाब प्रशासकीय स्वरुपाची असल्याने चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारशीप्रमाणे अर्हता तपासून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने उचित कार्यवाही करावी.

**********

## ३.१९ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

<u>प्रस्तावाचा सारांश</u>

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय | | | | |
| १ | उप संचालक | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु. ५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| २ | सहायक संचालक | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ३ | सहायक अभियुक्त, गट-अ | ९३००-३४८०० | ५००० | एस-१८ रु.४९१००-१५५८०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ४ | ग्रंथपाल | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |

अ)व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

१.उपसंचालक :-

<u>संघटनेची मागणी :-</u> या संवर्गातील मंजूर पदे आणि कार्यरत पदांची संख्या पाहता, कर्तव्य आणि जबाबदारी यामध्ये वाढ होणार असल्याने इतर विभागातील गट अ (कनिष्ठ)(अतांत्रिक) या संवर्गातील पदांना मंजूर असणाऱ्या वेतन स्तरानुसार उपसंचालक (प्रशासन) या पदासाठी वेतनश्रेणी एस-२० ऐवजी वेतनश्रेणी एस-२३ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील पदांच्या आकृतीबंधानुसार उपसंचालक (प्रशासन) या संवर्गाचे वेतनस्तर एस-२० मंजूर केले आहे. सदर पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया अंतर्गत कार्यरत असणाऱ्या गट-अ, गट-ब व गट-क या संवर्गातील अधिकाऱ्यांचे राज्यस्तरावरील आस्थापनाविषयक कामकाज तसेच प्रशासकीय स्वरुपाच्या सर्व कामकाजाची जबाबदारी आणि संचालनालयाच्या स्थानिक स्तरावरील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांचे सर्व आस्थापनाविषयक कामकाजाचा अंतर्भाव असल्याने या पदाच्या कर्तव्य तसेच जबाबदारी यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच सदर पदाशी समकक्ष कौशल्य, रोजगार व उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत असलेल्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयामधील

उपआयुक्त, अर्थ व सांख्यिकी विभाग, राज्य कामगार विमा योजना या विभागातील उपसंचालक या पदासाठी एस-२३ मंजूर करण्यात आलेली आहे. त्यामुळे या पदासाठी वेतनस्तर एस-२३ लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- सदर पद दि.१८.१२.२०२३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नव्याने निर्माण करण्यात आले आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील उपसंचालक हे पद सहायक संचालक या पदाचे पदोन्नतीचे पद आहे. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दि. ०७/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये या संवर्गाचा गट-अ दर्जा विचारात घेऊन वेतनश्रेणी एस-२० रु.५६१००-१७७५०० प्रस्तावित केली आहे. सबब, सदर संवर्गाच्या संबंधाने मागणी केलेली वेतनश्रेणी ही अधिक वेतनाची मागणी असून, वेतनत्रुटी नाही. ७व्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींचे निराकरण करण्यासाठी समिती कार्यरत आहे. प्रसंगतः नमूद करण्यात येते की, विभागाने प्रस्तुत संवर्गाची ज्या संवर्गांशी तुलना केली आहे, त्यांच्याकडील कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्याशी तुलना योग्य ठरत नाही. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२.सहायक संचालक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- या संवर्गातील मंजूर पदे आणि कार्यरत पदांची संख्या पाहता, कर्तव्य आणि जबाबदारी यामध्ये वाढ होणार असल्याने इतर विभागातील गट अ (कनिष्ठ)(अतांत्रिक) या संवर्गातील पदांना मंजूर असणाऱ्या वेतन स्तरानुसार सहायक संचालक (प्रशासन) या पदासाठी वेतनश्रेणी एस-१८ ऐवजी वेतनश्रेणी एस-२० लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील पदांच्या आकृतीबंधानुसार सहायक संचालक/उप सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई या संवर्गातील ०९ पदे मंजूर आहेत. या प्रत्येक पदाचे कामाचे स्वरुप हे पूर्णतः प्रशासकीय/आस्थापना विषयक असुन या पदांचे कामकाज हे मुख्यालय व विभागीय स्तरावर असल्यामुळे सदर पदांचे कर्तव्य व जबाबदारी यामध्ये निश्चितच वाढ झालेली आहे. त्यामुळे सहायक संचालक या पदासाठी वेतनस्तर एस-२० लागू करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- या संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.५००० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी व गट-अ दर्जा विचारात घेऊन राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या शिफारशीनुसार योग्य वेतनश्रेणी एस-१८ रु.४९१००-१५५८०० मंजूर केली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

३.सहायक आयुक्त (गट-अ) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- वेतनश्रेणी एस-१८ ऐवजी एस-२० हा वेतनस्तर लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय या कार्यालयाकरिता, निर्माण करण्यात आलेल्या पदांचा विचार करता उप आयुक्त या पदानंतर पदोन्नतीसाठी कोणतेही पद उपलब्ध नाही. त्यामुळे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता व मार्गदर्शन अधिकारी (गट-ब) व सहायक आयुक्त (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नतीसाठी १ संधी उपलब्ध होते. सबब, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सहायक आयुक्त (गट-अ) या संवर्गातील नामनिर्देशनाने उपलब्ध होणारे उमेदवार सदर पदावरुन कार्यमुक्त होऊन शासनाच्या इतर विभागात रुजू होण्यास प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सहायक आयुक्त (गट-अ) या संवर्गातील नामनिर्देशनाने भरावयाची पदे रिक्त राहण्याचे प्रमाण जास्त आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमातर्गत ज्या संवर्गाचा समावेश आहे त्या संवर्गाना एकसमान वेतनश्रेणी नसून विविध वेतनश्रेणी (एस-१८ ते एस-२३) मंजूर आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०६/०३/२०२४ अन्वये वेतनश्रेणींच्या आधारे पदांचे गटनिहाय वर्गीकरण करण्यात येऊ नये असा निर्णय झाला आहे. प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये विहित करण्यात आली आहे. या संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

४.ग्रंथपाल :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्र शासनाने ग्रंथपाल पदाकरिता, रु.१४००-२६०० या वेतनश्रेणीत समकक्ष रु.५०००-८००० अशी वेतनश्रेणी देऊन दि.२१.२.२००१ च्या आदेशान्वये रु.५५००-९००० अशी पदवीधर/शिक्षकांच्या वेतनश्रेणी इतकी त्रिस्तरीय वेतनश्रेणी दिलेली आहे. तथापि, विभागाने ग्रंथपाल पद व्यपगत करून त्यास वसतीगृह अधिक्षक तथा ग्रंथपाल तथा शारिरिक शिक्षण निदेशक असे पदनाम करून कर्तव्य व जबाबदारीमध्ये वाढ केली, परंतु वेतनश्रेणी मध्ये कोणतीही वाढ केलेली नाही. त्यामुळे ग्रंथपाल या संवर्गातील पदांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-१० ऐवजी एस-१४ लागु करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>:- केंद्र शासनाने ग्रंथपाल पदाकरिता, रु.१४००-२६०० या वेतनश्रेणीत समकक्ष रु.५०००-८००० अशी वेतनश्रेणी देऊन दि.२१.२.२००१ च्या आदेशान्वये रु.५५००-९००० अशी पदवीधर/शिक्षकांच्या वेतनश्रेणी इतकी त्रिस्तरीय वेतनश्रेणी दिलेली आहे. तथापि, विभागाने ग्रंथपाल पद व्यपगत करून त्यास वसतीगृह अधिक्षक तथा ग्रंथपाल तथा शारिरिक शिक्षण निदेशक असे पदनाम करून कर्तव्य व जबाबदारीमध्ये वाढ केली परंतु वेतनश्रेणी मध्ये कोणतीही वाढ केलेली नाही. त्यामुळे ग्रंथपाल या संवर्गातील पदांना ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-१० ऐवजी एस-१४ लागु करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u> :-** कौशल्य , रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन निर्णय, दि.०७/०४/२०२२ अन्वये सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार ग्रंथपाल हा संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात आला असून, वसतीगृह अधीक्षक-नि-ग्रंथपाल-नि-शारिरीक शिक्षण निदेशक हा एकच संवर्ग करण्यात आला असून एस-१० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. तसेच सदर संवर्ग एकत्र केल्यानंतर विभागाने सदर संवर्गाचे नवीन सेवाप्रवेश नियम उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे सदर संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदारीमध्ये वाढ होत आहे याची खातरजमा करता येत नाही. ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर विभागाचा आकृतीबंध सुधारित झाला असल्याने, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये पुन्हा बदल करण्याची आवश्यकता नाही, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही..

**********

३.२० सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| १ | ग्रंथपाल सहायक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |

१.ग्रंथपाल सहायक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील खाजगी अनुदानित समाजकार्य महाविद्यालयामध्ये कार्यरत ग्रंथपाल सहायक / व्यावसायिक सहायक / सहायक ग्रंथपाल या पदांना ६ व्या वेतन आयोगानुसार रु.५२००-२०२०० ग्रेड पे २८०० आणि त्यानुसार ७ व्या वेतन आयोगात एस-१० : रु.२९२००-९२३०० ही वेतनश्रेणी लागु करण्यात आलेली आहे. उपरोक्त पदांना ६ व्या वेतन आयोगानुसार रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० व ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१४ : रु.३८६००-१२२८०० ही वेतनश्रेणी लागू करावी अशी मागणी आम्ही सातत्याने आपल्या विभागाकडे केलेली आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- निरंक

<u>समितीची शिफारस</u> :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक २९.०२.२०२४ अन्वये समाजकार्य महाविद्यालय (बी.एस.डब्ल्यु/एम.एस.डब्ल्यु) अभ्यासक्रम हा विषय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. विचाराधीन संवर्गाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडूनही कोणताही प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही. समितीच्या कार्यपद्धतीनुसार संबंधित प्रशासकीय विभागाने प्रस्तावाची छाननी करुन, अभिप्रायासह प्रस्ताव समितीच्या विचारार्थ सादर करावयाचे आहेत. प्रस्तुत प्रकरणी अशा प्रकारे कार्यवाही झाली नसल्यामुळे, प्रस्तुत संवर्गाच्या मागणीचा समितीला विचार करणे शक्य नाही.

********

## ३.२१ आदिवासी विकास विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | विद्यमान वेतनसंरचना | | सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) | मागणी केलेली वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ |
| | अ) आदिवासी आश्रम शाळा | | | | |
| १ | माध्यमिक मुख्याध्यापक | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| २ | कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ३ | सहायक प्रकल्प अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ४ | माध्यमिक शिक्षक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ५ | गृहपाल | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ६ | अधिक्षक स्त्री-पुरुष | ५२००-२०२०० | ३५०० | एस-१२ रु.३२२००-१०१६०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| ७ | प्राथमिक शिक्षक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| ८ | ग्रंथपाल (गट-क) | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ९ | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१२ रु.३२२००-१०१६०० |
| १० | प्रयोगशाळा सहायक (गट-क) | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५०० ८११०० |
| ११ | कनिष्ठ लिपिक/ लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| १२ | प्रयोगशाळा परिचर | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-१७ रु.एस-८ रु.२५५०० .८१५०० (आ.प्र.यो.लाभ) |

अ) आदिवासी आश्रम शाळा

१. माध्यमिक मुख्याध्यापक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा या निवासी पद्धतीच्या आहेत. माध्यमिक मुख्याध्यापक हे पद निवासी असल्याने या ठिकाणी चोवीस तास शाळेवर कार्यरत रहावे लागते. परंतु माध्यमिक मुख्याध्यापक यांना मिळणारी वेतनश्रेणी ही खाजगी शाळांना कार्यरत असणाऱ्या माध्यमिक मुख्याध्यापकांइतकी आहे. तसेच राज्यामध्ये कार्यरत असलेल्या नवोदय विद्यालय, एकलव्य रेसिडेंशिल स्कूल व केंद्रीय विद्यालय येथील माध्यमिक मुख्याध्यापक यांना मिळणारी वेतनश्रेणी वेगळी आहे. समान काम समान वेतन या धर्तीवर आश्रमशाळेतील सर्व माध्यमिक मुख्याध्यापकांना एस-१७ रु.४७६००-१५११०० ऐवजी एस-२५ रु.७८८००-२०९२०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील शालेय शिक्षण व क्रिडा विभागातील माध्यमिक शाळांतील माध्यमिक मुख्याध्यापक या पदासाठी असलेली वेतनश्रेणी व आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळांतील माध्यमिक मुख्याध्यापक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी एकसमान आहे. सबब, शासकीय आश्रमशाळांतील माध्यमिक मुख्याध्यापक संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी विभागाच्या अभिप्रायासह वेतन त्रुटी निवारण समितीकडे शिफारस करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- आदिवासी आश्रम शाळामधील माध्यमिक मुख्याध्यापक यांनी नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय आणि एकलव्य इंग्लिश मिडीयम स्कूल मधील माध्यमिक मुख्याध्यापक संवर्गाशी तुलना करुन एस-२५ या वेतनश्रेणीची मागणी केली आहे. सदर तुलना योग्य ठरत नाही. प्रस्तुत संवर्गाचा वेतनत्रुटी निवारण समिती, २०१२ मध्ये रु.९३००-३४८०० ग्रे.वे.४८०० वेतनश्रेणी लागू करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव मान्य झाला असून, वित्त विभागाचा शासन निर्णय दि.११/०२/२०१३ अन्वये सदर संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सातव्या वेतन आयोगानमध्ये सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- आदिवासी विकास विभागातील अनुदानित व शासकीय आश्रमशाळा इयत्ता ११ वी १२ वीच्या वर्गासाठी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक / उच्च माध्यमिक शिक्षण संवर्गाची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पदासाठीच्या अर्हता या महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या अधिसूचनेनुसार ग्राह्य धरल्या जातात. परंतु, भारत सरकारच्या अखत्यारितील केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय व एकलव्य रेसिडेंशियल स्कूल येथे नियुक्त पदव्युत्तर शिक्षक

व महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील नियुक्त कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक शिक्षक यांच्या वेतनश्रेणीत एकरामानता दिसून येत नाही. सबब, आदिवासी विकास विभागातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक/उच्च माध्यमिक शिक्षकांना केंद्र शासनाच्या शैक्षणिक संघटनांच्या धर्तीवर ग्रेड वेतन रू.४८०० अनुरुप सातव्या वेतन आयोगात एस-१७ ही वेतनश्रेणी सुधारणा होणेस विनंती आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- आदिवासी विकास विभागाच्या दि.१५/०३/२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम प्रसिद्ध करण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील शालेय शिक्षण व क्रिडा विभागातील उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यामधील कनिष्ठ महाविद्यालये शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक यांचेशी एकसमान आहे. सबब, कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी विभागाच्या अभिप्रायासह वेतन त्रुटी निवारण समितीकडे शिफारस करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- आदिवासी आश्रम शाळामधील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक यांनी नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय आणि एकलव्य इंग्लिश मिडीयम स्कूल मधील कनिष्ठ महाविद्यालयीन संवर्गाशी तुलना करुन एस-१६ या वेतनश्रेणीची मागणी केली आहे. या संवर्गाची तुलना शिक्षण विभागातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक यांच्याशी करुन, प्रस्तुत संवर्गाची वेतनत्रुटी निवारण समिती, २०१२ मध्ये रु.९३००-३४८०० ग्रे.वे.४६०० वेतनश्रेणी लागू करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव मान्य झाला असून, वित्त विभागाचा शासन निर्णय दि.११/०२/२०१३ अन्वये सदर संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सातव्या वेतन आयोगामध्ये सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

३.सहायक प्रकल्प अधिकारी:-

<u>संघटनेची मागणी</u> :- शालेय शिक्षण विभागामध्ये तालुका स्तरावर शिक्षण विषयक बाबींसाठी गट शिक्षणाधिकारी यांची नियुक्ती केली जाते. ते तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व इतर खाजगी शाळा यांच्यातील शिक्षण विषयक बाबीला जबाबदार अधिकारी म्हणून काम करतात. आदिवासी विकास विभागात सहायक प्रकल्प अधिकारी यापदाची निर्मिती आदिवासी विकास विभागातील शासकीय व अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील शिक्षण विषयक बाबींच्या नियंत्रणासाठी किमान ५ तालुके व अधिक या कार्यक्षेत्रासाठी करण्यात आली आहे.

सदर पद हे आदिवासी विकास विभागातील शिक्षण विषयक बाबींशी निगडीत महत्वाचे पद असल्याने सदर पद गट शिक्षणाधिकारी/ उप शिक्षणाधिकारी/मुख्याध्यापक (शासकीय शाळा)

यांस समकक्ष असे पद आहे. या पदास निम्नस्तराची वेतनश्रेणी लागू आहे. वास्तव, वेतनस्तर एस-१५ ऐवजी एस-१७ लागू करावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- शालेय शिक्षण व क्रिडा विभागातील गट शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व इतर संवर्ग, गट ब यांची मूळ वेतनश्रेणी ही एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी असून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचो व आदिवासी विकास विभागाच्या शिक्षण कक्षातील संवर्गाची रचना वेगवेगळी आहे. त्यामुळे संघटनेने शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या धर्तीवर सहायक प्रकल्प अधिकारी या संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत केलेली मागणी प्रथम दर्शनी योग्य दिसून येत नाही. तसेच, आदिवासी विकास सेवेतील प्रशासकीय संरचनेतील सहायक प्रकल्प अधिकारी एस-१५ या पदाशी समकक्ष सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) हे पद आहे. सबब, सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) या पदांसाठी एस-१५ असलेली वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी विभागाच्या अभिप्रायासह वेतन त्रुटी निवारण समितीकडे शिफारस करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- शालेय शिक्षण विभागातील गट शिक्षणाधिकारी व आदिवासी विकास विभागातील सहायक प्रकल्प अधिकारी या दोन्ही पदांची वेतनश्रेणी ४ थ्या वेतनआयोगामध्ये समान होती. तथापि, ५ व्या वेतन आयोगामध्ये गट शिक्षणाधिकारी संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये बदल करण्यात आला आहे. विभागाने प्रस्तुत संवर्ग गट शिक्षणाधिकारी या संवर्गाशी समकक्ष असल्याबाबत कोणतेही कागदपत्र उपलब्ध करुन दिले नाहीत.

प्रसंगतः नमूद करण्यात येते की, आदिवासी विकास विभागाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सहायक प्रकल्प अधिकारी या पदावर माध्यमिक शिक्षक/ प्राथमिक मुख्याध्यापक/ पदवीधर प्राथमिक शिक्षक या संवर्गातून मर्यादित विभागीय परीक्षेच्या आधारे भरली जातात. सदर मर्यादित विभागीय परीक्षा उपरोक्त संवर्गातील उमेदवार स्वेच्छेने देत असतात. प्रस्तुत संवर्गाला ४थ्या, ५व्या, ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

४. माध्यमिक शिक्षकः-

<u>संघटनेची मागणी</u> :- आदिवासी विकास विभागातील अनुदानित व शासकीय आश्रमशाळा इयत्ता आठवी ते दहावी वर्गासाठी नियुक्त माध्यमिक शिक्षक या पदाची शैक्षणिक अर्हता भारत सरकारच्या एनसीटीई व त्याबरहुकुम महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या अधिसूचनेनुसार ग्राह्य धरण्यात येते. केंद्र शासनाच्या एनसीटीईच्या अधिसूचनेनुसार प्रशिक्षित पदवीधर शिक्षक व महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या इयत्ता आठवी ते दहावी साठी नियुक्त माध्यमिक शिक्षक ही दोन्ही पदे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता बाबतीत समकक्ष आहेत. परंतु भारत सरकारच्या अखत्यारितील केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय व एकलव्य रेसिडेंशिल स्कूल येथे नियुक्त प्रशिक्षित पदवीधर शिक्षक व महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील

नियुक्त माध्यमिक शिक्षक यांच्या वेतनश्रेणीत एकसमानता दिसून येत नाही. सबब, आदिवासी विकास विभागातील माध्यमिक शिक्षकांना भारत सरकारच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक यांच्या धर्तीवर ग्रे.पे.४६०० नुसार सातव्या वेतन आयोगात एस-१६ रु.४४९००-१४२४०० प्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी. तसेच या प्रमाणात वरिष्ठ व निवडश्रेणीचा लाभ देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील माध्यमिक शिक्षक / प्राथमिक शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी व आदिवासी विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील माध्यमिक शिक्षक / प्राथमिक शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी एकसमान आहे. सबब, माध्यमिक शिक्षक / प्राथमिक शिक्षक संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी विभागाच्या अभिप्रायासह वेतन त्रुटी निवारण समितीकडे शिफारस करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u>:- महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील शालेय शिक्षण व क्रिडा विभागातील माध्यमिक शिक्षक / प्राथमिक शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी व आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील माध्यमिक शिक्षक / प्राथमिक शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी समान आहे. आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील माध्यमिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

५.गृहपाल:-

<u>संघटनेची मागणी</u> :- गृहपाल संवर्गाला आदिवासी विकास विभागाच्या दि.११.११.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजपत्रित दर्जा देऊन कार्यालय प्रमुख घोषित करावे व सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रु.४८०० व सातव्या वेतन आयोगानुसार एस-१४ रु.३८६००-१२२८०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० वेतनस्तर लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय विभागाच्या अधिनस्त वसतीगृहातील गृहपाल या पदासाठी असलेली वेतनश्रेणी व आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वसतीगृहातील गृहपाल यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी एकसमान आहे. तसेच गृहपाल/कार्यालय अधिक्षक/वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक व इतर गट-क संवर्गामधून सहायक प्रकल्प अधिकारी गट-ब राजपत्रित या पदावर पदोन्नती देण्यात येते. संघटनेने पदोन्नतीच्या पदापेक्षा जास्त वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी केली आहे. शासकीय वसतीगृहातील गृहपाल संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

समितीची शिफारस :- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.११/११/२०११ नुसार शासकीय आदिवासी वसतीगृहात देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांमध्ये सुसूत्रता आणण्याबाबत सुधारित नियमावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर नियमावलीचा व राजपत्रित दर्जा

देण्याचा संबंध दिसून येत नाही. सदर संवर्गाला सहाव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनामध्ये त्रुटी आढळत नाही.

६.अधिक्षक स्त्री-पुरुष:-

संघटनेची मागणी :- आश्रमशाळा अधिक्षकांना शैक्षणिक पात्रता मास्टर डिग्री व व्यवस्थापकीय/पर्यवेक्षकीय जबाबदारी असूनही वेतनश्रेणी मात्र लिपिक वर्गीय देण्यात येत आहे. सन २००६ पासून आदिवासी विकास विभागांमध्ये गुणवत्ता दर्जा वाढविण्यासाठी अधिक्षक पदाची शैक्षणिक अर्हता एमएसडब्ल्यु मान्यता देण्यात आली आहे. परंतु, आदिवासी आश्रमशाळा शासनाकडून कायम दुर्लक्षित राहिली आहे. पाचव्या व सहाव्या वेतन आयोगात झालेला हा अन्याय सातव्या वेतन आयोगात होणार नाही अशी अपेक्षा होती. तथापि, खंड-२ मध्ये शासन निर्णय दि.१३/०२/२०२३ अन्वये एस-१४ ऐवजी एस-१२ रु.३२०००-१०१६०० ही वेतनश्रेणी लागू केली आहे. त्याऐवजी एस-१४ रु.३८६००-१२२८०० हा वेतनस्तर लागू करून अन्याय दूर करणे गरजेचे आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- आदिवासी विकास विभागातील शासकीय आश्रमशाळेतील अधिक्षक (स्त्री/पुरुष) यांना गृहपाल पदावर पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे. गृहपाल संवर्गातील ७५ टक्के पदे ही सरळसेवेद्वारे व २५ टक्के पदे ही पदोन्नतीद्वारे भरण्यात येतात. तरी, आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना यांनी शासकीय आश्रमशाळातील अधिक्षक (पुरुष/स्त्री) या संवर्गाकरिता, एस-१४ असा वेतनस्तर लागू करण्याची मागणी केली आहे. तथापि, एस-१४ हा वेतनस्तर अधिक्षक पदाकरिता, असलेल्या पदोन्नतीच्या पदाचा वेतनस्तर असल्याने सदर वेतनस्तर अधिक्षक (पुरुष/स्त्री) या संवर्गाकरिता, लागू करणे उचित होणार नाही.

समितीची शिफारस :- शासकीय आश्रमशाळातील अधिक्षक (पुरुष/स्त्री) या संवर्गाकरिता, एस-१४ असा वेतनस्तर लागू करण्याची मागणी केली आहे. तथापि, एस-१४ हा वेतनस्तर अधिक्षक पदाकरिता, असलेल्या पदोन्नतीच्या पदाचा वेतनस्तर आहे. तसेच वेतनत्रुटी निवारण समिती, २०१७ च्या शिफारशीनुसार वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३/०२/२०२३ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११०० वरून एस-१२ रु.३२०००-१०१६०० अशी सुधारित करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनामध्ये त्रुटी आढळत नाही.

७.प्राथमिक शिक्षक:-

संघटनेची मागणी :- आदिवासी विकास विभागातील अनुदानित व शासकीय आश्रमशाळा इयत्ता पहिली ते सातवी वर्गासाठी नियुक्त प्राथमिक शिक्षक या पदाची शैक्षणिक अर्हता भारत सरकारच्या एनसीटीई, आरटीई २००९ व त्या हरहुकूम महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अधिसूचनेनुसार ग्राह्य धरण्यात येते. केंद्र शासनाच्या एनसीटीईच्या अधिसूचनेनुसार इयत्ता पहिली ते पाचवी साठी प्राथमिक शिक्षक व महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या इयत्ता पहिली ते पाचवी साठी नियुक्त प्राथमिक शिक्षक ही दोन्ही पदे कर्तव्य व जबाबदाऱ्या तसेच शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता याबतीत समकक्ष आहेत. परंतु भारत

सरकारच्या अखत्यारितील केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय व एकलव्य रेसिडेंशिल स्कूल येथे नियुक्त प्राथमिक शिक्षक व महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील नियुक्त प्राथमिक शिक्षक यांच्या वेतनश्रेणीत एकसमानता दिसून येत नाही. सबब, आदिवासी विकास विभागातील प्राथमिक शिक्षकांना केंद्र शासनाच्या शैक्षणिक संघटनांच्या धर्तीवर ग्रे.वे. रु. ४२०० नुसार सातव्या वेतन आयोगात एस-१३ रु.३५४००-११२४०० प्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी. तसेच या प्रमाणात वरिष्ठ व निवडश्रेणीचा लाभ देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील माध्यमिक शिक्षक/प्राथमिक शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी व आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील माध्यमिक शिक्षक/प्राथमिक शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी एकसमान आहे. माध्यमिक शिक्षक/प्राथमिक शिक्षक संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी विभागाच्या अभिप्रायासह वेतन त्रुटी निवारण समितीकडे शिफारस करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील माध्यमिक शिक्षक / प्राथमिक शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी व आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील माध्यमिक शिक्षक / प्राथमिक शिक्षक यांचेसाठी असलेली वेतनश्रेणी समान आहे. आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील प्राथमिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

८. ग्रंथपाल (गट-क):-

<u>संघटनेची मागणी</u> :-केंद्रीय विद्यालय संघटनेच्या नवोदय विद्यालय (६ वी ते १२ वी)या वर्गासाठी शाळा असून आदिवासी विकास विभागाच्या शासकीय उच्च माध्यमिक आश्रमशाळा ह्या पहिली ते बारावी पर्यंतच्या असून देखिल वेतनश्रेणीमध्ये तफावत आहे. ग्रंथपाल संवर्गाच्या वेतनश्रेणीत असलेली अन्यायकारक तफावत /त्रुटीत सुधारणा करून एस-८ रु.२५५००-८११०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. तसेच एस-१७ रु.४७६००-१५११०० (वरिष्ठ वेतनश्रेणी) व एस-२० रु.५६१००-१७७५०० (निवडस्तर वेतनश्रेणी) लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- ग्रंथपाल या संवर्गाच्या विद्यमान सेवाप्रवेश नियमांनुसार पुढील पदोन्नतीचे पद उपलब्ध नसल्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील कार्यरत ग्रंथपाल, जे ग्रंथपाल शास्त्रातील पदवी धारण करतात त्यांच्यासाठी केंद्रिय विद्यालय संघटनेच्या नवोदय विद्यालय व केंद्र शासनाने राज्य स्तरावर सुरू केलेल्या एकलव्य पब्लिक स्कुल या शाळांमध्ये ग्रंथपाल या संवर्गासाठी असलेली एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तथापि, शासनाच्या इतर विभागातील कार्यालयातील (उदा. लोक आयुक्त व उप लोकायुक्त, शिक्षण संचालनालय, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, समाजकल्याण संचालनालय इत्यादि.) ग्रंथपाल या संवर्गास एस-१० रु.२९२००-

९२३०० हा वेतनस्तर नमूद केलेला आहे. सदर वस्तुस्थिती पाहता, संघटनेने मागणी केल्याऐवजी राज्य शासनातील इतर विभागातील कार्यालयांमधील ग्रंथपाल या संवर्गास आलेली एस-१० रु.२९२००-९२३०० हा वेतनस्तर आदिवासी विकास सेवेतील ग्रंथपाल संवर्गास लागू करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- संघटनेने केंद्रीय विद्यालयातील ग्रंथपाल या संवर्गाला लागू असलेली एस-०६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी मिळण्याबाबत मागणी केली आहे. तथापि, केंद्रीय विद्यालय संघटन मध्ये ग्रंथपाल या संवर्गामध्ये भरती करण्यासाठी शैक्षणिक अर्हता ग्रंथालय शास्त्रातील पदवी (डिग्री) आहे. तर आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथपाल यांच्यासाठी शैक्षणिक अर्हता ग्रंथालय शास्त्रातील पदविका (डिप्लोमा) आहे. आदिवासी विभागाच्या अधिनस्त आश्रमशाळांमधील ग्रंथपाल संवर्गाला सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रे.वे. रु.२४०० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस-८ रु.२५५००-८११०० लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गातील वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

९.वरिष्ठ लिपिक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- आश्रमशाळा संहितेनुसार लिपिकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या लक्षात घेता लिपिकांना एकूण ४१ प्रकारची विविधता पूर्ण कामे करावी लागतात. यास्तव वरिष्ठ लिपिक संवर्गास एस-८ ऐवजी एस-१२ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- विधि व न्याय विभाग व मंत्रालयीन लिपिक यांच्या धर्तीवर आदिवासी विकास लिपिक संवर्गीय कर्मचारी संघटना यांनी आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील कनिष्ठ लिपिक /लिपिक-टंकलेखक व वरिष्ठ लिपिक या संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत केलेली मागणी प्रथमदर्शनी योग्य दिसून येते.

<u>समितीची शिफारस</u> :- विधि व न्याय विभाग व मंत्रालयीन लिपिक या संवर्गाशी केलेली तुलना योग्य नाही. सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणे ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -८ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

१०. प्रयोगशाळा सहायक (गट-क):-

संघटनेची मागणी :- एकलव्य पब्लिक शाळांतर्गत पाचवी ते बारावी पर्यंतच्या निवासी आश्रमशाळा असून सदरच्या शाळांमध्ये प्रयोगशाळा सहायक या संवर्गासाठी एस-८ वेतनश्रेणी लागू आहे. सदरच्या एकलव्य पब्लिक शाळा हया सद्य:स्थितीमध्ये शासकीय आश्रमशाळांच्या ठिकाणी एकाच कॅंपस मध्ये सुरु करण्यात आल्या आहेत. त्यामुळे एकाच ठिकाणामध्ये सुरु असलेल्या

शासकीय आश्रमशाळा व एकलव्य पब्लिक शाळांमधील प्रयोगशाळा सहायक संवर्गाच्या दोन वेगवेगळ्या वेतनश्रेण्या दिसून येतात तेव्हा प्रयोगशाळा सहायक संवर्गाकरिता, एस-६ ऐवजी एस-८ वेतनश्रेणी मंजूर करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्रयोगशाळा सहायक या संवर्गाच्या विद्यमान सेवाप्रवेश नियमानुसार प्रयोगशाळा सहायक या संवर्गास पुढील पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही. त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील उच्च माध्यमिक आश्रमशाळातील कार्यरत प्रयोगशाळा सहायक जे विज्ञान शाखेतील पदवी धारण करतात, त्यांच्यासाठी केंद्र शासनाने राज्य स्तरावर सुरू केलेल्या एकलव्य पब्लिक शाळांमध्ये प्रयोगशाळा सहायक या संवर्गासाठी असलेला एस-८ रु.२५५००-८११०० हा वेतनस्तर लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- प्रयोगशाळा सहायक (गट-क) या संवर्गाच्या विद्यमान सेवाप्रवेश नियमानुसार प्रयोगशाळा सहायक या पदावर सरळसेवेने भरती करण्यासाठी शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी आहे तर, एकलव्य पब्लिक स्कुल या संवर्गामध्ये सरळसेवेने भरती करण्यासाठी शैक्षणिक अर्हता विज्ञान शाखेतील पदवी अशी आहे. वास्तव एकलव्य पब्लिक शाळांमधील प्रयोगशाळा सहायक या संवर्गास लागू असलेली वेतनश्रेणी मिळण्याची मागणी योग्य असल्याचे दिसून येत नाही. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

११.कनिष्ठ लिपिक/ लिपिक-टंकलेखक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- आश्रमशाळा संहितेनुसार लिपिकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या लक्षात घेता, लिपिकांना एकुण ४१ प्रकारची विविधता पूर्ण कामे करावी लागतात. वास्तव कनिष्ठ लिपिक संवर्गास एस-६ ऐवजी एस-८ रु.२५५००-८११००, एस-१२ रु.३२३००-१०१६०० (प्रथम कालबध्द), एस-१३ रु.३५४००-११२४०० (दुसरी कालबध्द) व एस-१४ रु.३८६००-१२२८०० (तिसरी कालबध्द) वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय <u>विभागाचे अभिप्राय</u> :- विधि व न्याय विभाग व मंत्रालयीन लिपिक यांच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागातील लिपिक संवर्गीय कर्मचारी संघटना यांनी आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील कनिष्ठ लिपिक / लिपिक-टंकलेखक या संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत केलेली मागणी प्रथमदर्शनी योग्य दिसून येते.

<u>समितीची शिफारस</u> :- विधि व न्याय विभाग व मंत्रालयीन लिपिक या संवर्गाशी केलेली तुलना योग्य नाही. आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा करुन १२ व २४ वर्षे ऐवजी १०, २० व ३० वर्षांची सुधारित आश्वासित प्रगती योजना दि.०१/०१/२०१६ पासून अस्तित्वात आली आहे. हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असून त्यामुळे बहुसंख्य संवर्गांचा फायदा होत आहे. सेवेच्या कमी कालावधीनंतर पुढील वेतनश्रेणीचा लाभ होत असल्यामुळे सुधारित आश्वासित प्रगती योजना आहे तशीच स्विकारणे हिताचे ठरेल. प्रस्तुत संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. विभागाने या संवर्गास

अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -६ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

१२. प्रयोगशाळा परिचर:-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय वेतन आयोगाच्या स्वीकृत शिफारशीनुसार राज्यातील कृषि विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,समाज कल्याण विभागातील प्रयोगशाळा परिचर या संवर्गाला केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. भारतीय संविधान कलम १४ च्या समान काम समान वेतन या न्यायतत्वाच्या आधारावर आदिवासी विकास विभागातील शासकीय आश्रमशाळेतील प्रयोगशाळा परिचर यांना एस-६ रु.१९९००-६३२०० ऐवजी एस-७ रु.२१७००-६९१०० ही वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- आदिवासी विकास विभागाच्या दि.१६/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. सदर सुधारित आकृतीबंधानुसार प्रयोगशाळा परिचर या संवर्गातील सर्व पदे मृतसंवर्ग घोषित करण्यात आली आहे. दि.१०/०१/२००६ रोजीच्या अधिसूचनेन्वये प्रयोगशाळा परिचर या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम प्रसिद्ध करण्यात आले आहेत. सदरहु सेवाप्रवेश नियमानुसार प्रयोगशाळा परिचर हे पद गट-ड संवर्गाचे आहे. महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील गृह विभाग/उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग/शालेय शिक्षण व क्रीडा विभाग/जलसंपदा विभाग/कृषि व पदुम विभाग या विभागांमध्ये प्रयोगशाळा परिचर हे पद गट-क किंवा गट-ड किंवा दोन्ही (गट-क आणि गट-ड) संवर्गामध्ये आहे. उक्त विभागामध्ये प्रयोगशाळा परिचर, गट-क या पदासाठी एस-६ अशी वेतनश्रेणी आहे व प्रयोगशाळा परिचर गट-ड या पदासाठी एस-१ अशी वेतनश्रेणी आहे. या विभागाच्या अखत्यारित प्रयोगशाळा परिचर हे पद गट-ड या संवर्गात समावेश असून, सदर पदासाठी एस-६ वेतनश्रेणी लागू आहे. सबब, प्रयोगशाळा परिचर या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- आदिवासी विकास विभागाने दिनांक १६.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित केला असून, प्रयोगशाळा परिचर हा संवर्ग मृत घोषित केला आहे. यास्तव या संवर्गाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

********

### ३.२२ नगर विकास विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ) नगररचना व मुल्य निर्धारण संचालनालय | | | | |
| १ | सहायक नगर रचनाकार (श्रेणी-१) | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ ४१८००-१३२३०० | एस-१६ रु. ४४९००-१४२४०० |
| २ | सहायक नगर रचनाकार (श्रेणी-२) | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु. ४४९००-१४२४०० |
| ३ | रचना सहायक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.२४१८००-१३२३०० |

अ) नगररचना व मुल्य निर्धारण संचालनालय

१. सहायक नगर रचनाकार (श्रेणी-१) :-

<u>संघटनेची मागणी :-</u> नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार, श्रेणी-१, आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील सहायक अभियंता, श्रेणी-२, यांच्यामध्ये असलेली समकक्षता विचारात घेता, वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १३.०२.२०२३ अनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील सहायक अभियंता, श्रेणी-२, या संवर्गाकरिता, मंजूर केलेले सुधारित वेतनस्तर नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार, श्रेणी-१, या संवर्गांना लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार, श्रेणी-१, आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील सहायक अभियंता, श्रेणी-२, यांच्यामध्ये असलेली समकक्षता विचारात घेता, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील सहायक अभियंता, श्रेणी-२, या संवर्गाकरिता, मंजूर

केलेले सुधारित वेतनस्तर नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार, श्रेणी-१, या संवर्गांना लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- नगर विकास विभागाच्या दिनांक ०७.०७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नगररचना आणि मुल्यनिर्धारण संचालनालयातील तांत्रिक वर्गातील सहायक नगर रचनाकार/ रचना सहायक व कनिष्ठ अभियंता यांना पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्याप्रमाणे राजपत्रित दर्जा वर्ग-२ देऊन त्याप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रस्तुत संवर्गाला सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे विभागातील सहायक अभियंता श्रेणी-२ प्रमाणे ४ थ्या वेतन आयोगापासून ७ व्या वेतन आयोगापर्यंत वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये सहायक अभियंता श्रेणी-२ या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ वरुन एस-१६ करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० वरून एस-१६ रु.४४९००-१४२४०० सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. सहायक नगर रचनाकार (श्रेणी-२) :-

<u>संघटनेची मागणी</u>:- नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार, श्रेणी-२ आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्यामध्ये असलेली समकक्षता विचारात घेता, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील शाखा अभियंता या संवर्गाकरिता, मंजूर केलेले सुधारित वेतनस्तर नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार, श्रेणी-२ या संवर्गांना लागू करण्यात यावे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार, श्रेणी-२ आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्यामध्ये असलेली समकक्षता विचारात घेता, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील शाखा अभियंता या संवर्गाकरिता, मंजूर केलेले सुधारित वेतनस्तर नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार, श्रेणी-२ या संवर्गांना लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- नगर विकास विभागाच्या दिनांक ०७.०७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नगररचना आणि मुल्यनिर्धारण संचालनालयातील तांत्रिक वर्गातील सहायक नगररचनाकार/ रचना सहायक व कनिष्ठ अभियंता यांना पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्याप्रमाणे राजपत्रित दर्जा वर्ग-२ देऊन त्याप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रस्तुत संवर्गाला सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे विभागातील शाखा अभियंता प्रमाणे ४ थ्या वेतन आयोग पासून ७ व्या वेतन आयोगापर्यंत वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये शाखा अभियंता या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ वरुन एस-१६ करण्यात

आली आहे. प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-१५ रु.४१८००-१३२३०० वरून एस-१६ रु.४४९००-१४२४०० सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. रचना सहायक :-

संघटनेची मागणी:- नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील रचना सहायक आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यामध्ये असलेली समकक्षता विचारात घेता, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील कनिष्ठ अभियंता या संवर्गाकरिता, मंजूर केलेले सुधारित वेतनस्तर नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील रचना सहायक या संवर्गाना लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील रचना सहायक आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यामध्ये असलेली समकक्षता विचारात घेता, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभागातील कनिष्ठ अभियंता या संवर्गाकरिता, मंजूर केलेले सुधारित वेतनस्तर नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील रचना सहायक या संवर्गाना लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- नगर विकास विभागाच्या दिनांक ०७.०७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नगररचना आणि मुल्यनिर्धारण संचालनालयातील तांत्रिक वर्गातील सहायक नगररचनाकार/ रचना सहायक व कनिष्ठ अभियंता यांना पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्याप्रमाणे राजपत्रित दर्जा वर्ग-२ देऊन त्याप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रस्तुत संवर्गाला सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे विभागातील कनिष्ठ अभियंता प्रमाणे ४थ्या वेतन आयोगापासून ६ व्या वेतन आयोगापर्यंत वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२३ अन्वये कनिष्ठ अभियंता या संवर्गाची वेतनश्रेणी एस-१४ वरून एस-१५ करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८०० वरून एस-१५ रु. ४१८००-१३२३०० सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

***********

## ३.२३ जलसंपदा विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ) पाटबंधारे विभाग, मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना व सर्व प्रादेशिक मंडळे | | | | |
| १ | वरिष्ठ भूवैज्ञानिक | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२२ रु.६००००-१९०८०० |
| २ | वैज्ञानिक अधिकारी | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| ३ | वरिष्ठ वैज्ञानिक सहायक | ९३००-३४८०० | ४५०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | ७ व्या वेतन आयोगामध्ये वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदास एस-१६ ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. सदर वैज्ञानिक संवर्गाच्या कनिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदाचे वरिष्ठ वैज्ञानिक सहायक हे पदोन्नतीचे पद असून ग्रेड पे रु.१००/- कमी झाली आहे. सबब, वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदाचा ५ व्या वेतन आयोगापासून होत असलेला अन्याय दूर करून ७ व्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | पदाच्या वेतनश्रेणीतील त्रुटींचे निवारण करण्यात यावे. |
| ४ | सहायक भूवैज्ञानिक (वर्ग-२) | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१९ रु.५५१००-१७५१०० |
| ५ | प्रमुख आरेखक | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ६ | भू वैज्ञानिक सहायक (वर्ग-३) | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| ७ | आरेखक श्रेणी-१ | ५२००-२०२०० ९३००-३४८०० (४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर( | २८०० ४३०० | एस-१० रु.२९२००-९२३०० एस-१४ रु.३८६००-१२२८०० (४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० (४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर) |
| ८ | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| ९ | संदेशक | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| १० | दफ्तर कारकून/ कालवा निरीक्षक/ मोजणीदार | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| ११ | चालक, ऑपरेटर, बिनतारी संदेश यंत्रचालक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | १२ वर्षानंतर एस-८ वेतनस्तर लागू करण्याबाबत |

ड) पाटबंधारे विभाग, मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना व सर्व प्रादेशिक मंडळे

१.वरिष्ठ भूवैज्ञानिक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- जलसंपदा विभागातील वरिष्ठ भुवैज्ञानिक वर्ग-१ व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील विभागांतर्गत भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागातील वरिष्ठ भुवैज्ञानिक वर्ग-१ ही पदे समकक्ष आहेत. वास्तव, जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ भु वैज्ञानिक वर्ग-१ या संवर्गाला एस-२० ऐवजी एस-२२ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- जलसंपदा विभागातील वरिष्ठ भू वैज्ञानिक व सहायक भू वैज्ञानिक यांनी ७ व्या वेतन आयोगानुसार अनुक्रमे एस-२२ व एस-१९ हा वेतनस्तर मिळण्याबाबत मोघम स्वरुपात स्वरुपाची मागणी केलेली दिसून येत आहे. या संवर्गातील कर्मचाऱ्यांनी सदरची मागणी करताना काहीही कारण नमूद केलेले दिसुन येत नाही. तसेच याबाबत समर्थनीय मुद्दे नाहीत. याबाबत उचित निर्णय घेण्याबाबत प्रस्ताव वेतन त्रुटी समितीच्या विचारार्थ ठेवण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ३ ऱ्या, ४थ्या , ५व्या व ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर असल्याने, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२.वैज्ञानिक अधिकारी :-

संघटनेची मागणी :- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

समितीची शिफारस :- वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या संवर्गाचा पदोन्नतीचा संवर्ग वैज्ञानिक अधिकारी हा आहे. शासन शुद्धिपत्रक दिनांक १८.०१.२०१९ अन्वये ६ व्या वेतन आयोगामध्ये वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या संवर्गाला रु.९३००-३४८०० ग्रे.वे. रु.४५०० व वैज्ञानिक अधिकारी या संवर्गाला रु.९३००-३४८०० ग्रे.वे.रु.४६०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. तथापि, ७ व्या वेतन आयोगामध्ये रु.४५०० व रु.४६०० या दोन्ही ग्रेडवेतनाकरिता, एस-१६ रु.४४९००-१४२४०० हा वेतनस्तर मंजूर करण्यात आला आहे. यास्तव पदोन्नतीच्या पदाची व निम्न पदाची वेतनश्रेणी एकच झाली असल्याने पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. वैज्ञानिक अधिकारी या संवर्गाला एस-१६ रु.४४९००-१४२४०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० अशी सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३.वरिष्ठ वैज्ञानिक सहायक :-

संघटनेची मागणी :- वैज्ञानिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदास वेतन बँड (९३००-३४८००ग्रे.वे.४५००) ही वेतन श्रेणी मंजूर करण्यात आली आहे. परंतु, बक्षी समितीने ७ व्या वेतन आयोगाच्या खंड १ मधील वेतनत्रुटीत सुधारणा करून

सदर वैज्ञानिक संवर्गातील वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदास एस-१६ ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. सदर पद हे कनिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदाचे पदोन्नतीचे पद असून ग्रेड पे रू.१०० ने कमी करण्यात आले आहे. सबब, वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदाचा ५ व्या वेतन आयोगापासून होत असलेला अन्याय दूर करून ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील त्रुटीचे निवारण करण्यात यावे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- ७ व्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना एस-१६ वेतनस्तर मंजूर करण्यात आला आहे. परंतु ७ व्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रीक स्तंभातील ग्रेड पे रु.४५००/- व ग्रेड पे रु.४६००/- साठी एस-१६ हा एकच वेतनस्तर लागू करण्यात आला आहे. म्हणजेच वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना ग्रेड रु.४५००/- च्या ऐवजी ग्रेड पे रु.४६००/- मिळावी अशी मागणी केली आहे. ७ व्या वेतन आयोगात ग्रेड पे ही संकल्पना लागू नसून वेतनस्तर संकल्पना लागू केली आहे. सबब, त्यांना एस-१६ हाच वेतनस्तर लागू होईल. सदरची मागणी संयुक्तिक दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- ७ व्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना एस-१६ वेतनस्तर मंजुर करण्यात आला आहे. परंतु, ७ व्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रिक्स स्तंभातील ग्रे.पे.४५०० व ४६०० साठी एस-१६ हा एकच वेतनस्तर लागू करण्यात आला आहे. ७व्या वेतन आयोगात ग्रेड वेतन ही संकल्पना लागू नसून वेतनस्तर लागू करण्यात आले आहेत. यामुळे सदरची मागणी संयुक्तिक दिसून येत नाही. विभागानेही या प्रस्तावाला सहमती दिलेली नाही सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

४.सहायक भूवैज्ञानिक (वर्ग-२) :-

<u>संघटनेची मागणी</u> :- जलसंपदा विभागातील सहायक भुवैज्ञानिक वर्ग-२ व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील विभागांतर्गत भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागातील सहायक भुवैज्ञानिक वर्ग-२ ही पदे समकक्ष आहेत. वास्तव, जलसंपदा विभागाच्या सहायक भुवैज्ञानिक वर्ग-२ या संवर्गाला एस-१५ ऐवजी एस-१९ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- जलसंपदा विभागातील वरिष्ठ भू वैज्ञानिक व सहायक भू वैज्ञानिक यांनी ७ व्या वेतन आयोगानुसार अनुक्रमे एस-२२ व एस-१९ हा वेतनस्तर मिळण्याबाबत मोघम स्वरुपात स्वरुपाची मागणी केलेली दिसून येत आहे. या संवर्गातील कर्मचाऱ्यांनी सदरची मागणी करताना काहीही कारण नमूद केलेले दिसुन येत नाही. तसेच याबाबत समर्थनीय मुद्दे नाहीत. याबाबत उचित निर्णय घेण्याबाबत प्रस्ताव वेतन त्रुटी समितीच्या विचारार्थ ठेवण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- विभागानेही या प्रस्तावाला सहमती दिलेली नाही. प्रस्तुत संवर्गाला ३ ऱ्या, ४थ्या ,५व्या व ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये प्रस्तुत संवर्गाला मंजूर असल्याने, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

५.प्रमुख आरेखक :-

संघटनेची मागणी :- ६ व्या वेतन आयोगानुसार प्रमुख आरेखक या पदास केंद्र शासनातील प्रमुख आरेखक या पदाप्रमाणे रु.४६०० ग्रे.पे. (७ व्या वेतन आयोगानुसार एस-१६) ही वेतनश्रेणी एस-१५ ऐवजी मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्र शासनामध्ये प्रमुख आरेखक या पदास ६व्या वेतन आयोगानुसार रु.४६०० ग्रेड पे मंजूर आहे. त्याप्रमाणे राज्य शासनाच्या प्रमुख आरेखक पदास सुद्धा रु.४६००/-ग्रेड पे ची केलेली मागणी संयुक्तिक दिसून देते. तरी वेतनत्रुटी समितीने मागणी विचारात घ्यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही . प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या, ५ व्या, व ६ व्या वेतनआयोगामध्ये अनुज्ञेय असलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

६.भू वैज्ञानिक सहायक (वर्ग -३) :-

संघटनेची मागणी :- जलसंपदा विभागातील भुवैज्ञानिक सहायक व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील विभागांतर्गत भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागातील कनिष्ठ भुवैज्ञानिक ही पदे समकक्ष आहेत. यास्तव, जलसंपदा विभागाच्या भु वैज्ञानिक सहायक यांना एस-१४ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करून राजपत्रित दर्जा देण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- भू-वैज्ञानिक सहायक यांनी ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१६ ही मागणी करताना मोघम स्वरुपात मागणी केलेली दिसून येत आहे. या संवर्गातील कर्मचाऱ्यांनी सदरची मागणी करताना काहीही कारण नमूद केलेले दिसून येत नाही. सदरची मागणी संयुक्तिक दिसून येत नाही.

समितीची शिफारस :- जलसंपदा विभागातील भुवैज्ञानिक सहायक या पदाला पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील विभागांतर्गत भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागातील कनिष्ठ भुवैज्ञानिक या पदापेक्षा ३ ऱ्या, ४ थ्या, ५व्या व ६ व्या वेतन आयोगामध्ये कनिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. विभागानेही या प्रस्तावाला सहमती दिलेली नाही. प्रस्तुत संवर्गाला ३ ऱ्या, ४थ्या , ५व्या व ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर असल्याने, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

७.आरेखक श्रेणी-१ :-

संघटनेची मागणी :- आरेखक श्रेणी-१ या पदावरील कर्मचाऱ्यास ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर ६ व्या वेतन आयोगामध्ये ग्रे.वे.रु.४३०० मंजूर करण्यात आले आहे. त्या ऐवजी ग्रे.वे रु.४४०० मंजूर करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- आरेखक पदास अभियांत्रिकी पदवी किंवा पदविका आणि ३ वर्षे सहायक आरेखक पदावरील अनुभव अशी अर्हता दर्शविली आहे. आरेखक या पदास एस-१० हा वेतनस्तर मंजूर आहे. आरेखक या पदावर चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर आरेखक श्रेणी-१ हा दर्जा प्राप्त होऊन एस-१४ हा वेतनस्तर मंजूर करण्यात येतो. संघटनेने आरेखक श्रेणी-१ या पदास एस-१४ ऐवजी एस-१५ या वेतनस्तराची केलेली मागणी संयुक्तिक दिसून येते. तरी वेतनत्रुटी निवारण समितीने उपरोक्त मागणी विचारात घ्यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही . प्रस्तुत संवर्गाला ४ थ्या, ५ व्या, व ६ व्या वेतनआयोगामध्ये अनुज्ञेय असलेल्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

८.वरिष्ठ लिपिक :-

संघटनेची मागणी :- (१) जलसंपदा विभागातील वरिष्ठ लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील वरिष्ठ लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांप्रमाणे रू.२८००/- ग्रेड वेतन लागू करण्यात यावे. (२) वरिष्ठ लिपिक पदावरून प्रथम लिपिक पदावर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देते वेळी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१३ ऐवजी एस-१४ मध्ये वेतन निश्चिती करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- जलसंपदा विभागातील वरिष्ठ लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील वरिष्ठ लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांप्रमाणे रु.२८००/- ग्रेड वेतन लागू करण्याची तसेच वरिष्ठ लिपिक पदावरुन प्रथम लिपिक पदावर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देतेवेळी मूळ वेतनात किमान रु.६०००/- इतकी वाढ करुन त्याप्रमाणे ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१३ ऐवजी एस-१४ वेतनस्तर अशी सुधारणा करुन आश्वासित प्रगती योजनेचे लाभ लागू करणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :- सदरहू संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय/लिपिक संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. विभागाने या संवर्गास अधिक वेतनवाढीच्या मागणीचे समर्थनीय कारण दिलेले नाही. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागातील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -८ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

९.संदेशक :-

संघटनेची मागणी :- संदेशक पदास शैक्षणिक अर्हता पदवी तसेच संगणक ज्ञान प्रमाणपत्र असे असून एस-७ ही निम्न वेतनश्रेणी दिली जाते. तरी संदेशक पदास सुरुवातीपासूनच एस-७ ऐवजी एस-१० ही वेतनश्रेणी लागू करून त्रुटी दूर करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** लिपिक-टंकलेखक या संवर्गातील कर्मचारी यांची शैक्षणिक अर्हता पदवी तसेच टंकलेखक व MS-CIT संगणक अर्हता परीक्षा पास होऊन देखील एस-६ ही वेतनश्रेणी देण्यात येते. तरीच संदेशक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना एस-७ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. संघटनेने सादर केलेल्या प्रस्तावात वेतनस्तरात सुधारणा करावी याबाबत समर्थनीय मुद्दे दिलेले नाहीत. सदरची मागणी संयुक्तिक दिसून येत नाही.

**समितीची शिफारस :-** विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारणा करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ३ ऱ्या, ४थ्या, ५व्या व ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळत नाही.

१०.दप्तर कारकून/ कालवा निरीक्षक/ मोजणीदार:-

**संघटनेची मागणी :-** (१) ६ व्या वेतन आयोगानुसार ग्रामसेवक या पदाप्रमाणे रू. २४००/- ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

(२) दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व मोजणीदार या पदास आ.प्र.योजनेतही ग्रामसेवक या पदाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी.

(3) दप्तर कारकून संवर्गाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या ग्रामसेवक पदाच्या समकक्ष आहेत. त्यानुसार ५व्या वेतन आयोगात ग्रामसेवक व दप्तर कारकून संवर्गांना एकसारखी वेतनश्रेणी होती. संबंधित विभागाने दखल घेऊन वेतनश्रेणी बदल केला आहे. त्यामुळे जलसंपदा विभागातील दप्तर कारकून पदाच्या वेतनश्रेणी सुधारणा करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व मोजणीदार या पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेता त्यांच्या वेतनश्रेणीतील त्रुटींचे निवारण करणे आवश्यक आहे. दप्तर कारकून संवर्गाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या ग्रामसेवक पदाच्या समकक्ष आहेत. त्यानुसार ५ व्या वेतन आयोगात ग्रामसेवक व दप्तर कारकून संवर्गांना एकसारखी वेतनश्रेणी होती. यास्तव या पदाचे ग्रेड वेतन, ग्राम सेवक पदाच्या ग्रेड वेतनाप्रमाणे रु.२४००/- व वेतनस्तर एस-६ ऐवजी एस-८ असणे आवश्यक आहे. तसेच कालवा निरीक्षक व मोजणीदार या संवर्गातील पदांना सुध्दा ग्रामसेवक पदाच्या संवर्गानुसार ७ व्या वेतन आयोगानुसार सुरुवातीचे वेतनस्तर एस-८ अशी सुधारणा करून आश्वासित प्रगती योजनेचे लाभ लागू करण्यासाठी प्रस्ताव वेतनत्रुटी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस :-** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला राज्य शासनातील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच जलसंपदा विभागातील दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व मोजणीदार आणि ग्रामविकास विभागातील ग्रामसेवक या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न आहेत. या संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी एस -६ ही ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर

केली आहे. आश्वासित प्रगती योजनेच्या मागणीबाबत नमूद करण्यात येते की, आश्वासित प्रगती योजना लागू करताना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर लागू करणे अशी तरतूद असून, सेवेत नियमित होण्यापूर्वीची सेवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करण्यासाठी ग्राह्य धरतिणे नियमाला अनुसरुन नाही. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळत नाही.

**११.चालक, ऑपरेटर, बिनतारी संदेश यंत्रचालक :-**

<u>संघटनेची मागणी</u> :- रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील चालक, ऑपरेटर बिनतारी संदेश यंत्रचालक या तांत्रिक एकाकी पदास कनिष्ठ लिपिक हे पद समकक्ष असून या सर्व एकाकी पदास एस-६ ही कनिष्ठ लिपिक पदाची १२ वर्षानंतरची वरिष्ठ वेतनश्रेणी लागू होती. ६ व्या वेतन आयोगानुसार कनिष्ठ लिपिक या पदाप्रमाणे १२ वर्षाचा लाभ देण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर कर्मचाऱ्यांना १२ वर्षे पूर्ण झाल्यानंतर एस-८ व २४ वर्षानंतर एस-१३ हा वेतनस्तरात सुधारणा करण्याबाबत त्यांनी समर्थनीय मुद्दे दिसून येत नाही. सबब, मागणी संयुक्तिक दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत असून, प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी होत नाही. तसेच आश्वासित प्रगती योजनेच्या तरतुदीनुसार सर्व एकाकी पदांना नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी मंजूर होतात.

******************

## ३.२४ पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रु. | ग्रेड पे रु. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रु. | मागणी केलेली वेतनश्रेणी रु. |
| | अ) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा | | | | |
| १ | अतिरिक्त संचालक | ३७४००-६७००० | ८७०० | एस-२ रु.१२३१०० -२१५९०० | एस-३० रु.१४४२००-२१८२०० |
| २ | सहसंचालक | १५६००-३९१०० | ७९०० | एस-२६ रु.८२२००-२११५०० | एस-२८ रु.१२४८००-२१२४०० |
| ३ | सहसंचालक (अभियांत्रिकी) | १५६००-३९१०० | ७९०० | एस-२६ रु.८२२००-२११५०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० |
| ४ | उपसंचालक | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ५ | मुख्य भूभौतिकतज्ज्ञ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ६ | मुख्य खोदन अभियंता | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ७ | वरिष्ठ खोदन अभियंता | १५६००-३९१०० | ५७०० | एस-२२ रु.६००००-१९०८०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ८ | वरिष्ठ भूवैज्ञानिक | १५६००-३९१०० | ५७०० | एस-२२ रु.६००००-१९०८०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ९ | वरिष्ठ रसायनी | १५६००-३९१०० | ५५०० | एस-२१ रु.५७१००-१८०८०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | वरिष्ठ भूभौतिकतज्ञ | १५६००-३९१०० | ५५०० | एस-२१ रु.५७१००-१८०८०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ११ | प्रशासन अधिकारी | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| १२ | सहायक भूवैज्ञानिक | १५६००-३९१०० | ५००० | एस-१९ रु.५५१००-१७५१०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| १३ | कनिष्ठ भूवैज्ञानिक | ९३००-३४८०० | ४५०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१७ ४७६००-१५११०० |
| १४ | सहायक रसायनी | ९३००-३४८०० | ४५०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १५ | सहायक भूभौतिकतज्ञ | ९३००-३४८०० | ४५०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १६ | कनिष्ठ भूभौतिकतज्ञ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १७ | शाखा अभियंता | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १८ | सहायक प्रशासन अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८०० १३२३०० | एस-१७ रु.४७६००-१५११०० |
| १९ | कनिष्ठ रसायनी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| २० | भौगोलिक माहिती प्रणाली अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| २१ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | कार्यालय अधिक्षक | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० |
| २३ | तांत्रिक अधिकारी | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| २४ | भौगोलिक प्रणाली माहिती वरिष्ठ सहायक | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० रु.२९२००-९२३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० (चार वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) |
| २५ | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | एस- ८ रु.२५५००-८११०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| २६ | सर्वेक्षक | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ रु.२५५००-८११०० | एस-१३ रु.३५४००-११२४०० |
| २७ | भौगोलीक माहिती प्रणाली सहायक | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.२१७००-६९१०० | एस-८ रु.२५५००-८११०० (७ वर्षे अर्हताकारी सेवेनंतर) |
| २८ | कनिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-८ रु.२५५००-८११०० |
| २९ | प्रयोगशाळा सहायक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-७ रु.२१७००-६९१०० |

आ)संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा

१.अतिरिक्त संचालक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय भुजल मंडळ मधील सदस्य व प्रस्तुत संवर्ग या पदाच्या शैक्षणिक अर्हता समान आहेत. केंद्रीय भुजल मंडळ यांचे सुधारित वेतनमानाशी सुसंगत वेतनमान असावे यासाठी प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-२७ ऐवजी एस-३० लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर पदाची तुलना केली असता शैक्षणिक अर्हता एकसारखी दिसत असली तरी कर्तव्य व जबाबदाऱ्या भिन्न आहेत. सबब, समकक्षता सिद्ध होत नसल्याने वेतनस्तर त्रुटी आहे हे सिद्ध होत नाही. तसेच विभाग प्रमुखा पेक्षा जास्त वेतन मागणी आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) सदर संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही पदाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती व त्यानुसार या संवर्गास वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. तद्नंतर ५व्या ,६व्या आणि ७ व्या वेतन आयोगात देखिल असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित

वेतनश्रेणी/वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

२.सहसंचालक:-

संघटनेची मागणी :- केंद्रीय भुजल मंडळ मधील विभागीय संचालक व प्रस्तुत संवर्ग या पदाच्या शैक्षणिक अर्हता समान आहेत. केंद्रीय भुजल मंडळ याचे सुधारित वेतनमानाशी सुसंगत वेतनमान असावे यासाठी प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-२६ ऐवजी एस-२८ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> समकक्षता सिद्ध होण्यासाठी समर्थनीय कागदपत्रे जोडण्यात आलेली नाहीत. वेतनस्तर त्रुटी आहे हे सिद्ध होत नाही. तसेच विभाग प्रमुखाची वेतनस्तरापेक्षा जास्त मागणी केली आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाच्या अभिप्रायांशी समिती सहमत आहे. तसेच ४ थ्या वेतन आयोगात या संवर्गाला आणि भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सह संचालक संवर्गाला समान तत्वानुसार वेतनश्रेण्या विहित केल्या होत्या. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रस्तुत सह संचालक संवर्गास भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सह संचालक संवर्गाप्रमाणे वेतनबँड पी.बी.-रु.१५६००-३९१०० ग्रे.वे. रु.७६०० ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली असून त्यास अनुसरून ७ व्या वेतन आयोगात एस-२६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणी मध्ये त्रुटी आढळत नाही.

३.सहसंचालक (अभियांत्रिकी) :-

<u>संघटनेची मागणी :-</u> सहसंचालक अभियंता हे पद मुख्य खोदन अभियंता यांच्या पदोन्नतीने भरण्यात येते राज्य शासनाच्या इतर विभागामध्ये मुख्य अभियंता हे पद अधीक्षक अभियंता यांच्या पदोन्नतीने भरण्यात येते. सहसंचालक अभियंता या पदाचे पदनाम बदलून मुख्य अभियंता असे करावे व वेतनस्तर एस-२६ऐवजी एस-२७ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> समकक्षता सिद्ध करण्यासाठी समर्थनीय कागदपत्रांची पुर्तता करण्यात आलेली नाही.

<u>समितीची शिफारस :-</u> संघटनेने सहसंचालक अभियंता या पदाचे पदनाम बदलून मुख्य अभियंता असे करण्याबाबत मागणी केली आहे. प्रस्तुत विषय हा वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही. तसेच सदर पदाची अन्य संवर्गाशी समकक्षता सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाहीत. तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा येथील सहसंचालक व सहसंचालक (अभियांत्रिकी) या संवर्गाचे वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-२६ अशी समान आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

४.उपसंचालकः-

<u>संघटनेची मागणी :-</u> केंद्रीय भुजल मंडळ मधील सायंटीस्ट डी व प्रस्तुत संवर्ग या पदाच्या शैक्षणिक अर्हता समान आहेत. केंद्रीय भुजल मंडळ यांचे सुधारित वेतनमानाशी सुसंगत वेतनमान असावे यासाठी प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-२३ ऐवजी एस-२५ लागु करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पदाची तुलना केली असता शैक्षणिक अर्हता एकसारखी दिसत असली तरी कर्तव्य व जबाबदाऱ्या भिन्न आहेत. सबब, समकक्षता सिद्ध होत नसल्याने वेतनस्तर त्रुटी आहे हे सिद्ध होत नाही.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाच्या अभिप्रायांशी समिती सहमत आहे. ४ थ्या वेतन आयोगात या संवर्गाला आणि भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील उप संचालक संवर्गाला समान तत्वानुसार वेतनश्रेण्या विहित केल्या होत्या. उपसंचालक संवर्गास भु-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील उप संचालक संवर्गाप्रमाणेच रु.१५६०० -३९१०० ग्रे.वे.६६०० ही वेतनसंरचना ६व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. त्यास अनुसरून ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-२३ ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. या संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

५.मुख्य भूभौतिकतज्ञः-

<u>संघटनेची मागणी :-</u> मुख्य भुभौतिकतज्ञ यांचे केंद्रीय भुमीजल मंडळ मधील वेतनस्तर एल-१२ आहे. तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाचे वेतनस्तर एस-२३ आहे. सबब,सदर संवर्गाला वेतनस्तर एस-२३ ऐवजी एस-२५ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पदाशी तुलना केले पदनाम कर्तव्य भिन्न आहेत. त्यामुळे वेतनस्तर त्रुटी आहे हे सिद्ध होत नाही.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. यासंवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेवून वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. यासंवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतनआयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाहीत.

६.मुख्य खोदन अभियंताः-

<u>संघटनेची मागणी :-</u> मुख्य खोदन अभियंता हे पद वरिष्ठ खोदन अभियंता यांच्या पदोन्नतीने भरण्यात येते राज्य शासनाच्या इतर विभागामध्ये अधिक्षक अभियंता हे पद कार्यकारी अभियंता यांच्या पदोन्नतीने भरण्यात येते. मुख्य खोदन अभियंता या पदाचे पदनाम बदलून अधीक्षक अभियंता असे करावे व वेतनस्तर एस-२३ ऐवजी एस-२५ लागू करण्यात यावा.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :-** समकक्षता सिद्ध करण्यासाठी समर्थनीय कागदपत्रांची पुर्तता करण्यात आलेली नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- संघटनेने मुख्य खोदन अभियंता अभियंता या पदाचे पदनाम बदलून अधिक्षक अभियंता असे करण्याबाबत मागणी केली आहे. प्रस्तुत विषय हा वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही. तसेच सदर पदाची अन्य संवर्गाशी समकक्षता सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाहीत. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये लागू करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

**७.वरिष्ठ खोदन अभियंता:-**

**संघटनेची मागणी :-** वरिष्ठ खोदन अभियंता हे पद उप अभियंता (यां) यांच्या मधून पदोन्नतीने भरण्यात येते. केंद्र शासनाच्या खनिकर्म विभागात वरिष्ठ खोदन अभियंता हे पदनाम बदलून कार्यकारी अभियंता केलेले आहे. प्रस्तुत संवर्गावर पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्याला कार्यकारी अभियंता यांच्यापेक्षा कमी वेतन मिळते. राज्य शासनामध्ये उप अभियंता पदानंतर पदोन्नतीचे पद कार्यकारी अभियंता आहे. सदर पदाला एस-२३ ही वेतनश्रेणी लागू असल्यामुळे प्रस्तुत संवर्गाला एस-२२ ऐवजी एस-२३ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर पदाच्या बाबतीत ५ व्या वेतन आयोग व ६ व्या वेतन आयोगाने समकक्षता नाकारली आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) या संवर्गांना केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत. या संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाहीत.

**८.वरिष्ठ भूवैज्ञानिक:-**

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय भुजल मंडळ मधील सिनियर हायड्रॉलॉजिस्ट व प्रस्तुत संवर्ग या पदाच्या शैक्षणिक अर्हता समान आहेत. केंद्रीय भुजल मंडळ यांचे सुधारित वेतनमानाशी सुसंगत वेतनमान असावे यासाठी प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-२२ ऐवजी एस-२३ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर पदाशी तुलना केली असता शैक्षणिक अर्हता एकसारखी दिसत असली तरी पदनाम कर्तव्य भिन्न आहेत. त्यामुळे वेतनत्रुटी आहे हे सिद्ध होत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने सदर पदाशी तुलना केली असता शैक्षणिक अर्हता समान दिसत असली तरी पदनाम कर्तव्य भिन्न आहेत असे नमूद केले आहे. तसेच ४ थ्या वेतन आयोगात या

संवर्गास आणि भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील वरिष्ठ भू-वैज्ञानिक संवर्गास समान तत्वानुसार वेतनश्रेण्या विहित केल्या होत्या. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रस्तुत वरिष्ठ भू-वैज्ञानिक संवर्गास भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील वरिष्ठ भू वैज्ञानिक संवर्गाप्रमाणे सदर संवर्गाला शासन निर्णय दि.११.२.२०१३ अन्वये वेतनबँड पीबी.-३ रु.१५६००-३९१०० ग्रे.पे.रु.५७०० ही वेतन संरचना सुधारित करण्यात आली आहे. त्यास अनुसरून ७ व्या वेतन आयोगात एस-२२ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणी मध्ये त्रुटी आढळत नाही.

९.वरिष्ठ रसायनी:-

<u>संघटनेची मागणी :-</u> केंद्रीय भुजल बोर्ड यांचे वरिष्ठ रसायनी या पदाचे विद्यमान वेतन एल-११ आहे. तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाला वेतन एस- २१ लागू आहे. सबब,सदर संवर्गाला वेतनस्तर एस-२१ ऐवजी एस-२३ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पदाशी तुलना केली असता पदनाम कर्तव्य जबाबदारी, शैक्षणिक अर्हता यामध्ये समकक्षता दिसून येते. तसेच कामात झालेली वाढ विचारात घेता मागणी नुसार एस-२३ मंजूरीची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेवून वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. यासंवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. यासंवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१०.वरिष्ठ भूभौतिकतज्ञ:-

<u>संघटनेची मागणी :-</u> वरिष्ठ भुभौतिकतज्ञ यांचे केंद्रीय भुमीजल मंडळ मधील वेतन एल-११ आहे. तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाचे वेतन एस-२१ आहे. सदर संवर्गाला वेतनस्तर एस-२१ ऐवजी एस-२३ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पदाशी तुलना केली असता पदनाम कर्तव्य जबाबदारी एकसारखी आहेत. तसेच कामात झालेली वाढ विचारात घेता संघटनेने केलेल्या मागणी नुसार एस-२३ मंजूरीची शिफारस आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेवून वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. यासंवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. यासंवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

११.प्रशासन अधिकारी:-

संघटनेची मागणी :- संचालनालय, पुणे येथील प्रशासन अधिकारी हे राज्यस्तरावरील एकमेव पद आहे. महाराष्ट्र शासनाकडील मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र अभियांत्रिकी व संशोधन संस्था, नाशिक, कृषी आयुक्तालय येथील वरिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षक संचालक, महासमादेशक होमगार्ड ह्या महाराष्ट्र शासनाकडील विभागात प्रशासन अधिकारी या पदास ६ व्या वेतन आयोगात वेतन १५६००-३९१०० ग्रे.पे.६६०० आहे. सदर पदे या विभागातील पदास समकक्ष आहेत. मुख्य प्रशासन अधिकारी यांचे केंद्रीय भुजल बोर्ड मधील विद्यमान वेतन १५६०० ३९१०० ग्रे.पे.६६०० आहे. त्याप्रमाणे वेतनस्तर एस-२० ऐवजी एस-२३ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शासनाच्या इतर विभागाच्या आस्थापना या जास्त पदसंख्या असणाऱ्या आहेत. त्या तुलनेत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची आस्थापना ही खूप कमी पदसंख्या असणारी आहे. त्यामुळे कर्तव्य व जबाबदारी यामध्ये समकक्षता दिसून येत नाही. ६ व्या वेतन आयोगाने समकक्षता नाकारली आहे.

समितीची शिफारस :- संघटनेने तुलना केलेल्या संवर्गाची उदा. कृषि आयुक्तालय, मुख्य वनसंरक्षक, इ. कर्तव्ये व जबाबदाऱ्या, कार्यव्याप्ती व विविधता तसेच सेवा प्रवेश नियम तुलनीय नाहीत. प्रस्तुत संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागांतील संवर्गाप्रमाणेच ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१२.सहायक भूवैज्ञानिक:-

संघटनेची मागणी :- केंद्रीय भुजल मंडळ मधील सायंटिस्ट बी व प्रस्तुत संवर्ग या पदाच्या शैक्षणिक अर्हता समान आहेत. केंद्रीय भुजल मंडळ यांचे सुधारित वेतनमानाशी सुसंगत वेतनमान असावे यासाठी प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-१९ ऐवजी एस-२० लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पदाशी तुलना केली असता शैक्षणिक अर्हता समान दिसत असली तरी पदनाम कर्तव्य भिन्न आहेत. त्यामुळे वेतनत्रुटी आहे हे सिद्ध होत नाही.

समितीची शिफारस :- विभागाने सदर पदाशी तुलना केली असता शैक्षणिक अर्हता समान दिसत असली तरी पदनाम कर्तव्य भिन्न आहेत असे नमूद केले आहे. ४ थ्या वेतन आयोगात या संवर्गास आणि भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सहाय्यक भूवैज्ञानिक संवर्गास समान तत्वानुसार वेतनश्रेण्या विहित केल्या होत्या. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रस्तुत सहाय्यक भूवैज्ञानिक संवर्गास भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सहायक भू वैज्ञानिक संवर्गाप्रमाणे पेबँड पीबी-२- रू.९३००-३४८०० ग्रे.पे.५००० ही वेतनसंरचना शासन निर्णय दि.११.२.२०१३ अन्वये सुधारित करण्यात आली आहे. त्यास अनुसरून ७ व्या वेतन आयोगात एस-१९ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.

१३.कनिष्ठ भूवैज्ञानिक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय भुजल मंडळ मधील असिस्टंट डायड्रॉलॉजिस्ट व प्रस्तुत संवर्ग या पदाच्या शैक्षणिक अर्हता समान आहेत. केंद्रीय भुजल मंडळ यांचे सुधारित वेतनमानाशी सुसंगत वेतनमान असावे यासाठी प्रस्तुत संवर्गाला वेतनस्तर एस-१६ ऐवजी एस-१७ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर पदाशी तुलना केली असता शैक्षणिक अर्हता समान दिसत असली तरी पदनाम कर्तव्य भिन्न आहेत. त्यामुळे वेतनत्रुटी आहे हे सिद्ध होत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाना केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, कनिष्ठ भूवैज्ञानिक या संवर्गाला सुधारित वेतनसंरचनमध्ये ५व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्षतेपेक्षा उच्च ग्रेड वेतन मंजूर केले आहे. या संवर्गाना मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१४.सहायक रसायनी:-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय भुजल बोर्ड यांचे सहायक रसायनी या पदाचे विद्यमान वेतन एल-८ आहे. तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाला वेतन एस-१६ लागू आहे. सबब,सदर संवर्गाला वेतनस्तर एस-१६ ऐवजी एस-१७ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- समकक्षता सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नाहीत. वेतनस्तर त्रुटी दिसून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेवून वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. यासंवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. यासंवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१५.सहायक भूभौतिकतज्ञ :-

<u>संघटनेची मागणी</u> :- सहायक भुभौतिकतज्ञ यांचे केंद्रीय भूमीजल मंडळ मधील एल-८ आहे. तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाचे वेतन एस-१६ आहे. सदर संवर्गाला वेतनस्तर एस-१६ ऐवजी एस-१७ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर पदाशी तुलना केली असता पदनाम कर्तव्य जबाबदारी, शैक्षणिक अर्हता समकक्ष आहेत. या बाबी विचारात घेता मागणी नुसार एस-१७ मंजूरीची शिफारस आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेवून वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. यासंवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. यासंवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१६.कनिष्ठ भूभौतिकतज्ञ:-

संघटनेची मागणी :- कनिष्ठ भुभौतिकतज्ञ यांचे केंद्रीय भुमीजल मंडळ मधील एल-७ आहे. तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाचे वेतन एस-१५ आहे. सदर संवर्गाला वेतनस्तर एस-१५ ऐवजी एस-१६ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पदाशी तुलना केली असता पदनाम कर्तव्य जबाबदारी, शैक्षणिक अर्हता विचारात घेता दोन्ही पदे समकक्ष असल्याचे दिसून येते. मागणी नुसार एस-१६ मंजूरीची शिफारस आहे.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेवून वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. यासंवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. यासंवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

१७.शाखा अभियंता:-

संघटनेची मागणी :- जलसंपदा विभागाकडील शाखा अभियंता यांना खंड २ मध्ये पदाचे विद्यमान वेतन एस-१६ रु.४४९००-१४२४०० विहित केलेले आहे. त्या प्रमाणे सदर पदास वेतनस्तर एस-१५ ऐवजी एस-१६ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वित्त विभागाच्या दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार समकक्षता सिद्ध होते. त्याप्रमाणे एस-१६ करण्याची शिफारस आहे.

समितीची शिफारस :- सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील अभियंता संवर्गाला व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील भूजल सर्वेक्षण या कार्यालयातील शाखा अभियंता संवर्गाला ४ थ्या वेतन आयोगापासून ७ व्या आयोगापर्यंत वेतनश्रेणी समान आहेत. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील शाखा अभियंता या संवर्गाला वित्त विभाग, दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१५ ऐवजी एस-१६ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. भूजल सर्वेक्षण या कार्यालयातील शाखा अभियंता या संवर्गाला वेतनश्रेणी एस-१५ रु. ४१८००-१३२३०० ऐवजी एस-१६ रु.४४९००-१४२४०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१८.सहायक प्रशासन अधिकारी:-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय भुजल बोर्ड यांचे प्रशासन अधिकारी गट ब या पदाचे विद्यमान वेतन एस-१७ आहे, तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाला वेतन एस-१५ लागू आहे. उपरोक्त दोन्ही पदे समकक्ष असल्याने सदर संवर्गाला वेतनस्तर एस-१५ ऐवजी एस-१७ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- केंद्रीय भूजल बोर्ड मध्ये प्रशासन अधिकारी गट -ब हे पद व सहायक प्रशासन अधिकारी गट-ब या पदनामात भिन्नता आहे. तथापि, शासनाच्या इतर विभागाच्या आस्थापना या जास्त पदसंख्या असणाऱ्या आहेत. या तुलनेत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची आस्थापना ही कमी पदसंख्या असणारी आहे. त्यामुळे कर्तव्य व जबाबदारी यामध्ये समकक्षता दिसून येत नाही. सबब, वेतनत्रुटी सिद्ध होत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतनसमानीकरण समितीने या संवर्गांना केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत. या संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

१९.कनिष्ठ रसायनी:-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय भुजल बोर्ड यांचे कनिष्ठ रसायनी या पदाचे विद्यमान वेतन एल ७ आहे, तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाला वेतन एस-१५ लागू आहे. सदर संवर्गाला वेतनस्तर एस-१५ ऐवजी एस-१६ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर पदाशी तुलना केली असता पदनाम कर्तव्य व जबाबदारी तसेच शैक्षणिक पात्रता यामध्ये समकक्षता दिसून येते. तसेच कामात झालेली वाढ विचारात घेता मागणीनुसार एस-१६ मंजूरीची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेवून वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. यासंवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. यासंवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

२०.भौगोलिक प्रणाली अधिकारी:-

<u>संघटनेची मागणी</u> :- भौगोलिक माहिती प्रणाली अधिकारी हे प्रमुख आरेखक या पदाशी समकक्ष आहे. सदर पद भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहायक मधून १००% पदोन्नतीने भरण्यात येत असल्यामुळे उच्च शैक्षणिक अर्हता व पदोन्नती पद असून प्रादेशिक स्तराच्या कार्यालयातील

अतिरिक्त जबाबदारीचे कार्यकारी दर्जाचे पद आहे. यास्तव सदर पदाला एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> तुलना केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागातील मुख्य आरेखक व या विभागातील भौगोलिक माहिती प्रणाली अधिकारी यांचे वेतनस्तर समान आहेत. त्यामुळे त्रुटी आढळून येत नाही.

**समितीची शिफारस :-** विभागाच्या अभिप्रायाशी समिती सहमत आहे. तसेच वेतनसमानीकरण समितीने प्रस्तुत संवर्गास कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सबब, सदर संवर्गाच्या वेतनश्रेणी मध्ये त्रुटी आढळत नाही.

२१.कनिष्ठ अभियंता:-

<u>संघटनेची मागणी :-</u> जलसंपदा विभागाकडील कनिष्ठ अभियंता यांना खंड २ मध्ये पदाचे विद्यमान वेतन एस-१५ रु.४१८००-१३२३०० विहित केलेले आहे. त्याप्रमाणे वेतनस्तर एस-१४ ऐवजी एस-१५ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> वित्त विभागाच्या दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार समकक्षता सिद्ध होते. त्याप्रमाणे एस-१५ करण्याची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील अभियंता संवर्गाला व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील भूजल सर्वेक्षण या कार्यालयातील कनिष्ठ अभियंता संवर्गाला ४ थ्या वेतन आयोगापासून ७ व्या आयोगापर्यंत वेतनश्रेणी समान आहेत. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग या विभागातील शाखा अभियंता या संवर्गाला दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एस-१४ ऐवजी एस-१५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. भूजल सर्वेक्षण या कार्यालयातील कनिष्ठ अभियंता या संवर्गाला वेतनश्रेणी एस-१४ रु. ३८६००-१२२८०० ऐवजी एस-१५ रु.४१८००-१३२३०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२२.कार्यालय अधिक्षक:-

<u>संघटनेची मागणी :-</u> या कार्यालयातील कार्यालय अधिक्षक हे पद महाराष्ट्र शासनाकडे पशुसंवर्धन आयुक्तालय, समाज कल्याण संचालनालय, आयुक्त अपंग कल्याण, आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, आयुक्त राज्य उत्पादन शुल्क येथील कार्यालय अधिक्षक या पदाला समकक्ष आहे. सदर कार्यालयामध्ये ७ व्या वेतन आयोगात एस-१४ ही वेतनश्रेणी लागू

असून भूजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाला वेतन एस-१३ लागू आहे. सदर संवर्गाला वेतनस्तर एस-१३ ऐवजी एस-१४ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पद विभागस्तरावरील आहे. विभाग स्तरावर झालेली कार्यात वाढ व कृषी आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, समाजकल्याण संचालनालय, आयुक्त अपंगकल्याण, दुग्ध व्यवसायविभाग व इतर विभागात कार्यालय अधिक्षक व अधिक्षक या पदास एस-१४ हा वेतनस्तर विहित केलेला आहे. त्याप्रमाणे सदर संवर्गाला एस-१४ हा वेतनस्तर मंजुरीची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतनसमानीकरण समितीने या संवर्गांना संघटनेने नमूद केलेल्या संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणी वाढीबाबत विभागाने कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. सदर संवर्गाला असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत. या संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२३.तांत्रिक अधिकारी:-

<u>संघटनेची मागणी :-</u> पाटबंधारे विभागातील कनिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व शैक्षणिक अर्हता प्रस्तुत संवर्गाशी समकक्ष असल्याने एस-१३ ऐवजी एस-१५ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाने समकक्षता नाकारली आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समिती (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२४.भौगोलिक प्रणाली माहिती वरिष्ठ सहायक:-

<u>संघटनेची मागणी :-</u> सार्वजनिक बांधकाम विभागातील आरेखक श्रेणी-१ या पदाप्रमाणे वेतनस्तर एस-१० ऐवजी ४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१४ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> तुलना केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागातील आरेखक श्रेणी-१ व या विभागातील भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहायक यांचे वेतनस्तर समान आहेत. त्यामुळे त्रुटी आढळून येत नाही.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतनसमानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाचे पदनामामध्ये नुकतेच बदल केल्याचे आढळून येते. विभागाने प्रस्तुत संवर्गाचे सेवाप्रवेश नियम उपलब्ध करुन दिले नाहीत. वास्तव, नमूद केलेल्या संवर्गाचे सेवाप्रवेश नियमासोबत तुलना करणे शक्य होत नाही. सदर

संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२५.वरिष्ठ लिपिक:-

<u>संघटनेची मागणी :-</u> महाराष्ट्र शासनाकडील महसूल विभाग, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ येथील वरिष्ठ लिपिक या पदाला विद्यमान वेतन एस-१० आहे. सदर पदे या विभागातील प्रस्तुत संवर्गाला समकक्ष आहेत.भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाला वेतन एस-८ लागू आहे. उपरोक्त दोन्ही पदे समकक्ष असल्याने सदर संवर्गाला वेतनस्तर एस-८ ऐवजी एस-१० लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> इतर विभागात असलेले वेतन व कामाचे स्वरुप तसेच पदसंख्या विचारात घेता जिल्हा कार्यालयात ९ पद मंजूर असल्याने पार पाडावी लागत असलेली कर्तव्य विचारात घेता एस-१० मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> विभागाने प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. तसेच वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्ग महाराष्ट्र शासनाच्या बहुतांश कार्यालयांमध्ये कार्यरत आहे.सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२६.सर्वेक्षक:-

<u>संघटनेची मागणी :-</u> केंद्रीय भुजल बोर्ड यांचे सर्वेक्षण या पदाचे विद्यमान वेतन (एल-६) एस-१३ आहे. तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाला वेतन एस-८ लागू आहे. उपरोक्त दोन्ही पदे समकक्ष असल्याने सदर संवर्गाला वेतनस्तर एस-८ ऐवजी एस-१३ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर पद भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या सुधारित आकृतीबंधानुसार मृत घोषीत केलेले आहे. शैक्षणिक अर्हता विचारात घेता शिफारस नाही.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने प्रस्तुत संवर्गाची शैक्षणिक अर्हता विचारात घेवुन ४ थ्या वेतन आयोगामध्ये या संवर्गास लागु असलेल्या समकक्षतेपेक्षा उच्च वेतनश्रेणी मंजूर केली होती. त्यानंतर ५व्या,६ व्या आणि ७व्या आयोगामध्ये या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय दि.२४.४.२००३ अन्वये भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा या कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून सर्वेक्षक हे पद मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२७.भौगोलिक माहिती प्रणाली सहायक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- सार्वजनिक बांधकाम विभागातील आरेखक श्रेणी-३ या पदाप्रमाणे वेतनस्तर एस-७ ऐवजी ७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-८ लागू करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- तुलना केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागातील आरेखक श्रेणी-३ व या विभागातील भौगोलिक माहिती प्रणाली सहायक यांचे वेतनस्तर समान आहेत. त्यामुळे त्रुटी आढळून येत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतनसमानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. प्रस्तुत संवर्गाचे पदनामामध्ये नुकतेच बदल केल्याचे आढळून येते. विभागाने प्रस्तुत संवर्गाचे सेवाप्रवेश नियम उपलब्ध करुन दिले नाहीत. वास्तव नमूद केलेल्या संवर्गाचे सेवाप्रवेश नियमासोबत तुलना करणे शक्य होत नाही. सदर संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणी मध्ये त्रुटी आढळत नाही.

२८.कनिष्ठ लिपिक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- कनिष्ठ लिपिक हे पद जिल्हास्तरीय असून सदर पदाची शैक्षणिक अर्हता पदवी आहे. सदर पदास एस-६ ही वेतनश्रेणी लागू आहे. राज्य शासनाकडील मंत्रालयीन कर्मचारी यांच्याप्रमाणे प्रस्तुत संवर्गाला एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- कर्मचाऱ्यांची मागणी इतर विभागातील वेतनस्तर विचारात घेता त्रुटी आढळून येत नाही.

समितीची शिफारस :- विभागाने प्रस्तुत संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. प्रस्तुत संवर्ग महाराष्ट्र शासनाच्या बहुतांश कार्यालयांमध्ये कार्यरत आहे.सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही.

२९.प्रयोगशाळा सहायक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- केंद्रीय भुजल बोर्ड यांचे प्रयोगशाळा सहायक या पदाचे विद्यमान वेतन एल-३ आहे. तर भुजल सर्वेक्षण आणि विकास मंडळ येथील प्रस्तुत संवर्गाला वेतन एस-६ लागू आहे. याबब,सदर संवर्गालावेतनस्तर एस ६ ऐवजी एस-७ लागू करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर पदाची तुलना केली असता शैक्षणिक अर्हता, पदनाम, कर्तव्य यानुसार दोन्ही पदे समकक्ष आहेत. तसेच कामात झालेली वाढ विचारात घेता मागणी नुसार एस-७ मजूरीची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४था वेतन आयोग) या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित

वेतनश्रेणी विचारात घेवून वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. यासंवर्गास ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना ७ व्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. यासंवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळत नाही.

---

## ३.२५ महिला व बाल विकास विभाग

**प्रस्तावाचा सारांश**

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| | अ) महिला व बाल विकास आयुक्तालय | | | | |
| १ | जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण), अधिक्षक शासकीय संस्था व तत्सम गट-ब (राजपत्रित) संवर्ग | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रू.४१८००-१३२३०० | एस-१७ रू.४७६००-१५११०० |

अ) महिला व बाल विकास आयुक्तालय

१. जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण), अधिक्षक शासकीय संस्था व तत्सम गट-ब (राजपत्रित) संवर्ग :-

<u>संघटनेची मागणी :-</u> जिल्हा परिविक्षा अधिकारी हे तत्सम गट-क ची पदे या संवर्गाची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन संरचना एस-१६ (४४९००- १४२४००) अशी आहे. तथापी, पदोन्नतीचे पद गट- ब (राजपत्रित) या संवर्गाची वेतन संरचना एस-१५ (४१८००-१३२३००) अशी आहे. सदर गट-क संवर्गातून गट-ब (राजपत्रित) या संवर्गात पदोन्नती देण्यात येते. सबब, गट-क संवर्गातील कर्मचारी यांची पदोन्नती झाल्यास किंवा त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू केल्यास त्यांचे वेतन वाढण्याऐवजी वेतन कमी होते. ही वित्तीय विसंगती आहे. सबब, गट-ब (राजपत्रित) या संवर्गास ७ व्या वेतन आयोगानुसार एस १७ वेतनस्तर करण्यात यावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> जिल्हा परिविक्षा अधिकारी हे तत्सम गट-क ची पदे या संवर्गाची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन संरचना एस-१६ (४४९००- १४२४००) अशी आहे. तथापी, पदोन्नतीचे पद गट- ब (राजपत्रित) या संवर्गाची वेतन संरचना एस-१५ (४१८००-१३२३००) अशी आहे. सदर गट-क संवर्गातून गट-ब (राजपत्रित) या संवर्गात पदोन्नती देण्यात

येते. गट-क संवर्गातील कर्मचारी यांची पदोन्नती झाल्यास किंवा त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू केल्यास त्यांचे वेतन वाढण्याऐवजी वेतन कमी होते. ही वित्तीय विसंगती आहे. गट-ब (राजपत्रित) या संवर्गास ७ व्या वेतन आयोगानुसार एस १७ वेतनस्तर मंजूर केल्यास सदर वित्तीय विसंगती उद्भवणार नाही.

<u>समितीची शिफारस</u> :- जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) हे जिल्हा परिविक्षा अधिकारी हे पद जिल्हा परिविक्षा अधिकारी या पदाचे पदोन्नतीचे पद आहे. ४ थ्या व ५ व्या वेतन आयोगामध्ये जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी या पदाचे वेतन जिल्हा परिविक्षा अधिकारी या पदापेक्षा अधिक होते. तथापि, जिल्हा परिविक्षा अधिकारी या संवर्गाला ६ व्या वेतन आयोगामध्ये ९३००-३४८०० ग्रे.वे.४५०० (७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१६) तर जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी या संवर्गाला ९३००-३४८०० ग्रे.वे. रु.४४०० (७ व्या वेतन आयोगामध्ये एस-१५) ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी हे पदोन्नतीचे पद असल्याने सदर संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करणे आवश्यक आहे. सदर संवर्गाला एस-१५ रु.४१८००-१३२३०० ऐवजी एस-१७ रु.४७६००-१५११०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**********

## ३.२६ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| १ | प्रतिवेदक (निवडश्रेणी) | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० | आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करणेबाबत |
| २ | कार्यवाही संपादक | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ रु. ७८८००-२०९२०० | एस-२७ रु.१२३१००-२१५९०० |
| ३ | प्रतिवेदक (वरिष्ठ) | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करणेबाबत |
| ४ | उपकार्यवाही संपादक | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु.५६१००-१७७५०० | एस-२५ रु.७८८००-२०९२०० |
| ५ | प्रतिवेदक (कनिष्ठ) | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० रु. ५६१००-१७७५०० | आश्वासित प्रगती योजनेचा लाभ |
| ६ | मुख्य अनुवादक तथा सहायक कार्यवाही संपादक | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | एस-२३ रु.६७७००-२०८७०० |
| ७ | पर्यवेक्षक. | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ रु. ४१८००-१३२३०० | एस-१७ रु. ४७६००-१५११०० व (चार वर्षानंतर) रू.एस-२० रु.५६१००-१७७५०० |
| ८ | अनुवादक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१५ रु.४१८००-१३२३०० |
| ९ | अनुवादक तथा संपादन सहायक | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० | एस-१६ रु.४४९००-१४२४०० |
| १० | फितध्वनिमुद्रक | ९३००- | ४३०० | एस-१४ | एस-१७ रु.४७६००- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३४८०० | | रु.३८६००-१२२८०० | १५११०० (आश्वासित प्रगती योजना मंत्रालयीन संवर्गाप्रमाणे) |
| ११ | दूरध्वनी चालक | ५२००-२०२०० | २००० | एस-७ रु.१९५००-६३२०० | एस-१० रु.२९२००-९२३०० |
| १२ | ध्वनी यंत्रणा चालक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | एस-१४ रु.३८६००-१२२८०० (आश्वासित प्रगती योजना मंत्रालयीन लिपिक संवर्गाप्रमाणे) |

१. प्रतिवेदक (निवडश्रेणी):-

<u>संघटनेची मागणी :-</u> या पदावर कार्यरत अधिकारी जुन्या सेवा प्रवेश नियमांनुसार "प्रतिवेदक" पदावर रुजू झालेले असल्याने त्यांना वरीलप्रमाणे अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा लाभ अनुज्ञेय करावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर संवर्गांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. प्रतिवेदकांनी त्यांच्या निवेदनात कार्यवाही संपादक पदाच्या वेतनश्रेणीत बदल करावयाची मागणी केली आहे. सदर पदांच्या वेतनश्रेणीत बदल करावयाचा झाल्यास त्यास मा. विशेष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवेदकांनी प्रतिवेदक (पर्यवेक्षक) हा संवर्ग निर्माण करावयाची केलेल्या मागणी विशेष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. आश्वासित प्रगती योजनेच्या लाभ लागू करण्याबाबत करण्यात आलेली मागणी शासन निर्णयाप्रमाणे एस-२० लागू करण्यात आलेला आहे. एस-२० च्या वरील वेतनस्तराकरिता, निवडश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यानुसार या सचिवालयातील प्रतिवेदकांना निवडश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. प्रतिवेदकांनी त्यांच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे त्यांना केंद्राप्रमाणे आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावयाचा झाल्यास महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय सेवाप्रवेश नियम आणि सेवेच्या शर्ती यामध्ये बदल करावा लागेल. तसेच प्रतिवेदकांनी मागणी केल्याप्रमाणे विधानमंडळातील सर्वच पदांना संसदेच्या समकक्ष पदाप्रमाणे वेतनस्तर लागू करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवेदकांच्या वेतनस्तरामध्ये बदल केल्यास अन्य पदांच्या बाबतीत तुलनात्मकदृष्ट्या असमतोल होण्याचा संभव आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाच्या मागण्या ह्या प्रशासकीय आस्थापना विषयी असल्याने याबाबत विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रथम विभाग स्तरावर कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

२. कार्यवाही संपादक:-

<u>संघटनेची मागणी :-</u> हे साखळी पदोन्नतीचे स्तरात वरचे एकाकी पद असून या पदावरील व्यक्तीस प्रतिवेदन कक्ष, अनुवाद व संपादन कक्ष, लघुलेखन कक्ष, टंकलेखन कक्ष, फितध्वनीमुद्रण कक्ष, ध्वनी नियंत्रण कक्ष आदि कक्षाचे नियंत्रण करावे लागते. तसेच त्यांना माहिती अधिकार प्रकरणेही हाताळावी लागतात. एकंदरीत या पदावरील व्यक्तीस संसदेतील संचालक (प्रतिवेदन) पदास समकक्षच नव्हे तर त्यापेक्षाही अधिकची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडावी लागत असल्याने ही वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> सदर संवर्गांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. प्रतिवेदकांनी त्यांच्या निवेदनात कार्यवाही संपादक पदाच्या वेतनश्रेणीत बदल करावयाची मागणी केली आहे. सदर पदांच्या वेतनश्रेणीत बदल करावयाचा झाल्यास त्यास मा. विशेष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवेदकांनी प्रतिवेदक (पर्यवेक्षक) हा संवर्ग निर्माण करावयाची केलेल्या मागणी विशेष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. आश्वासित प्रगती योजनेच्या लाभ लागू करण्याबाबत करण्यात आलेली मागणी शासन निर्णयाप्रमाणे एस-२० लागू करण्यात आलेला आहे. एस-२० च्या वरील वेतनस्तराकरिता, निवडश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यानुसार या सचिवालयातील प्रतिवेदकांना निवडश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. प्रतिवेदकांनी त्यांच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे त्यांना केंद्राप्रमाणे आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावयाचा झाल्यास महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय सेवाप्रवेश नियम आणि सेवेच्या शर्ती यामध्ये बदल करावा लागेल. तसेच प्रतिवेदकांनी मागणी केल्याप्रमाणे विधानमंडळातील सर्वच पदांना संसदेच्या समकक्ष पदाप्रमाणे वेतनस्तर लागू करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवेदकांच्या वेतनस्तरामध्ये बदल केल्यास अन्य पदांच्या बाबतीत तुलनात्मकदृष्ट्या असमतोल होण्याचा संभव आहे.

<u>समितीची शिफारस :-</u> वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाच्या मागण्या ह्या प्रशासकीय आस्थापना विषयी असल्याने याबाबत विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रथम विभाग स्तरावर कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

३.प्रतिवेदक (वरिष्ठ):-

<u>संघटनेची मागणी :-</u> जुन्या सेवा प्रवेश नियमानुसार "प्रतिवेदक" पदावर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना सलग सेवेची १६ वर्षे पूर्ण करण्याऐवजी १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर पदोन्नती देऊन एस-२५ या वेतनश्रेणीत पहिला, त्या पुढील १० वर्षानंतर एस-२६ या वेतनश्रेणीत दुसरा व त्या पुढील १० वर्षानंतर एस-२७ मध्ये तिसरा लाभ अनुज्ञेय करावा.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>** सदर संवर्गांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. प्रतिवेदकांनी त्यांच्या निवेदनात कार्यवाही संपादक पदाच्या वेतनश्रेणीत बदल करावयाची मागणी केली आहे. सदर पदांच्या वेतनश्रेणीत बदल करावयाचा झाल्यास त्यास मा. विशेष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवेदकांनी प्रतिवेदक (पर्यवेक्षक) हा संवर्ग निर्माण करावयाची केलेल्या मागणी विशेष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. आश्वासित प्रगती योजनेच्या लाभ लागू करण्याबाबत करण्यात आलेली मागणी शासन निर्णयाप्रमाणे एस-२० लागू करण्यात आलेला आहे. एस-२० च्या वरील वेतनस्तराकरिता, निवडश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यानुसार या सचिवालयातील प्रतिवेदकांना निवडश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. प्रतिवेदकांनी त्यांच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे त्यांना केंद्राप्रमाणे आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावयाचा झाल्यास महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय सेवाप्रवेश नियम आणि सेवेच्या शर्ती यामध्ये बदल करावा लागेल. तसेच प्रतिवेदकांनी मागणी केल्याप्रमाणे विधानमंडळातील सर्वच पदांना संसदेच्या समकक्ष पदाप्रमाणे वेतनस्तर लागू करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवेदकांच्या वेतनस्तरामध्ये बदल केल्यास अन्य पदांच्या बाबतीत तुलनात्मकदृष्ट्या असमतोल होण्याचा संभव आहे.

**<u>समितीची शिफारस :-</u>** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाच्या मागण्या ह्या प्रशासकीय आस्थापना विषयी असल्याने याबाबत विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रथम विभाग स्तरावर कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**४. उपकार्यवाही संपादक:-**

**<u>संघटनेची मागणी :-</u>** विधी मंडळ सचिवालयातील उप सचिव संवर्गाप्रमाणे उपकार्यवाही संपादक या संवर्गाला एस-२० ऐवजी एस-२५ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u>** ६ व्या वेतन आयोगात या पदाची वेतनसंरचना रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६००/- अशी सुधारित करण्याची मागणी केली होती. त्यानुषंगाने सदरहू पदास रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.५४००/- अशी वेतन संरचना मंजूर करण्याच्या प्रस्तावास विशेष मंडळाने जून २०१५ मध्ये मान्यता दर्शविली होती. तथापि, वित्त विभागाने सर्व पदांचा एकत्रित आढावा घेण्यात यावा असे कळविले होते. सदरहू पदास पदोन्नतीची सिमीत संधी उपलब्ध आहे. त्यामुळे सदरहू पदास सद्यःस्थितीत ७ व्या वेतन आयोगानुसार एस-२३ अशी वेतनसंरचना अनुज्ञेय करण्यात यावी.

**<u>समितीची शिफारस :-</u>** वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. विभागाने वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार सदर

पदांचा एकत्रित आढावा घेण्यात आल्याचा अहवाल प्रस्तावासोबत सादर केला नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे . सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

५. प्रतिवेदक (कनिष्ठ):-

<u>संघटनेची मागणी</u> :- या पदावर सलग सेवेची ४ वर्षे + म.वि.प्रतिवेदक (वरिष्ठ) पदावर (एस-२३) सलग सेवेची ६ अशा एकूण १० वर्षाच्या सेवेनंतर एस- २५ या वेतनश्रेणीत पदोन्नती देऊन पहिला, त्या पुढील सलग १० वर्षानंतर एस-२६ या वेतनश्रेणीत दुसरा व त्या पुढील सलग १० वर्षानंतर एस-२७ मध्ये तिसरा लाभ अनुज्ञेय करावा.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- सदर संवर्गाना ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. प्रतिवेदकांनी त्यांच्या निवेदनात कार्यवाही संपादक पदाच्या वेतनश्रेणीत बदल करावयाची मागणी केली आहे. सदर पदांच्या वेतनश्रेणीत बदल करावयाचा झाल्यास त्यास मा. विशेष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवेदकांनी प्रतिवेदक (पर्यवेक्षक) हा संवर्ग निर्माण करावयाची केलेल्या मागणी विशेष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. आश्वासित प्रगती योजनेच्या लाभ लागू करण्याबाबत करण्यात आलेली मागणी शासन निर्णयाप्रमाणे एस-२० लागू करण्यात आलेला आहे. एस-२० च्या वरील वेतनस्तराकरिता, निवडश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यानुसार या सचिवालयातील प्रतिवेदकांना निवडश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. प्रतिवेदकांनी त्यांच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे त्यांना केंद्राप्रमाणे आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावयाचा झाल्यास महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय सेवाप्रवेश नियम आणि सेवेच्या शर्ती यामध्ये बदल करावा लागेल. तसेच प्रतिवेदकांनी मागणी केल्याप्रमाणे विधानमंडळातील सर्वच पदांना संसदेच्या समकक्ष पदाप्रमाणे वेतनस्तर लागू करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवेदकांच्या वेतनस्तरामध्ये बदल केल्यास अन्य पदांच्या बाबतीत तुलनात्मकदृष्ट्या असमतोल होण्याचा संभव आहे.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच प्रस्तुत संवर्गाच्या मागण्या ह्या प्रशासकीय आस्थापना विषयी असल्याने याबाबत विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रथम विभाग स्तरावर कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही..

६. मुख्य अनुवादक तथा सहायक कार्यवाही संपादक :-

<u>संघटनेची मागणी</u> :- विधी मंडळ सचिवालयातील अवर सचिव संवर्गाप्रमाणे मुख्य अनुवादक तथा सहायक कार्यवाही संपादक या संवर्गाला एस-१९ ऐवजी एस-२३ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

__प्रशासकीय विभागाचे अभिप्राय__ :- सहाव्या वेतन आयोगात या पदाची वेतनसंरचना रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००/- अशी सुधारित करण्याची मागणी केली होती. त्यानुषंगाने सदरहू पदास रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.५०००/- अशी वेतन संरचना मंजूर करण्याच्या प्रस्तावास विशेष मंडळाने जून २०१५ मध्ये मान्यता दर्शविली होती. तथापि, वित्त विभागाने सर्व पदांचा एकत्रित आढावा घेण्यात यावा असे कळविले होते. सदरहू पदास पदोन्नतीची सिमीत संधी उपलब्ध आहे. त्यामुळे सदरहू पदास सद्यःस्थितीत सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० अशी वेतनसंरचना अनुज्ञेय करण्यात यावी.

__समितीची शिफारस__ :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. विभागाने वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार सर्व पदांचा एकत्रित आढावा घेण्यात आल्याचा अहवाल प्रस्तावासोबत सादर केला नाही. तथापि, वेतन समानीकरण समितीने ४ थ्या वेतन आयोगामध्ये अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीपेक्षा उच्च वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे .सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

**७. पर्यवेक्षक :-**

__संघटनेची मागणी__ :- विधी मंडळ सचिवालयातील कक्ष अधिकारी संवर्गाप्रमाणे पर्यवेक्षक संवर्गाला एस-१५ ऐवजी एस-१७ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी तसेच ४ वर्षानंतर एस-२० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

__प्रशासकीय विभागाचे अभिप्राय__ :- पर्यवेक्षक पदास ५ व्या वेतन आयोगामध्ये कक्ष अधिकारी पदास असलेली वेतन संरचना अनुज्ञेय करण्यात आली होती. ६ व्या वेतन आयोगात या पदाची वेतनसंरचना रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४८००/- अशी सुधारित करण्याची मागणी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी केली होती. त्यानुषंगाने सदरहू पदास रु. ९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४८००/- अशी वेतन संरचना मंजूर करण्याच्या प्रस्तावास मा. विशेष मंडळाने माहे जून २०१५ मध्ये मान्यता दर्शविली होती. तथापि, वित्त विभागाने सर्व पदांचा एकत्रित आढावा घेण्यात यावा असे कळविले होते. सदरहू पदास पदोन्नतीची सिमीत संधी उपलब्ध आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत या पदास ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१७ अशी वेतनसंरचना अनुज्ञेय करण्यात यावी.

__समितीची शिफारस__ :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. विभागाने वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार सर्व पदांचा एकत्रित आढावा घेण्यात आल्याचा अहवाल प्रस्तावासोबत सादर केला नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे . सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

८. अनुवादक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- विधी मंडळ सचिवालयातील अतांत्रिक पदांशी तुलना करता अनुवादक हे पद सहायक कक्ष अधिकारी पदाशी समकक्ष असल्याने या दोन्ही पदांसाठी पुढील पदोन्नती देखिल समकक्ष राखणे आवश्यक आहे. यास्तव, अनुवादक पदाची वेतनश्रेणी एस-१४ ऐवजी एस १५ लागु करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- अनुवादक पदास ६ व्या वेतन आयोगात मंजूर झालेली वेतनसंरचना केंद्र शासनाकडे नाही. सदरहू पदास पदोन्नतीची सिमीत संधी उपलब्ध आहे. अनुवादक या पदास ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१५ अशी वेतनसंरचना अनुज्ञेय करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे . सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

९. अनुवादक तथा संपादन सहायक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- सदर पदास पदोन्नतीची सिमीत संधी उपलब्ध असल्याने अनुवादक तथा संपादक सहायक या पदाची वेतनश्रेणी एस-१४ ऐवजी एस-१६ लागू करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- अनुवादक पदास ६व्या वेतन आयोगात मंजूर झालेली वेतनसंरचना केंद्र शासनाकडे नाही. सदरहू पदास पदोन्नतीची सिमीत संधी उपलब्ध आहे. अनुवादक तथा संपादक सहायक या पदास ७ व्या वेतन आयोगानुसार एस-१६ अशी वेतनसंरचना अनुज्ञेय करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :- विभागाने प्रस्तुत संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याबाबत कोणतेही नवीन कारण दिलेले नाही. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे . सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१०. फितध्वनीमुद्रक:-

<u>संघटनेची मागणी</u> :- प्रस्तुत संवर्गाला सेवा काळात पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे १०,२०,३० आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मिळणारी वेतनश्रेणी एस-१४ नंतर एस-१५ दिली जाते. फितध्वनीमुद्रक या पदाची वेतनश्रेणी मंत्रालयातील सहायक कक्ष अधिकारी या संवर्गाप्रमाणे आहे. सदर पदाला १० वर्षा नंतर आश्वासीत प्रगती योजनेअंतर्गत कक्ष अधिकारी या पदाची वेतनश्रेणी देण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u> :- विधानमंडळ सचिवालयातील फितध्वनीमुद्रक ही तांत्रिक पदे असून एकाकी पदे आहेत. राज्य शासनाकडील एकाकी पदांना ज्या पद्धतीने आश्वासित प्रगती योजना अंतर्गत लाभ देण्यात येतात त्याप्रमाणे या सचिवालयातील एकाकी पदांना लाभ अनुज्ञेय

करण्यात येतो. राज्य शासनाने एकाकी पदांच्या योजनेसंदर्भात निकषांमध्ये बदल केल्यास त्याप्रमाणे या सचिवालयातील एकाकी पदांना लाभ लागू करण्यात येईल.

समितीची शिफारस :- आश्वासित प्रगती योजना लागू करणे हा शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१९ अन्वये आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर विषय वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

११.दूरध्वनी चालक :-

संघटनेची मागणी :- दूरध्वनीचालक पदावरील कर्मचाऱ्यास केंद्राप्रमाणे लेवल-५ रु.२९२००-९२३०० वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- दूरध्वनीचालक या संवर्गातील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वेतन संरचनेमध्ये असमानता असून त्याची त्रुटी निवारण करण्याबाबत ६ व्या वेतन आयोगात विनंती केली होती. सदरहू विनंतीच्या अनुषंगाने प्रस्ताव वेतनत्रुटी समितीकडे पाठविला असता समितीने वेतन संरचनेमध्ये त्रुटी नसल्याचा अहवाल दिला होता. वेतन संरचनेमध्ये सदरहू पदास ६व्या वेतन आयोगामध्ये जी वेतन संरचना मंजूर झालेली आहे, त्या वेतन संरचनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे ७ व्या वेतन आयोगात वेतन संरचना मंजूर करण्यात आलेली आहे. ती वेतन संरचना अनुज्ञेय करण्यात यावी.

समितीची शिफारस :- वेतन समानीकरण समितीने (४ था वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गाला केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. सदर संवर्ग राज्य शासनाकडील बहुतांश शासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत आहे. सदर संवर्गाला ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळून येत नाही.

१२. ध्वनी यंत्रणा चालक:-

संघटनेची मागणी :- प्रस्तुत संवर्गाला सेवा काळात पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे १०,२०,३० आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मिळणारी वेतनश्रेणी एस-६ नंतर एस-१४ दिली जाते. ध्वनी यंत्रणा चालक या पदाची वेतनश्रेणी मंत्रालयातील लिपिक या संवर्गाप्रमाणे आहे. सदर पदाला १० वर्षा नंतर आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत सहायक कक्ष अधिकारी/ फितध्वनीमुद्रक या पदाची वेतनश्रेणी देण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- विधानमंडळ सचिवालयातील ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिक डी तांत्रिक पदे असून एकाकी पदे आहेत. राज्य शासनाकडील एकाकी पदांना ज्या पद्धतीने आश्वासित प्रगती योजना अंतर्गत लाभ देण्यात येतात त्याप्रमाणे या सचिवालयातील एकाकी पदांना लाभ अनुज्ञेय करण्यात येतो. राज्य शासनाने एकाकी पदांच्या योजनेसंदर्भात निकषांमध्ये बदल केल्यास त्याप्रमाणे या सचिवालयातील एकाकी पदांना लाभ लागू करण्यात येईल.

**<u>समितीची शिफारस</u>**:- आश्वासित प्रगती योजना लागू करणे हा शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१९ अन्वये आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर विषय वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

********

## ३.२७ वाहनचालक संवर्ग

| अ.क्र. | संवर्ग पदनाम | सहाव्या वेतन आयोगातील वेतन संरचना | | सातव्या वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|---|
| | | पे बँड रू. | ग्रेड पे रू. | मंजूर केलेली वेतनश्रेणी रू. | मागणी केलेली वेतनश्रेणी रू. |
| १ | वाहन चालक | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ रु.१९९००-६३२०० | आश्वासित प्रगती योजना लाभ १० वर्षे एस -८ रु. २५५००-८११००, २० वर्षे लाभ एस -१० रु . २९२००-९२३०० व ३० वर्ष लाभ एस -१२ रु. ३२०००-१०१६०० |

१. वाहनचालक संवर्ग :-

**<u>संघटनेची मागणी</u>** :- ७ व्या वेतन आयोगानुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय करताना अन्याय झाला आहे. त्यात सुधारणा करुन अपेक्षित सुधारणा वाहनचालकांना आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभासाठी १० वर्षानंतर एस- ८ आणि दुसऱ्या लाभासाठी २० वर्षांनंतर एस -१० आणि तिसऱ्या लाभानंतर ३० वर्षांनंतर एस -१२ अशी वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणेबाबत मागणी आहे.

**<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय</u>** :-सदर मागणीच्या अनुषंगाने उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग आणि नियोजन विभाग या दोन विभागांनी आपले अभिप्राय पुढीलप्रमाणे दिले आहेत. १) उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग: सुधारणापूर्व वेतनश्रेणी व सुधारित वेतनश्रेणी सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ. बाबी विचारात घेऊन वाहनचालक याच्या वेतन सुधारणेचा प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समितीकडे विचारार्थ सादर करण्यात येत आहे. २) नियोजन विभाग: नियोजन विभागातील नियमित आस्थापनेवरील वाहनचालकांच्या ४ पदांपैकी ३ पदे निरसित केल्याने नियमित आस्थापनेवर कार्यरत असलेल्या एका वाहनचालकाची वेतनश्रेणी सुधारित केल्यास शासनावर आर्थिक भार येणार नाही. वेतनश्रेणी निश्चित करण्याचा निर्णय वेतन त्रुटी निवारण समितीने घेणे उचित होईल. वाहन चालक हा सर्वसाधारण संवर्ग सर्वच प्रशासकीय विभागांच्या आस्थापनेवर कार्यरत आहे. त्यामुळे वरील विभागांव्यतिरिक्त इतर प्रशासकीय विभागाचे अभिप्राय नाहीत.

**<u>समितीची शिफारस</u>** :- वाहन चालक या संवर्गात राज्य शासनाकडे एकच संवर्ग कार्यरत आहे व सदर संवर्गास आश्वासित प्रगती योजना शासनाच्या धोरणानुसार विहित करण्यात आली आहे.

केंद्र शासनाकडे वाहन चालक संवर्गात चार स्तर मंजूर असून ते पुढीलप्रमाणे आहेत. १)पहिल्या स्तरात ३०% ( ६ व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे. रु.१९००), २)दुसऱ्या स्तरात ३०% ( ६ व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे. रु.२४००), ३) तिसऱ्या स्तरात ३५% ( ६ व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे. रु.२८००) ४) विशेष स्तरात ५% ( ६ व्या वेतन आयोगानुसार ग्रे.वे. रु.४२००). केंद्र शासनामध्ये उपरोक्तप्रमाणे स्तर असले तरी, आश्वासित प्रगती योजना लागू करताना सेवा कालावधी (१०, २०, ३० वर्षे) विचारात घेतला जात असल्याने आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लागू असलेले लाभ दिले जातात, असे निरीक्षण ७ व्या केंद्रीय वेतन आयोगाने नोंदले आहे. राज्य शासनाकडील वाहनचालक संवर्गासही शासन धोरणानुसार लागू असलेले आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय आहेत.

राज्य शासनाच्या लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार वाहनचालक या संवर्गातून संवर्गबाह्य बदलीने लिपिक-टंकलेखक संवर्गात घेण्यासाठी १०% पदे राखून ठेवण्यात आली आहेत. लिपिक-टंकलेखक संवर्गाला ७ व्या वेतन आयोगामध्ये एस-६ हीच वेतनश्रेणी लागू आहे. वास्तव, वाहनचालक संवर्गाच्या मूळ वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणे योग्य ठरत नाही.

७ व्या वेतन आयोगापासून सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०, २० व ३० वर्षांनी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करण्यात येत आहे. आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करणे हा शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. थोडक्यात, वाहन चालक संवर्गास ७ व्या वेतन आयोगानुसार लागू असलेल्या एस-६ रु.१९९००-६३२०० या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून येत नाही.

***********

# समितीची प्रशासकीय सुधारणासंबंधी टिप्पणी व सादरीकरण

## Key learnings and way forward

Six-month long engagement for making recommendations to rectify the pay anomalies perceived by various cadres seeking higher pay scales and extensive interactions thereupon with officials of the departments controlling these cadres, 99 out of 442 representations were found to be having pay anomalies. Remaining 343 representations were found to be in the nature of repeats from the past pay committees rejecting the same.

Overall, the Committee notes the following in the representations received :

*In general*

1. Most proposals (3/4 of total) were seeking equivalence with similar cadres working in institutions of Government of India (GoI), or with cadres in similar organisational hierarchy levels of other departments, even though the equivalence committee set up during 4th Pay Commission (PC) had clearly delineated only some cadres as equivalent to those of GoI and had determined only in some cases the levels equivalent across departments.

2. Many cadres were seeking increase in pay scale considering their increased responsibilities and status upgrade in group category by Government orders.

3. As cadres of some departments got higher scale per recommendation of earlier pay anomalies rectification committee, the remaining cadres were seeking the same scale to them also.

4. It has also happened that the pay scale increase to a cadre disturbed the organizational hierarchy as the promotional post carried the same pay scale as that of the feeder post. The promotional post in the cadre therefore sought higher scale.

5. Instead of uniformly applying pay scales for a university cadre, only those who represented to earlier pay anomalies committee got the higher pay scale. Same cadres working in the colleges/institutions of the same university or those in other universities of the same department represented to this committee to redress their pay anomaly.

While verifying the proposals received from Departments and the representing cadres, Committee analysed the information from Payroll application 'Sevarth' by taking out data in excel sheets with the help of officer in charge of Sevarth and his team of technical assistants to check the pay scales of the representing cadres.

*Verification using Sevarth*

1. There are many customized sevarth applications for departments having big cadres and several autonomous or grant in aid institutions. Information from these customized applications is not directly accessible to core Sevarth team of Finance Department.

2. While the notification is issued declaring pay scales of most Government cadres, for departments having customized sevarth, it is their GRs that notify the changed pay scales. Customised sevarth reflects the same per the Drawing and Disbursing Officers of the offices implementing the GRs. It becomes difficult to verify whether omission of a cadre in any anomaly was due to oversight or by a considered decision.

3. Verification of the claims of cadres of the autonomous and grant in aid institutions was a time consuming exercise that involved field office, mantralaya office, finance department in digging out the previous noting kept in multiple files to get complete picture on the claims and how these were attended or not included in the original GRs of the Departments.

4. Sevarth package gives details of employees in different cadres working as on date while information about approved posts as per staffing pattern is not readily available. Sevarth database does not capture the GR on approved staffing pattern that includes the post against which employee was drawing salary.

5. Many officials in a cadre in the same department were carrying different pay scales. In one case, there was a jump of 15 pay scales from the new entrant to the one who was nearing retirement. In another case, academic scale was availed by some officials while others in the same cadre within or in other departments were getting state notified scale.

6. Further for the same cadre in different departments varying pay scales were availed as also their placement in varying group categories. The nomenclature needs change as per duties and responsibility and scope of work.

7. Sevarth is having information for over twenty years across all offices and Departments and is regularly being updated month after month when payrolls are prepared using the application. But no meaningful information is being drawn as feedback on HR policies including trend analysis of expenditure and much more.

*On HR tools*

Apart from comparative analysis of pay scales claimed, interactions with representatives of cadres, field organization and departments and on going through the documents presented with representations, it was noticed as under.

1. Some cadres did not as yet have recruitment rules (RRs); some had 'draft Rules' under processing; RRs were not updated even though eligibility criteria were improved through GRs; RRs had provision for recruitment by promotion or nomination, but a promotional quota/frequency was not delineated for the feeder cadres.

2. Recruitment and promotions had taken place without RRs especially in the autonomous agencies or for new posts or where there were only single post cadres using overall administrative power of appointing authority, may be for expedience.

3. Instead of a single statewide common cadre, there were multiplicity of cadres for the same type of work in different departments like statistical assistant, librarians to name a few.

4. There is no uniformity in terms of pay scale as per group category. However, there are cadres that have got status upgrade through government order while recruitment rules have not been updated.

5. Staffing pattern was not reviewed by many departments and their field offices. Many cadres have become obsolete, processing/hierarchical levels have not been reduced, correlation with work norms was not visible as the work norms have not been reviewed, multi tasking personnel are not envisaged even when existing work responsibility like in case of tracers and draughtsman having similar academic qualification as engineering cadre has considerably reduced due to adoption of GIS and CAD technology applications.

6. Even after availing non-functional up-gradation in pay scale, officials were availing assured career progression benefits counting the entire service length for eligibility despite getting pay up-gradation. RRs have not been tweaked to convert up-gradation to selection grade.

7. There was a big jump from feeder to promotional pay scales. With limited number of promotional posts, feeder cadres were getting huge jump in pay scales under assured career progression scheme.

### *Approach to reform and way forward*

Considering the recurrent grievances and demands presented to every pay commission/committee on equivalence and other key issues in-common narrated above, there is pressing need to comprehensively address the underlying distortions mostly because of the out of tune HR tools.

A two-pronged reform agenda is proposed for action in parallel. Such a systems approach will go beyond *ad hoc* corrections in anomalies with satisfactory outcomes in employee life cycle from recruitment to retirement.

These two streams of action agenda are narrated in brief as under

## Stream A - Developing an integrated database with ease of implementation and monitoring

There is need to have an integrated approach to Human Resource Development in the State, facilitated by a robust common data base. Such a system could have a centralized meta data with distributed servers across departments and agencies having bidirectional links. Sevarth database becomes the starting point for the exercise as it is already having authentic information about every employee allotted a unique sevarth id.

eHRMS developed by NIC could then be used to provide information relating to establishment matters other than payroll, allowances, pensions etc. which get pulled using sevarth id into eHRMS from core Sevarth and customized sevarth applications.

APIs should be developed to pull information to eHRMS of departments from respective legacy HRMS of departments and their field organizations. A bidirectional link should be provided with the proposed transaction processing server to push/pull data.

A transaction processing server should be set up by MahaIT at Central level to pull eHRMS data from different departments at the end of every day. Data should also be pulled from Developed applications like vetanika and nivruttivetanvahini, applications of specialised agencies like Department Enquiry officials, Recruiting agencies like MPSC, Training agencies like YASHADA, Establishment Boards and Departmental Promotional Committees for promotions, Internal departmental examination agencies like MPSC or others and pushed to respective eHRMS servers of Departments.

Data analytical tools need to be employed to query common database for the desired view and information as status reports for an office, department, FD or GAD.

Hierarchy of decentralized application with centralized meta data and data analytics would be sevarth, customized sevarth to eHRMS of departments; developed HRMS packages of departments and their field organizations to eHRMS of departments; Role based agencies' data to transactions server to eHRMS of departments; eHRMS to transaction server; Data Analytics of Transaction server for single touch point on HR.

With the information system in place, HR systems get the options to work on

- Optimized length and breadth of organization
    - Expeditious decision making
        - Performance indices
            - Financial and Non-financial incentives
- Uniform implementation of HR policies
    - Recruitment to Retirement
        - Tracking milestones
            - Promotes stakeholder confidence

## Stream B - Removing distortions while updating HR tools

As narrated earlier, adequate attention has not been given to HR tools - Recruitment Rules (RRs), Staffing Pattern, Work norms, Organization of work, Performance linked incentives etc.

1. There is urgent need to initiate a campaign to review RRs and get them promulgated within six months of such a review as against reportedly about 5 years on an average at present.
2. Similarly work norms need to be reviewed in the light of developed and emerging technology and newer challenges in different domains.
3. Based on work norms, organization of work needs to be reviewed keeping flexibility in terms of fast changing modes of communication.
4. Organization needs to be made shallower by flattening out responsibilities and decision-making levels.
5. Review of Staffing pattern would be needed as per developed work norms and organization of work in terms of total cost of establishment to government for efficient delivery of envisaged services.

6. Performance monitoring framework needs to be reviewed and updated to bring in right financial/non-financial incentive structure against objective assessment of outcomes and efforts made.

*Institutional arrangement*

To move fast on these critical pressing needs of HR reform, a dedicated set of institutions need to be set up from whom expected outcomes could be delivered within a given time.

1. An executive committee for each of the two streams need to be set up.

- Stream A could be led by PS Finance Expenditure and DIT, SIO NIC and DES as members Jt director DAT to service the committee.
- Stream B could be led by ACS Services with Secretary OM&AR, DG YASHADA, Secretary MPSC, Joint Secretary GAD services to service the committee.

2. A committee under Secretary of each Department should be set up comprising heads of domain institutions and serviced by Joint Secretary in charge of establishment of the department. A member of PMU would be permanent invitee to the committee.
3. HPC under CS should be set up to approve proposals of departments as vetted by PMU. It should be serviced by ACS GAD services and could include GAD OM&AR, IT, FD (personnel), Planning as other members.
4. A project management unit (PMU) should be set up by GAD to get recruitment rules, staffing pattern and organization levels optimized and normalized in a time bound manner.

The unit should have officials from GAD and FD. It could engage expertise of retired personnel to effectively liaise with the departments and their field agencies.

### *Conclusion*

The exercise undertaken for rectification of pay anomalies arising after implementation of 7[th] Pay Commission recommendations has revealed several deeper underlying constraining issues that need correction over time. From integrating disjointed HRMS modules and applications to using data analytical tools to complete the feedback loop of HR policy planning, there is big scope to usher productivity gain.


Simultaneously, to keep pace with the changing times due to technological advances, a campaign should be initiated for updating the recruitment rules and the staffing pattern in a time bound manner. Under the process so planned, work norms and organizational structure could also be reviewed for developing a conducive work environment that enables more efficient and assured delivery of public services.


रिक्त पान


सादरीकरण :-


12/30/2024
































What we have ...






Institutional arrangement


What we don't have...


Stream A – possible action agenda


Conclusion




Stream B – Possible action agenda


Thank You

## ऋणनिर्देश :-

वेतनत्रुटी निवारण समितीचे कामकाज करण्याची बहुमूल्य संधी शासनाने आम्हास दिली याबद्दल आम्ही शासनाचे आभारी आहोत.

आम्ही येथे विशेषत्वाने नमूद करु इच्छितो की, शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी, कृषि विद्यापीठे व अकृषि विद्यापीठांमधील कर्मचारी व शिक्षक संघटना तसेच महासंघाच्या प्रतिनिधींनी समितीच्या बैठकीस उपस्थित राहून प्रत्यक्ष चर्चेच्या वेळी त्यांच्या विभागांशी/संवर्गाशी संबंधित माहिती विषद करुन समितीस सहकार्य केले. त्यामुळे हा अहवाल सादर करण्यास समितीस बहुमूल्य मदत झाली. कर्मचारी संघटनांनी आम्हाला जे सहकार्य केले त्याबाबत आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

श्री.नितिन गद्रे, अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग यांनी काही काळ समितीचे सदस्य म्हणून कामकाज पाहिले आहे. या कामी त्यांचेही आम्हास मौलिक सहकार्य लाभले. समिती त्यांच्या सहकार्याबद्दल त्यांची विशेष आभारी आहे.

सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, संबंधित विभाग प्रमुख, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे सह सचिव, उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी तसेच कर्मचारीवृंदानी केलेल्या सहकार्याचा उल्लेख समिती येथे आवर्जून करु इच्छिते. त्यांच्या सहकार्याशिवाय हा अहवाल शासनास सादर करणे समितीस शक्य झाले नसते.

श्री.वि.अ.धोत्रे, उप सचिव, श्री.श.ज्ञा.तिजारे, अवर सचिव तसेच वेतनत्रुटी निवारण समिती कक्षातील श्री.प्र.द.देशकर, उप सचिव (से.नि), श्रीम.वृ.वि.भिंगार्डे, कक्ष अधिकारी, श्रीम.अ.मो.लांभाते व श्रीम.स्व.चिं.मुंडे सहायक कक्ष अधिकारी, श्री.नि.सं.रोकडे, लिपिक टंकलेखक यांनी समितीचा अहवाल सादर होईपर्यंत घेतलेले परिश्रम उल्लेखनीय आहेत. समितीच्या संपूर्ण कामकाजादरम्यान त्यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य गौरवास्पद आहे. तसेच वित्त विभागाच्या सेवा-९ कार्यासनातील कार्यासन अधिकारी श्रीम.वै.वे.सावंत, कक्ष अधिकारी व कर्मचारीवृंदाने केलेल्या तत्पर सहाय्याचाही उल्लेख समिती या ठिकाणी करु इच्छिते.

श्री.मुकेश खुल्लर
अध्यक्ष,वेतन त्रुटी निवारण समिती

श्री.सौरभ विजय
प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग तथा
सदस्य, वेतनत्रुटी निवारण समिती

श्रीमती व्ही.राधा
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग
तथा सदस्य, वेतनत्रुटी निवारण समिती

रिक्त पान

# जोडपत्रे

जोडपत्र -अ

**समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले प्रशासकीय विभागप्रमुख/विभागप्रमुख आणि अधिकारी/कर्मचारी संघटना**

१) समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले प्रशासकीय विभागप्रमुख/विभागप्रमुख

| अ.क्र. | प्रशासकीय विभागप्रमुख /विभागप्रमुख |
|---|---|
| १ | सह सचिव जलसंपदा विभाग (आस्था) |
| | अवर सचिव जलसंपदा विभाग (आ-तांत्रिक) |
| २ | उप सचिव वित्त विभाग (वस्तु व सेवा कर विभाग) |
| | सह सचिव वित्त विभाग (विमा संचालनालय) |
| ३ | उप सचिव विधी व न्याय विभाग (कार्यासन -१) |
| | उप सचिव विधी व न्याय विभाग (कार्यासन -१) |
| | उप सचिव विधी व न्याय विभाग (कार्यासन-२) |
| | अवर सचिव विधी व न्याय विभाग (कार्यासन-२२) |
| | सह सचिव विधी व न्याय विभाग (कार्यासन-६) |
| ४ | उप सचिव आदिवासी विभाग (कार्यासन-१५) |
| ५ | सह सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग (सेवा- ३/ आस्था- २) |
| | अवर सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग (सेवा- ३/सेवा-४/ आस्था- २) |
| ६ | सह सचिव मराठी भाषा विभाग ( आस्था- २) |
| ७ | अवर सचिव कृषी व पदुम विभाग ( पदुम-६) |
| | उप सचिव कृषी व पदुम विभाग (६-अ) |
| | अवर सचिव कृषी व पदुम विभाग (ऐएच -१) |
| | कक्ष अधिकारी कृषी व पदुम विभाग (पदु -२) |
| ८ | सह सचिव महिला व बाल विकास विभाग (कार्या -७अ) |
| ९ | उप सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग (विशी -१) |
| | उप सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग (तांशी-२) |
| १० | उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग (अध्यक्ष प्रेसेस फेडरेशन) |
| | उप सचिव उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग (काम-८) |
| | उप सचिव उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग (काम-६) |
| | उप सचिव उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग (उद्योग-३) |
| ११ | उप सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैसेवा-४/वैसेवा-३/वैसेवा-५) |
| | उप सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (परिचर्या कक्ष) |
| | उप सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (आयु-१) |
| १२ | सह सचिव नियोजन विभाग (कार्यासन-१४२३) |
| १३ | उप सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा-१) |

| अ.क्र. | प्रशासकीय विभागप्रमुख / विभागप्रमुख |
|---|---|
| | कक्ष अधिकारी सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा-५) |
| १४ | उप सचिव गृह विभाग (राकाश-१) |
| | अवर सचिव गृह विभाग (पोल ५-अ व क) |
| | उप सचिव गृह विभाग (पोल-४) |
| | अवर सचिव गृह विभाग (परि-४) |
| | उप सचिव गृह विभाग (तुरुंग-१) |
| १५ | उप सचिव नगर विकास विभाग (नवि २७) |
| १६ | उप सचिव विधानमंडळ सचिवालय |
| १७ | सह सचिव महसुल व वन विभाग (ई-७/ई-१०) |
| | उप सचिव महसुल व वन विभाग (फ-४/फ-८) |
| | सह सचिव महसुल व वन विभाग (ई-६) |
| | उप सचिव महसुल व वन विभाग (म-१) |
| १८ | उप सचिव ग्राम विकास विभाग (आस्था-४) |
| १९ | कक्ष अधिकारी कौशल्य विकास व उद्योजकता |
| २० | उप सचिव शालेय शिक्षण विभाग (टीएनटी-३) |
| | सहा सचिव शालेय शिक्षण विभाग (प्रशा-५) |
| २१ | सह सचिव अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग (नापु-१५/ग्रास-३) |
| २२ | उप सचिव सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग (रेशीम) |
| २३ | अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग (मासेक) |
| | अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग (मावज-२) |
| | सह सचिव सामान्य प्रशासन विभाग (प्रशा-१/प्रशा-२/प्रशा-३) |
| | अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग (गलोआ) |
| | सह सचिव सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१५) |
| | अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग (शासकिय परिवहन सेवा) |
| २४ | उप सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (पापु-१५) |
| २५ | उप सचिव इतर मागास व बहुजन कल्याण विभाग (विजाभज -१) |

२) समितीच्या बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी/कर्मचारी संघटना

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी संघटना |
|---|---|
| १ | कृषी पर्यवेक्षक संघटना |
| २ | कृषी लिपिक संवर्ग संघटना |
| ३ | कृषी सहायक संघटना |
| ४ | महाराष्ट्र राज्य गुणनियंत्रण कर्मचारी संघटना (गुणनियंत्रक व दुग्धतंत्रज्ञ) |
| ५ | महाराष्ट्र शासन दुग्धतंत्रज्ञ संघटना (दुग्धशाळा पर्यवेक्षक व पाळी व्यवस्थापक) |
| ६ | पशुचिकित्सा व्यवसायी संघटना , महाराष्ट्र |
| ७ | कृषी अधिकारी संघटना |
| ८ | रेशीम उद्योग कर्मचारी संघटना |
| ९ | महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कर्मचारी संघटना |
| १० | मुंबई शिधावाटप कर्मचारी संघटना |
| ११ | निरीक्षक वैध मापनशास्त्र कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| १२ | मंत्रालय अधिकारी संघटना |
| १३ | मंत्रालय कर्मचारी संघटना |
| १४ | पोलीस कर्मचारी कुटुंबीय व सेवानिवृत्त पोलीस बिनतारी समाजसेवी संस्था |
| १५ | कार्यकारी अधिकारी (राजपत्रित) संघटना मोटार वाहन विभाग (RTO) |
| १६ | महाराष्ट्र राज्य कौटुंबिक न्यायालय समुपदेशक संघटना |
| १७ | महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना |
| १८ | महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन |
| १९ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय कर्मचारी संघटना |
| २० | महाराष्ट्र राज्य परिसेविका संघटना |
| २१ | महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना |
| २२ | महाराष्ट्र राज्य आरोग्य सहायक/ निरीक्षक संघटना |
| २३ | महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी गट अ संघटना |
| २४ | महाराष्ट्र राज्य रेखा चित्र संघटना |
| २५ | महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी संघटना |
| २६ | फॉरेस्ट रेंजर असोसिएशन |
| २७ | बहुजनांचा वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना |
| २८ | वनरक्षक व पदोन्नत वनपाल संघटना |
| २९ | महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना |
| ३० | विदर्भ पटवारी संघ |
| ३१ | महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळाधिकारी समन्वय महासंघ |
| ३२ | महाराष्ट्र राज्य कृषी पदवीधर तांत्रिक ग्रामसेवक संघटना |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी संघटना |
|---|---|
| ३३ | महाराष्ट्र राज्य कृषी पर्यवेक्षक संघटना |
| ३४ | स्थापत्य अभियंता समन्वय समिती |
| ३५ | महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती |
| ३६ | राज्य संघटक जिल्हा परिषद अभियंता संघटना |
| ३७ | वेतनत्रुटी कृती समिती |
| ३८ | शिक्षक समिती |
| ३९ | पदवीधर शिक्षक संघटना |
| ४० | लेखा संघटना |
| ४१ | जिल्हा परिषद कर्मचारी संघटना |
| ४२ | जिल्हा परिषद अभियंता संघटना |
| ४३ | विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ |
| ४४ | प्राथमिक शिक्षक संघ |
| ४५ | राष्ट्रीय शिक्षक परिषद |
| ४६ | शिक्षक भारती |
| ४७ | शिक्षकेतर संघटना |
| ४८ | निदेशक संघटना |
| ४९ | नगर रचना तांत्रिक संघटना, महाराष्ट्र राज्य |
| ५० | वैज्ञानिक कर्मचारी संघटना |
| ५१ | जियो सायंटिस्ट असोसिएशन |
| ५२ | शासकीय जिल्हा प्रकल्प अधिकारी संघटना |
| ५३ | महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व यांत्रिकी कर्मचारी संघटना |
| ५४ | जिल्हा परिषद वाहनचालक संघटना |
| ५५ | कास्ट्राईब शासकीय व निमशासकीय वाहनचालक संघटना |
| ५६ | कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य |
| ५७ | शासकीय वाहन चालक संघटना मंत्रालय, मुंबई |
| ५८ | राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना |

अनुक्रमणिका 5

प्रकरण-१ 9

प्रस्तावना 9

२. प्रकरण- २ 11

समितीचा दृष्टीकोन 11

२.१ पार्श्वभूमी:- 11

२.२ समितीने विचारात घेतलेल्या मूल्यमापनविषयक आधारभूत बाबी:- 12

२.३ केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत 16

२.४ इतर अनुषंगिक बाबी 17

प्रकरण- २(अ) 19

समितीला आढळलेल्या प्रशासकीय सुधारणांसंबंधाने सूचना 19

प्रकरण २(ब) 19

प्रशासकीय विभागाचे आकृतीबंध आणि सेवा प्रवेश नियम 19

प्रकरण-३ 21

प्रशासकीय विभागांचे प्रस्ताव व त्यावरील समितीच्या शिफारशी 21

३.१ कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग 21

अ) कृषि आयुक्तालय 25

१.महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा प्रशासकीय अधिकारी (गट-अ) :- 25

२.महाराष्ट्र कृषि सेवा गट ब तंत्र अधिकारी :- 25

३.सहायक प्रशासकीय अधिकारी गट-ब :- 26

४.महाराष्ट्र कृषि सेवा गट ब कनिष्ठ अधिकारी :- 27

५. कृषि पर्यवेक्षक :- 27

ब) दुग्ध व्यवसाय विकास विभाग 28

६.पशु व्यवस्थापक :- 28

७. गुणनियंत्रण गट - क :- 29

८. दुग्धशाळा व्यवस्थापक :- 29
क) पशुसंवर्धन आयुक्तालय 30
९. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) :- 30
१०.सह आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) :- 31
११. उप आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) :- 32
१२.सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) :- 32
१३.पशुधन विकास अधिकारी गट - ब :- 33
ड) कृषि विद्यापीठे 34
ड(१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली. 34
१४.सहायक कुल सचिव :- 34
१५. शाखा अभियंता :- 35
१६.कनिष्ठ अभियंता :- 35
१७. वरिष्ठ लिपिक :- 36
१८. लिपिक टंकलेखक :- 36
ड (२) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठ, परभणी 37
१९. कार्यदेशक पर्यवेक्षक :- 37
ड (३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी 37
२०. नळ कारागीर :- 37
ड (४) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी 38
२१. वरिष्ठ तांत्रिक सहायक :- 38
२२. यांत्रिक पर्यवेक्षक :- 38
२३. तांत्रिक सहायक (यांत्रिकी) :- 39
२४. तांत्रिक सहायक (ग्रंथालय):- 39
२५. निरिक्षक (पशुवैद्यकीय) :- 40
२६.नळ कारागीर :- 41
२७. मिस्त्री :- 41
ड (५) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषितंत्र विद्यालय, मालेगाव 42
२८. प्राचार्य :- 42
२९.मुकादम : 43
ड (६) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत ग्रामीण शिक्षण संस्था, पिंपरी, वर्धा. 43
३०. फिल्डमन फॉर हॉर्टीकल्चर :- 43
३१.फिल्डमन :- 44
ड (७) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत शिवाजी कृषि महाविद्यालय, अमरावती. 44
३२. प्रक्षेत्र अधिक्षक :- 44
(८) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली. 45
३३. क्रीडा अधिकारी :- 45
३४. आरेखक :- 46
(ड) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ 47
३५. सहायक कुलसचिव :- 47

३६. स्वीय सहायक :- 47
३७. लघुलेखक (उच्चश्रेणी) :- 48
३८. लघुलेखक (निम्नश्रेणी) :- 48
३९. प्रक्षेत्र सहायक व कृषि सहायक :- 48
४०. मंत्रज्ञ तथा तारतंत्री :- 49

३.२ सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग 50
अ) रेशीम संचालनालय 50
१. संचालक (रेशीम):- 50
२. उपसंचालक (रेशीम):- 51
३. सहायक संचालक (रेशीम):- 51
४. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी–२) :- 51
५. वरिष्ठ तांत्रिक सहायक :- 52

३.३. वित्त विभाग 53
अ) वस्तू व सेवाकर कार्यालय :- 53
१.ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी :- 53
२.राज्यकर निरीक्षक (गट–ब अराजपत्रित) :- 54
३.महाव्यवस्थापक :- 55
४.व्यवस्थापक :- 55
ब) विमा संचालनालय, मुंबई 56
५.सहायक विमा संचालक :- 56
६.कनिष्ठ तांत्रिक अधिकारी :- 56
७.तांत्रिक सहायक :- 57

३.४ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग 58
अ) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा 59
१. तांत्रिक अधिकारी (गट–ब राजपत्रित) :- 59
२. शिधावाटप अधिकारी/ मुख्य निरीक्षण अधिकारी :- 59
३. सहायक शिधावाटप अधिकारी:- 60
४. शिधावाटप निरीक्षक :- 60
ब) नियंत्रक वैधमापनशास्त्र 61
५. सह नियंत्रक :- 61
६. उप नियंत्रक :- 61
७. निरीक्षक :- 62
८. क्षेत्र सहायक :- 62

३.५ सामान्य प्रशासन विभाग 64
१.सह सचिव :- 68
२. वरिष्ठ स्वीय सहायक :- 69
३. निम्नश्रेणी लघुलेखक :- 70
४. कक्ष अधिकारी :- 71

५. उच्चश्रेणी लघुलेखक :- 72
६. निम्नश्रेणी लघुलेखक :- 73
७. सहायक कक्ष अधिकारी :- 74
८. लघुटंकलेखक :- 75
९. लिपिक -टंकलेखक:- 75
ब) माहिती व जनसंपर्क:- 76
१०. जिल्हा माहिती अधिकारी :- 76
११. वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) :- 76
१२. वरिष्ठ उपसंपादक :- 77
१३. चलत छायाचित्रकार :- 78
१४. दुरदर्शन छायाचित्रकार :- 79
१५. सहायक संचालक (माहिती)/ माहिती अधिकारी/ अधीक्षक :- 79
१६. उप संपादक :- 80
१७. माहिती सहायक :- 81
१८. प्रतिवेदक :- 82
१९. उर्दु अनुवादक/ अनुवादक/ स्वागतकार : - 82
२०. छायाचित्रकार :- 83
२२. सहायक चित्रपट संकलक :- 84
२३. सिने यंत्रचालक :- 85
२४. कॅमेरा सहायक :- 86
२५. अंधार कोठडी परिचर :- 86
क) लोक आयुक्त कार्यालय :- 87
२६. सचिव :- 87
२७. सहायक प्रबंधक :- 88
२८. कक्ष अधिकारी :- 89
२९. सहायक कक्ष अधिकारी-: 90
३०. लिपिक टंकलेखक :- 90
ड) महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालय :- 91
३१. सहायक कक्ष अधिकारी :- 91
इ) सैनिक कल्याण विभाग:- 91
३२. संचालक:- 91
३३. उपसंचालक /जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / प्रभारी अधिकारी :- 92
ई) शासकीय परिवहन सेवा/ सह्याद्री अतिथीगृह/नंदगिरी अतिथीगृह :- 93
३४. नोंदणी पर्यवेक्षक :- 93
३५. मुख्य यांत्रिक :- 93
३६. नोंदणी लिपिक :- 94
३७. बटलर:- 94
३८. अकुशल कामगार (हमाल, धुलाई, शिपाई, स्वच्छक) :- 95
३९. सुरक्षा रक्षक :- 95
३.६ उच्च व तंत्र शिक्षण विभाग 97

अ) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) 99

१.कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ अधिक्षक/ व्यवस्थापक, गट-ब:- 99

२. सहायक ग्रंथपाल :- 100

३. प्रशासकीय अधिकारी:- 101

४.प्रोग्रामर :- 102

६. सहायक रासायनिक (चर्मकला) :- 103

समितीची शिफारस :- प्रस्तुत संवर्गाला ६व्या वेतन आयोगातील अनुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी ७व्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली आहे. तसेच संचालनालयअंतर्गत प्रशासकीय व शिक्षकेतर संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदांचा सुधारित आकृतीबंध/ आढावा वित्त विभागास सादर केला आहे. सदर आकृतीबंध /आढाव्यामध्ये सहायक रासायनिक (चर्मकला) या पदांना मृत संवर्गामध्ये समावेश करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे. विभागानेही संवर्गाच्या प्रस्तावाचे समर्थन केलेले नाही. प्रस्तुत संवर्गाच्या मंजूर वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आढळत नाही. 103

७. कर्मशाळा निदेशक/ प्रयोगशाळा सहायक (तांत्रिक)/ निदेशक :- 104

८.प्रयोगशाळा सहायक (अतांत्रिक) :- 105

९.सहायक ग्रंथपाल :- 105

(क) (१) पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर 106

११.कायदा अधिकारी :- 106

(क)(२) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती 107

१२.उपकुलसचिव :- 107

१३.सहायक कुलसचिव :- 108

१४.सांख्यिकी सहायक :- 109

(क)(४) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड 109

१५.सहायक कुलसचिव :- 109

१६.उप अभियंता (स्थापत्य)/ (विद्युत) :- 110

१७.उच्चश्रेणी लघुलेखक :- 111

१८.निम्नश्रेणी लघुलेखक :- 111

१९. निवडश्रेणी लघुलेखक 112

(क)(६) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे 112

२०.डाटा एंट्री ऑपरेटर श्रेणी-२ :- 112

३.७ गृह विभाग 114

अ)पोलीस महासंचालक:- 117

१) पोलीस निरीक्षक:- 117

२. पोलीस शिपाई :- 118

३. स्वीय सहायक (राजपत्रित) (गट-ब) :- 118

ब) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे 119

४. कार्यदेशक/ छायाचित्रकार :- 119

५. छायाचित्रकार :- 119

६. सहायक छायाचित्रकार :- 120

क) पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई 120

७. वरिष्ठ लिपिक :- 120

ड) संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि शासकीय रासायनिक विश्लेषक 121

८. संचालक :- 121

९. उपसंचालक (गट-अ) :- 121

१०. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी गट-अ :- 121

११. लेखा अधिकारी गट-अ :- 122

१२. सहायक रासायनिक विश्लेषक व इतर ६ संवर्ग :- 122

१३. प्रशासकीय अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी (भांडार) गट-ब :- 123

१४. अधिक्षक/ अधिक्षक (भांडार) गट-ब (अराजपत्रित) :- 123

१५. लिपिक-टंकलेखक :- 123

इ) कारागृह महानिरीक्षक, पुणे 124

१६. वरिष्ठ प्रशासन अधिकारी :- 124

१७. स्वीय सहायक / प्रशासन अधिकारी/ रचना व कार्यपध्दती अधिकारी:- 124

१८. पर्यवेक्षक:- 124

१९. निदेशक :- 125

फ) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क 125

२०. उप अधीक्षक :- 125

२१. दुय्यम निरीक्षक :- 126

२२. सहायक दुय्यम निरीक्षक :- 127

ग) परिवहन आयुक्त 127

२३. अपर परिवहन आयुक्त :- 127

२४. परिवहन सह आयुक्त :- 128

२५. प्रादेशिक परिवहन अधिकारी :- 129

२६. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी :- 130

२७. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी :- 130

२८. मोटर वाहन निरीक्षक :- 131

२९. सहायक मोटर वाहन निरीक्षक :- 132

३.८ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग 133

अ) उद्योग संचालनालय 135

२. अधिक्षक :- 135

ब) मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय 136

३. अंतर्गत प्रशिक्षण अधिकारी/उपव्यवस्थापक/ व्यवस्थापक (लहान मुद्रणालय) :- 136

४. आस्थापना अधिकारी :- 137

७. सहायक संचालक :- 138

८. कला कार्याधिकारी :- 138

९. कार्यालय अधिक्षक :- 138

१०. रवरी ठसेकार :- 139

क) कामगार आयुक्त 139

ड) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य 140

१२. संचालक :- 140

१४. सह संचालक :- 140

१५.उप संचालक :- 141
१६.सहायक संचालक :- 141
इ) मुख्य विद्युत निरीक्षक (निरीक्षण व शुल्क शाखा) 142
१७.सहायक अभियंता श्रेणी -२:- 142
१८.शाखा अभियंता :- 142
१९.कनिष्ठ अभियंता :- 143
ण) औद्योगिक न्यायालय 144
२०.प्रबंधक/ अपर प्रबंधक/उपप्रबंधक/ क.अ. अधिकारी/ तसेच सचिव/सह सचिव (वर्ग-२) :- 144

३.९ विधि व न्याय विभाग 145
अ)उच्च न्यायालय, मुंबई 147
१.वाहन चालक:- 147
ब) जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय (ग्रामीण):- 148
२.पुस्तक बांधणीकार :- 148
क) कौटुंबिक न्यायालय 148
३. विवाह समुपदेशक :- 148
ड) धर्मादाय आयुक्त 149
४. धर्मादाय सह आयुक्त (गट अ) :- 149
५. सहायक धर्मादाय आयुक्त (गट अ) :- 149
६. प्रशासकीय अधिकारी गट-ब :- 150
७. अधिक्षक (गट-ब) :- 151
८. निरीक्षक (गट-क) :- 152
ड) निबंधक, भागिदारी संस्था 152
९. सहायक निबंधक (गट-ब) :- 152
इ) विधि व न्याय विभाग, मंत्रालय (खुद्द) (विधि संवर्ग) 153
१०. विधि सल्लागार नि-सह सचिव :- 153
११. सॉलिसिटर नि-सह सचिव :- 153
१२. सह सचिव (विधि) :- 153
१३. उप विधि सल्लागार-नि-उप सचिव :- 154
१४. उप सचिव (विधि) :- 154
१५. सॉलिसिटर (भु.वि.) -नि-उप सचिव :- 154
१६. सहायक सॉलिसिटर-नि-उप सचिव :- 154
१७. सहायक विधि सल्लागार-नि-अवर सचिव :- 155
१८. अवर सचिव (विधि) :- 155
१९. अधीक्षक (विधि) :- 156
२०. सहायक (विधि) :- 156
फ) महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण 157
२१. अधिक्षक (विधि) :- 157
२२. कक्ष अधिकारी/ आस्थापना अधिकारी :- 157

३.१० मराठी भाषा विभाग 159

अ)भाषा संचालनालय 160

१.भाषा संचालक :- 160

२.भाषा उपसंचालक (वा.द.स)/ भाषा उपसंचालक (विधि):- 160

३.सहायक भाषा संचालक :- 161

४.पर्यवेक्षक गट-क :- 161

५. अनुवादक गट-क :- 161

ब)महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ 162

३.५१ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग 163

अ)वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय 165

२.मुख्य प्रशासकीय अधिकारी (गट-अ) :- 166

३. प्राध्यापक तथा उपप्राचार्य :- 167

६.सार्वजनिक आरोग्य परिचारिका :- 168

७. बालरोग तज्ज्ञ परिसेविका :- 169

८. मनोरुग्णतज्ज्ञ परिसेविका :- 169

९. प्राध्यापक :- 170

१०. सहयोगी प्राध्यापक :- 170

११.जीवरसायनशास्त्रज्ञ (गट-ब) :- 170

१२. प्रशासकीय अधिकारी गट-ब :- 171

१३. अधिव्याख्याता /सहायक प्राध्यापक:- 171

१४. पाठ्यनिर्देशिका :- 172

१५. समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय)/ समाजसेवा अधीक्षक (मनोविकृती) :- 172

१६. आहारतज्ज्ञ :- 173

१७. क्ष-किरण तंत्रज्ञ :- 173

१८. ई.सी.जी. तंत्रज्ञ :- 174

१९.परिसेविका :- 174

२०. अधिपरिचारीका :- 175

२१. कलाकार/ छायाचित्रकार :- 175

२२.ग्रंथपाल :- 176

२३. विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ :- 176

२४. दंत तंत्रज्ञ :- 177

२५. दंत आरोग्य तज्ज्ञ :- 178

२६. स्वच्छता निरीक्षक :- 178

२७. दूरध्वनी चालक :- 179

२८. भांडारपाल/ वस्त्रपाल :- 179

२९. शिंपी :- 180

३०. लोहारी, सुतार, बागकाम परीचर, नळ कारागीर :- 180

३१. लिपिक-टंकलेखक :- 181

ब) आयुष संचालनालय 181

३२. सहायक संचालक,आयुष गट-ब :- 181

३३. जिल्हा आयुष अधिकारी :- 182

२४. प्रशासकीय अधिकारी गट-ब :- 182

३.१२ इतर मागास व बहुजन कल्याण विभाग 184

अ)इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे 184

१.वसतीगृह अधीक्षक-: 184

३.१३ नियोजन विभाग 186

अ) अर्थ व सांख्यिकी संचालनालय 185

१. अपर संचालक :- 185

२. सह संचालक :- 187

३. उप संचालक :- 188

४. संशोधन अधिकारी :- 189

५. सहायक संशोधन अधिकारी :- 189

६. सांख्यिकी सहायक :- 190

७. अन्वेषक :- 190

३.१४ सार्वजनिक आरोग्य विभाग 192

अ) आरोग्य सेवा संचालनालय 196

१. उपसंचालक (वाहतूक) :- 196

२. जिल्हा आरोग्य अधिकारी :- 197

३. जिल्हा शल्य चिकित्सक:- 197

४. वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्ग :- 198

५. सहाय्यक संचालक (वाहतूक) :- 199

६. मुख्य प्रशासकीय अधिकारी :- 199

७. वैद्यकीय अधिकारी गट- अ :- 200

८. वैद्यकीय अधिकारी गट-ब :- 200

९. सांख्यिकी अधिकारी :- 201

१०. जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी (गट -ब) :- 202

११. जिल्हा हिवताप अधिकारी संवर्ग :- 202

१२. सार्वजनिक आरोग्य परिचारिका निर्देशिका :- 203

१३. पाठ्यनिर्देशिका :- 203

१४. सेवा व्यवस्थापक/ भांडार अधिकारी :- 204

१५. आरोग्य साधनसामग्री देखभाल अधिकारी (गट ब):- 204

१६. जीव वैद्यकीय अभियंता सामान्य राज्य सेवा गट :- 205

१७. अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-क) :- 205

१८. समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय):- 206

१९. समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) :- 206

२०. व्यवसायोपचार तज्ञ :- 207

२१. अधिक्षक :- 207

२२. परिसेविका :- 208

२३. बालरुग्ण तज्ञ परिचारीका :- 208

२४. आहारतज्ञ :- 209

२५. ई.सी.जी. तंत्रज्ञ :- 209
२६. आरोग्य पर्यवेक्षक :- 209
२७. सहायक अधिक्षक :- 210
२८. अधिपरिचारीका :- 210
२९. क्ष-किरण तंत्रज्ञ :- 211
३०. प्रयोगशाळा तंत्रज्ञ :- 211
३१. रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी :- 212
३२. औषध निर्माता :- 212
३३. अभिलेखापाल :- 213
३४. नेत्र चिकित्सा अधिकारी :- 213
३५. आरोग्य निरीक्षक :- 214
३६. वरिष्ठ लिपिक :- 214
३७. दंत आरोग्यक :- 215
३८. सांख्यिकी अन्वेषक :- 215
३९. दंतयांत्रिकी व दंत तंत्रज्ञ :- 216
४०. लिपिक नि टंकलेखक :- 216
४१. अर्धकुशल कारागीर :- 217
४२. पुरुष परिचर (मनोरुग्णालय) :- 217
४३. अकुशल कारागीर :- 217
४४. अकुशल कारागीर (तांत्रिक) :- 218

३.१५ सार्वजनिक बांधकाम विभाग 219
१ विशेष अधीक्षक :- 220
३ आरेखक श्रेणी-१ :- 221
५.प्रथम लिपिक:- 222
८.कनिष्ठ लिपिक :- 224
९.लिपिक-टंकलेखक:- क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक संवर्ग 224
ब)मुख्य अभियंता विद्युत 225
१०.तारतंत्री :- 225
क) संचालक, उपवने व उद्याने 225
११.संचालक :- 225
१४. उद्यान पर्यवेक्षक :- 227
ड) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन 227
१६.सहायक कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ :- 229

३.१६ महसूल व वन विभाग 229
अ)महसूल विभाग 231
१.नायब तहसीलदार :- 231
२.मंडळ अधिकारी (गट-क) :- 231
३.तलाठी (गट-क) :- 232
४.महसूल सहायक (गट-क) :- 232

घ) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख 233
६.जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेखः- 234
७.उपअधीक्षक भूमी अभिलेखक /नगर भूमापन अधिकारीः- 234
८.मुख्यालय सहायक/ शिरस्तेदार/ वरिष्ठ लिपिक :- 235
९.परिरक्षण भूकरमापक :- 235
१०.भूकरमापक /कनिष्ठ लिपिकः- 236
च)नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक अधिक्षक 236
११.मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय)/(अतिरिक्त नोंदणी महानिरीक्षक) :- 236
१२.नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक :- 237
१३.सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी :- 238
१४.सहदुय्यम निबंधक वर्ग-२/ सह जिल्हा निबंधक वर्ग-२/ मुद्रांक उपअधिक्षक :- 238
१५.दुय्यम निबंधक श्रेणी-1/ मुद्रांक निरीक्षक :- 238
१६.वरिष्ठ लिपिक/ पर्यवेक्षक :- 239
छ) मुख्य वन संरक्षक 239
१७.मुख्य वन सांख्यिक :- 239
१८.वनसांख्यिक :- 240
१९.वनक्षेत्रपालः- 240
२०. शाखा अभियंता :- 241
२१.सहायक अभियंताः- 242
२२.कनिष्ठ अभियंता :- 242
२५.लेखापालः- 244
२६.वनपाल :- 245
२७.वनरक्षक :- 245

३.१४ ग्राम विकास विभाग 247
१.शाखा अभियंता/ (वर्गवारी पद) सहायक अभियंता श्रेणी-२ :- 249
२.कनिष्ठ अभियंता :- 250
३.स्थापत्य अभियांत्रिकी :- 250
४.कृषी अधिकारी गट क तांत्रिक-: 251
५.सहायक गट विकास अधिकारी गट-ब :- 251
६.विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ :- 252
७.विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३:- 252
८.जिल्हा परिषद पदवीधर शिक्षक :- 253
९.सहायक लेखा अधिकारी (जिल्हा परिषद सेवेतील) :- 254
११.सहायक प्रशासन अधिकारी :- 256
१२.आरोग्य पर्यवेक्षक तथा विस्तार अधिकारी आरोग्य :- 256
१३.प्रयोगशाळा तंत्रज्ञ :- 257
१४.कनिष्ठ प्रशासन अधिकारी :- 257
१५.जिल्हापरिषद प्राथमिक शिक्षक :- 258
१६. औषध निर्माता :- 259
१७.आरोग्य सहाय्यिका (LHV) :- 259

१८.आरोग्य सहायक तथा आरोग्य निरीक्षक :- 259
१९. सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका (ए.एन.एम.) :- 260
२०. कनिष्ठ लिपिक (लेखा) :- 261
२८.ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी :- 262
२९.आरोग्य सेवक :- 262
३१.कनिष्ठ सहायक (लिपिक) :- 264
३२.पशुवैद्यकीय व्रणोपचारक :- 264
३३.शिपाई/ परिचर :- 255

३.१८ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग 266

अ) शिक्षण संचालनालय 268
१.प्राचार्य (अध्यापक विद्यालयातील शिक्षक) :- 268
२.केंद्रप्रमुख :- 268
३.प्रशिक्षित पदवीधर शिक्षक :- 269
४.लघुपदेशक :- 270
५.मुख्य लिपिक :- 270
६.संगीत शिक्षक :- 270
७.ग्रंथपाल (पदवीधर व ग्रंथशास्त्रातील पदवी अथवा पदविका) :- 271
८.ग्रंथपाल (अशासकीय माध्यमिक शाळेतील मॅट्रीक व ग्रंथालयाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र) :- 271
९.प्रयोगशाळा सहायक :- 271
१०.वरिष्ठ लिपिक :- 272
११.प्रयोगशाळा परिचर :- 272
१२.कनिष्ठ लिपिक :- 273
ब) शिक्षण आयुक्तालय, पुणे 273
१३.विधि अधिकारी :- 273
१४.महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (प्रशिक्षण शाखा) /अधिव्याख्याता :- 274
१५.अधीक्षक, साखरे (गट-क) :- 274
१६.तबला वादक :- 275

३.१९ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग 276

अ)व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय 276
१.उपसंचालक :- 276
२.सहायक संचालक :- 277
३.सहायक आयुक्त (गट-अ) :- 278
४.ग्रंथपाल :- 278

३.२० सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग 280
१.ग्रंथपाल सहायक :- 280

३.२१ आदिवासी विकास विभाग 281
अ) आदिवासी आश्रम शाळा 282

१. माध्यमिक मुख्याध्यापक:- 282
२. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक:- 282
३.सहायक प्रकल्प अधिकारी:- 283
४. माध्यमिक शिक्षक:- 284
५.गृहपाल:- 285
६.अधिक्षक स्त्री-पुरुष:- 286
७.प्राथमिक शिक्षक:- 286
८. ग्रंथपाल (गट-क):- 287
९.वरिष्ठ लिपिक :- 288
१०. प्रयोगशाळा सहायक (गट-क):- 288
११.कनिष्ठ लिपिक/ लिपिक-टंकलेखक : 289
१२. प्रयोगशाळा परिचर:- 290
आ) नगररचना व मूल्य निर्धारण संचालनालय 291
१. सहायक नगर रचनाकार (श्रेणी-१) :- 291
२. सहायक नगर रचनाकार (श्रेणी-२) :- 292
३. रचना सहायक :- 293

३.२३ जलसंपदा विभाग 294
अ) पाटबंधारे विभाग, मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना व सर्व प्रादेशिक मंडळे 296
१.वरिष्ठ भूवैज्ञानिक :- 296
२.वैज्ञानिक अधिकारी :- 296
३.वरिष्ठ वैज्ञानिक सहायक :- 296
४.सहायक भूवैज्ञानिक (वर्ग-२) :- 297
५.प्रमुख आरेखक :- 298
६.भू वैज्ञानिक सहायक (वर्ग-३) :- 298
७.आरेखक श्रेणी-१ :- 298
८.वरिष्ठ लिपिक :- 299
९.संदेशक :- 299
१०.दप्तर कारकून/ कालवा निरीक्षक/ मोजणीदार:- 300
११.चालक, ऑपरेटर, बिनतारी संदेश यंत्रचालक :- 301

३.२४ पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग 302
अ)संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा 304
१.अतिरिक्त संचालक :- 304
२.सहसंचालक:- 305
३.सहसंचालक (अभियांत्रिकी) :- 305
४.उपसंचालक:- 306
५.मुख्य भूभौतिकतज्ञ:- 306
६.मुख्य खोदन अभियंता:- 306
७.वरिष्ठ खोदन अभियंता:- 307
८.वरिष्ठ भूवैज्ञानिक:- 307

९.वरिष्ठ रसायनी:- 308

१०.वरिष्ठ भूभौतिकतज्ञ:- 308

११.प्रशासन अधिकारी:- 309

१२.सहायक भूवैज्ञानिक:- 309

१४.सहायक रसायनी:- 310

१५.सहायक भूभौतिकतज्ञ :- 310

१७.शाखा अभियंता:- 311

१८.सहायक प्रशासन अधिकारी:- 312

१९.कनिष्ठ रसायनी:- 312

२०.भौगोलिक प्रणाली अधिकारी:- 312

२१.कनिष्ठ अभियंता:- 313

२२.कार्यालय अधिक्षक:- 313

२३.तांत्रिक अधिकारी:- 314

२४.भौगोलिक प्रणाली माहिती वरिष्ठ सहायक:- 314

२५.वरिष्ठ लिपिक:- 315

२६.सर्वेक्षक:- 315

२७.भौगोलिक माहिती प्रणाली सहायक:- 316

२८.कनिष्ठ लिपिक:- 316

२९.प्रयोगशाळा सहायक:- 316

३.२५ महिला व बाल विकास विभाग 318

अ) महिला व बाल विकास आयुक्तालय 318

१. जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण), अधिक्षक शासकीय संस्था व तत्सम गट-ब (राजपत्रित) संवर्ग :- 318

३.२६ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय 320

१. प्रतिवेदक (निवडश्रेणी):- 321

२. कार्यवाही संपादक:- 322

३.प्रतिवेदक (वरिष्ठ):- 322

४. उप कार्यवाही संपादक:- 323

६. मुख्य अनुवादक तथा सहायक कार्यवाही संपादक :- 324

७. पर्यवेक्षक :- 325

८. अनुवादक:- 326

९. अनुवादक तथा संपादन सहायक:- 326

१०.फितध्वनीमुद्रक:- 326

१२. ध्वनी यंत्रणा चालक:- 327

३.२७ वाहनचालक संवर्ग 329

१. वाहनचालक संवर्ग :- 329

प्रकरण –४ 331

समितीची प्रशासकीय सुधारणासंबंधी टिप्पणी व सादरीकरण 331

**KEY LEARNINGS AND WAY FORWARD** 331

*In general* 331

*Verification using Sevarth* 331

*On HR tools* 332

*Approach to reform and way forward* 333

Stream A - Developing an integrated database with ease of implementation and monitoring 333

Stream B - Removing distortions while updating HR tools 334

*Conclusion* 335

सादरीकरण :- 337

ऋणनिर्देश :- 338

जोडपत्रे 340

जोडपत्र –अ 341

समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले प्रशासकीय विभागप्रमुख/विभागप्रमुख आणि अधिकारी/कर्मचारी संघटना 341

रिक्त पान

# वेतन त्रुटी निवारण समितीची नियुक्ती व आनुषंगिक शासन निर्णय

सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतन त्रुटी निवारण समिती २०२४ ची स्थापना.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : वेपुर -११२३/प्र.क्र.१७/सेवा-९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- १६ मार्च, २०२४

वाचा :- शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९,
दिनांक ३० जानेवारी, २०१९

**प्रस्तावना :-** सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेच्या अनुषंगाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना उपरोक्त दिनांक ३० जानेवारी, २०१९ च्या शासन अधिसूचनेमध्ये दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतनश्रेणी विहित करण्यात आली आहे.

मा. न्यायालयाच्या आदेशानुसार, सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने तपासणी करुन शिफारशी करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तपासणी करुन त्याबाबत शिफारशी करण्याकरीता पुढीलप्रमाणे वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ ची स्थापना करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. श्री. मुकेश खुल्लर<br>राज्य शासनाचे सेवा निवृत्त अपर मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. अपर मुख्य सचिव (सेवा)<br>सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| ३. अपर मुख्य सचिव (व्यय)<br>वित्त विभाग | सदस्य |

२. सदर समितीच्या कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहतील :-

(अ) ज्या संवर्गांच्या संदर्भात न्यायालयाने उपरोक्त प्रमाणे आदेश दिले असतील अशा संवर्गांच्या वेतनश्रेणीतील त्रुटींचा सखोल अभ्यास करुन अहवाल सादर करणे.

(ख) प्रशासकीय विभागाकडून एखाद्या विशिष्ट संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीमधील त्रुटी संदर्भात सादर होणाऱ्या प्रकरणांची तपासणी करणे.

(क) समितीने नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपला अहवाल शासनास सादर करण्यात यावा. या कामासाठी समिती आपली कार्यपध्दती स्वतः ठरवील.

३. एखाद्या विशिष्ट संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आहेत असे प्रशासकीय विभागाच्या सचिवांना / विभागप्रमुखांना ज्या प्रकरणी वाटेल ती प्रकरणे त्यांनी केंद्र शासनाकडील समतुल्य पद त्यांची सुधारणापूर्व वेतनश्रेणी आणि सुधारीत वेतनश्रेणी सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊन तपासाव्यात व तपासणीअंती अशा प्रकरणामध्ये त्रुटी आहे असे त्यांची खात्री झाल्यास, त्यासंबंधीचे प्रस्ताव (४ प्रतीत) योग्य त्या समर्थनासह हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत समितीकडे पाठवावे.

४. शासकीय कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त संघटनेस / महासंघास काही संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील त्रुटी बाबत निवेदने सादर करावयाची झाल्यास ती संबंधित प्रशासकीय विभागामार्फत सादर करावीत व प्रशासकीय विभागाने या निवेदनाची तपासणी करुन वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्यानुसार आपल्या शिफारशीसह प्रस्ताव समितीच्या विचारार्थ सादर करावेत.

५. समिती आपल्या कामासाठी स्वतःची कार्यपध्दती ठरवील आणि नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०३१६१५०६०८८९०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMASWAMI
N

(डॉ. रामास्वामी एन.)
सचिव, (ले. व को.)

प्रति

| | |
|---|---|
| मा. राज्यपालांचे सचिव | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई |
| मा. मुख्यमंत्री यांचे सचिव | सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, |
| मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव | लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, |
| सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव | मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद. |
| विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता | मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका |
| सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई | कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, |
| मंत्रालयीन सर्व विभाग | खडकी / देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर. |
| मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिनस्त कार्यालय | कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. |

| | |
|---|---|
| विभाग प्रमुख<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.<br># सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.<br># सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.<br># प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.<br># प्रमुख राज्य माहिती आयोग, (सर्व)<br># सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई.<br># प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्याय प्राधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.<br>राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.<br>सर्व विभागीय आयुक्त,<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवार, पुणे | जिल्हा अहमदनगर<br>कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी<br>कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला<br>कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.<br>कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, नागपूर.<br>कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.<br>कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद<br>कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड<br>कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती<br>कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई |

सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीतील
त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतन त्रुटी
निवारण समिती २०२४
मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.४७/सेवा-९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ११ सप्टेंबर, २०२४

पहा :- शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.४७/सेवा-९, दि.१६.०३.२०२४

प्रस्तावना :-

सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तपासणी करुन त्याबाबत शिफारशी करण्याकरिता तसेच मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या इतर संवर्गांच्या सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या त्रुटींची तपासणी करुन शिफारशी करण्यासाठी वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ ची स्थापना करण्यात आली आहे.

सदर समितीस अहवाल सादर करण्याकरिता नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांची (दि.१५ सप्टेंबर, २०२४ पर्यंत) मुदत देण्यात आली आहे. समितीचे कामकाज अद्याप सुरु आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करुन अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तपासणी करुन त्याबाबत शिफारशी करण्याकरिता तसेच मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या इतर संवर्गांच्या सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या त्रुटींची तपासणी करुन शिफारशी करण्यासाठी वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ ला आपला अहवाल सादर करण्यासाठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०९११५४४७२५१२०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.अ.धोत्रे)
उप सचिव, वित्त विभाग

प्रति

| | |
|---|---|
| मा. राज्यपालांचे सचिव<br>मा. मुख्यमंत्री यांचे सचिव | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, |

| | |
|---|---|
| मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता<br>सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील<br>विभाग प्रमुख<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.<br>#सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.<br># सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.<br>#प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे<br>कार्यालय,मुंबई.<br># आयुक्त राज्य माहिती आयोग, (सर्व)<br># सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई.<br># प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,<br>मुंबई/नागपूर/औरंगाबाद.<br>राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.<br>सर्व विभागीय आयुक्त,<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवार, पुणे | लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक,<br>मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद,<br>मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका<br>कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड,<br>खडकी / देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर,<br>कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,<br>राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर<br>कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी<br>कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला<br>कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,<br>जिल्हा रत्नागिरी.<br>कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई<br>कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.<br>कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा<br>विद्यापीठ, औरंगाबाद<br>कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा<br>विद्यापीठ, नांदेड<br>कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती<br>कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी<br>महिला विद्यापीठ, मुंबई |

सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीतील
त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतन त्रुटी
निवारण समिती २०२४
मुदतवाढ देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- २६ नोव्हेंबर, २०२४

वाचा :- १. शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९, दि.१६.०३.२०२४
२. शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९, दि.११.०९.२०२४

प्रस्तावना :-

सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तपासणी करुन त्याबाबत शिफारशी करण्याकरिता तसेच मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या इतर संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या त्रुटींची तपासणी करुन शिफारशी करण्याकरिता वरील क्र.१ येथील आदेशान्वये वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ ची स्थापना करण्यात आली आहे.

सदर समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील क्र.२ येथील शासन निर्णयान्वये दि.३१ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत मुदत देण्यात आलेली आहे. तथापि, समितीस अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तपासणी करुन त्याबाबत शिफारशी करण्याकरिता तसेच मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या इतर संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या त्रुटींची तपासणी करुन शिफारशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ ला आपला अहवाल सादर करण्यासाठी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४११२६१६१२२९२१०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.अ.धोत्रे)
उप सचिव, वित्त विभाग

प्रति

| | |
|---|---|
| मा. राज्यपालांचे सचिव<br>मा. मुख्यमंत्री यांचे सचिव | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, |

मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिपत्याखालील
विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
# प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
# आयुक्त राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
# प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, पुणे

लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्ड, खडकी / देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर.
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, नागपूर.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई

सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीतील
त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतन त्रुटी
निवारण समिती २०२४
मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २७ डिसेंबर, २०२४

पहा :- १. शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९, दि.१६.०३.२०२४
२. शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९, दि.११.०९.२०२४
३. शासन निर्णय क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९, दि.२६.११.२०२४

प्रस्तावना :-

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरिता संदर्भ १) येथील आदेशान्वये वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ ची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी संदर्भ क्र.३ अन्वये दि.३०.११.२०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत आता संपली असून, समितीचे कामकाज अद्याप चालू आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करुन अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरिता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ ला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि. ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२४१२२६१२४०४००१०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. अ. धोत्रे)
उप सचिव, वित्त विभाग

प्रति

| | |
|---|---|
| मा. राज्यपालांचे सचिव<br>मा. मुख्यमंत्री यांचे सचिव<br>मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>अर्थ जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक,<br>मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद. |

| | |
|---|---|
| विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता | मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका |
| सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई | कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्ड, |
| मंत्रालयीन सर्व विभाग | खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर. |
| मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख | कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. |
| प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई. | जिल्हा अहमदनगर |
| प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई. | कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. | कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला |
| सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई. | कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी. |
| प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई. | कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, नागपूर. |
| आयुक्त राज्य माहिती आयोग, (सर्व) | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे. |
| सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई. | कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर |
| प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद. | कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई. | कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड |
| सर्व विभागीय आयुक्त. | कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| सर्व जिल्हाधिकारी | कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती |
| सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा. | कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई |
| महासंचालक, यशदा, राजभवन आवार, पुणे | |

पृष्ठ ३ पैकी ३